SPEAK | READ | WRITE

# माय मराठी २
# My Marathi 2



पाठ्यपुस्तक | TEXTBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI





Suhas Limaye
Madhuri Purandare



UNIVERSITY OF MUMBAI
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

सुहास लिमये / Suhas Limaye
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide
सोनाली गुजर / Sonalee Gujar

# माय मराठी २
# My Marathi 2

पाठ्यपुस्तक / Textbook for Communicative Marathi

**संपादक / Editors**
विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

संकल्पना, निर्मिती आणि प्रकाशन / Concept, Production & Publication

University of Mumbai

मुंबई विद्यापीठ / University of Mumbai

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

ISBN 978-93-5291-443-2

First Edition, 2019

पहिली आवृत्ती, २०१९

क्रिएटिव्ह कॉमन्स अॅट्रिब्यूशन – शेअरअलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0) ह्याअन्वये उपलब्ध
Published under Creative Commons Attribution – ShareAlike license (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

**प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinator**

विभा सुराणा / Vibha Surana

**लेखक / Authors**

सुहास लिमये / Suhas Limaye

माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare

ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide

सोनाली गुजर / Sonalee Gujar

**संपादक / Editors**

विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

**सहलेखक / Co-authors**

गिरिजा गोंधळेकर / Girija Gondhalekar, भारती केळकर / Bharati Kelkar, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale,
गिरिषा टिळक / Girissha Tilak, जुईली वैद्य / Juilee Vaidya, शिवानी वैद्य / Shivani Vaidya,
तुषार घाटे / Tushar Ghate, गायत्री भिडे / Gayatri Bhide, प्राची शर्मा / Prachi Sharma,
मानसी सामंत / Manasi Samant, अलकनंदा काळे / Alaknanda Kale, मधुरा जोशी / Madhura Joshi
अपर्णा वैद्य / Aparna Vaidya, प्रभव सखदेव / Prabhav Sakhdeo, अक्षय पराडकर / Akshay Paradkar

**संपादकीय मंडळ / Editorial Team**

मेहेर भूत / Meher Bhoot, प्र॰ ना॰ परांजपे / P. N. Paranjape, प्रतिभा गोपुजकर / Pratibha Gopujkar,
भारती केळकर / Bharati Kelkar, जमीर कांबळे / Zameer Kamble,
गुरुनाथ कलमकर / Gurunath Kalamkar, जुईली म्हात्रे / Jueli Mhatre, सायली थारळी / Sayali Tharali

**मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / Technical Support for Marathi**

मस्त रेडिओ, कन्फ़ुशिअस इंस्टिट्युट, (गुरुनाथ कलमकर) मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ

**कला, मांडणी, चित्रे / छायाचित्रे / अक्षर जुळणी - Layout Design / Photos / Typesetting**

संदीप देशपांडे, पुणे / Sandeep Deshpande, Pune

**प्रकाशन / Publication**

मुंबई विद्यापीठ / University of Mumbai,

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

**संकेतस्थळ / Website Address**

https://www.learn-marathi.com

rmvs.maharashtra.gov.in

**ई-पत्ता / E-mail**

rmvs_mumbai@yahoo.com

Online access link: https://mu.ac.in/mymarathi2

**Textbook, Workbook, Glossary and 1 Free DVD**

INR 1250 | $25 | €20

# प्रस्तावना

भारतीय अन्यभाषक, त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे द्वितीय पातळीचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतीशील आणि निर्मितीक्षम अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्यापन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने तीन पुस्तके आहेत, १) डीव्हीडीसहित पाठ्यपुस्तक, २) सराव, चाचणी, ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक आणि ३) मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह.

'माय मराठी, पातळी २'च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणी, समर्पक अर्कचित्रे, विषयानुसार येणारी अतिरिक्त शब्दसंपदा आणि दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्‌श्राव्य चित्रफिती आहेत. तसेच सर्वच धड्यांची रचना विद्यार्थ्यांना समजेल अशी आहे. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्‌श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे.

'माय मराठी, पातळी २'च्या अभ्यासपुस्तकात १) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्याखाली स्वाध्याय आहेत. त्यासोबतच २) पातळी १च्या उजळणीसाठी 'मागील भागात' हा सरावाचा धडा, ३) प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी प्रश्नावली, शेवटी ४) संपूर्ण पातळी २च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी, ५) ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे लिखित मजकूर आणि ६) उत्तरे यांचा समावेश आहे.

ग्लॉसरी म्हणजे शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे.

संवादात्मक मराठीच्या पातळी २चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

सोबत जोडलेली दृक्‌श्राव्य डीव्हीडी ह्या अध्यापन सामग्रीसोबत विनामूल्य देण्यात येणार आहे कारण हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या डीव्हीडीमध्ये श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्‌श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी सुचवलेल्या उत्तरासहची प्रश्नावली घेताना तसेच इतर प्रश्नोत्तरांच्या वेळी ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी शिक्षकांसाठी असणाऱ्या भाषा-प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे; तसेच, ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापनसामग्री तयार करण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागला असून त्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपियन भाषा आहे. ह्या भाषेचे अध्यापन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान ६ पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. पुढील चार पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरले जाणारे मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवले जाणार आहेत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेच्या सुशान्त देवळेकर आणि कादंबरी भंडारे यांचेही आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापाठाच्या अधिकाऱ्यांचे आम्ही आभारी आहोत. हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**विभा सुराणा आणि आनन्द काटीकर**

संपादक

# Preface

My Marathi Level 2 is a Marathi course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, action and task based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of the Marathi language systematically and effectively by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of three books, namely 1) a Textbook with a DVD, 2) a Workbook with exercises, tests, transcripts of audios and answer keys and 3) a Marathi Glossary in English and Hindi.

This particular Textbook of 'My Marathi Level 2' consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with exercises, vocabulary as per topics (shabdsampada), vocabulary as per chapters (drishtikshep), as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual DVD attached to it.

The Workbook of 'My Marathi Level 2' consists of 1) exercises for each chapter as well as the following regular tests 2) a comprehensive test for level 1 after mageel bhagat, 3) a test after every two chapters 4) a comprehensive test for level 2 5) transcripts of audios from the textbook and 6) answer keys.

The Glossary or shabdasangraha gives a detailed list of difficult words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms. English and Hindi word meanings are given along with the usage of these words in sentences.

The entire Communicative Marathi Level 2 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also more exercises as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to learn to speak

correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary.

The audio-visual DVD at the end comes free with the book and is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editor or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. It has taken three years of sustained intensive work to prepare this material and we are extremely thankful to the entire team for making it happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for further 4 levels for learning Marathi is a daunting task ahead of us. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to Sushant Devlekar and Kadambari Bhandare from Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable inputs.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

**Vibha Surana and Anand Katikar**

Editors

# आभार / Acknowledgement


Abhijeet Ranadive

Aditya Badle

Amit Varandekar

Amruta Sudame

Anagha Mandavkar

Anil Sapkal

Anuradha Mishra

Ashish Sawant

Bharati Chhatre

Bharati Nirgudkar

Chaitali Nachanekar

Chandrakant Margaj

Dipti Tambe

Disha Gudulkar

Gauri Bramhe

Gurudutt Kamath

Isha Pandit

Kadambari Bhandare

Kamala Ganesh

Kavya Chintala

Kiran Sawant (M.U.S.T. Radio)

Manasi Samant

Manish Bawkar

Manjiri Paranjape

Mihir Kulkarni

Neha Thombare

Nirupama Joshi

Pradnya Dalvi

Prasanna Bhave

Prathmesh Jagtap

Pushpa Gavit

Ramji Tiwari

Sammati Balgi

Sandeep Avhad

Sanjay Deshmukh

Shaleen Sharama

Shrikant Pathak

Smita Shukla

Tanvi Paradkar

Vidya Pingle

**Permission from copyright holders**

ABP Maza

Ajit Padgaonkar

Charuhas Pandit
and Prabhakar Wadekar
(For 'Chintu' cartoon strips)

Geeta Gramopadhye

Girish Kuber

Jayawant Kakade

Kaushik Lele

Kesari Tours

Maharashtra Times

Narendra Badambe

Neha Badjatya

Nilesh Mayekar

Popular Prakashan

S. D. Phadnis

Sakal Today

Sanjay Raut

Sanjay Upadhye

Uday Karandikar

Vinda Karandikar

# व्याकरणिक पारिभाषिक संज्ञा

## Grammar Terminology

| | |
|---|---|
| नाम = Noun | लिंग = Gender एकवचन = Singular अनेकवचन = Plural |
| सामान्यरूपे = Oblique Forms | अकारान्त नाम = Noun ending with अ<br>आकारान्त नाम = Noun ending with आ<br>इकारान्त नाम = Noun ending with इ<br>ईकारान्त नाम = Noun ending with ई<br>उकारान्त नाम = Noun ending with उ<br>ऊकारान्त नाम = Noun ending with ऊ<br>एकारान्त नाम = Noun ending with ए<br>ओकारान्त नाम = Noun ending with ओ |
| विभक्ती = Case<br>प्रत्यय = Suffix | प्रथमा = Nominative द्वितीया = Accusative<br>तृतीया = Instrumental चतुर्थी = Dative पंचमी = Ablative<br>षष्ठी = Genitive / Possessive सप्तमी = Locative /<br>Prepositional अष्टमी / संबोधन = Vocative |
| सर्वनाम = Pronoun | पुरुष = Person<br>प्रथम पुरुष = First Person<br>द्वितीय पुरुष = Second Person<br>तृतीय पुरुष = Third Person<br>दर्शक सर्वनाम = Demonstrative pronoun<br>सर्वनामांची षष्ठी = Possessive Case of Pronouns /<br>Possessive Pronouns |
| विशेषण = Adjective | विकारी विशेषणे = Adjectives with Declension<br>अविकारी विशेषणे = Adjectives without Declension |
| क्रियापद = Verb<br>धातू = Root | नियमित क्रियापदे = Regular Verbs<br>अनियमित क्रियापदे = Irregular verbs<br>अकर्मक क्रियापदे = Intransitive verbs<br>सकर्मक क्रियापदे = Transitive verbs |

| | |
|---|---|
| वर्तमानकाळ = Present Tense | साधा / सामान्य वर्तमानकाळ = Simple Present Tense<br>चालू / अपूर्ण वर्तमानकाळ = Present Continuous Tense<br>पूर्ण वर्तमानकाळ = Present Perfect Tense |
| भूतकाळ = Past Tense | साधा / सामान्य भूतकाळ = Simple Past Tense<br>अकर्मक भूतकाळ = Intransitive Past Tense<br>चालू / अपूर्ण भूतकाळ = Past Continuous Tense<br>पूर्ण भूतकाळ = Past Perfect Tense |
| भविष्यकाळ = Future Tense | साधा / सामान्य भविष्यकाळ = Simple Future Tense |
| क्रियाविशेषण = Adverb | धातुसाधित क्रियाविशेषण = Adverb formed from root |
| शब्दयोगी अव्यय = Post Position | |
| उभयान्वयी अव्यय = Conjunction | |
| केवलप्रयोगी अव्यय = Interjection | |
| प्रश्नशब्द = Question Word | |
| वाक्य = Sentences | होकारार्थी = Affirmative नकारार्थी = Negative |

## विभक्ती तक्ता : Cases

| विभक्ती | Cases | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| प्रथमा | Nominative | - | - |
| द्वितीया | Accusative | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| तृतीया | Instrumental | ने, ए, शी | नी, ही, ई, शी |
| चतुर्थी | Dative | स, ला, ते | स, ला, ना, ते |
| पंचमी | Ablative | ऊन, हून | ऊन, हून |
| षष्ठी | Genitive | चा, ची, चे | चे, च्या, ची |
| सप्तमी | Locative | त, ई, आ | त, ई, आ |
| संबोधन | Vocative | - | हो, नो |

## पाठ्यपुस्तकात आणि अभ्यासपुस्तकात येणारी सर्व लघुरूपे :
## Abbreviations that appear in the textbook and workbook

अ॰पु॰ = अभ्यासपुस्तक (Workbook)
औप॰ = औपचारिक (Formal)
अनौप॰ = अनौपचारिक (Informal)
पु॰ए॰व॰ = पुल्लिंग एकवचन (Masculine Singular)
पु॰अ॰व॰ = पुल्लिंग अनेकवचन (Masculine Plural)
स्त्री॰ए॰व॰ = स्त्रीलिंग एकवचन (Feminine Singular)
स्त्री॰अ॰व॰ = स्त्रीलिंग अनेकवचन (Feminine Plural)
नपुं॰ए॰व॰ = नपुंसकलिंग एकवचन (Neuter Singular)
नपुं॰अ॰व॰ = नपुंसकलिंग अनेकवचन (Neuter Plural)
प्र॰पु॰ = प्रथम पुरुष (First Person)
द्वि॰पु॰ = द्वितीय पुरुष (Second Person)
तृ॰पु॰ = तृतीय पुरुष (Third Person)
सा॰रू॰ = सामान्य रूप (Oblique Form)

ध्वनिमुद्रणांचे शब्दांकन या पुस्तकाच्या शेवटी दिले आहे / **Audio transcripts are given at the end of this book.**

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | मागील भागात | प्रश्नशब्द : कसा, काय, कधी, कुठला, कोण, कोणता इ.<br>नाम आणि सर्वनाम यांच्या वचन आणि लिंग यांनुसार क्रियापदांचे रूप बदलून वाक्य लिहिणे | स्वतःची आणि इतरांची ओळख करून देणे<br>प्रश्न विचारणे<br>कागदपत्र ओळखणे, अर्ज भरणे<br>'करा' किंवा 'करू नका' असे सांगणे<br>दिवाळी या सणाबद्दल थोडे सांगणे, शुभेच्छा देणे<br>दैनंदिन व्यवहारात संभाषण करणे | नातेसंबंध<br>रंग<br>महिने, दिवस,<br>खाद्यपदार्थ,<br>कपडे, पशु-पक्षी<br>चव, अंक आणि संख्या | १५ |
| १ | प्रसारमाध्यमे | प्रश्नशब्द : कितीचा, कितीला, कधीपासून, कधीपर्यंत<br>असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता)<br>होणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (होता, झाला, झाला नाही)<br>अव्यये : जरी / तरी, जेव्हा / तेव्हा, जसं / तसं, जो / तो | वेळ ठरवणे<br>प्रसारमाध्यमांबद्दल बोलणे<br>स्वत:चे मत व्यक्त करणे<br>ई-पत्र लिहिणे | प्रसारमाध्यमे | ३३ |
| २ | आरोग्य | सामान्य भविष्यकाळ (बसेन, बसणार, बसणार नाही, करीन, खाईन) | अवयव सांगणे<br>डॉक्टर-पेशंट संभाषण करणे<br>काय झाले ते सांगणे आणि सल्ला देणे<br>किरकोळ आजारांबद्दल बोलणे<br>तब्येतीसाठी आणि स्वत:साठी काय करीन, हे सांगणे | अवयव<br>फळे<br>भाज्या | ७१ |
| ३ | आवडनिवड | विकारी / अविकारी विशेषण<br>क्रियापद + ला<br>प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कसंय...<br>आम्ही दोघे, आम्ही दोघी, आम्ही दोघं | आवडी निवडी सांगणे<br>वस्तूंचे / व्यक्तींचे वर्णन करणे<br>अभिप्राय देणे | छंद<br>खरेदी<br>दागदागिने | ९५ |

| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ४ | नातेसंबंध | षष्ठी नाम आणि सर्वनामांची रूपे<br>प्रश्नशब्द : कोणाचा<br>षष्ठीचे प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी अव्यय 'च'<br>'रोजच्या रोज', 'आजच्या आज' असे वाक्प्रचार | नातेसंबंध ओळखणे<br>चित्र वर्णन करणे | नातेसंबंध | १२६ |
| ५ | आनंदतरंग | सर्वनामांची सामान्यरूपे + शब्दयोगी अव्यय<br>तरी, आता तरी, निदान | सणांविषयी बोलणे<br>आनंदाचे प्रसंग<br>अभिनंदन करणे / शुभेच्छा देणे<br>मराठी न्याहारी आणि जेवण<br>एखादी मराठी पाककृती बनवणे, त्यावर लिहिणे आणि बोलणे | अवयव<br>फळे<br>सण<br>खाद्यपदार्थ<br>पेये | १५५ |
| ६ | भाषा | प्रश्नशब्द : का<br>संयुक्त वाक्ये : कारण, त्यामुळे, म्हणून<br>सामान्यनामांची सामान्यरूपे<br>'च'चा वापर | भाषेबद्दल बोलणे<br>इच्छा व्यक्त करणे<br>कारण आणि परिणाम सांगणे | वर्गात<br>व्याकरण<br>विषयक चर्चा | १७६ |
| ७ | दैनंदिन व्यवहार | द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती<br>प्रश्नशब्द : कोणाला<br>विशेषनामांची सामान्यरूपे<br>विकारी विशेषणांची सामान्यरूपे<br>विध्यर्थ : असणे आणि नसणे | रोजच्या घडामोडींवर संभाषण करणे<br>व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे यांबद्दल बोलणे | व्यवसाय,<br>सरकारी वापर<br>घर आणि<br>घरातल्या वस्तू<br>भांडी | २०७ |
| ८ | करावे तसे भरावे | विध्यर्थ, आज्ञार्थ : सकारात्मक / नकारात्मक<br>सर्वनाम / नाम + तृतीया<br>कधीतरी / काहीतरी<br>जिथे / तिथे, जिकडे / तिकडे, ज्याने / त्याने, ज्याच्याशी / त्याच्याशी, ज्याला / त्याला<br>शब्दयोगी अव्यय : आधी / मग, पूर्वी / आत्ता, अगोदर / नंतर<br>जोडक्रियाविशेषणे : इकडेतिकडे, रात्रीअपरात्री ... | सूचना देणे / सल्ला देणे / नियम सांगणे<br>हवंय / नकोय<br>सर्वनाम / नाम + तृतीया | जोडशब्द | २३७ |

| पाठ | विषय | व्याकरण | संवादकौशल्य | शब्दसंपदा | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ९ | भ्रमंती | सामान्य भूतकाळ (सकर्मक)<br>विशेषनाम, सामान्यनाम, सर्वनाम, क्रियापद + शब्दयोगी अव्यय<br>प्रश्नशब्द + शब्दयोगी अव्यय (कुठे + पर्यंत = कुठपर्यंत)<br>ऊन, हून, पासून/पर्यंत, कडून<br>प्रश्नशब्द : कोणी, कोणाशी, कुठे | प्रवास, सुट्टी, सहल यांबद्दल सांगणे<br>मुख्य शहरांची व पर्यटन स्थळांची माहिती सांगणे | ठिकाणे<br>वाहतूक | २७६ |
| १० | नवी जुनी पिढी | सप्तमी प्रश्नशब्द : कोणावर, कोणात, कुठे<br>द्विकर्मक भूतकाळ | नव्या-जुन्या पिढीची मते मांडणे<br>नेट-नाद<br>व्यक्तिमत्त्व, प्रवृत्ती व राहणीमान यांविषयी बोलणे | व्यक्ती आणि काम<br>भाववाचक आणि इतर नामे | ३०१ |
| | ध्वनिमुद्रित संवाद | पाठ्यपुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित संवाद, उतारे इ० | | | ३२२ |

# मागील भागात



## चला, उजळणी करू या...

- स्वतःची आणि इतरांची ओळख करून देणे
- प्रश्न विचारणे : कसा, काय, कधी, कुठला, कोण, कोणता इ॰
- नातेसंबंध, रंग, महिने, दिवस, खाद्यपदार्थ, कपडे, पशुपक्षी
- चव सांगणे आणि लिहिणे
- अंक आणि संख्या ओळखणे, बोलणे, लिहिणे
- नाम / सर्वनाम यांच्या वचन / लिंगानुसार क्रियापदातील बदल
- कागदपत्र ओळखणे, अर्ज भरणे
- ‘करा’ किंवा ‘करू नका’ असे सांगणे
- दिवाळी या सणाबद्दल सांगणे, शुभेच्छा देणे
- दैनंदिन व्यवहारांत संभाषण करणे

# मागील भागात

## १ वर्गात ओळख

मी आणि मराठी भाषा




परस्परांची ओळख



## २ छोटासा प्रश्न



आमचे बाबा
कामाला जातात
संध्याकाळी दमून
घरी येतात



आमची आई
घरीच असते
दिवसभर काम
करीत बसते



ताई तिच्याच
तोऱ्यात राहते
नटून थटून
आरशात पाहते



दादा पुस्तकांच्या
गराड्यात असतो
नुसता अभ्यास
करताना दिसतो



आजी नेहमीच
देवघर धरी
पोथी पुराणाचे
पारायण करी



आजोबांचं सारं
पेपरात लक्ष
आमच्याकडं मात्र
साऱ्यांचं दुर्लक्ष



मग कुणाशी खेळू
मी कुणावर रुसू?
सांगा किती वेळ
मी कोपऱ्यात बसू?

**१. तुम्ही वरील कविता वाचली आहे. आता नातेवाचक शब्दांचे लिंग बदलून कविता पुन्हा लिहू या. पूर्वीच्या आणि आताच्या कुटुंबांमधील फरक लक्षात येतोय का?** ▶अ.पु. १-२

| पूर्वी | आता |
|---|---|
| | उदा. |
| आमचे बाबा | आमची आई |
| कामाला जातात | कामाला जाते |
| संध्याकाळी दमून घरी येतात | संध्याकाळी दमून घरी येते |
| ... | ... |

## ३ खालील संवादांतील तीन रंग आणि तुम्हाला माहीत असलेले इतर रंग लिहू या.



**ब्लॅक अँड व्हाईट**

गणपुलेसर : सांगा पाहू, सगळ्यात जुना प्राणी कोणता?

मंजू : झेब्रा

गणपुलेसर : असं का बरं?

मंजू : कारण तो काळा-पांढरा असतो ना!

गणपुलेसर : मग?

मंजू : ब्लॅक अँड व्हाईट ना, सर!



**आवडता रंग**

बॉयफ्रेंड : मला तुझे दात खूप आवडतात.

गर्लफ्रेंड : अय्या! का?

बॉयफ्रेंड : कारण मला पिवळा रंग आवडतो.

१. ........................

२. ........................

३. ........................

४. ........................

५. ........................

६. ........................

## ४ नाव-गाव

**१. रिकाम्या जागा भरू या.**

अमिताभ बच्चन हे एक मोठे व्यक्तिमत्त्व आहे. अलाहाबाद हे त्यांचे मूळ गाव, तर मुंबई .............. .............. कर्मभूमी आहे. प्रसिद्ध कवी हरिवंशराय बच्चन .............. .............. वडील आणि तेजी बच्चन .............. .............. मातोश्री! जया बच्चन .............. .............. पत्नी. अभिषेक आणि श्वेता .............. .............. मुले आहेत. ऐश्वर्या .............. .............. सून आणि आराध्या .............. .............. नात आहे. जुहू-विलेपार्ले या उपनगरात 'प्रतीक्षा' .............. .............. निवासस्थान आहे.

**२. वरील परिच्छेद वाचून पुढील तक्ता भरू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| क. नाव | | ग. कार्यस्थळ | |
| ख. मूळ गाव | | घ. कुटुंबीय | |
| | | | |

## ५ महिने आणि आठवड्यातील दिवस क्रमाने लिहू या.

▶ अ.पु. ३

शुक्रवार जून ऑक्टोबर मंगळवार सप्टेंबर

मार्च जुलै सोमवार गुरुवार

बुधवार जानेवारी डिसेंबर

एप्रिल मे ऑगस्ट शनिवार

फेब्रुवारी नोव्हेंबर रविवार




| महिने |
| --- |
| |
| |
| मार्च |
| |
| |
| |
| |
| |
| |
| |
| |

| आठवड्यातील दिवस |
| --- |
| सोमवार |
| |
| |
| |
| |
| |
| |

# मागील भागात

६ **जोड्या जुळवून, नामांचे योग्य लिंग लिहून योग्य रकान्यात भरू या.** ▶अ॰पु॰ ४-५

आजी

पती कागद भाऊ आजोबा

वडील सलवार

आडनाव कमीज ब्लाऊज

पत्नी कुर्ता

नाव

पत्र कॉफी उपमा शर्ट पँट साडी

सरबत नवरा पायजमा

बहीण जीन्स

भात आई चहा

भाजी

पोळी बायको

लिंबू टॉप आमटी पोहे

| कार्यालय | नातेसंबंध | खाद्यपदार्थ / पेयपदार्थ | कपडे |
|---|---|---|---|
| उदा॰ ते नाव - ते आडनाव | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

## ७ जोड्या जुळवू या.

▶अ.पु. ६

| चित्र | | शब्द |
|---|---|---|
| १. |  | क. तो उंदीर |
| २. |  | ख. तो पोपट |
| ३. |  | ग. ती गाय |
| ४. |  | घ. ती / ते मांजर |
| ५. |  | च. तो कुत्रा |
| ६. |  | छ. ती चिमणी |
| ७. |  | ज. ते कबुतर |

**टीप :**
ती मांजर, ते कुत्रे / कुत्रं
असंही म्हटलं जातं...
ते मांजर :

| | | |
|---|---|---|
| तो बोका, ते बोके | ती मांजर, त्या मांजरी<br>ती मांजरी, त्या मांजऱ्या | ते मांजर, ती मांजरे / मांजरं |

ते कुत्रे / कुत्रं :

| | | |
|---|---|---|
| तो कुत्रा, ते कुत्रे | ती कुत्री, त्या कुत्र्या | ते कुत्रे / कुत्रं, ती कुत्री |

# मागील भागात

## ८ चवीनं खाऊ.

आवळा, सुपारी भारी तुरट
मीठ, समुद्राचे पाणी खारट




कारले, मेथी कडूच कडू
ऊस, साखर गोडाचा गड्डू

कैरी, चिंच आंबटचिंबट
लवंग, मिरी, मिरची तिखट

विविध रसांची चला चव घेऊ
चवीचवीनं सारंच खाऊ!

**चव :** तुरट, खारट, ........................, ........................, ........................,

........................, ........................

## ९ वाचू या.

एकदा अभी आणि आदीला रस्त्यात दोन हजार रुपयांची नोट सापडते.

अभी : चल आदी, आपण फिफ्टी - फिफ्टी वाटून घेऊ या.

आदी : मग बाकीच्या १९०० रुपयांचं काय करायचं?



**१०** हाउझी खेळू या. शिक्षिकेकडून एक चिठ्ठी घेऊन मोठ्याने वाचू या. ▶अ.पु. ७

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एक | ११ | अकरा | २१ | एकवीस | ३१ | एकतीस | ४१ | एकेचाळीस |
| २ | दोन | १२ | बारा | २२ | बावीस | ३२ | बत्तीस | ४२ | बेचाळीस |
| ३ | तीन | १३ | तेरा | २३ | तेवीस | ३३ | तेहतीस | ४३ | त्रेचाळीस |
| ४ | चार | १४ | चौदा | २४ | चोवीस | ३४ | चौतीस | ४४ | चव्वेचाळीस |
| ५ | पाच | १५ | पंधरा | २५ | पंचवीस | ३५ | पस्तीस | ४५ | पंचेचाळीस |
| ६ | सहा | १६ | सोळा | २६ | सव्वीस | ३६ | छत्तीस | ४६ | शेहेचाळीस |
| ७ | सात | १७ | सतरा | २७ | सत्तावीस | ३७ | सदतीस | ४७ | सत्तेचाळीस |
| ८ | आठ | १८ | अठरा | २८ | अठ्ठावीस | ३८ | अडतीस | ४८ | अठ्ठेचाळीस |
| ९ | नऊ | १९ | एकोणीस | २९ | एकोणतीस | ३९ | एकोणचाळीस | ४९ | एकोणपन्नास |
| १० | दहा | २० | वीस | ३० | तीस | ४० | चाळीस | ५० | पन्नास |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | एकावन्न | ६१ | एकसष्ट | ७१ | एकाहत्तर | ८१ | एक्याऐंशी | ९१ | एक्याण्णव |
| ५२ | बावन्न | ६२ | बासष्ट | ७२ | बाहत्तर | ८२ | ब्याऐंशी | ९२ | ब्याण्णव |
| ५३ | त्रेपन्न | ६३ | त्रेसष्ट | ७३ | त्र्याहत्तर | ८३ | त्र्याऐंशी | ९३ | त्र्याण्णव |
| ५४ | चौपन्न | ६४ | चौसष्ट | ७४ | चौऱ्याहत्तर | ८४ | चौऱ्याऐंशी | ९४ | चौऱ्याण्णव |
| ५५ | पंचावन्न | ६५ | पासष्ट | ७५ | पंच्याहत्तर | ८५ | पंच्याऐंशी | ९५ | पंच्याण्णव |
| ५६ | छप्पन्न | ६६ | सहासष्ट | ७६ | शाहत्तर | ८६ | शाऐंशी | ९६ | शहाण्णव |
| ५७ | सत्तावन्न | ६७ | सदुसष्ट | ७७ | सत्त्याहत्तर | ८७ | सत्त्याऐंशी | ९७ | सत्त्याण्णव |
| ५८ | अठ्ठावन्न | ६८ | अडुसष्ट | ७८ | अठ्ठ्याहत्तर | ८८ | अठ्ठ्याऐंशी | ९८ | अठ्ठ्याण्णव |
| ५९ | एकोणसाठ | ६९ | एकोणसत्तर | ७९ | एकोणऐंशी | ८९ | एकोणनव्वद | ९९ | नव्व्याण्णव |
| ६० | साठ | ७० | सत्तर | ८० | ऐंशी | ९० | नव्वद | १०० | शंभर |

# मागील भागात

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १००० | एक हजार | १,००,००० | एक लाख | १,००,००,००० | एक कोटी |
| १०,००० | दहा हजार | १०,००,००० | दहा लाख | १०,००,००,००० | दहा कोटी |
| ५०,००० | पन्नास हजार | ५०,००,००० | पन्नास लाख | ५०,००,००,००० | पन्नास कोटी |

| | |
|---|---|
| १,००,००,००,००० | एक अब्ज |
| १०,००,००,००,००० | दहा अब्ज |
| ५०,००,००,००,००० | पन्नास अब्ज |

## ११ वाचू या.



दोन गट तयार करावेत, 'अ' आणि 'ब'. 'अ' गटातील एका विद्यार्थ्याने अंक मोठ्याने वाचायला सुरुवात करावी. तो / ती अडखळल्यावर 'ब' गटातील विद्यार्थ्याने पुन्हा पहिल्या अंकापासून सुरुवात करावी. तो / ती अडखळल्यावर पुन्हा 'अ' गटातील दुसऱ्या विद्यार्थ्याने पुन्हा पहिल्या अंकापासून सुरुवात करावी. अशा तऱ्हेने ज्या गटातील विद्यार्थी सगळे अंक न अडखळता वाचेल तो गट जिंकेल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | २३ | २८ | ३३ | ३९ | ४३ |
| ४६ | ४९ | ३२९ | ५७ | ५९ | ६४ |
| ८६ | १०४ | ६८ | २३४१ | ७३ | ७७ |
| ८२ | ६६ | ९९१ | ९४ | ३६७२ | ९९ |
| ६७ | २१७ | ५३ | ४३८ | ५४५ | ६५४ |
| ७१ | ८८९ | ८८ | १००८ | ७८८ | ९६ |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ कॉम्प्युटर<br>तुम्हाला कॉम्प्युटर कसा हवा? | तुम्हाला कॉम्प्युटर कसा हवा? |
| काम | तुम्हाला काम कसं हवं? |
| नोकरी | तुम्हाला नोकरी कशी हवी? |
| पुस्तकं | तुम्हाला पुस्तकं कशी हवीत? |
| गाडी | तुम्हाला गाडी कशी हवी? |
| कपडे | तुम्हाला कपडे कसे हवेत? |
| जोडीदार | तुम्हाला जोडीदार कसा हवा? |
| जोडीदारीण | तुम्हाला जोडीदारीण कशी हवी? |



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ नवी नोकरी<br>नवी नोकरी कशी वाटते? | नवी नोकरी कशी वाटते? |
| नवं काम | नवं काम कसं वाटतं? |
| नवा कॉम्प्युटर | नवा कॉम्प्युटर कसा वाटतो? |
| नवी पुस्तके / पुस्तकं | नवी पुस्तके / पुस्तकं कशी वाटतात? |
| नवी गाडी | नवी गाडी कशी वाटते? |
| नवे कपडे | नवे कपडे कसे वाटतात? |
| नवा मित्र | नवा मित्र कसा वाटतो? |
| नवी मैत्रीण | नवी मैत्रीण कशी वाटते? |





## १२ नवीन नामे वापरून पुन्हा संभाषण करू या.

▶अ.पु. ८, १३

**१. बरा आहे :**

क : तू कसा आहेस? ख : बरा आहे.

क : दादा कसा आहे? ख : बरा आहे.

क : ताई कशी आहे? ख : बरी आहे.

क : आई कशी आहे? ख : बरी आहे.

क : बाबापण बरेच असतील?

ख : नाही, बाबा एकच आहेत.

**आदरार्थी**

क : तुम्ही कसे आहात? ख : बरा आहे.

क : दादा .................... ख : ....................

क : ताई .................... ख : ....................

क : आई .................... ख : ....................

**२. बोलता येतं?**

रमेश : तुला इंग्रजी बोलता येतं?

मधू : हो, का?

रमेश : बोल बरं!

मधू : इंग्रजी



**हा संवाद वेगवेगळ्या भाषांची नावे वापरून परत बोलू या.**

**क. मराठी**

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

**ख. चिनी**

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

**ग. हिंदी**

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

....................................................................................

**३. मराठी व्याकरणाचा तास**

गुरुजी : 'ती मुलगी सर्व मुलांकडे बघून हसते.'
गोप्या, सांग बघू, या वाक्यात 'मुलगी' काय आहे?

गोप्या : गुरुजी, मुलगी चावट आहे.



क.

गुरुजी : '(मुलगा) ............ सर्व मुलांकडे बघून (हसणे) ............' गोप्या सांग, या वाक्यात ............ काय आहे?

गोप्या : गुरुजी, ............ चावट आहे.

ख.

गुरुजी : '(बाळ) ............ सर्व मुलांकडे बघून (हसणे) ............'
गोप्या सांग, या वाक्यात ............ काय आहे?

गोप्या : गुरुजी, ............ चावट आहे.



# मागील भागात

**१३** भारतात ओळखीचा पुरावा म्हणून कोणत्या गोष्टी लागतात? जोड्या जुळवू या. ▶अ.पु. १४-१६

| | | |
|---|---|---|
| १. | ते पारपत्र / तो पासपोर्ट | क. |
| २. | ती शिधापत्रिका | ख. |
| ३. | ते पॅनकार्ड | ग. |
| ४. | ते मतदार ओळखपत्र | घ. |
| ५. | तो वाहनचालक परवाना | च. |
| ६. | ते आधारकार्ड | छ. |


















१. ………………………, २ ………………………, ३ ………………………,

४ ………………………, ५ ………………………, ६ ………………………

**१४** कोणताही अर्ज भरताना आपली वैयक्तिक माहिती द्यावी लागते. पुढे दिलेल्या एका अर्जाच्या भागात आपली वैयक्तिक माहिती भरू या.

अर्ज क्रमांक : २३४

संपूर्ण नाव : ..........

संपूर्ण पत्ता : ..........

..........

शहर : .......... पिन : ..........

देश : .......... मातृभाषा : ..........

वय : .......... जन्मदिनांक : ..........

स्त्री/पुरुष : .......... विवाहित/अविवाहित : ..........

व्यवसाय : .......... दूरध्वनी क्र. : ..........

भ्रमणध्वनी : .......... ई-मेल : ..........

दिनांक : .......... जागा : ..........

स्वाक्षरी

**१५** 'कर' आणि 'करू नकोस' यांपैकी कोणती सूचना द्याल?

| | कर | करू नकोस |
|---|---|---|
| १. शहाण्यासारखे वागणे | उदा॰ शहाण्यासारखे वाग. | |
| २. चिखलात खेळणे | | |
| ३. डबा वाटून खाणे | | |
| ४. सामान विसरणे | | उदा॰ सामान विसरू नकोस. |
| ५. खोड्या काढणे | | |
| ६. हात धुणे आणि जेवणे | | |
| ७. पैसे जपून ठेवणे | | |

**१६ चित्रांच्या मदतीने वाक्ये पुन्हा लिहू या.** ▶ अ.पु. १७

(रंग, फटाके, दिवाळी, रांगोळी, पणत्या)

कार्तिक महिन्यात  .............. हा सण साजरा केला जातो. तेव्हा दारासमोर

 .............. काढली जाते.  ..............च्या प्रकाशाने

घर छान दिसते. घराला  .............. दिला जातो. लहानमोठे सर्व जण

 .............. उडवून आनंद लुटतात.

**१७ खालील म्हणी आणि वाक्प्रचारांच्या योग्य स्पष्टीकरणांशी जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| १. घरोघरी मातीच्या चुली | क. कितीही प्रयत्न केला, तरी एखाद्याचा मूळ स्वभाव बदलत नाही. |
| २. शितावरून भाताची परीक्षा | ख. उत्तमच हवे, नाही तर काहीच नको, असा हट्ट धरणे |
| ३. कानामागून आली आणि तिखट झाली | ग. सगळ्यांच्या घरी सारखीच परिस्थिती. |
| ४. खाईन तर तुपाशी, नाही तर उपाशी | घ. नंतर येऊनही डोक्यावर बसणे किंवा अधिकार गाजवणे. |
| ५. खाई त्याला खवखवे | च. लहानशा नमुन्यावरून संपूर्ण गोष्टीबद्दल मत बनवणे. |
| ६. कडू कारले, तुपात तळले, साखरेत घोळले तरी कडू ते कडूच | छ. जो गुन्हा करतो, त्यालाच टोचणी लागते. |

## १८ काय चाललंय?

▶ अ॰पु॰ १०-११

१. एक संभाषण ऐकू या आणि पुढील वाक्ये कोणी म्हटली आहेत ते सांगू या.

| वाक्य | आई | बाबा | मन्या |
|---|---|---|---|
| १. चित्रपट बघायला जायचं की नाही हे अजून नक्की ठरायचं आहे. | | | |
| २. चित्रपट पाहायला गेलं तर खूप वेळ फुकट जाईल. | | | |
| ३. अभ्यास पूर्ण होणार असेल तर चित्रपट पाहायला काही हरकत नाही. | | | |
| ४. चित्रपटाला जाण्यासाठी पैशांची गरज आहे. | | | |

२. **आता याप्रमाणे पुढे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे संवाद लिहू या.**

संवाद १

उदा॰ **तुषार :** हॅलो, चिन्या, परळ आणि दादर भागात खूप पाऊस पडतोय...

~~खूप पाऊस पडणे~~, सगळीकडे पाणी तुंबणे, लोकांनी दुकाने बंद करणे, गाड्या खूप हळूहळू चालणे, स्टेशनवर गर्दी वाढणे, लोकांनी मोटरमनला प्रश्न विचारणे, काही लोकांनी स्टेशनवर सगळ्यांना चहा आणि पोहे फुकट वाटणे, रस्त्यावर गाड्या बंद पडणे, लोकांनी चालत घरी जाणे, मुंबईत नवीन असल्यामुळे एका मुलीचे खूप रडणे.

संवाद २

**मंदार :** बाहेरची माणसं गोंधळ करतायत.

**शिवानी :** गोंधळ म्हणजे काय?...

संस्थेबाहेरच्या काही माणसांनी खूप गोंधळ घालणे, चौघांनी आरडाओरडा करणे, एका माणसाने भाषण देणे, एकाने मुख्याध्यापकांशी भांडणे, काही बायकांनी सगळी कार्यालये बंद करणे आणि काम करू न देणे, मुख्याध्यापकांनी सगळ्यांना समजावणे, पण त्यांचे कोणीही न ऐकणे, लोकांनी सगळ्या वर्गांचे कामकाज थांबवणे, सगळ्या वस्तू फेकणे व तोडणे, दोन जणांनी कागदपत्रं अस्ताव्यस्त करणे आणि फाडणे, त्यांच्यातील एकाने लॉकर उघडणे आणि पैसे लुटणे.

१९ वर्गात गट करू या. खाली दिलेल्या कोणत्याही तीन म्हणी किंवा वाक्प्रचार आणि पाच क्रियापदे वापरून संभाषण सादर करू या. तुम्ही इतर म्हणी किंवा वाक्प्रचार आणि क्रियापदेही वापरू शकता.

| म्हणी आणि वाक्प्रचार |
| --- |
| सतरा ठिकाणी फिरणे |
| घरोघरी मातीच्या चुली |
| करावे तसे भरावे |
| पी हळद नि हो गोरी |
| एका दगडात दोन पक्षी मारणे |
| छत्तीसचा आकडा असणे |
| हजारदा सांगणे |

| क्रियापदे |
| --- |
| करणे, पाहणे, ऐकणे, उठणे, फिरणे, खाणे, पिणे, शिकणे, असणे, खेळणे, होणे, जाणे, म्हणणे, वाचणे, बोलणे, सांगणे, बसणे, चालणे, धावणे, झोपणे, शिकवणे. |






# प्रसारमाध्यमे

९



## चला, शिकू या...

- वेळ ठरवणे
- प्रश्नशब्द : कितीचा, कितीला, कधीपासून, कधीपर्यंत
- असणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (आहे, होता, नव्हता)
- होणे : वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी रूप (होतो, झाला, झाला नाही)
- अकर्मक भूतकाळ
- प्रसारमाध्यमांबद्दल बोलणे
- स्वतःचे मत व्यक्त करणे
- अव्यये : जरी / तरी, जेव्हा / तेव्हा, जसं / तसं, जो / तो
- क्रियापद + ताना
- ई-पत्र लिहिणे

किंजल, जाहिद, गार्गी, सॅम, पार्थ, मी



**मी :** ऐका! नऊचा आहे सिनेमा. पावणेनऊपर्यंत पोहोचावं लागेल. करू का बुक?

**किंजल :** ए, पावणेनऊ मीन्स?

**पार्थ :** अगं, म्हणजे ८:४५पर्यंत.

**मी:** खूप उशिराचा आहे! एखादा लवकरचा शो बघू?

**गार्गी :** अरे, सव्वाचारचाही एक शो आहे. पी॰व्ही॰आर॰, जुहू...

**जाहीद :** मॅडम, आपलं लेक्चरच साडेतीनपर्यंत संपेल. कसं जमणार?

**किंजल :** सव्वाचार? म्हणजे?

**पार्थ :** अगं किंजल, सव्वाचार म्हणजे ४:१५

**सॅम :** हां! मग मारू या ना दांडी लेक्चरला!

**गार्गी :** गुड आयडिया! म्हणजे अडीचलाच मोकळे होऊ.

**पार्थ :** अडीच म्हणजे २:३०ला, किंजल.

**किंजल :** थँक्स हं, पार्थ.







**मी :** ए, नाही हं, दांडी नको. साडेपाचचाही एक शो आहे ग्लोबसला.

**सॅम :** ओह! चालेल मग. तसंपण दीड तास लागेल पोहोचायला.

**किंजल :** यार?

**जाहीद :** अगं किंजल, साडेपाच म्हणजे ५:३० ना?

**पार्थ :** अरे व्वा, जाहिद! आणि दीड तास?

**किंजल :** थांबा, मी सांगते.



**पार्थ :** दीड म्हणजे १:३०, पण दीड तास म्हणजे एक तास आणि तीस मिनिटं.

**गार्गी :** किती चर्चा! पाऊण तास! ठरवा रे लवकर!

**मी :** उद्या संध्याकाळी साडेपाचचा शो, ग्लोबसला. पावणेचारला निघू.

**पार्थ :** ठरलं तर मग!

**गार्गी :** 👍

**जाहीद :** डन

**किंजल :** म्हणजे – ३:४५ला निघायचं ना? आणि पाऊण तास म्हणजे ४५ मिनिटं ना?

**पार्थ :** 👍



**टीप :**

दोन वाजता : बैठक दोन वाजता आहे.

दोनला : बैठक दोन एप्रिलला / दुपारी दोनला आहे.

दोनचा / दोनची : दोन एप्रिलची बैठक / दुपारी दोनची बैठक.

दोनच्या सुमारास : बैठक दोनच्या सुमारास आहे.

दोनपर्यंत : बैठक दोनपर्यंत आहे.

दोनपासून : बैठक दोनपासून आहे.

१ **योग्य प्रश्नशब्द निवडू या.**

**(कितीचा (२) / कितीला / कधीपर्यंत (२) / कधीपासून)**

| | |
|---|---|
| १. पावणेनऊचा | |
| २. पावणेनऊपर्यंत | |
| ३. साडेतीनपर्यंत | |
| ४. साडेपाचचा | |
| ५. पावणेचारला | |
| ६. सव्वाचारपासून | |



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ पाऊण<br>किती वाजलेयत / वाजलेत? पाऊण? | किती वाजलेयत / वाजलेत? पाऊण? |
| अडीच | किती वाजलेयत / वाजलेत? अडीच? |
| दीड | किती वाजलेयत / वाजलेत? दीड? |
| सव्वापाच | किती वाजलेयत / वाजलेत? सव्वापाच? |
| साडेबारा | किती वाजलेयत / वाजलेत? साडेबारा? |
| पावणेनऊ | किती वाजलेयत / वाजलेत? पावणेनऊ? |
| सव्वा | किती वाजलेयत / वाजलेत? सव्वा? |

सराव

२ घड्याळात किती वाजले आहेत? उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वेगळ्या शब्दांत लिहू या.


उदा॰ अडीच -
दोन वाजून तीस मिनिटे

४.  पावणेतीन

१.  सव्वाअकरा

५.  पाऊण

२.  साडेआठ

६.  सव्वाचार

३.  सव्वा

७.  साडेनऊ

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ दीड<br>दीडला पोहोचतोय / पोहोचतेय मी. | दीडला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| दीड | दीडला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| पाऊण | पाऊणला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| सव्वाअकरा | सव्वाअकराला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| साडेतीन | साडेतीनला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| अडीच | अडीचला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| पावणेदहा | पावणेदहाला पोहोचतोय / पोहोचतेय मी. |
| सव्वा | सव्वाला पोहोचतोय / पोहोचतेय मी |

सराव

## ३ आपल्या जोडीदाराचे वेळापत्रक समजून घेऊ या.

(अच्छा!, ओह!, काय!, हो?)



| | |
|---|---|
| • मी सकाळी सहा वाजून तीस मिनिटांनी उठतो / उठते. | • .................................. तू सकाळी साडेसहा वाजता उठतोस / उठतेस! |
| • मी सकाळी सात वाजून पंधरा मिनिटांनी नाश्ता करतो / करते. | • .................................. तू सकाळी सव्वासात वाजता नाश्ता करतोस / करतेस! |
| • मी सकाळी सात वाजून पंचेचाळीस मिनिटांनी ऑफिससाठी निघतो / निघते. | • .................................. तू सकाळी पावणेआठ वाजता ऑफिससाठी निघतोस / निघतेस? |
| • मी दुपारी एक वाजून पंधरा मिनिटांनी जेवतो / जेवते. | • .................................. तू दुपारी सव्वा वाजता जेवतोस / जेवतेस? |











## ४ वेळ ठरवणे

१. पुढील संवाद वाचू या व सराव करू या.



\+ हाय, रूपाली! सिनेमाला येतेस?
\# सिनेमा? कधी गं?
\+ आज दुपारी तीनचा शो आहे.

\# हो, चालेल ना!

\# आज तीन वाजता? आज नाही जमणार गं!
\+ मग उद्या जाऊ या, अडीचच्या शोला.
\# उद्या अडीच वाजता चालेल.

\# किती वाजता भेटू या मग?
\+ दीड / पावणेदोनपर्यंत भेटू.
\# ठीक आहे. सी यू देन.

२. आता वरील नमुन्याच्या आधारे नवीन संवाद तयार करू या.

▶ अ.पु. १

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नाटकाला | | साडे तीन | | |
| | | साडे सात | | |
| प्रदर्शन | | दीड | | |
| बघायला | | | | |
| परिसंवाद | येतोस / | पावणेचार | वाजता | चालेल |
| ऐकायला | येतेस / | पावणेपाच | ...च्या | भेटू / |
| | येणार | सव्वाअकरा | सुमारास | भेटू या |
| | का? | | ...पर्यंत | ठीक |
| संगीत | | सव्वापाच | | आहे |
| मैफलीला | | | | |
| खरेदीला | | | | |

## ५ वेळ कोणासाठी थांबत नाही!



"मी पावणे सहापासून इथे उभी आहे, आता वाजताहेत सव्वासहा, तुला वेळेचं काही भान आहे की नाही? सगळं काही वेळच्या वेळी झालं की बरं असतं." सीमा खूप रागानं बोलत होती. जर्मनी आणि अमेरिका या देशांत कामानिमित्तानं राहून हे जोडपं नुकतंच भारतात परतलं होतं.

वेळ अतिशय महत्त्वाचा, असं सगळेच म्हणतात, पण वेळ पाळणं ही गोष्ट भारतात फार महत्त्वाची नसते, असं कधी कधी वाटतं. वेळेचा गुलाम होऊ नये, पण वेळेचं मोल जाणावं, हे नक्की!

बस आणि गाड्या जर्मनीत अगदी ठरलेल्या वेळीच येतात, त्यामुळे लोक आपलं वेळापत्रक त्यानुसार ठरवतात. अमेरिकेतही लोक बऱ्यापैकी वेळेवर येतात. भारतात जरा वेगळं चित्र दिसतं. मुंबईत गाड्या वेळेवर येत नसल्या, तरी गाडी गाठायला सर्व जण जिवाचं रान करतात. नागपूरला सर्व काही आरामात चालतं. अहमदाबादेतही तीच तऱ्हा. उदय आणि सीमा हे जोडपं कामानिमित्त या सर्व देशांत आणि शहरांत राहिलं आहे. सीमानं कोणतीही गोष्ट वेळच्या वेळी केली नाही असं होत नाही. वेळ पाळण्याच्या बाबतीत उदय जरा ढिला आहे, पण कोणाच्याही मदतीला तो वेळेला धावून येईल हे नक्की. सीमा वेळ पाहून वागते, तर उदय वेळेला उपयोगी पडतो, कारण वेळ काही सांगून येत नाही, त्यामुळे कोणावर वाईट वेळ आलीच, तर वेळात वेळ काढून उदय मदतीला धावतो.

**१. 'वेळ' हा शब्द इथे किती वेगवेगळ्या प्रकारे वापरला आहे ना? दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे गट करून, वरील रंगीत वाक्प्रचारांचा वापर करून अशी काही वाक्ये तयार करू या.**

उदा॰ वेळच्या वेळी करणे.
"सुमित, घरी आल्यावर लगेचच गृहपाठ करत जा. अभ्यास वेळच्या वेळी केलेला चांगला!"

**टीप :** 'वेळ' हा शब्द पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी या दोन्ही लिंगांत वापरला जातो.
'ती वेळ' म्हणजे एक अचूक नेमका क्षण, किंवा, एखादी विशिष्ट वेळ.

उदा॰
- गाडी अगदी वेळेवर आली, बरोबर ९.१० वाजता. (ती वेळ)
- मिताली वेळेत घरी पोचली. सातच्या आत. (ती वेळ)

तर 'तो वेळ' म्हणजे एक कालावधी :

उदा॰
- मी रिकाम्या वेळात वाचन करते. (तो वेळ)
- पावसाळ्यात ओले कपडे सुकायला वेळ लागतो. (तो वेळ)

## ६ खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहू या.



### भाषा

१ ऑगस्ट १९९६ रोजी सॅम्युएल टेलर ब्लू हा अमेरिकन रेडइंडिअन माणूस मरण पावला. तो काताव्बा नदीकाठी राहणारा आणि काताव्बा भाषेत पारंगत असणारा शेवटचा रेडइंडिअन होता. त्याच्याबरोबरच ही भाषाही मृत झाली. ही घटना काही एकमेव नाही.

युनेस्कोच्या आकडेवारीप्रमाणे जगभरात एकूण ६००० वेगवेगळ्या भाषा अस्तित्वात आहेत. त्यांपैकी जवळजवळ निम्म्या भाषांना नष्ट होण्याचा धोका संभवतो. प्रसिद्ध भाषासंशोधक डेविड क्रिस्टल यांच्या म्हणण्यानुसार दर दोन आठवड्यांनी एक भाषा मरण पावते. जेव्हा लहान भाषागटांचे लोक मुलांना आपली भाषा न शिकवता दुसरी जास्त बोलली जाणारी भाषा शिकवू लागतात, तेव्हा असे होऊ शकते. लहान भाषागटांना सध्या मंडारिन, स्पॅनिश आणि इंग्लिश या भाषांकडून असा धोका आहे. भाषांनाही सभोवतालची परिस्थिती, वातावरण इत्यादींशी जमवून घ्यावे लागते. जी भाषा असे करत नाही, ती मरण पावते. भाषासंशोधकांच्या मते मनुष्याच्या उत्क्रांतिकाळापासून आजवर एकूण १,५०,००० भाषा झाल्या. त्यांपैकी बहुतेक भाषा कोणतीही खूण मागे न ठेवता नष्ट झाल्या. काही अजूनही कोणत्या तरी विशेष कारणामुळे वापरात आहेत. उदाहरणार्थ लॅटीन, संस्कृत, जुनी ग्रीक. इतर भाषा इतक्या बदलल्या आहेत, की त्या आता मूळ स्वरूपात ओळखूही येत नाहीत.

ज्या भाषा मरण पावल्या आहेत, त्या बहुतेक करून बोलीभाषा होत्या, म्हणजेच त्या लिहिल्या जात नव्हत्या. त्यामुळे त्या भाषांबरोबरच त्या भाषांमधील कथा, कल्पना याही नष्ट झाल्या. जेव्हा मातृभाषा पुढील पिढीला दिली जात नाही, तेव्हा केवळ भाषाच नव्हे, तर संस्कृतीचा एक मोठा भागही मरण पावतो.

**१. लिहू या, चूक की बरोबर.**

| | चूक | बरोबर |
|---|---|---|
| क. काताव्बा ही एकमेव रेडइंडिअन भाषा होती. | ☐ | ☐ |
| ख. काताव्बा भाषा आता अस्तित्वात नाही. | ☐ | ☐ |
| ग. काताव्बा भाषा बोलणारे सर्व रेडइंडिअन १ ऑगस्ट १९९६ रोजी मरण पावले. | ☐ | ☐ |
| घ. काताव्बा हे एका नदीचेही नाव आहे. | ☐ | ☐ |

**२. दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप वापरून रिकाम्या जागा भरू या.**

क. जगात सध्या एकूण ६,००० भाषा (असणे) ................ .

ख. जगात पूर्वी एकूण १,५०,००० भाषा (असणे) ................ .

ग. त्यातील बऱ्याच बोलीभाषा नष्ट (होणे) ................ .

घ. जर मातृभाषा पुढील पिढीला दिली नाही, तर ती नष्ट (होणे) ................ .

### ३. जोड्या लावू या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जगात सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषा | क. | त्या भाषेतील कथा, कल्पना आणि संस्कृतीचा एक भाग. |
| २. | जी भाषा सभोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेत स्वतःला बदलत नाही, | ख. | संस्कृत, जुने ग्रीक आणि लॅटीन या आहेत. |
| ३. | भाषेबरोबरच नष्ट होतात | ग. | मंडारीन, हिन्दी, स्पॅनिश आणि इंग्रजी या आहेत. |
| ४. | अजूनही काही प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या जुन्या भाषा | घ. | ती मरण पावते. |

### ‘असणे’, ‘होणे’... (तृ॰पु॰ए॰व॰पु॰)

▶ अ॰पु॰ २

**Third Person Singular Masculine**

| Verb | Simple Present Tense | Simple Present Tense - Negation | Simple Past Tense | Simple Past Tense - Negation |
|---|---|---|---|---|
| क्रियापद | साधा वर्तमानकाळ | साधा वर्तमानकाळ नकारात्मक रूप | साधा भूतकाळ | साधा भूतकाळ नकारात्मक रूप |
| असणे | आहे | नाही | होता | नव्हता |
| होणे | होतो | होत नाही | झाला | झाला नाही |

व्याकरण

### ७ काय होत नाही?

▶ अ॰पु॰ ३

**१. खालील वाक्ये वाचू या आणि त्यांतील क्रियापदे अधोरेखित करू या.**

क. मी काही या वर्षी पास होत नाही.

ख. तू काही या वर्षी पदवीधर होत नाहीस.

ग. भाजी फ्रीजमध्ये ठेवली, की लवकर खराब होत नाही.

घ. मंत्र्यांच्या आश्वासनांनी लोक खुश होत नाहीत.

च. एखाद्या दिवशी उपाशी राहून तुम्ही बारीक होत नाही.



२. आता खालील कोष्टक पूर्ण करू या.

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी होत .................... | आम्ही / आपण होत .................... |
| तू होत नाहीस | तुम्ही / आपण होत .................... |
| तुम्ही / आपण होत .................... | |
| तो / ती / ते होत .................... | ते / त्या / ती / होत नाहीत |

**'होणे' - साधा वर्तमानकाळ आणि 'असणे' - साधा भूतकाळ**

**Simple Present Tense of 'होणे' and Simple Past Tense of 'असणे'**

▶ अ.पु. ४-७

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ 'होणे' | साधा भूतकाळ 'असणे' |
|---|---|---|
| मी (पु.) | होतो | होतो |
| मी (स्त्री.) | होते | होते |
| आम्ही / आपण | होतो | होतो |
| तू (पु.) | होतोस | होतास |
| तू (स्त्री.) | होतेस | होतीस |
| तुम्ही / आपण (आदरार्थी + अनेकवचन) | होता | होता / होतात |
| तो | होतो | होता |
| ती | होते | होती |
| ते | होते / होतं | होते / होतं |
| ते (अनेकवचन) | होतात | होते |
| त्या (अनेकवचन) | होतात | होत्या |
| ती (अनेकवचन) | होतात | होती |

**टीप :** वर्तमानकाळ : पाऊस पडला की मी खुश होते.
साधा भूतकाळ : पाऊस पडला तेव्हा मी खुश झाले.

व्याकरण

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी (स्त्री॰)<br>पाऊस पडला की मी अगदी वेडी होते. | पाऊस पडला, की मी अगदी खुश होते. |
| मी (स्त्री॰) | पाऊस पडला, की मी अगदी खुश होते. |
| तो | पाऊस पडला, की तो अगदी खुश होतो. |
| ते (होणे - अ॰व॰) | पाऊस पडला, की ते अगदी खुश होतात. |
| आम्ही | पाऊस पडला, की आम्ही अगदी खुश होतो. |
| तू (पु॰) | पाऊस पडला, की तू अगदी खुश होतोस. |
| ते | पाऊस पडला, की ते अगदी खुश होतं. |
| तुम्ही | पाऊस पडला, की तुम्ही अगदी खुश होता. |
| त्या | पाऊस पडला, की त्या अगदी खुश होतात. |



**साधा भूतकाळ 'होणे'**
**Simple Past Tense**



| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी (पदवीधर) झालो | आम्ही / आपण (पदवीधर) झालो |
| मी (पदवीधर) झाले | |
| तू (पदवीधर) झालास | तुम्ही / आपण (पदवीधर) झालात |
| तू (पदवीधर) झालीस | |
| तुम्ही / आपण (पदवीधर) झालात | |
| तो (पदवीधर) झाला | ते (पदवीधर) झाले |
| ती (पदवीधर) झाली | त्या (पदवीधर) झाल्या |
| ते (पदवीधर) झाले | ती (पदवीधर) झाली |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० मी (स्त्री०) पहिल्यांदा समुद्र बघितला आणि मी अगदी वेडी झाले. | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि मी अगदी वेडी झाले. |
| मी (स्त्री०) | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि मी अगदी वेडी झाले. |
| तो | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि तो अगदी वेडा झाला. |
| ते (होणे - अ०व०) | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि ते अगदी वेडे झाले. |
| आम्ही | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि आम्ही अगदी वेडे झालो. |
| तू (पु०) | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि तू अगदी वेडा झालास. |
| ते (नपुं०) | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि ते अगदी वेडे झाले / ते अगदी वेडं झालं. |
| तुम्ही | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि तुम्ही अगदी वेडे झालात. |
| त्या | पहिल्यांदा समुद्र बघितला आणि त्या अगदी वेड्या झाल्या. |



| शिक्षक/ शिक्षिका | विद्यार्थी/विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मीटिंग<br>मीटिंग कशी झाली तुमची? | मीटिंग कशी झाली तुमची? |
| समारंभ | समारंभ कसा झाला तुमचा? |
| परीक्षा | परीक्षा कशी झाली तुमची? |
| जेवण | जेवण कसं झालं तुमचं? |
| मुलाखत | मुलाखत कशी झाली तुमची? |
| भेट | भेट कशी झाली तुमची? |
| व्याख्यान | व्याख्यान कसं झालं तुमचं? |

पु॰ ल॰ देशपांडे एका मित्राकडे जेवायला गेले. पोटभर जेवण झाल्यानंतर आभार मानताना ते म्हणाले, "जेवण इतकं रुचकर झालं, की मी तर 'अवाक' झालो". ही शाब्दिक कोटी न समजलेल्या लोकांसाठी खुलासा करीत पु॰ ल॰ म्हणाले, "मी इतका जेवलोय, की आता वाकूच शकत नाही".





## ८ पुढील वाक्ये नकारार्थी करू या.

▶अ॰पु॰ ८-९

उदा॰ या वर्षी पाऊस चांगला झाला.   या वर्षी पाऊस चांगला झाला नाही.

१. वृषाली पदवीधर झाली. ........................................

२. आजही मला उशीर झाला. ........................................

३. झाले का नाटक सुरू? ........................................

४. रस्त्यावर गर्दी झाली. ........................................

५. झाले का जेवण? ........................................

## ९ पूर्वी काय होते आणि आता काय झाले आहे?

**पूर्वी**




पूर्वी बस तिकीट स्वस्त होते.

**आता**




आता तिकीट महाग झाले आहे.



पूर्वी माझे केस काळे होते.



आता माझे केस पांढरे झाले आहेत.



पूर्वी माझी गाडी जुनी होती.



आता माझी गाडी आधुनिक झाली आहे.



पूर्वी मी जाड होतो.



आता मी बारीक झालो आहे.

भूतकाळ - अकर्मक - नियमित : बसणे

**Past Tense - Intransitive - Regular**

| सर्वनाम | साधा भूतकाळ | पूर्ण वर्तमानकाळ | पूर्ण भूतकाळ |
|---|---|---|---|
| मी | बसलो / बसले | बसलो आहे / बसले आहे | बसलो होतो / बसले होते |
| आम्ही / आपण | बसलो | बसलो आहोत | बसलो होतो |
| तू | बसलास / | बसला आहेस / | बसला होतास / |
| | बसलीस | बसली आहेस | बसली होतीस |
| तुम्ही / आपण | बसला / बसलात | बसला आहात | बसला होतात / होता |
| तो | बसला | बसला आहे | बसला होता |
| ती | बसली | बसली आहे | बसली होती |
| ते | बसले / बसलं | बसले / बसलं आहे | बसले / बसलं होतं |
| ते | बसले | बसले आहेत | बसले होते |
| त्या | बसल्या | बसल्या आहेत | बसल्या होत्या |
| ती | बसली | बसली आहेत | बसली होती |

**याचप्रमाणे : धावणे, झोपणे, उठणे, चालणे, पडणे**

भूतकाळ - अकर्मक - अनियमित : 'जाणे'

**Past Tense - Intransitive - Irregular**

| सर्वनाम | | क्रियापद |
|---|---|---|
| मी (पु॰) | | गेलो |
| मी (स्त्री॰) | | गेले |
| आम्ही / आपण | | गेलो |
| तू (पु॰) | | गेलास |
| तू (स्त्री॰) | | गेलीस |
| तुम्ही / आपण | दिल्लीला | गेलात / गेला |
| तो | | गेला |
| ती (स्त्री॰ए॰व॰) | | गेली |
| ते (नपुं॰ए॰व॰) | | गेले / गेलं |
| ते (पु॰अ॰व॰) | | गेले |
| त्या | | गेल्या |
| ती (नपुं॰ अ॰व॰) | | गेली |

**याचप्रमाणे : भूतकाळ -अकर्मक-अनियमित**
**Past Tense - Intransitive - Irregular**

| क्रियापद | (तृ॰पु॰ए॰व॰पु॰) Third Person Singular Masculine |
|---|---|
| येणे | आला |
| असणे | होता |
| मरणे | मेला |
| होणे | झाला |
| उडणे / बुडणे | उडाला / बुडाला |

**टीप : 'मारणे'**
या क्रियापदाचा वापर
शेतकऱ्याने वाघ मारला. (ठार मारणे)
शेतकऱ्याने बैलाला मारले. (फक्त मारणे)



## १० असा मी!

मी जन्मलो, मोठा झालो.
शाळेत गेलो, कॉलेजात गेलो, कामावर गेलो.
मी प्रेमात पडलो. नवरा झालो.
बायकोबरोबर खूप फिरलो, संसार केला, मुलं झाली. तीपण मोठी झाली.
आयुष्यात खूप चाललो, दमलो, थकलो, कंटाळलो, पण अजूनही म्हातारा मात्र झालो नाहीये, कारण थांबलोच नाही कधी.

१. याचप्रमाणे आपण आयुष्यात काय काय केले ते लिहू या.

........................................................................................................

........................................................................................................

२. सर्व क्रियापदे लिहू या.

........................................................................................................

........................................................................................................

३. आता खालील तक्त्यात क्रियापदाचे उताऱ्यातील रूप आणि मूळ रूप लिहू या.

| क्रियापदाचे उताऱ्यातील रूप | क्रियापदाचे मूळ रूप |
|---|---|
| उदा॰ जन्मलो | जन्मणे |
| उदा॰ झालो | होणे |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

साधा भूतकाळ (नकारार्थी रूप)

**Simple Past Tense - Negation**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी बसलो नाही / मी बसले नाही | आम्ही / आपण बसलो नाही |
| तू बसला नाहीस / तू बसली नाहीस | तुम्ही बसला नाहीत |
| तुम्ही / आपण बसला नाहीत | तुम्ही / आपण बसला नाहीत |
| तो बसला नाही | ते बसले नाहीत |
| ती बसली नाही | त्या बसल्या नाहीत |
| ते बसले / बसलं नाही | ती बसली नाहीत |



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा॰ मी – मुंबईला : मी मुंबईला गेलो. | मी मुंबईला गेलो. |
| आम्ही / आपण | आम्ही मुंबईला गेलो. |
| आपण / तुम्ही | आपण मुंबईला गेलात. |
| तू | तू मुंबईला गेलास. |
| तो | तो मुंबईला गेला. |
| ती (ए॰व॰) | ती मुंबईला गेली. |
| ते (अ॰व॰) | ते मुंबईला गेले. |
| ते (ए॰व॰) | ते मुंबईला गेले / गेलं. |
| त्या | त्या मुंबईला गेल्या. |
| ती (अ॰व॰) | ती मुंबईला गेली. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा॰ मी – खेळणे : मी खेळायला गेलो. | मी खेळायला गेलो. |
| आपण – (त्यांना) भेटणे | आपण (त्यांना) भेटायला गेलो. |
| तुम्ही – फिरणे | तुम्ही फिरायला गेलात. |
| त्या – धावणे | त्या धावायला गेल्या. |
| तो – जेवणे | तो जेवायला गेला. |
| ती – (सिनेमा) बघणे | ती (सिनेमा) बघायला गेली. |
| ते – झोपणे | ते झोपायला गेले. |





▶अ॰पु॰ १०-११



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ आम्ही – दवाखान्यात | |
| आम्ही दवाखान्यात गेलो. | आम्ही दवाखान्यात गेलो. |
| तो – बाजारात | तो बाजारात गेला. |
| आपण – विद्यापीठात | आपण विद्यापीठात गेलात. |
| तो – बागेत | तो बागेत गेला. |
| त्या – शाळेत | त्या शाळेत गेल्या. |
| ती – ऑफिसात | ती ऑफिसला गेली. |
| ते – वर्गात | ते वर्गात गेले. |
| तुम्ही – खोलीत | तुम्ही खोलीत गेलात. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ दुपार | |
| एकदाचा तो दुपारी गावाला गेला! | एकदाचा तो दुपारी गावाला गेला! |
| दुपारी | एकदाचा तो दुपारी गावाला गेला! |
| काल सकाळी | एकदाचा तो काल सकाळी गावाला गेला! |
| परवा रात्री | एकदाचा तो परवा रात्री गावाला गेला! |
| तेरवा संध्याकाळी | एकदाचा तो तेरवा संध्याकाळी गावाला गेला! |
| मागच्या रविवारी | एकदाचा तो मागच्या रविवारी गावाला गेला! |
| मागच्या आठवड्यात | एकदाचा तो मागच्या आठवड्यात गावाला गेला! |
| मागील महिन्यात | एकदाचा तो मागील महिन्यात गावाला गेला! |
| मागील वर्षी | एकदाचा तो मागील वर्षी गावाला गेला! |

११ आपल्याला ही प्रसारमाध्यमे माहीत आहेत. चित्र आणि शब्द यांच्या जोड्या लावू या!

अ.पु. १२

रेडिओ

दूरदर्शन



ट्विटर





वर्तमानपत्र

संगणक

नियतकालिक



आंतरजाल





ब्लॉग

यू ट्यूब

फेसबुक



ई मेल

## प्रसारमाध्यमे : पूर्वी आणि आता

▶अ.पु. १३

### १. वाचू या



आमच्या लहानपणी प्रसारमाध्यमे म्हणजे वर्तमानपत्र आणि नंतर रेडिओ. वयाच्या दहाव्या किंवा बाराव्या वर्षी चांगले वाचता येऊ लागले, की वर्तमानपत्राशी संबंध येई. तोवर रेडिओ हेच माहिती मिळवण्याचे साधन होते. घरी रेडिओ आल्यावर झालेला आनंद आजही आठवतो. सध्या जसे आईवडील दूरचित्रवाणी पाहण्यावर वेळेचे बंधन घालतात, तसे त्यावेळी रेडिओ ऐकण्यावर घातले जाई. माझ्या वडिलांना बिनाका गीतमालेचे वावडे होते. ती गाणी ऐकल्याने मुले बिघडतील, असे त्यांना वाटे. त्यामुळे अगदी चोरूनच किंवा मैत्रिणीकडे जाऊन बिनाका ऐकावी लागे.

सध्या प्रसारमाध्यमात होणारे बदल पाहिले, की अगदी अचंबा वाटतो. वर्तमानपत्र, रेडिओनंतर दूरचित्रवाणी आणि आता आंतरजालामुळे अस्तित्वात आलेले फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, ब्लॉग्ज, इन्स्टाग्राम इत्यादींच्या माध्यमातून सतत येणारा माहितीचा ओघ... कुठे घेऊन जाणार आहे हे सर्व आणि कुठे थांबणार आहे, हेच कळत नाही.

### २. खालील विधाने वाचू या आणि त्यांवर आपले मत मांडू या.

क. आंतरजालामुळे पूर्वीच्या प्रसारमाध्यमांचे महत्त्व कमी झाले आहे.

ख. वर्तमानपत्रापेक्षा फेसबुकवर रोजच्या घडामोडींची जास्त जलद माहिती मिळते.

ग. व्हॉट्सॲपवर खूप वेळ वाया जातो.

घ. 'ब्लॉग्ज' हे अभिव्यक्तीचे एक चांगले व्यासपीठ आहे.



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ शाम्पू | |
| तुम्ही पण हाच शाम्पू वापरता का? | तुम्ही पण हाच शाम्पू वापरता का? |
| तेल | तुम्हीपण हेच तेल वापरता का? |
| फोन | तुम्हीपण हाच फोन वापरता का? |
| भाषा | तुम्हीपण हीच भाषा वापरता का? |
| पेन | तुम्हीपण हेच पेन वापरता का? |
| शब्दकोश | तुम्हीपण हाच शब्दकोश वापरता का? |
| साबण | तुम्हीपण हाच साबण वापरता का? |
| लिपी | तुम्हीपण हीच लिपी वापरता का? |
| तंत्र | तुम्हीपण हेच तंत्र वापरता का? |



## १२ वेड लागले सेल्फीचे

अ॰पु॰ १४

सेल्फी... काही वर्षांपूर्वी स्वतःची काहीच ओळख नसणाऱ्या या शब्दाने आज सर्वांनाच वेड लावले आहे. स्मार्टफोनमुळे सेल्फीचा नाद जगभरात वाऱ्याच्या वेगाने पसरू लागला आहे. सेल्फीच्या लाटेमुळे स्मार्टफोनने चांगलाच जम बसवला आहे.



**१. खाली काही शीर्षके दिली आहेत. पुढील पानावरील परिच्छेदांसाठी योग्य शीर्षक निवडून रिकाम्या जागेत लिहू या.**

क. सेल्फी नको
ख. नामवंतांचे सेल्फीप्रेम
ग. विचित्र सेल्फी
घ. सेल्फी आणि मानसिक आजार
च. सेल्फीचे व्यसन
छ. सेल्फीचा अभ्यासक्रम



१) ..............................

चित्रपटसृष्टीतील कलाकार, वेगवेगळ्या खेळांतील खेळाडू, समाजसेवक, उद्योजक यांसारख्या सर्वांना सेल्फी काढण्याचा मोह अनेकदा आवरत नाही. त्यामुळेच काम, वय, आपले सामाजिक स्थान विसरून अनेक बड्या व्यक्ती मोठ्या समारंभांत लोकांमध्ये मिसळल्यावर सेल्फीच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करतात.



२) ..............................

लंडनमधील सिटी लिट कॉलेजमध्ये मार्च महिन्यापासून 'द आर्ट ऑफ फोटोग्राफिक सेल्फ पोर्ट्रेट' या नावाने सेल्फीचा एका महिन्याचा अभ्यासक्रम सुरू झाला असून, त्याची फी १६० यूएस डॉलर म्हणजेच १० हजार रुपयांपर्यंत आहे. या एका महिन्यामध्ये सेल्फी काढताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे, हे विद्यार्थ्यांना व्याख्यानांद्वारे आणि चर्चासत्रांद्वारे शिकवले जाते.

३) ..............................

अनेक मानसोपचारतज्ज्ञांनी सेल्फी काढण्याची सवय 'बॉडी डायस्मॉरफिक डिसॉर्डरशी' जोडली आहे. सेल्फी काढणाऱ्यांना आपल्या दिसण्याबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असल्याचे मत व्यक्त करणारा मानसोपचारतज्ज्ञांचा मोठा गट आहे. याच्या अगदी उलट, जास्त सेल्फी काढणे हे 'नार्सिसिजम' म्हणजेच 'स्वत:वरच असलेलं अतीव प्रेम' या मानसिक आजाराशीही संबंधित आहे असेही काहींचे म्हणणे आहे.





४) ..............................

सेल्फीमुळे अनेकांचा जीव गेल्याची उदाहरणे आहेत. अमेरिकेत तर सेल्फी काढताना रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. उंचावरून पडून जीव जाणे, डोक्यावर बंदूक रोखून सेल्फी काढताना, मोबाईल क्लिक करण्याऐवजी चुकून बंदुकीचा चाप ओढला गेल्याने मृत्यू ओढवणे, गाडी चालवताना सेल्फी काढण्याच्या प्रयत्नात अपघातात जीव जाणे यांसारख्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत.



५) ..........

सेल्फीचे खूळ तरुणाईच्या डोक्यात शिरले आहे. दुबईत एका मुलीने चोरी करण्यासाठी घरात घुसलेल्या मुलीबरोबर सेल्फी काढला होता. मृत आजोबांबरोबरच्या सेल्फीवर भारतातील नेटकऱ्यांनी भरपूर टीका केली. ट्रॅफिक हवालदाराने पहिल्यांदा पावती फाडताना काढलेल्या सेल्फीवर लोक खदखदून हसले. सेल्फीच्या वेडामुळे कोण, कुठे, कसा सेल्फी काढेल सांगता येत नाही. यातही सेल्फीस्टिकसारख्या भन्नाट कल्पनांनी पैसे कमवले आहेत.



६) ..........

सेल्फीची टूम अशी पसरत जात असताना त्यावर बंदी घालण्याबाबत वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे नियम होत आहेत. काही शहरांमध्ये सेल्फीवर बंदी आहे, तर काही प्रेक्षणीय ठिकाणी सेल्फीवर बंदी आहे.
एकंदरीतच, हौस म्हणून सेल्फी काढण्यात काहीच गैर नाही; मात्र, नियमभंग करून किंवा जिवाशी खेळून सेल्फी काढण्यात काहीच अर्थ नाही, हे प्रत्येक स्मार्टफोन वापरणाऱ्याने समजून घेणे गरजेचे आहे.

**२. सेल्फीबद्दलची एक बातमी पाहू या.**

**क. आता ही बातमी परत पाहून रिकाम्या जागा भरू या.**

(नशेत, मंगळवारी, दरीत, शोध, झाडावर, मद्यधुंद, संध्याकाळी, वेळी, मृतदेह, मोह)

आणि आता (१) .......... अवस्थेत सेल्फी काढून धोका पत्करणाऱ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. लोणावळा शूटिंगपॉइंटवर मद्यधुंद अवस्थेत सेल्फी काढण्याचा (२) .......... तरुणाच्या जिवावर बेतलाय. (३) .......... (४) .......... एक तरुण मद्यधुंद अवस्थेत सेल्फी काढण्यासाठी (५) .......... चढला, पण त्याच (६) .......... त्याचा पाय घसरला, आणि तो थेट साडेतीनशे फूट खोल (७) .......... कोसळला. त्याच्या सोबत असलेल्या पंचम रविदास नामक मित्राने त्याची माहिती लोणावळा पोलिसांना दिली. दरम्यान पंचमही दारूच्या (८) .......... धुंद असल्याने त्याला मृत मित्राचं नावही सांगता आलं नाही. शिवदुर्ग टीमसोबत पोलिसांनी दरीत पडलेल्या युवकाचा (९) .......... सुरू केला आणि अखेर अठरा तासांच्या प्रयत्नांनंतर त्याचा (१०) .......... आढळला.

**ख. जोड्या जुळवू या.**

| | | |
|---|---|---|
| १. कोसळणे | | क. दारूच्या नशेत असणे |
| २. आढळणे | | ख. सापडणे |
| ३. मद्यधुंद अवस्थेत असणे | | ग. संकटाची जाणीव असूनही एखादी गोष्ट करणे |
| ४. धोका पत्करणे | | घ. एखाद्या गोष्टीमुळे मृत्यू होणे / जीव गमावणे |
| ५. जिवावर बेतणे | | च. उंचीवरून वेगाने पडणे |

**३. वरील परिच्छेदांतील कोणत्या मुद्द्यांशी तुम्ही सहमत आहात?**




**तुमचं काय मत आहे?**

(सेल्फीचं वेड वाईटच / सेल्फीचं व्यसन नसावं / सेल्फीचा अभ्यासक्रम गरजेचा / जास्त सेल्फी काढणे म्हणजे 'नार्सिसिजम' / सेल्फीवर बंदी असावी / सेल्फीवर बंदी नसावी)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ सेल्फीचं वेड वाईटच. | |
| माझ्या मते सेल्फीचं वेड वाईटच. | माझ्या मते सेल्फीचं वेड वाईटच. |
| सेल्फीचं व्यसन नसावं. | माझ्या मते सेल्फीचं व्यसन नसावं. |
| सेल्फीचा अभ्यासक्रम गरजेचा. | माझ्या मते सेल्फीचा अभ्यासक्रम गरजेचा आहे. |
| जास्त सेल्फी काढणं म्हणजे 'नार्सिसिझम'. | माझ्या मते जास्त सेल्फी काढणं म्हणजे 'नार्सिसिझम'. |
| सेल्फीवर बंदी असावी. | माझ्या मते सेल्फीवर बंदी असावी. |
| सेल्फीवर बंदी नसावी. | माझ्या मते सेल्फीवर बंदी नसावी. |

**१३** खाली दिलेल्या विधानांवर आपले मत मांडू या.



## १४ खालील वाक्ये अव्ययांच्या साहाय्याने जोडू या.

अ॰पु॰ १५-१८

उदा॰ मालिकांमध्ये सून, काकू या व्यक्ती सतत कट-कारस्थाने करताना दाखवल्या जातात. खऱ्या आयुष्यात त्या चांगल्याही असू शकतात. (जरी / तरी)

जरी मालिकांमध्ये सून, काकू या व्यक्ती सतत कट-कारस्थाने करताना दाखवल्या जात असल्या, तरी खऱ्या आयुष्यात त्या चांगल्याही असू शकतात.

१. व्यंगचित्रे बोलू लागतात.

शब्दांची गरज पडत नाही. (जेव्हा / तेव्हा)

.................................................................................................

.................................................................................................

२. प्रसारमाध्यमांत जगभरातील सौंदर्यस्थळे पाहायला मिळतात. स्वत: जगभर प्रवास करण्यातील मौज काही निराळीच असते. (जरी / तरी)

.................................................................................................

.................................................................................................

३. जाहिरातीत आठवड्याभरात वजन कमी झालेलं दाखवतात. खऱ्या आयुष्यात वजन कमी करायला खूप वेळ द्यावा लागतो. (जरी / तरी)

.................................................................................................

.................................................................................................

४. अग्रलेख लिहिणे – एकांगी विचार न करणे (जो / तो)

.................................................................................................

.................................................................................................

५. मी कल्पनारम्य चित्रपटात रमणे – वास्तवाचे भान ठेवणे. (जरी / तरी)

.................................................................................................

.................................................................................................

१५ **'मोलकरीण' नावाची एक कविता ऐकू या.**

**या छोट्याशा कवितेत काही क्रियापदांची रूपे कशी बनली आहेत ते बघू या -**

म्हणणे – म्हणताना करणे – करताना

धातू + प्रत्यय = धातुसाधित (क्रियाविशेषण )

Root + Suffix = Participle (Adverb)

म्हण + ताना = म्हणताना कर + ताना = करताना

व्याकरण

**आता उरलेल्या क्रियापदांची अशीच फोड करून रूपे लिहू या!**

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

............................................................

**म्हणी आणि वाक्प्रचार**

जे होते ते चांगल्यासाठीच होते

झाले गेले विसरून जा

एकाच नाण्याच्या दोन बाजू असणे

**संभाषण करू या.**

मोबाईलचा योग्य वापर कसा करावा?

मोबाईलशिवाय कसं जगायचं?

मोबाईलमुळे ज्ञान / माहिती वाढवता येते.

... एकमेकांशी संपर्क साधता येतो.

... रस्ता शोधता येतो.

... खरेदी करता येते.

एकविसाव्या शतकातील संकटे...

आता / आजच्या काळात / आजकाल / हल्ली / सध्या ...

मोबाईलला पर्याय नाही, कारण ...

मोबाईलमध्ये वेळ वाया घालवणे

मोबाईलशिवाय इतर काहीच न सुचणे.

प्रत्येक गोष्टीसाठी मोबाईलवर अवलंबून राहणे.



संवाद

**१६** एखादे आवडते प्रसारमाध्यम निवडून एका मिनिटाचे PPT किंवा तोंडी सादरीकरण करू या. त्यात त्याचे फायदे, तोटे, त्याचा वापर व ते आपण का निवडले, ते सांगू या.

**१७** रविवारसाठी नाटक, सिनेमा, किंवा कुठे तरी फिरायला जाण्याचा कार्यक्रम ठरवू या, आणि आपल्या मित्राला आमंत्रणाचे ई-पत्र लिहू या.

**१८** पाहू या मंगेश पाडगावकर यांच्या 'तुमचं काय गेलं' या कवितेचे त्यांनीच केलेले अभिवाचन.

**१. कविता पुन्हा ऐकू या आणि कंसातील शब्द रिकाम्या जागी भरू या.**

(गेलं, होता, केलं, पेटला, भेटला, झाली, फावलं, खेटला, नव्हतं, नेलं, घेतलं, गेली, लावलं)

**तुमचं काय गेलं?**

त्याने प्रेम (क) ..............................
किंवा तिने प्रेम केलं,
करू दे की!
मला सांगा,
त्यात तुमचं काय (ख) ..............................?





तो तिला एकांतात
बागेमध्ये (ग) .............................. ?
नको तितक्या जवळ जाऊन
अंगाशी (घ) .............................. ?
अहो भेटला तर भेटू दे की,
(च) .............................. तर पेटू दे की!
तुमचं डोकं कशासाठी इतकं गरम झालं?



त्याने प्रेम केलं किंवा
तिने प्रेम केलं,
करू दे की!
मला सांगा,
त्यात तुमचं काय गेलं?





एकदा ती त्याच्यासाठी
वेडीपिशी (छ) .................... ?
आणि पाऊस (ज) ....................
तरी भिजत त्याच्या घरी (झ) .................... ?
घरात तेव्हा कोणीच (ट) ....................
म्हणून त्यांचं (ठ) .................... ?
त्याने तिला जवळ घेऊन
चक्क दार (ड) .................... ?
अहो, लावलं तर लावू दे की,
आणि फावलं तर फावू दे की!
तुमच्या-माझ्या पूर्वजांनी
वेगळं काय केलं?



त्याने प्रेम केलं किंवा
तिने प्रेम केलं,
करू दे की!
मला सांगा,
त्यात तुमचं काय गेलं?




घरात जागा नसते त्यांचं
चालणारच टॅक्सीत प्रकरण!
ते थोडेच बसणारेत
घोकीत पाणिनीचं व्याकरण?
गुलाबी थंडीचे परिणाम हे होणारच!
कोणीतरी कोणाला जवळ ओढून घेणारच!
अहो (ढ) .................... तर घेऊ दे की,
आणि व्हायचं ते होऊ दे की!
तुमच्या घरचं बोचकं त्यांनी
उचलून थोडीच (त) ....................?

त्याने प्रेम केलं किंवा
तिने प्रेम केलं,
करू दे की!
मला सांगा,
त्यात तुमचं काय गेलं?



२. वरील क्रियापदांची मूळ रूपे लिहू या.

| भूतकाळ | मूळ रूप |
|---|---|
| क. केलं | करणे |
| ख. गेलं | |
| ग. भेटला | |
| घ. पेटला | |
| च. होता | |
| छ. झाली | |
| ज. फावलं | |
| झ. नव्हतं | |
| ट. नेलं | |
| ठ. घेतलं | |

३. वरील क्रियापदांपैकी जास्तीत जास्त क्रियापदे वापरून एक गोष्ट तयार करू या आणि ती भूतकाळात लिहू या.

४. तुम्हाला ही कविता कशी वाटली? मंगेश पाडगावकरांनी मांडलेली मते तुम्हाला पटली की नाही? आणि का? समाजमाध्यमांमुळे (सोशल नेटवर्किंग साईट्‌समुळे) आजकालच्या जोडप्यांसाठी एकमेकांसोबत वेळ घालवणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे, असे तुम्ही म्हणाल का? वर्गमित्रांसोबत या विषयावर चर्चा करू या.



## शब्दसंपदा

### १.१ नाम : प्रसारमाध्यमे

| | | |
|---|---|---|
| तो रेडिओ, ते - | ती पुरवणी, त्या पुरवण्या | ते वर्तमानपत्र, ती वर्तमानपत्रे |
| तो टीव्ही, ते - | ती बातमी, त्या बातम्या | ते आंतरजाल |
| तो कॉम्प्युटर, ते - | ती जाहिरात, त्या जाहिराती | ते इंटरनेट |
| तो ई-मेल, ते ई-मेल्स | ती भूमिका, त्या - | ते गुगल |
| | | ते ॲप्लिकेशन, ती ॲप्लिकेशन्स |
| | | ते ॲप, ती ॲप्स |
| | | ते फेसबुक |
| | | ते ट्विटर |

### सामान्यरूपे

नामांना विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये जोडण्याआधी त्या नामांमध्ये काही बदल होतात. त्याला त्या नामांचे सामान्यरूप म्हणतात. आता सामान्य नामांची सामान्यरूपे बघू या.

**१. अकारान्त नामे**

दृष्टिक्षेपातील अकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.

**क. अकारान्त पुल्लिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो हात – ते हात | त्या हाता-, त्या हातां- |
| तो पाय – ते पाय | त्या पाया-, त्या पायां- |
| तो कान – ते कान | त्या काना-, त्या कानां- |



**वापर :** हाताखाली...

**ख. अकारान्त नपुंसकलिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ते घर – ती घरे | त्या घरा-, त्या घरां- |
| ते दार – ती दारे | त्या दारा-, त्या दारां- |
| ते घड्याळ – ती घड्याळे | त्या घड्याळा-, त्या घड्याळां- |



**वापर :** घरामागे...

**आता अकारान्त पुल्लिंगी आणि अकारान्त नपुंसकलिंगी नामांच्या सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १. विद्यार्थी एक   २. विद्यार्थी दोन   ३. सगळे एकत्र

**विद्यार्थी एक :** तू शाळेत येणार आहेस का?

**विद्यार्थी दोन :** नाही. माझ्या पायाला लागलं आहे.

**सगळे एकत्र :** पायाला?

**विद्यार्थी दोन :** हो पायाला.

**सगळे एकत्र :** अच्छा. मग काळजी घे पायाची.

(याचप्रमाणे : कान, हात, नाक, पोट, बोट, नख... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

**ग. अकारान्त स्त्रीलिंगी नामे**

**१. बहीण**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ती बहीण – त्या बहिणी | त्या बहिणी-, त्या बहिणीं- |
| ती ओळ – त्या ओळी | त्या ओळी-, त्या ओळीं- |
| ती भेट – त्या भेटी | त्या भेटी-, त्या भेटीं- |
| पण | पण |
| ती चूक – त्या चुका | त्या चुकी-, त्या चुकां- |



**वापर :** बहिणीमुळे...

२. बाग

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती बाग – त्या बागा | त्या बागे-, त्या बागां- |
| ती झोप – त्या झोपा | त्या झोपे-, त्या झोपां- |



वापर : बागेबद्दल...

३. अक्कल

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती अक्कल – त्या अकला | त्या अकले-, त्या अकला- |
| ती चप्पल – त्या चपला | त्या चपले-, त्या चपलां- |



वापर : अकलेसाठी...

४. घूस

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती घूस – त्या घुशी | त्या घुशी-, त्या घुशीं- |
| ती कूस – त्या कुशी | त्या कुशी-, त्या कुशी- |
| ती हौस – त्या हौसा / हौशी | त्या हौसे-, त्या हौसां-, हौशीं- |



वापर : घुशीवर...




चिंटू, अभ्यासाला बस.
त्याचीच तयारी करतोय.
झाली का तयारी ?
तेच करतोय.
दप्तर शोधतोय.
©चारुहास पंडित


चिंटू, काय देऊ ? लाडू आहेत. चिवडा आहे. शंकरपाळे पण आहेत.
नुडल्स करून देतेस ?
घरात असलेलं का सांगत नाहीस ?
कारण त्यांची टीव्हीवर जाहिरात नसते ना !
©चारुहास पंडित

पुणेरी पाटी


"फुकटयांनो"
विकत घेऊन मला वाचा
ऐक्य
पुण्यनगरी


सूचना
रेनडान्स करताना पूर्ण कपडे घालणे आवश्यक.
- हुकुमावरून

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो पदवीधर, ते | ती पदवीधर, त्या - | ते नाटक, ती नाटके / ती नाटकं |
| तो अभ्यासक्रम, ते - | ती चर्चा, त्या - | ते प्रदर्शन, ती प्रदर्शने / ती प्रदर्शनं |
| तो परिसंवाद, ते - | ती घटना, त्या - | ते वेळापत्रक, ती वेळापत्रके / ती वेळापत्रकं |
| तो विचार, ते - | ती बंदी, त्या - | ते मत, ती मते / ती मतं |
| तो जीव, ते - | ती गर्दी | |
| तो मोह, ते - | ती पावती, त्या पावत्या | |
| तो न्यूनगंड, ते - | ती सवय, त्या सवयी | |
| तो उशीर | ती हौस, त्या हौसा | |
| | ती कल्पना, त्या - | |
| | ती सर्दी | |

| क्रियापद | विशेषण | क्रियाविशेषण | इतर शब्द |
|---|---|---|---|
| ठरवणे | भन्नाट | उशिरा | पाऊण |
| वाजणे | वेगळा | लवकर | सव्वा |
| पोहोचणे | | नियमित | दीड |
| थांबणे | | खदखदून | पावणे |
| भेटणे | | | साडे |
| बसवणे | | | अडीच |
| म्हणणे | | | |
| होणे | | | |
| थकणे | | | |

शब्दसंग्रह

## आता मला हे येतं...

वेळ ठरवणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

प्रश्नशब्द : कितीचा, कितीला, कधीपासून, कधीपर्यंत

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

असणे - वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी (आहे, नाही – होता, नाही होता / नव्हता)

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

होणे - वर्तमानकाळ, भूतकाळ आणि नकारार्थी (होतो, होत नाही - झाला, झाला नाही)

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

अकर्मक भूतकाळ

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

प्रसारमाध्यमांबद्दल बोलणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

स्वत:चे मत व्यक्त करणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

अव्यये : जरी / तरी, जसं / तसं, जेव्हा / तेव्हा, जो / तो

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

क्रियापद + ताना

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

ई-पत्र लिहिणे

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# आरोग्य

## २



## चला, शिकू या...

- अवयव सांगणे
- साधा भविष्यकाळ (बसेन / बसणार / बसणार नाही / करीन / खाईन)
- डॉक्टर-पेशंट संभाषण करू या
- काय झाले ते सांगणे आणि सल्ला देणे
- किरकोळ आजारांबद्दल बोलणे
- तब्येतीसाठी आणि स्वत:साठी काय करीन, हे सांगणे

# २ आरोग्य

१ हा चिंटूचा फोटो. वर्गात चर्चा करून त्याच्या अवयवांची नावे लिहू या. ▶ अ.पु. १




छाती, पोट, पंजा, खांदा, मांडी, केस, कान, दात, डोळे, मान, नाक, दंड, पाऊल, घोटा, तोंड, हात, गुडघा, कोपर, कपाळ, ओठ, गळा, तळहात, जीभ, पाय, टाच, बोट, अंगठा

## २ आपले सगळे अवयव सतत काम करत असतात. कोणते अवयव काय काम करतात?

उदा॰ डोळे : पाहणे, वाचणे, रडणे

१. हात ..................

२. पाय ..................

३. तोंड ..................

४. नाक ..................

५. डोके ..................

## ३ कोणाची आहे ही कविता? आंतरजालावर पूर्ण कविता शोधून वर्गात चर्चा करू या.



**१. म्हणू या.**

गाढव म्हणाले जिराफाला,
"का हो तुमची लांब मान?"
जिराफ म्हणाले,
"आधी सांगा, का हो तुमचे लांब कान?"

## ४ करणार, घासणार, जमणार...

**१. नवरा आणि बायको यांच्यात एका रविवारी झालेला संवाद ऐकू या.**

### साधा भविष्यकाळ
### Simple Future Tense



**सर्व क्रियापदे : अकर्मक आणि सकर्मक : धातू + णार**

All Verbs : Intransitive and Transitive : Root + णार

उदा॰ बसणे : बस + णार = बसणार

गाणे : गा + णार = गाणार

### भविष्यकाळ - होकारार्थी (Future Tense - Affirmative)

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | बसणार | आहे | आम्ही / आपण | बसणार | आहोत |
| तू | बसणार | आहेस | तुम्ही / आपण | बसणार | आहात |
| तुम्ही / आपण | बसणार | आहात | तुम्ही / आपण | बसणार | आहात |
| तो | बसणार | आहे | ते | बसणार | आहेत |
| ती | बसणार | आहे | त्या | बसणार | आहेत |
| ते | बसणार | आहे | ती | बसणार | आहेत |

### भविष्यकाळ - नकारार्थी (Future Tense - Negative)

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | बसणार | नाही | आम्ही / आपण | बसणार | नाही |
| तू | बसणार | नाहीस | तुम्ही / आपण | बसणार | नाही |
| तुम्ही / आपण | बसणार | नाही | तुम्ही / आपण | बसणार | नाही |
| तो | बसणार | नाही | ते | बसणार | नाहीत |
| ती | बसणार | नाही | त्या | बसणार | नाहीत |
| ते | बसणार | नाही | ती | बसणार | नाहीत |

**टीप :**
एखाद्या वाक्यात 'मी बसणार आहे' याऐवजी नुसते 'मी बसणार' असा प्रयोग झाला तर त्याचा अर्थ 'मी नक्की बसणार आहे' असा होतो.

**२. याचप्रमाणे खालील अकर्मक क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.**
असणे, उठणे, झोपणे, चालणे, धावणे, हसणे, रडणे, उडणे, पोहणे

**३. याचप्रमाणे खालील सकर्मक क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.**
करणे, लिहिणे, वाचणे, लावणे, शिकणे, पिणे, खाणे, ठेवणे, सोडणे

### पुणेरी चिमटा

एका दुकानात असा फलक लिहिला होता - 'साड्यांचा रंग जाणार नाही गेल्यास पैसे परत' फलक वाचून बायकांची साडीखरेदीसाठी झुंबड उडाली. घरी गेल्यावर त्यांना कळले की सर्व साड्यांचा रंग जातोय. त्या साड्या घेऊन दुकानात गेल्या आणि दुकान मालकाशी पैसे परत देण्यासाठी हुज्जत घालू लागल्या. दुकानदार शांतपणे म्हणाला 'मी तुमची अजिबात फसवणूक केलेली नाही. तुम्हीच नीट फलक वाचला नाहीत.' दुकानदार पुण्याचा होता हे सांगायला नको.




४. फलकावरील सूचनेत योग्य त्या जागी स्वल्पविराम देऊ या.

........................................................................

........................................................................

........................................................................

........................................................................

........................................................................

## ५ आरोग्यासाठी सर्व काही!

अ॰पु॰ २

**१. रिकाम्या जागा भरू या.**

(उठणे, करणे, चढणे, खाणे, करणे, शिकणे, करणे, जाणे, खाणे, पिणे, झोपणे, जाणे)

आई : काय गं मुलींनो, सुट्टीत आरोग्यासाठी काय काय करणार?

मीना : मी रोज सकाळी लवकर (क) ........................ आणि एक तास फिरायला (ख) ........................ .

आई : आणि ऋतुजा तू? तू नियमितपणे व्यायाम (ग) ........................ का?

ऋतुजा : मी चालायला नाही (घ) ........................, पण मी भरपूर ताजी फळं आणि भाज्या (च) ........................ आणि मी लिफ्ट न वापरता नेहमी जिने (छ) ........................ .

मीना : आम्ही सगळ्या झुंबापण (ज) ........................ .

मानसी : मी काही करणार नाही. मी फक्त (झ) ........................, (ट) ........................, (ठ) ........................ आणि मजा (ढ) ........................ .

**२. वरील वाक्ये पुन्हा एकदा वाचू या व खालील तक्ता भरू या.**

| कर्ता | क्रियापद | कर्ता | क्रियापद |
|---|---|---|---|
| उदा॰ तुम्ही | करणार | | |
| | | | |
| | | | |

६ **कविता वाचू या.**

**खुर्ची आणि स्टूल**



खुर्ची म्हणाली,
"अरे स्टुला, केव्हा येणार चालायला तुला?"
स्टूल म्हणाले,
"त्याच वेळी, जेव्हा हाताने वाजवशील टाळी!"
हे ऐकून पंखा हसला,
पाय नसून फिरत बसला.

**- विंदा करंदीकर**

७ **साधा भविष्यकाळ**

**Simple Future Tense**



**क्रियापद - अकर्मक**

**Verb - Intransitive**

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| मी | बसेन | आम्ही / आपण | बसू |
| तू | बसशील | तुम्ही / आपण | बसाल |
| तुम्ही / आपण | बसाल | तुम्ही / आपण | बसाल |
| तो | बसेल | ते | बसतील |
| ती | बसेल | त्या | बसतील |
| ते | बसेल | ती | बसतील |

**१. याचप्रमाणे खालील अकर्मक क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.**
असणे, उठणे, झोपणे, चालणे, धावणे, हसणे, रडणे, उडणे, पोहणे

### क्रियापद - सर्कमक
### Verb - Transitive

| एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|
| मी | | करीन / करेन | आम्ही / आपण | | करू |
| तू | | करशील | तुम्ही / आपण | | कराल |
| तुम्ही / आपण | अभ्यास | कराल | तुम्ही / आपण | अभ्यास | कराल |
| तो | | करील / करेल | ते | | करतील |
| ती | | करील / करेल | त्या | | करतील |
| ते | | करील / करेल | ती | | करतील |

**२. याचप्रमाणे खालील सकर्मक क्रियापदांची भविष्यकाळातील रूपे लिहू या.**
करणे, लिहिणे, वाचणे, लावणे, शिकणे, पिणे, खाणे, ठेवणे, सोडणे

उदा॰ उद्या मी ट्रेकला नक्की जाईन. (जाणे)
मी रात्री बसेन. (बसणे)
मी अभ्यास पूर्ण करीन / करेन. (करणे)



**टीप :**
करीन = करेन ✔
वाचीन = वाचेन ✔

असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे
- शांता शेळके

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ गोष्ट : मी गोष्ट सांगेन. | मी गोष्ट सांगेन. |
| निरोप | मी निरोप सांगेन. |
| उत्तर | मी उत्तर सांगेन. |
| पत्ता | मी पत्ता सांगेन. |
| माहिती | मी माहिती सांगेन. |
| फोन नंबर | मी फोन नंबर सांगेन. |



**३. याचप्रमाणे 'आम्ही', 'तो', 'ती' (स्त्री॰ए॰व॰), 'ते' (अ॰व॰) वापरून सराव करू या.**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ गोष्ट : तुम्ही गोष्ट सांगाल का? | तुम्ही गोष्ट सांगाल का? |
| निरोप | तुम्ही निरोप सांगाल का? |
| उत्तर | तुम्ही उत्तर सांगाल का? |
| पत्ता | तुम्ही पत्ता सांगाल का? |
| माहिती | तुम्ही माहिती सांगाल का? |
| फोन नंबर | तुम्ही फोन नंबर सांगाल का? |

**४. याचप्रमाणे 'तू' वापरून सराव करू या.**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ गाणे : तो / ती गाणे म्हणणार नाही. | तो / ती गाणे म्हणणार नाही. |
| कविता | तो / ती कविता म्हणणार नाही. |
| पाढे | तो / ती पाढे म्हणणार नाही. |
| बालगीत | तो / ती बालगीत म्हणणार नाही. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ कविता : ते वर्गात नक्कीच कविता करतील. | ते वर्गात नक्कीच कविता करतील. |
| मजा | ते वर्गात नक्कीच मजा करतील. |
| टिंगल | ते वर्गात नक्कीच टिंगल करतील. |
| गंमत | ते वर्गात नक्कीच गंमत करतील. |
| टाईमपास | ते वर्गात नक्कीच टाईमपास करतील. |
| अभ्यास | ते वर्गात नक्कीच अभ्यास करतील. |
| सराव | ते वर्गात नक्कीच सराव करतील. |

**५. याचप्रमाणे 'मी', 'आम्ही', 'तो', 'ती' (स्त्री०ए०व०) वापरून सराव करू या.**

८ **आपले अवयव कधी कधी दमतात आणि मग आपल्याला छोटेमोठे रोग होतात. कुठले आजार गंभीर आहेत आणि कुठले किरकोळ आहेत याचे वर्गीकरण करू या आणि त्यात आपल्याला माहीत असलेले आणखी एक-दोन आजार लिहू या.** ▶अ॰पु॰ ३-४

सर्दी, ताप, घसा दुखणे, खोकला, डोळ्यांची आग होणे,
हृदयविकाराचा झटका येणे, कॅन्सर, टीबी, पोट दुखणे

| किरकोळ आजार | गंभीर आजार |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

९ **डॉक्टर, मला काय झालंय?** ▶अ॰पु॰ ५-६

१. डॉक्टर आणि पेशंट यांच्यातील संभाषण ऐकू या. 

२. आता आपणही अशी संभाषणे लिहू या.

(घसा दुखणे, पोटात दुखणे, पोट बिघडणे, उलट्या होणे)

## १० अरेरे! काय झालं?



**१. खालील संभाषण वाचू या.**

रमेश : अरे, काय झालं?
सुरेश : मी काल रस्त्यावर पाणीपुरी खाल्ली आणि माझं पोट बिघडलं.
रमेश : अरेरे! बाहेरचं खाताना आपण काळजी घेतली पाहिजे.
सुरेश : हो ना! ते विक्रेते स्वच्छता नाही पाळत.

**२. आता आपणही अशी संभाषणे लिहू या.**

क. सायकलवरून पडणे, खरचटणे.
ख. जिन्यावरून पडणे, पाय मुरगळणे.
ग. खूप चहा पिणे, डोके दुखणे.
घ. वजन उचलणे, पाठ दुखणे.
च. कॉम्प्युटरवर खूप वेळ काम करणे, डोळे दुखणे.

## ११ आजीचा बटवा



हवामान किंवा वातावरणात फरक पडला की तब्येतीच्या छोट्या मोठ्या तक्रारी सुरू होतात, आणि सारखं डॉक्टरकडे जाणं, महागडी औषधं घेणं शरीराला आणि खिशाला परवडणारं नसतं. अशा वेळी मदतीला धावून येतो तो आपला आजीचा बटवा. पूर्वी आयुर्वेदिक घरगुती उपायांसाठी 'आजीबाईचा बटवा' हे नाव वापरलं जायचं. 'जुनं ते सोनं' ही म्हण आपल्याकडे प्रचलित आहे. पारंपरिक दृष्टीने किरकोळ आजारांवर केलेले घरगुती प्रथमोपचार आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतात, असं अनेक फिटनेस एक्स्पर्ट म्हणतात. तर पाहू या, आपल्या आजीच्या बटव्यात कोणकोणते घरगुती उपाय सांगितले आहेत.

- सर्दी, कफ झाला असेल तर ज्येष्ठमध खावा, आल्याचा रस प्यावा.
- घशाला त्रास होत असेल किंवा आवाज बसला असेल तर गरम दुधात हळद घालून ते प्यावं.
- जखम झाली असेल, किंवा जखमेतून रक्त वाहत असेल, तर त्यावर हळद लावावी.
- शरीरात प्रोटीन कमी असेल तर रोज एक अंडं खावं. शरीरातील ऊर्जा टिकून राहते.
- सतत खोकला येत असेल, तर १ ते २ चमचे मध घ्यावा किंवा खडीसाखर चघळावी.
- अशक्तपणा कमी करण्यासाठी रोज दही खावं.
- आवळा खाल्ल्याने शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.
- एक कप उकळत्या पाण्यात, दोन बारीक लवंगा टाकून, पाणी गार करून प्यावं. गॅस, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

१. किरकोळ आजारांवर आपण घरगुती उपाय करू शकतो त्यासाठी आपल्याजवळ असतो आजीचा बटवा. काय काय असते या आजीच्या बटव्यात? उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करू या.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हळद | मध | तुळस | गवती चहा | गरम दूध | कापूर | मिरे | दालचिनी | बाम |

**किरकोळ आजार आणि त्यावरील उपाय**

उदा॰ माझा घसा खूप दुखतोय.

मग तू गरम दुधात हळद घालून पी.

२. एक आरोग्याविषयीची चित्रफीत पाहू या.

**क. व्हिडिओमध्ये दाखवलेली चित्रे पाहून रिकाम्या जागा भरू या.**

उदा॰ दही खाल्ल्याने अशक्तपणा कमी होतो.

१. दातदुखीवर ........................ हा एक उत्तम उपाय ठरतो.

२. शरीराची प्रतिकारशक्ती वाढावी म्हणून ........................ शरीराला विटामिन सी आणि फायबर यांचा पुरवठा करतो.

३. आपल्या शरीरातील प्रोटीनची कमतरता ........................ दूर करतात. म्हणूनच ती नियमितपणे खाल्ल्याने शरीरातील ऊर्जा टिकून राहते.

४. वाहत्या जखमेवर ........................ लावली, की ती रक्त वाहणं थांबवते.

५. सर्दी, खोकला, अपचन, मळमळ अशा किरकोळ आजारांवर उत्तम घरगुती उपाय म्हणजे गुणकारी ........................ .

६. मधुमेही रुग्णांच्या शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण वाढवण्यासाठी ........................ अत्यंत गुणकारी ठरते.

७. ........................ उष्णतेचे विकार दूर करण्यास मदत करते.

८. ........................ वजन कमी करण्यास आणि त्वचा तजेलदार करण्यास मदत करते.

९. त्वचेचे रोग बरे व्हावेत म्हणून रक्त शुद्ध करण्यासाठी आयुर्वेदिक डॉक्टर नेहमी ........................ खाण्याचा सल्ला देतात.

**ख. वरील वाक्ये जर / तर वापरून लिहू या.**

उदा॰ जर अशक्तपणा कमी करायचा असेल तर दही खा.

१. ................................................

२. ................................................

३. ................................................

४. ................................................

५. ..........

६. ..........

७. ..........

८. ..........

९. ..........

### १२ भविष्यकाळाची योग्य रूपे वापरू या.

▶ अ॰पु॰ ७

| तक्ता 'अ' | तक्ता 'ब' |
|---|---|
| उदा॰ मी गोष्ट (सांग) सांगणार. | उदा॰ मी गोष्ट सांगेन. |
| १. आम्ही कविता (म्हण) | क. आम्ही कविता (म्हण) |
| २. तू गाणं (ऐक) | ख. तू कविता (ऐक) |
| ३. मी शांत नाही (बस) | ग. तुम्ही शांत (बस) |
| ४. मुली पत्ते (खेळणे) | घ. मुली लपाछपी (खेळणे) |

### १३ खालील तक्ता पूर्ण करू या.

▶ अ॰पु॰ ८

**लावणे**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी बाम लावीन | आम्ही / आपण बाम |
| तू बाम | तुम्ही / आपण बाम |
| तुम्ही / आपण बाम | तुम्ही / आपण बाम |
| तो बाम | ते बाम |
| ती बाम | त्या बाम |
| ते बाम | ती बाम |

## १५ भविष्यकाळ - एकाक्षरी धातू

अ०पु० ९

### Future Tense - Single Letter Roots

धातू म्हणजे कोणत्याही क्रियापदाचे मूळ रूप असते.
उदा० 'करणे' या क्रियापदाचे मूळ रूप 'कर' हे आहे.
त्यामुळे 'कर' हा 'करणे' या क्रियापदाचा धातू आहे.
क्रियापदाचे आज्ञार्थी रूप म्हणजे हे मूळ धातुरूपच असते.
उदा० कर, जा, खा, चल इ०

| क्रियापद | खाणे | पिणे | भिणे | धुणे | जाणे | देणे | घेणे | नेणे | येणे | होणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धातू | खा | पी | भी | धू | जा | दे | घे | ने | ये | हो |
| मी | खाईन | पिईन | ............ | धुवीन / धुईन | ............ | ............ | ............ | ............ | ............ | होईन |
| आम्ही / आपण | खाऊ | पिऊ | ............ | धुवू / धुऊ | जाऊ | ............ | ............ | ............ | ............ | ............ |
| तू | ............ | पिशील | ............ | धुशील | | ............ | ............ | ............ | ............ | ............ |
| तुम्ही / आपण | खाल | प्याल | भ्याल | धुवाल / धुआल | जाल | ............ | ............ | ............ | ............ | ............ |
| तो / ती / ते | खाईल | पिईल | ............ | धुवील / धुईल | ............ | ............ | ............ | ............ | ............ | ............ |
| ते / त्या / ती | खातील | पितील | ............ | धुतील | ............ | ............ | ............ | ............ | ............ | ............ |



### पुणेरी पाट्या

मधुमेही व्यक्तीच्या दारावरील पाटी






## १४ भविष्यकाळ एकाक्षरी धातू

**१. खाणे**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी खाईन | आम्ही / आपण ............ |
| तू ............ | तुम्ही / आपण ............ |
| तुम्ही / आपण ............ | तुम्ही / आपण ............ |
| तो ............ | ते ............ |
| ती ............ | त्या ............ |
| ते ............ | ती ............ |

**२. जाणे**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी ............ | आम्ही / आपण ............ |
| तू ............ | तुम्ही / आपण ............ |
| तुम्ही / आपण ............ | तुम्ही / आपण ............ |
| तो ............ | ते ............ |
| ती ............ | त्या ............ |
| ते ............ | ती ............ |



## १६ रिकाम्या जागी योग्य रूपे लिहा.

उदा॰ मी घरी (जा) जाईन.

१. आम्ही खायला (कर) ............ .

२. अनिल पुस्तक (दे) ............ .

३. तुम्ही दूध (पी) ............ .

४. मुलगे शाळेत (ये) ............ .



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी | |
| साठीनंतर मी फक्त दूध पिईन. | साठीनंतर मी फक्त दूध पिईन. |
| आम्ही | साठीनंतर आम्ही फक्त ताक पिऊ. |
| तू | साठीनंतर तू फक्त लस्सी पिशील. |
| तुम्ही | साठीनंतर तुम्ही फक्त फळांचा रस प्याल. |
| तो / ती | तो / ती साठीनंतर फक्त पाणी पिईल. |
| ते / त्या | ते / त्या साठीनंतर फक्त औषध पितील. |

**१७** **अखिलेश व त्याच्या मित्रांनी नवीन वर्षी आपल्या आरोग्यासाठी काय काय संकल्प केले आहेत ते बघू या. ते संकल्प वाचू या आणि वाक्ये बनवू या. (मी / आम्ही)**

उदा॰ रोज सकाळी लवकर उठणे आणि जिमला जाणे.
मी रोज सकाळी लवकर उठेन आणि जिमला जाईन.
आम्ही रोज सकाळी लवकर उठू व जिमला जाऊ.

१. आहार हलकाफुलका ठेवणे. २. दारू आणि सिगारेट सोडणे.
३. भरपूर फळे व भाज्या खाणे. ४. बाहेर कमी खाणे.
५. चहा आणि कॉफी कमी पिणे. ६. आठवड्यात दोन वेळा चालायला जाणे.

**१८** **आणि आता त्यांचे मित्र काय करतील? वरील उपाय वापरून ते काय काय करतील ते लिहू या.**

उदा॰ ते – रोज सकाळी लवकर उठतील आणि फिरायला जातील.

**१९** **क्रियापदाचा भविष्यकाळ वापरून रिकाम्या जागा भरू या.** ▶अ॰पु॰ १०-११

१. मी सकाळी सहा वाजता गाडी (काढणे) काढेन आणि दिवसभर मनसोक्त भटकणे) ................ .
२. मी तासभर आधीच तिथे (पोहोचणे) ................ .
३. मला जास्त त्रास दिलास तर तुला (मारणे) ................ हं!
४. तू काळजी करू नकोस, मी सगळं नीट (सांभाळणे) ................ .
५. तो परवा समीरकडून पुस्तक (घेणे) ................ .
६. उमा तिकडे जाऊन हॉटेलमध्ये (जेवणे) ................ .
७. त्या मुली विशालला लाल गुलाब (देणे) ................ .
८. तू इथे आलीस की तो तुला सगळं पुणे शहर (दाखवणे) ................ .
९. नाना आजोबा बाळाला रोज मोटारीतून (फिरवणे) ................ .
१०.(खाणे) ................ तर तुपाशी नाही तर उपाशी.

**पुणेरी चिमटा**

एक बाळ जन्मत:च बोलू लागते.
बाळ - खायला काय आहे?
नर्स - पोहे, उप्पीट आणि
साबुदाणा खिचडी तयार आहे!
बाळ - अरे वा! पुन्हा पुण्यातच
जन्माला आलो वाटतं!

**पुणेरी चिमटा**

स्थळ - पुणे स्टेशन. प्रवासी बसमधून उतरून बंड्याने रिक्षा थांबवली.
बंड्या - काय, सदाशिव पेठेत येणार का?...
रिक्षावाला - मीटर बंद आहे. शंभर रुपये होतील.
बंड्या - शंभर? मी चाळीसच देईन.
रिक्षावाला - (उपहासाने) चाळीस रुपयात कोण नेणारे?...
बंड्या - तू मागे बस. मी नेतो.

**म्हणी आणि वाक्प्रचार**

गाढवाला गुळाची चव काय?

असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी.

बाळाचे पाय पाळण्यात दिसतात.

आपलेच दात नि आपलेच ओठ.

**संभाषण करू या**





धुळीमुळे लोकांना वेगवेगळे आजार / रोग होणे
प्रदूषणाचा तब्येतीवर परिणाम होणे
हवा बदलली की लगेच प्रकृती बिघडणे
थंडी वाजणे
गरम होणे

अरबटचरबट खायला आवडणे
चमचमीत खाण्याने पोट बिघडणे
चहामुळे तरतरी येणे
कॉफीमुळे ताजेतवाने वाटणे
वेळेवर न खाल्ल्यामुळे डोके दुखणे

चौरस आहार घेणे
दक्षता बाळगणे
चालायला जाणे
ताज्या हवेत फेरफटका मारणे
नियमित व्यायाम करणे
सायकल चालवणे
अन्नपदार्थ स्वस्त आणि प्रकृतीला चांगले असणे

संवाद

## २० करा आणि शिका

१. दोन गट करू या. एका गटाने चिठ्ठ्यांवर किरकोळ आजारांची नावे लिहावीत आणि दुसऱ्या गटाने किरकोळ आजारांवरील उपाय लिहावेत. मग त्यांनी चिठ्ठ्यांची अदलाबदल करावी. ज्या गटाजवळ आजार असतील त्या गटाने एकेक आजार सांगावा आणि दुसऱ्या गटाने त्यावरील उपाय सांगावा.

किंवा

याप्रमाणे चिठ्ठ्या करू या :

| पुढील बाजू | मागील बाजू |
|---|---|
| डोकेदुखी | बाम लावणे |

प्रत्येकाने एका व्यक्तीला एक आजार विचारावा आणि दुसऱ्याने त्यावर उपाय सांगावा. (मागील बाजूवरील उपाय मदतीसाठी असेल.) दोघांनी एकेका आजारावरील उपचार सांगितल्यानंतर त्यांनी आपली चिठ्ठी दुसऱ्याला देऊन त्याची चिठ्ठी घ्यावी आणि नवीन व्यक्तीला त्या आजारावरील उपचार विचारावा.

२. साहित्य - तीन मोठे चार्टपेपर, रंगीत पेन्सिली अथवा स्केचपेने, अवयवांची यादी.

शिक्षकाने अवयवांची यादी भिंतीवर लावावी.

वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट करावेत : पुल्लिंगी । स्त्रीलिंगी । नपुंसकलिंगी

प्रत्येक गटाने भिंतीवरच्या यादीतील आपल्या गटाचे शब्द शोधावे आणि त्याचे चित्र काढावे. नंतर इतर गट चित्र पाहून ते शब्द ओळखतील. जास्तीत जास्त शब्द ओळखणारा आणि कमीत कमी चुका करणारा गट ठरेल विजयी!

- हात
- दाढ
- पोट
- नख
- करंगळी
- हनुवटी
- गळा
- अंगठा
- कपाळ
- डोके
- गाल
- कंबर
- डोळा
- पाऊल
- पाठ

पुल्लिंगी नाम



(तो चेहरा)

स्त्रीलिंगी नाम



(ती मिशी)

नपुंसकलिंगी नाम



(ते बोट)

## शब्दसंपदा

### २.१ नाम : अवयव

| | | |
|---|---|---|
| तो केस, ते - | ती दाढ, त्या दाढा | ते डोके / ते डोकं, ती डोकी |
| तो चेहरा, ते चेहरे | ती हनुवटी, त्या हनुवट्या | ते कपाळ, ती कपाळे / ती कपाळं |
| तो डोळा, ते डोळे | ती मिशी, त्या मिश्या | ते नाक, ती नाके / ती नाकं |
| तो गाल, ते - | ती दाढी, त्या दाढ्या | ते तोंड, ती तोंडे / ती तोंडं |
| तो दात, ते - | ती मान, त्या माना | ते कोपर, ती कोपरे / ती कोपरं |
| तो घसा, ते घसे | ती छाती, त्या छात्या | ते मन, ती मने / ती मनं |
| तो गळा, ते गळे | ती पाठ, त्या पाठी | ते पोट, ती पोटे / ती पोटं |
| तो हात, ते - | ती कंबर, त्या कंबरा | ते बोट, ती बोटे / ती बोटं |
| तो दंड, ते - | ती करंगळी, त्या करंगळ्या | ते नख, ती नखे / ती नखं |
| तो अंगठा, ते अंगठे | ती मांडी, त्या मांड्या | ते पाऊल, ती पावले / ती पावलं |
| तो पाय, ते - | | ते बद्धकोष्ठ |
| तो गुडघा, ते गुडघे | | |

### २.२ नाम : फळे

| | | |
|---|---|---|
| तो आंबा, ते आंबे | ती पपई, त्या पपया | ते सफरचंद, ती सफरचंदे / ती सफरचंदं |
| तो पेरू, ते - | ती स्ट्रॉबेरी | ते केळे / ते केळं, ती केळी |
| तो चिक्कू, ते - | | ते कलिंगड, ती कलिंगडे / ती कलिंगडं |
| तो अननस, ते - | | ते संत्रे / ते संत्रं, ती संत्री |
| तो पेरू, ते - | | ते मोसंबे / ते मोसंबं, ती मोसंबी |
| तो नारळ, ते - | | ते डाळिंब, ती डाळिंबे / ती डाळिंबं |
| तो (फळांचा) घड, ते - | | ते द्राक्ष, ती द्राक्षे / ती द्राक्षं |
| | | ते सीताफळ, ती सीताफळे / ती सीताफळं |

## २.३ नाम : भाज्या

| | | |
|---|---|---|
| तो बटाटा, ते बटाटे | ती भाजी, त्या भाज्या | ते गाजर, ती गाजरे / ती गाजरं |
| तो कांदा, ते कांदे | ती मिरची, त्या मिरच्या | ते वांगे / ते वांगं, ती वांगी |
| तो फ्लॉवर, ते - | ती सिमला मिरची, त्या सिमला मिरच्या | ते आले / ते आलं, |
| तो मटार, ते - | ती पालेभाजी, त्या पालेभाज्या | ते लिंबू, ती लिंबे / ती लिंबं |
| तो वाटाणा, ते वाटाणे | ती कोथिंबीर, त्या कोथिंबिरी | |
| तो पालक, - | ती काकडी, त्या काकड्या | |
| तो टोमॅटो, ते - | ती मेथी, | |
| तो कोबी, ते - | | |
| तो भोपळा, ते भोपळे | | |



## २१ सामान्यरूपे - आकारान्त नामे

**दृष्टिक्षेपातील आकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.**

**क. आकारान्त पुल्लिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो काका – ते काका | त्या काका-, त्या काकां- |
| तो मामा – ते मामा | त्या मामा-, त्या मामां- |

**वापर :** काकाजवळ...

**१. आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र



**विद्यार्थी एक :** ही पोरगी कोणाची?

**विद्यार्थी दोन :** ही पोरगी काकाची!

**सगळे :** काकाची?

**विद्यार्थी दोन :** मग काय, माझ्याच काकाची!

**सगळे :** अरे हो, कळलं बाबा!

(याचप्रमाणे : दादा, मामा, काका, बाबा,... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो मासा – ते मासे | त्या माशा-, त्या माशां- |
| तो ससा – ते ससे | त्या सशा-, त्या सशां- |
| तो पैसा – ते पैसे | त्या पैशा-, त्या पैशां- |



**वापर :** पैशापुढे...

**२. आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

**विद्यार्थी एक :** पैशाबद्दल तुमचं काय मत आहे?

**सगळे :** पैशाबद्दल?

**विद्यार्थी एक :** हो. पैशाबद्दल.

**सगळे :** पैशावर आमचं खूप प्रेम आहे.

(याचप्रमाणे : मासा, ससा, डोसा,... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो दिवा – ते दिवे | त्या दिव्या-, त्या दिव्यां- |
| तो डोळा – ते डोळे | त्या डोळ्या-, त्या डोळ्यां- |
| तो घोडा – ते घोडे | त्या घोड्या-, त्या घोड्यां- |



**वापर :** दिव्यावर...

**३. आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

**विद्यार्थी एक :** काय रे, ते तेल कशासाठी घेऊन चाललायस तू?

**विद्यार्थी दोन :** दिव्यासाठी.

**सगळे :** दिव्यासाठी नक्की?

**विद्यार्थी दोन :** हो. खरंच दिव्यासाठी.

**सगळे :** चल रे. काहीही बोलू नकोस.

(याचप्रमाणे : डोळा, घोडा... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

## २१ आकारान्त स्त्रीलिंगी नामे

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती भाषा – त्या भाषा | त्या भाषे-, त्या भाषां- |
| ती दिशा – त्या दिशा | त्या दिशे-, त्या दिशां- |
| ती जागा – त्या जागा | त्या जागे-, त्या जागां- |

**वापर :** भाषेमुळे...

**१. आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

**विद्यार्थी एक :** आपण याचं कारण शोधलं पाहिजे. कशाबद्दल शंका आहे तुला?

**विद्यार्थी दोन :** कदाचित भाषेबद्दल.

**सगळे :** भाषेबद्दल?

**विद्यार्थी दोन :** हो. भाषेबद्दल.

**सगळे :** नाही हं. आम्हाला नाही वाटत तसं काही.




(याचप्रमाणे : दिशा, जागा... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)






# २ आरोग्य






## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो गाल, ते - | ती तपासणी, त्या तपासण्या | ते घोडामैदान, ती घोडामैदाने / ती घोडामैदानं |
| तो पंजा, ते पंजे | ती उलटी, त्या उलट्या | ते भोकाड, ती भोकाडे / ती भोकाडं |
| तो खांदा, ते खांदे | ती सर्दी | ते मलम, ती मलमे / ती मलमं |
| तो घोटा, ते घोटे | ती सरासरी | ते अपचन, - |
| तो रोग, ते - | ती सुटका | ते लंघन, - |
| तो आजार, ते - | ती हालचाल, त्या हालचाली | ते वृक्षारोपण, ती वृक्षारोपणे / ती वृक्षारोपणं |
| तो खोकला | ती काळजी, त्या काळज्या | ते प्रथिन, ती प्रथिने / ती प्रथिनं |
| तो ताप, ते - | ती स्वच्छता | ते मिरे / ते मिरं, त्या मिरी |
| तो हृदयविकार | ती वेधशाळा, त्या - | |
| तो हृदयरोग | ती तुळस, त्या तुळशी | |
| तो रक्तदाब | ती दालचिनी | |
| तो झटका, ते झटके | ती साखर | |
| तो उपाय, ते - | ती लपाछपी | |
| तो उपचार, ते - | ती फजिती, त्या फजित्या | |
| तो औषधोपचार, ते - | | |

| | | |
|---|---|---|
| तो मध | | |
| तो गवती चहा | | |
| तो कापूर | | |
| तो मैदा | | |
| तो सूर्यनमस्कार, ते - | | |
| तो संकल्प, ते - | | |
| तो पाहुणा, ते पाहुणे | | |
| तो दुष्काळ, ते - | | |
| तो अंदाज, ते - | | |
| तो हट्टीपणा | | |

| **क्रियापद** | **विशेषण** | **क्रियाविशेषण** |
|---|---|---|
| दुखणे | किरकोळ | दिवसेंदिवस |
| खरचटणे | हलकाफुलका | लगबगीने |
| मुरगळणे | गंभीर | यंदा |
| रडणे | एकेक | |
| चेपणे | सविस्तर | |
| भिजणे | विजयी | |
| फणफणणे | | |
| खवखवणे | | |
| सांभाळणे | | |
| आवरणे | | |
| घासणे | | |
| सजवणे | | |
| वाजवणे | | |

## आता मला हे येतं ...

**अवयव सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सामान्य भविष्यकाळ (बसणार / बसणार नाही / बसेन / करीन / खाईन)**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**डॉक्टर-पेशंट संभाषण करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**काय झाले ते सांगणे आणि सल्ला देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**किरकोळ आजारांबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**तब्येतीसाठी आणि स्वत:साठी काय करीन, हे सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# आवडनिवड

# ३



## चला, शिकू या...

- ◎ आवडीनिवडी सांगणे
- ◎ विकारी / अविकारी विशेषण
- ◎ क्रियापद + ला
- ◎ वस्तूंचे / व्यक्तींचे वर्णन करणे, अभिप्राय देणे
- ◎ प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कसंय...
- ◎ आम्ही दोघे, आम्ही दोघी, आम्ही दोघं
- ◎ छंद, खरेदी, दागदागिने

# ३ आवडनिवड

## १ आवडीनिवडी

**१. तुम्हाला / तुला काय काय आवडतं? आवडीनिवडी व चित्रांच्या जोड्या लावू या आणि उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या.**

क. निवांत पडून राहायला

ख. कॉम्प्युटरवर खेळायला

ग. मनमुराद नाचायला

घ. बाईकने फिरायला

च. मॉलमध्ये फिरायला




उदा॰ क. मला निवांत पडून राहायला आवडतं. आणि तुला?

ख. ..........................................................................

ग. ..........................................................................

घ. ..........................................................................

च. ..........................................................................

२. **तुम्हाला / तुला काय काय आवडतं? आवडीनिवडी व चित्रांच्या जोड्या लावू या आणि उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या.**

क. सिनेमा बघायला

ख. मोबाईलवर चॅट करायला

ग. चौपाटीवर पाणीपुरी खायला

घ. मित्रांसोबत गप्पा मारायला

च. साहसी खेळ खेळायला

छ. समाजसेवा करायला

ज. पर्यावरणाची काळजी घ्यायला




**टीप :** मला सिनेमा बघायला आवडतं. ✓
मला सिनेमा बघायला आवडतो. ✓

उदा॰ क. मला सिनेमा बघायला आवडतं.
मला सिनेमा बघायला आवडतो.

ख. ..............................................................................

..............................................................................

ग. ..............................................................................

..............................................................................

घ. ..............................................................................

..............................................................................

च. ..............................................................................

..............................................................................

छ. ..............................................................................

..............................................................................

ज. ..............................................................................

..............................................................................

३. आणि तुमच्या मित्र-मैत्रिणींना काय आवडतं? आपल्या सहकाऱ्यांना प्रश्न विचारू या आणि उत्तरे वर्गात सांगू या.



| | | |
|---|---|---|
| त्याला / तिला / त्यांना | फुटबॉल खेळणे / खेळणं<br>नाटक पाहणे / पाहणं<br>अभ्यास करणे / करणं<br>स्वयंपाक करणे / करणं | आवडते / तं |

## २ आजच्या तरुणाईची आवडनिवड

▶अ॰पु॰ १

१. खालील उतारे वाचू या. आणि चर्चा करू या.



**झकास**

मला रोज वेगळ्या प्रकारचे कपडे घालायला आवडतात. निळी जीन्स आणि त्यावर गडद रंगाचे टॉप आवडतात. मी फार सडपातळ आहे, त्यामुळे मला सैल कपडे जास्त आवडतात. अधूनमधून सलवार-कुडता घालून किंवा चक्क साडी नेसून सगळ्यांना धक्का द्यायलाही मला आवडतं. मासिकांमधले फोटो पाहून फॅशन करायला मला अजिबात आवडत नाही. माझी फॅशन मीच ठरवते! पण खरं सांगू का? कपडे, फॅशन, दिसणं याबद्दल मी जेवढा कमी विचार करते तेवढी जास्त आनंदी असते.

क. सध्या कोणता रंग फॅशनमध्ये आहे? तुम्ही कुठे खरेदी करता? तुम्ही कोणते ब्रँड वापरता? तुम्ही कुठे कोणते कपडे घालणं पसंत करता?

**गाणी मनातली**

माझ्या प्लेलिस्टमध्ये तुम्हाला वेगवेगळ्या प्रकारची गाणी ऐकायला मिळतील. म्हणजे अगदी लता मंगेशकरांच्या आवाजातील ‘मोगरा फुलला...’पासून अवधूत गुप्तेच्या आवाजातील ‘मधुबाला...’पर्यंत किंवा ‘आय जस्ट कॉल्ड टू से...’पासून ‘डीजे ब्राव्हो...’पर्यंत. शंकर महादेवन माझा आवडता गायक आहे. त्याची सगळीच गाणी चांगली आहेत. पण माझं सध्याचं आवडतं गाणं म्हणाल, तर ‘सूर निरागस हो... ’



ख. एकमेकांची प्लेलिस्ट बघून सांगू या कोणाला कोणत्या प्रकारची गाणी आवडतात. (चित्रपट संगीत, पॉप, इ॰डी॰एम॰)

**माझी आवडती ॲप्स**

माझं सध्याचं सगळ्यात आवडतं ॲप म्हणजे व्हॉट्सॲप. व्हॉट्सॲपमुळे जगभराच्या लोकांशी सर्वकाळ संपर्कात राहता येतं. फोटोज, व्हिडिओज शेअर करता येतात आणि व्हॉट्सॲपवरील ग्रुप्स म्हणजे एक वेगळीच धमाल. पण असंच एखादं नवं ॲप आलं प्ले स्टोअरवर, तर कुणास ठाऊक, व्हॉट्सॲपची जागा ते नवं ॲप घेईलसुद्धा.



**ग. आपल्या आवडत्या ॲपविषयी वर्गात ३-४ वाक्यांत सांगू या.**




माझी आवडती पुस्तकं

मला वाचायला आवडतं. पण मी चोखंदळ वाचक नाही हे मला कळतं. म्हणजे मला शिवाजी सावंतांचं 'मृत्युंजय' ही आवडतं आणि खानोलकरांचं 'गणूराया आणि चानी' ही आवडतं. चेतन भगतचीही पुस्तकं आवडतात आणि मुराकामीचीही आवडतात. यावरून मित्र नेहमी माझी टिंगल करतात. म्हणतात - 'तुला काहीही कसं रे आवडतं?' त्यांचं म्हणणं बरोबर असेल, पण माझं असंच आहे.



**घ. तुम्ही सध्या कोणतं पुस्तक वाचत आहात? ते कोणत्या भाषेत आहे? ते तुम्हाला कसं वाटतं?**

**२. वरील उताऱ्यांच्या मदतीने खालील तक्ता भरू या.**

| नाम / सर्वनाम | विशेषण | नाम | विशेषण |
|---|---|---|---|
| उदा॰ जीन्स | निळी | च. रंग | |
| क. मी | | छ. कपडे | |
| ख. गायक | | ज. गाणी | |
| ग. गाणं | | झ. ॲप | |
| घ. वाचक | | | |

## ३ खालील शब्दांमधून आकारान्त शब्द वेगळे काढू या.

अ.पु. २-३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. काळा | २. मोठा | ३. हळू | ४. खुळा | ५. गुलाबी |
| ६. लठ्ठ | ७. सडपातळ | ८. पांढरा | ९. लहान | १०. साधा |

| आकारान्त विशेषणे<br>**Adjectives ending with 'आ'** | इतर विशेषणे<br>**Other Adjectives** |
|---|---|
| क. | १. |
| ख. | २. |
| ग. | ३. |
| घ. | ४. |
| च. | ५. |

## ४ वाचू या.

अ.पु. ४



एखाद्याला काय खायला आवडते ते पाहून ठेवायचे आणि मग आठवणीने तो पदार्थ करून त्या माणसाला खुश करायचे, हा माझ्या सुमनमावशीचा छंद आहे. खाणाऱ्याने 'वा!' म्हटले, की तिला आकाश ठेंगणे होते. सासऱ्यांना शेवयांची खीर आवडते; नवऱ्याला आंबेडाळ आवडते; त्याच्या ऑफिसमधल्या कपाडियासाहेबांना भाज्यांचे लोणचे आवडते, मला गुळाचा खरवस आवडतो; शेजारच्या परबआजींना पालकाची भजी आवडतात... सतत दुसऱ्याचा विचार करायचा. "सुमन, तुला काय आवडतं गं?" असे कुणी कधी विचारत नाही. समजा, कुणी कधी विचारलेच, तर तिला सांगताही येणार नाही.

**१. सुमनमावशीचा छंद कोणता?**

**२. सुमनमावशीच्या हातचं कोणाला काय काय आवडतं?**

| | |
|---|---|
| क. सासरे | १. गुळाचा खरवस |
| ख. नवरा | २. पालकाची भजी |
| ग. कपाडियासाहेब | ३. शेवयांची खीर |
| घ. परबआजी | ४. भाज्यांचे लोणचे |
| च. लेखक | ५. आंबेडाळ |



**३. तुमच्या घरात उत्तम स्वयंपाक करणारं कोणी आहे का? त्यांच्या खाण्याच्या आवडी-निवडी तुम्ही कधी विचारता का? काय आहेत त्या?**

.................................................................................................................................

## ५ चांगलंचुंगलं खाऊ या.

▶ अ.पु. ५-६




नुकतेच एक चांगले पुस्तक वाचण्यात आले. त्या पुस्तकाची मांडणीही चांगली आहे. पाककला हा विषय मराठी लेखकांनी ह्यापूर्वी अशा प्रकारे हाताळला नव्हता. या पुस्तकातील छायाचित्रे फारच चांगली आहेत आणि काही चांगले आंतरराष्ट्रीय पदार्थ त्यात दिले आहेत. असे पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल लेखकाचे आणि प्रकाशकाचे अभिनंदन करायला हवे. या चांगल्या पाककृती तुम्हीही करू शकता.

**१. वरील उताऱ्याच्या मदतीने खालील तक्त्यात 'चांगला' या विशेषणाचे योग्य ते रूप भरू या.**

| | | | |
|---|---|---|---|
| **एकवचन** | (तो) | (ती) | (ते) |
| | .................... विषय | .................... मांडणी | .................... पुस्तक |
| **अनेकवचन** | (ते) | (त्या) | (ती) |
| | .................... पदार्थ | .................... गोष्टी | .................... छायाचित्रे |

**विकारी विशेषणे**

**Inflected Adjectives / Adjectives with Declension**

**टीप :**

**विकारी विशेषणे Inflected Adjectives / Adjectives with Declension**

चांगला / नवा / जुना / वेगळा / नकटा / बरा / मोठा / बुटका / गोरा / पहिला / पांढरा...

सर्व आकारान्त विशेषणे ही विकारी असतात.

All Marathi adjectives ending with 'आ' are inflected / declined.

**अविकारी विशेषणे Adjectives without Declension**

लहान / हुशार / प्रेमळ / मनमिळाऊ / जबाबदार / मठ्ठ / उंच / गोल / लांब / सरळ / विनोदी / गंभीर / बोटभर / हातभर...

| लिंग | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पुल्लिंगी | पांढरा | पांढरे |
| स्त्रीलिंगी | पांढरी | पांढऱ्या |
| नपुंसकलिंगी | पांढरे / पांढरं | पांढरी |

व्याकरण

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ कशी गोष्ट सांगू? | |
| चांगली गोष्ट सांग. | चांगली गोष्ट सांग. |
| चांगली / छोटी / मोठी<br>जुनी / नवी / बरी | चांगली / छोटी / मोठी /<br>जुनी / नवी / बरी |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ हे पेन चांगलं आहे. | हे चांगलं आहे? मग ते कसं आहे? |
| हे पेन चांगलं आहे. | हे चांगलं आहे? मग ते कसं आहे? |
| हा शर्ट मळलेला आहे. | हा मळलेला आहे? मग तो कसा आहे? |
| ही खोली छोटी आहे. | ही छोटी आहे? मग ती कशी आहे? |
| हे घड्याळ मोठं आहे. | हे मोठं आहे? मग ते कसं आहे? |
| हा मोबाईल नवा आहे. | हा नवा आहे? मग तो कसा आहे? |
| ही गाडी जुनी आहे. | ही जुनी आहे? मग ती कशी आहे? |



**२. फरक पाहू या.**

**आकारान्त विशेषणे (विकारी)**
**Adjectives with Declension**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| **पुल्लिंगी** | काळा कागद | काळे कागद |
| **स्त्रीलिंगी** | काळी वही | काळ्या वह्या |
| **नपुंसकलिंगी** | काळे / काळं / अक्षर | काळी अक्षरे / अक्षरं |

**इतर विशेषणे (अविकारी)**
**Adjectives without Declension**

| | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| **पुल्लिंगी** | सुंदर कागद | सुंदर कागद |
| **स्त्रीलिंगी** | सुंदर वही | सुंदर वह्या |
| **नपुंसकलिंगी** | सुंदर अक्षर | सुंदर अक्षरे / अक्षरं |

**६ पुढे दिलेल्या विशेषणांचे योग्य रूप वापरून त्याखालील वाक्ये पूर्ण करू या.** ▶ अ॰पु॰ ७-८

१. **नेटका**
तुमचे सगळेच कार्यक्रम नेटके होतात, तसा याही वेळचा कार्यक्रम (क) .................................. झाला.

२. **बडबडा**

पारनेकरांचे अख्खे कुटुंबच (ख) .................... आहे. मुलं तर (ग) .................... आहेतच, पण मुलीही (घ) .................... आहेत.

३. **हिरवा**

त्या दिवशी कुमी हिरव्या रंगात बुचकळून काढल्यासारखी दिसत होती. (च).................... साडी, (छ) .................... ब्लाऊज, (ज) .................... बांगड्या, कुंकूदेखील (झ) ....................! पायातले बूट (ट) .................... होते का, ते मी काही वाकून पाहिले नाही; पण हाताच्या बोटांची नखेसुद्धा (ठ) .................... होती, हे पाहून मी हताश झालो. क्षणभर आपल्याला (ड) .................... कावीळ झाली आहे की काय, अशीही शंका आली. (ढ) .................... रंग मलाही आवडतो; पण हे जरा अतीच होते.

४. **बरा**

याही वेळच्या बाकरवड्या (ण) .................... नव्हत्या, आणि बटाट्याचा चिवडादेखील (त) .................... नव्हता. दुकान बदला आता! असो. गेल्या खेपेला जिजीची तब्येत (थ) .................... नव्हती. ती कशी आहे?

५. **लाडका**

अप्पा सध्या एकदम खुशीत आहेत. दिवाळीनिमित्त त्यांच्या (द) .................... लेकी, (ध) .................... जावई आणि (न) .................... नातवंडे आली आहेत.

६. **बोचरा**

हवामान अचानक बिघडले. (प) .................... वारा आणि (फ) .................... थंडी, यामुळे बाहेर पडण्याची सोय राहिली नाही.

## ७ असे हो कसे? रिकाम्या जागी विशेषणाचे योग्य ते रूप लिहू या.

▶अ.पु. ९-१०

१. माझी मैत्रीण निराळी
माझा मित्र (क) ....................
आमचं मैत्र (ख) ....................

२. माझी शाळा (ग) ....................
माझा वर्ग चांगला
माझं कॉलेज (घ) ....................

३. माझी बहीण (च) ....................
माझा मेव्हणा (छ) ....................
माझं भाचरू ठेंगणं

४. माझी वस्ती (ज) ....................
माझा परिसर सुंदर
माझं घर (झ) ....................

५. माझी बायको (ट) ....................
माझा मुलगा (ठ) ....................
माझं बाळ शांत

६. माझी बँक दूर
माझा कारखाना (ड) ....................
माझं ऑफीस (ढ) ....................

## ८ तुम्हाला काय आणि कसे हवे? अनेक उत्तरे शक्य आहेत.

▶अ॰पु॰ ११

| नाम | | विशेषण |
|---|---|---|
| १. कॉम्प्युटर |  | क. नवा |
| २. बाळ |  | ख. मोठा |
| ३. घड्याळ |  | ग. छोटा |
| ४. गाडी |  | घ. चांगला |
| ५. स्कूटर |  | च. स्वस्त |
| ६. मैत्रीण |  | छ. काळा |
| ७. नोकरी |  | ज. भोळा |
| ८. सदनिका |  | झ. जवळचा |
| ९. परदेश दौरे |  | ट. परवडणारा |
| १०. मॉलमध्ये खरेदी |  | ठ. प्रेमळ |
| ११. कपडे |  | ड. महागडा |
| १२. स्मार्टफोन |  | ढ. पांढरा |

**१. नाम आणि विशेषण यांच्या जोड्या लावू या आणि उदाहरणाप्रमाणे वाक्य तयार करू या.**

उदा॰ कॉम्प्युटर कसा हवा? मला हवा नवा कॉम्प्युटर.

क. ..........

ख. ..........

ग. ..........

घ. ..........

च. ..........

छ. ..........

ज. ..........

झ. ..........

ट. ..........

ठ. ..........

ड. ..........

ढ. ..........



**२. आपल्या वर्गमित्रांबरोबर चर्चा करू या, आपली आणि त्यांची निवड एकच आहे का?**

**३. आता विशेषणे बदलून बघू या, काय गंमत होते.**

उदा॰ मोठी मैत्रीण

..........

..........

..........

..........

..........

**४. आता हे शब्द वापरून वाक्ये बनवू या.**

उदा॰ साहिल नवा कॉम्प्युटर घेतो.

..........

..........

..........

..........

..........

**५. तुम्हाला काही नवी विशेषणे सुचतायत का?**

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

**६. खालील विशेषणे वापरून बघू या. त्यांच्यात काही बदल होतो का ते सांगू या.**

(हुशार, कंजूष, उंच, ठेंगणा, रेखीव, बेजबाबदार, गर्विष्ठ, अभ्यासू, सावळा, गोरा, जाडा, स्वस्त, महाग, हलका, नीटनेटका)

उदा॰ महाग, हलकी

साहिल महाग कॉम्प्युटर घेतो.    साहिल हलकी स्कूटर शोधतो.

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

.................................................................................................................................

### पुणेरी चिमटा



खंडूजीबाबा चौकातल्या सिग्नलला एका बाईंची मोटार नेमकी बंद पडली.
हिरवा सिग्नल पिवळा झाला आणि पुन्हा लाल झाला, तरी गाडी काही सुरू होईना!
फुटपाथवरून चाललेले आजोबा ओरडले, "काय बाई, कुठलाच रंग पसंत पडत नाहीये का?(!)"

## ९ वाचू या









### भावचिन्हे आणि आपण

१७ जुलैला जगभरात 'वर्ल्ड इमोजी डे' साजरा होतो. इमोजी म्हणजे स्माईली आणि इमोटीकॉन्स यांचा जपानी अवतार. आधी निव्वळ हसरा आणि रडका चेहरा माहीत असणारे आपण टेक्स्ट चॅटिंग सुरू झाल्यापासून सर्रास कित्येक प्रकारच्या इमोजींचा वापर करतो. हा वापर एवढा वाढलाय की त्यामुळे 'इमोजीशिवाय कसं जगायचं?' अशी भावना निर्माण झाली तर त्यात काय नवल?

१. कोणत्या इमोजीसाठी कोणते विशेषण वापराल? चला, जोड्या लावू या आणि वाक्ये तयार करू या.

| इमोजी | विशेषण | | वाक्य |
|---|---|---|---|
| (गोंडस, हसरा, प्रेमळ) | | | (मुलगी, आई, बाळ) |
| क.  | ........................ |  | अरे वा! ........................ |
| ख.  | ........................ |  | वा! ........................ |
| ग.  | हसरा! |  | अहाहा! ही बघा एक हसरी मुलगी. |
| (रडका, उदास, चिंताग्रस्त) | | | (विद्यार्थी, शिक्षक, तरुण) |
| घ.  | ........................ |  | अरेरे! ........................ विद्यार्थी. |
| च.  | ........................ |  | खरंच! |
| छ.  | ........................ |  | आई गं! |
| (मस्तीखोर, मस्त, अभ्यासू) | | | (मुलगा, आजोबा, बुवा) |
| ज.  | ........................ |  | ए! ........................ |
| झ.  | ........................ |  | वा! ........................ |
| ट.  | ........................ |  | अरे वा! ........................ |
| (रागीट, झोपाळू, आश्चर्यचकित) | | | (बाबा, परिचारिका, जोडपं) |
| ठ.  | ........................ |  | खूप ........................ |
| ड.  | ........................ |  | बाप रे! ........................ |
| ढ.  | ........................ |  | आयला! ........................ |

## १० असा हवा जोडीदार!

**१. संवाद.**

**क. ऐकू या.**

**ख. वाचू या.**



मी सर्जा. पांढरासफेत रंग माझा. थोडीशी मान वळवून शिंगं रोखली, की बघणाऱ्याची पळता भुई थोडी होते अशी माझी लांबलचक, टोकदार शिंगं आहेत. दाव्याला हिसका देऊन मी ते सहजच तोडू शकतो. चारा ताजा आणि हिरवा नसेल, तर मी त्याला तोंडच लावत नाही, हे माझ्या मालकाला चांगलंच माहीत आहे. मी डुरकलो, की तो घाबरतो.

मला आता जोडीदारीण हवी. रंग तर सुंदर हवाच. तिची शिंगं मला लागली नाही पाहिजेत. माझ्या चाऱ्यात ती वाटेकरी होणार, आणि हेच जरा कठीण आहे. पण म्हणूनच आखूडशिंगी, बहुदुधी, कमी चारा खाणारी, लाथ न मारणारी आणि कशी प्रेमळ पाहिजे!

**२. 'मुंबई-पुणे-मुंबई २' या चित्रपटातील एक भाग पाहू या.**

**क. जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| १. बेत | क. जेवणाची |
| २. सोहळा | ख. खाण्याचा, सहलीचा, सुट्टीचा, अभ्यासाचा, फिरण्याचा, झोपण्याचा |
| ३. पंगत | ग. लग्नाचा, मुंजीचा, वाढदिवसाचा, पुरस्काराचा |

**ख. आता या शब्दांचे अर्थ ओळखू या.**

| | |
|---|---|
| १. बेत | क. एखादा सण किंवा समारंभ साजरा करणे |
| २. सोहळा | ख. जमिनीवर पाट मांडून एका ओळीत जेवायला बसण्याची पारंपरिक पद्धत |
| ३. पंगत | ग. पुढे काय आणि कसे करायचे, किंवा जेवण्यासाठी कोणते पदार्थ करायचे हे ठरवणे; कार्यक्रमाचे एकंदर स्वरूप ठरवणे |

**ग. आता ही चित्रफीत पुन्हा पाहू या आणि खालील यादीतील मुंबईकर आणि पुणेकर यांच्या पसंतीच्या गोष्टी वेगळ्या काढून पुढे दिलेला तक्ता भरू या.**

चार दिवसांचा सोहळा ढोल-ताशे शाहीकुर्मा चार तासांचा समारंभ

पंगती पुण्यात अळूचं फदफदं चायनीज मोगलाई

बुफे डी.जे. मुंबईत पारंपरिक मराठी जेवण

चार दिवसांची सुट्टी शनिवार-रविवारमध्ये लग्न चाट आणि पंजाबी जेवण

भरली वांगी / वालाच्या डाळिंब्या / मसुराची आमटी मसाले भात / टॉमॅटोचं सार

| | पुणेकर | मुंबईकर |
|---|---|---|
| लग्नसोहळा | चार दिवसांचा | |
| | | |
| वरात | | |
| खाण्याची व्यवस्था | | बुफे |
| खाण्याचा बेत | | |
| | | |
| | | |
| लग्नाचं ठिकाण | | |

**घ. लग्नसोहळ्यासाठी तुम्ही खालीलपैकी कोणती विशेषणे वापराल? यांतील विकारी आणि अविकारी विशेषणे ओळखू या. तुम्हाला अजून कोणती विशेषणे सुचतायत का लग्नसोहळ्यासाठी?**

रंगीबेरंगी सुटसुटीत लहान साग्रसंगीत देखणा

मोठा आधुनिक मराठमोळा साधा भव्यदिव्य

दिमाखदार पारंपरिक शानदार भपकेबाज

| विकारी | अविकारी | अविकारी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

च. तुम्हांला कोणत्या प्रकारच्या लग्नाला जायला आवडेल? पारंपरिक की आधुनिक? आणि का? हे वर्गमित्रांना सांगू या आणि त्यांचेही मत जाणून घेऊ या.

## ११ वाचू या.

**विनोद**

ती : रविवारचा पूर्ण दिवस वीज नव्हती, त्यामुळे नेट बंद! वैताग आला!

मैत्रीण : ओह नो! मग काय केलंस तू?

ती : नवऱ्याशी गप्पा मारल्या. बरा वाटला गं स्वभावानं!!

## १२ शब्दजाळे

▶अ॰पु॰ १२

**१. वेगवेगळ्या आवडी-निवडी आणि छंद यांची यादी करू या. 'आणि', 'पण', 'परंतु' ही अव्यये वापरून चर्चा करू या.**




**टीप :** मला असं वाटतं. पण मला नाही असं वाटत.

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मला सगळं कळतं. | |
| मला नाही काही कळत. | मला नाही काही कळत. |
| मला सगळं समजतं. | मला नाही काही समजत. |
| मला सगळं चालतं. | मला नाही काही चालत. |
| मला सगळं आवडतं. | मला नाही काही आवडत. |
| मला सगळं येतं. | मला नाही काही येत. |
| मला सगळं पटतं. | मला नाही काही पटत. |

## १३ संवाद

▶अ॰पु॰ १३






| | | | |
|---|---|---|---|
| आपण | आत्ता | फिरायला जाऊ या | का? |
| | रविवारी | सिनेमा बघू या | |
| | आज दुपारी | खेळायला जाऊ या | |
| | उद्या सकाळी | मैत्रिणीला फोन करू या | |
| | परवा संध्याकाळी | चालायला जाऊ या | |
| | नंतर | खरेदीला जाऊ या | |
| | थोड्या वेळाने | क्रिकेटची मॅच बघू या | |

१४ **वाचू या.**



"आई गं, आज सलग चार तास अभ्यास झाला. आता मात्र मी जरा बाहेर जाऊन येते."
"आता कुठे चाललीस एवढ्या उशिरा?"
"अगं, मनालीची वही माझ्याकडेच राहिली. तिला आत्ताच परत करून येते. नाही तर उगीच माझ्यावर चिडेल."
"हो, पण आत्ता? ही काय वेळ आहे का बाहेर पडण्याची?"
"कंटाळा आलाय गं आता एका जागी बसून. पायपण मोकळे होतील. आत्ता येते परत."
"आता जेवणाची वेळ होत आलीये. मनालीकडेही जेवायला बसतील सगळे. शिवाय तुझे बाबाही येतील आत्ता."
"आता उगीच अडवू नकोस हं! जाते ना गं!"
"आता काय बोलणार! ठीक आहे बाई, जा! पण लगेच ये. उशीर करू नकोस."
"आत्ता जाते आणि आत्ता येते."



| प्रतिक्रिया | |
|---|---|
| **होकारार्थी** | **नकारार्थी** |
| हो, बिनधास्त जा. | नाही, अजिबात नाही. |
| त्यात विचारायचं काय? जा! | बाप रे, या जन्मात तर मुळीच नाही. |
| हो, नक्कीच! | नाही जमणार. |
| होय! माझं शंभर टक्के नक्की धर. | आलो / आले असते. सॉरी. |
| | वेडबिड लागलंय का तुला? मी नाही. |

## कसा आहे / कसाय?

| | एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लिहिताना | बोलताना | | लिहिताना | बोलताना |
| | मी | कसा आहे | कसाय | आम्ही / आपण | कसे आहोत | कसेओत |
| | | कशी आहे | कशीय | | कशा आहोत | कशाओत |
| | तू | कसा आहेस | कसायस | तुम्ही / आपण | कसे आहात | कसे आहात |
| | | कशी आहेस | कशीयेस | | कशा आहात | कशाहात |
| | तुम्ही / आपण | कसे आहात | कसे आहात | तुम्ही / आपण | कसे आहात | कसे आहात |
| | | कशा आहात | कशाहात | | कशा आहात | कशाहात |
| | तो | कसा आहे | कसाय | ते | कसे आहेत | कसेयत / कसेत |
| | ती | कशी आहे | कशिये | त्या | कशा आहेत | कशायत |
| | ते | कसे / कसं आहे | कसेय / कसंय | ती | कशी आहेत | कशीयेत |

| | एकवचन | | | अनेकवचन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लिहिताना | बोलताना | | लिहिताना | बोलताना |
| | मी | चांगला आहे | चांगलाय | आम्ही / आपण | चांगले आहोत | चांगले ओत |
| | | चांगली आहे | चांगलीये | | चांगल्या आहोत | चांगल्या ओत |
| | तू | चांगला आहेस | चांगलायस | तुम्ही / आपण | चांगले आहात | चांगले आहात |
| | | चांगली आहेस | चांगलीयेस | | चांगल्या आहात | चांगल्या आहात |
| | तुम्ही/आपण | चांगले आहात | चांगले आहात | तुम्ही / आपण | चांगले आहात | चांगले आहात |
| | | चांगल्या आहात | चांगल्या आहात | | चांगल्या आहात | चांगल्या आहात |
| | तो | चांगला आहे | चांगलाय | ते | चांगले आहेत | चांगलेयत / चांगलेत |
| | ती | चांगली आहे | चांगलीये | त्या | चांगल्या आहेत | चांगल्यायत |
| | ते | चांगले/लं आहे | चांगलेय / चांगलंय | ती | चांगली आहेत | चांगलीयेत |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ कसंय ते पेन? | |
| चांगलंय की! आणि हे कसं आहे (कसंय)? | चांगलंय की! आणि हे कसं आहे (कसंय)? |
| कसाय तो शर्ट? | चांगलाय की! आणि हा कसा आहे (कसाय)? |
| कशीये ती खोली? | चांगलीये की! आणि ही कशी आहे (कशीय)? |
| कसंय ते घड्याळ? | चांगलंय की! आणि हे कसं आहे (कसंय)? |
| कसाय तो मोबाईल? | चांगलाय की! आणि हा कसा आहे (कसाय)? |
| कशीये ती गाडी? | चांगलीये की! आणि ही कशी आहे (कशीय)? |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ कशायत तुझ्या मैत्रिणी? | बऱ्यायत. |
| बऱ्यायत. आणि तुझ्या कशा आहेत (कशायत)? | आणि तुझ्या कशा आहेत (कशायत)? |
| कसेयत तुझे मित्र? | बरेयत. आणि तुझे कसे आहेत (कसेयत)? |
| कशीयत तुझी मुलं? | बरीयत. आणि तुझी कशी आहेत (कशीयत)? |
| कसेयत तुझे आजोबा? | बरेयत. आणि तुझे कसे आहेत (कसेयत)? |
| कशायत तुझ्या मॅडम? | बऱ्यात / बऱ्यायत. आणि तुझ्या कशायत? |
| कशीयत माझी उत्तरं? | बरीयत. आणि तुझी कशीयत? |

## १५ रिकाम्या जागा भरू या.

▶ अ॰पु॰ १४

१.



क. कसाय चहा? ख. चांगलाय.

क. पोहे कसेयत? ख. ........................ की!

क. ........................ ना हे घर? ख. ........................ की!

क. कशीये रे तुझी तब्येत आता? ख. हं, ........................ .

क. कशीयेत तुझी मित्रमंडळी? ख. खूप ........................ .

क. कंटाळवाण्या आहेत ना या कादंबऱ्या? ख. छे छे, ........................ की!



२.

क. हा बघ. कसाय हा फोटो? ख. बराय.

क. ........................ ना ही जाहिरात! ख. अगदी विचित्र.

क. ........................ माझं चित्र? ख. छानच आहे!

क. ही कानातली ........................? ख. फार सुंदर!

क. ही बघ माझी नवी जीन्स. ........................? ख. मस्तच!

क. ........................ या वेळी आंबे? ख. चांगलेत.

१६

१. ऐकू या.

**२. तुम्ही ऐकलेल्या संवादातील सौरभच्या स्कॉलरशिपची बातमी सरिताला मेसेंजरवर नेहाला कळवायची आहे. ती ते कसं कळवेल, ते लिहू या.**




१७

## करा आणि शिका

▶अ.पु. १५

करा आणि शिका

वर्गातील विद्यार्थ्यांचे ४ किंवा ५ गट करावेत. गटप्रमुख या चित्राचे वर्णन करील. गटातील इतरांनी मिळून हे वर्णन ऐकून एक चित्र काढावे. सर्व गटांतील उत्तम चित्राला बक्षिस मिळेल!

वर्णन करायला थोडी मदत.

**व्यक्ती :** स्त्री / पुरुष

**वय :** ........................ **उंची :** ........................ **वर्ण :** काळा / गोरा इ.

**शरीरयष्टी :** लठ्ठ / सडपातळ **पोशाख :** शर्ट / पँट / धोतर इ.

**पादत्राण :** बूट / चपला / जोडे **इतर गोष्टी :** हातात काय आहे?

**चेहऱ्याचे वर्णन :**

आता चित्रावरून ही व्यक्ती कोण आहे ते ओळखू या.

(गटप्रमुख सांगणार नाही, आणि चित्रही दाखवणार नाही.)


कॉमन मॅन

शिक्षकांसाठी सूचना : इथे उदाहरण म्हणून कॉमन मॅनचे चित्र दिले आहे. शिक्षक इतर कोणतेही चित्र निवडू शकतात.

## १८ सहल

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरू या. अनेक उत्तरे शक्य आहेत.**

(मोठ्या, चुरशीची, आंतरराष्ट्रीय, तरुण, बारीकसारीक, जाणकार, महत्त्वाचे, उत्तम, चांगली, उत्साही, खूप, योग्य, चविष्ट, मनोरंजक, धमाल, नव्या-जुन्या, कठीण, उत्साही, मस्त, सनसनाटी)



आमच्या मराठी वर्गाची सहल काढायचे ठरले तेव्हा साहजिकच आम्हा सर्वांना (क) .................. आनंद झाला. वर्गात एकूण १५ (ख) .................. विद्यार्थी, तेव्हा सर्वांना (ग) .................. कामे वाटून द्यायचे ठरले. हरदीपने (घ) .................. बस बघावी, शोभनाने सर्वांना (च) .................. नाश्ता-पाणी मिळेल याकडे लक्ष द्यावे, महिप (छ) .................. खेळाडू; तेव्हा (ज) .................. खेळ ठरवण्याचे (झ) .................. काम त्याच्याकडे दिले. (ट) .................. संगीताची व्यवस्था कोण पाहील? वर्गातील सर्वात (ठ) .................. मुलगी रेश्मा. सर्वच (ड) .................. संगीताची (ढ) .................. माहिती आहे तिला. म्हणून ही (ण) ..................जबाबदारी तिच्यावर सोपवली गेली. आमचे दोन (त) .................. शिक्षक - मिनीमॅडम आणि दिनेशसर. तर या दोघां (थ) .................. शिक्षकांनी सर्व (द) .................. विद्यार्थ्यांसाठी एक (ध) .................. मनोरंजनाचा कार्यक्रम आणि एक (न) .................. स्पर्धा घेणार असे जाहीर केले. आता या सहलीची (प) .................. बातमी लवकरच या (फ) .................. कॅम्पसमध्ये पसरेल हे नक्की.

**२. चार गट करू या. प्रत्येक गटाने २० विशेषणे लिहावीत. आता आपण निवडलेली विशेषणे त्यांचा क्रम न बदलता वरील उताऱ्यात लिहू या. आता आपापले उतारे वाचून दाखवू या आणि गंमत पाहू या.**

## १९ योग्य जोड्या लावू या.

▶अ॰पु॰ १६-२०

| | |
|---|---|
| १.  | क. “इथे मी नावालाच बॉस आहे. माझ्या हाताखालच्या चौघी बायका मला एक दिवस बाजारात विकून येतील.” |
| २.  | ख. “एकाच कुटुंबातले चौघेही डॉक्टर आहेत? किती बोअर!” |
| ३.  | ग. “त्या दोघी जणी जुळ्या आहेत! विश्वास नाही बसत? |
| ४.  | घ. आर्या अख्ख्या कुटुंबातली एकटीच मुलगी असल्यामुळे सगळ्यांची लाडकी आहे. |
| ५.  | च. “तू एकटाच गच्चीवर गेला होतास? फटके देईन हं, पुन्हा गेलास तर. |
| ६.  | छ. थोरला बिपिन धाकट्या हर्षदचा हात धरतो आणि दोघं भाऊ आनंदानं शाळेत जातात. |
| ७.  | ज. रोज संध्याकाळी सात वाजता हे तिघे समोरच्या बेकरीमध्ये ब्रेड घ्यायला येणार म्हणजे येणारच. |
| ८.  | झ. “कॉफी हाउसमध्ये सिया आणि डॅनी एकाच टेबलावर? सांगतोस काय! दोघांचं भांडण मिटलं वाटतं!” |
| ९.  | ट. आम्ही पाच जण पहिलीपासून दहावीपर्यंत सतत एकत्र होतो. वर्गात आमचीच दादागिरी चालायची. |



आम्ही दोघी



आम्ही दोघे / दोघं



आम्ही दोघे / दोघं

**थोडक्यात**

दोन मराठी माणसे एकत्र आली की भांडतात.
दोन विद्वान एकत्र आले की भांडतात.
**तात्पर्य :** मराठी माणसे विद्वान असतात.

**२० चार विद्यार्थ्यांचा गट करू या. प्रत्येकाने एक चिठ्ठी उचलावी आणि त्यानुसार चर्चा करावी.**

चिठ्ठी १ : तुझे नाव रोहन आहे. तू सतरा वर्षांचा आहेस आणि बारावीची परीक्षा दिली आहेस. गाण्याची आवड असल्यामुळे तुला त्यातच करिअर करायचे आहे.

चिठ्ठी २ : तू रोहनची आई आहेस व आपल्या मुलाच्या निवडीला पूर्ण पाठिंबा देतेस, आणि जमेल तितकी मदत करतेस.

चिठ्ठी ३ : तू रोहनचा बाबा आहेस व त्याच्या या इच्छेशी असहमत आहेस. तुझ्या मते रोहनने डॉक्टर किंवा इंजिनियर व्हावे.

चिठ्ठी ४ : तू रोहनचा मोठा भाऊ, अमेय, आहेस. तू इंजिनियरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत असून, तुला तुझे करिअर आवडते आहे.

| मत व्यक्त करणे | सहमत असणे, पाठिंबा असणे / दर्शवणे, त्याच्या / तिच्या बाजूने असणे / होकार देणे | गोष्ट न पटणे / असहमत असणे विरोध असणे / दर्शवणे नकार असणे / दर्शवणे |
|---|---|---|
| माझ्या मते... | माझे म्हणणे तरी ऐकून घ्या. | तुम्ही नेहमी असेच करता. |
| मला असे वाटते... | मला एक संधी तरी देऊन बघा. | हे माझे आयुष्य आहे, माझे निर्णय मीच का घेऊ नयेत? |
| | मला हेच जास्त चांगल्या प्रकारे जमू शकेल. | तुम्हाला नंतर पश्चात्ताप होईल. |
| माझे म्हणणे असे आहे, की... | कृपा करून माझ्यावर विश्वास ठेवा. | तुम्हाला आजकालच्या नवीन संधींबद्दल काय माहितीये? |
| मी सांगू इच्छितो / इच्छिते, की... | | मी घर सोडून निघून जाईन. |
| माझा असा विचार आहे, की... | | माझे आयुष्य मला माझ्या मनाप्रमाणे जगू द्या. |
| माझ्या मते... | | |
| मला खात्री आहे | | |

**म्हणी आणि वाक्प्रचार**

नव्याचे नऊ दिवस.
देखणी बायको दुसऱ्याची.
आपला तो बाब्या, दुसऱ्याचं ते कार्टं.
ऊस गोड लागतो म्हणून मुळासकट खाऊ नये.



संवाद

**संभाषण करू या**

तुमची आणि त्याची आवडनिवड सारखीच आहे का?
रिकाम्या वेळात वाचन करणे / गाणे म्हणणे / चित्र काढणे / खेळणे / इंटरनेटवर माहिती शोधणे / ...



बसून बसून कंटाळा येणे
केव्हाही झोपा काढणे
पूर्ण दिवस कंटाळवाणा जाणे
झोपा काढणे
चकाट्या पिटणे
माकडचेष्टा / माकडचाळे करणे

खळखळून हसणारे प्रेक्षक
रमतगमत पॉपकॉर्न खात सिनेमा बघणारा प्रेक्षक
नाटकाला मनापासून दाद देणारा प्रेक्षक
रसिक असणे
खवय्या असणे

**२१ खेळू या.**

करा आणि शिका

१. तुम्हाला काही वस्तूंची विक्री करायची आहे. दोघादोघांच्या जोड्या करायच्या. शिक्षिकेने दोन जोड्यांचा एक गट करायचा. उदा० : ‘क’ जोडी आणि ‘ख’ जोडी यांचा एक गट. प्रत्येक गटाला शिक्षिका कपडे, दागिने, पिशव्या अशासारख्या वस्तू सुचवेल. एका गटातील दोन्ही जोड्यांनी इंटरनेटवर त्या वस्तू शोधाव्यात आणि त्या वस्तू का विकत घ्याव्यात हे शिक्षिकेला पटवून द्यावे.

| | |
|---|---|
| गट क आणि गट ख | स्त्रियांसाठी पँट, बूट, कानातले इ. |
| गट ग आणि गट घ | पुरुषांसाठी शर्ट, टाय, स्त्रियांसाठी गळ्यातली माळ इ. |
| गट च आणि गट छ | लहान मुलांचे कपडे, खेळणी, व्हिडियो गेम्स इ. |



२. प्रत्येकाने एक मिनिटामध्ये आपला आवडता छंद सांगावा. तो आपल्याला का आवडतो व ते करताना आपल्याला कसे वाटते ते सांगावे.
३. खेळ : प्रत्येकाने आपला सर्वात आवडता छंद एका चिठ्ठीवर लिहावा आणि सर्व चिठ्ठ्या जमा कराव्यात. त्यानंतर एकेकाने एक चिठ्ठी उचलून त्यात लिहिलेला छंद न बोलता इतर वर्गमित्रांना अभिनयाद्वारे दाखवावा आणि इतरांनी तो ओळखावा. जमल्यास तो छंद कोणाचा आहे हेही ओळखले तर उत्तमच!

## शब्दसंपदा

### ३.१ नाम : छंद



| | | |
|---|---|---|
| तो छंद, ते - | ती कादंबरी, त्या कादंबऱ्या | ते बुध्दिबळ, ती बुध्दिबळे / ती बुध्दिबळं |
| तो नाच, ते - | ती मालिका, त्या - | ते क्रिकेट |
| तो खेळ, ते - | ती भटकंती | ते टेनिस |
| तो फुटबॉल | ती कबड्डी | ते वाचन |
| तो फुटबॉल, ते फुटबॉल / फुटबॉल्स (चेंडू या अर्थाने) | ती चित्रकला | ते गायन |
| तो खो-खो | ती पाककला, त्या - | ते नृत्य, ती नृत्ये / ती नृत्यं |
| | ती भाषा, त्या - | ते लिखाण |
| | ती सतार, त्या सतारी | ते लेखन |
| | ती पेटी, त्या पेट्या | ते बागकाम |
| | ती बासरी, त्या बासऱ्या | ते चित्र, ती चित्रे / ती चित्रं |
| | | ते पुस्तक, ती पुस्तके / ती पुस्तकं |
| | | ते गाणे, ती गाणी |
| | | ते गीत, ती गीते / ती गीतं |





### ३.२ नाम : खरेदी

| | | |
|---|---|---|
| तो पैसा, ते पैसे | ती खरेदी, | ते जॅकेट, ती जॅकेटे / जॅकेटं / जॅकेट्स |
| तो रुपया, ते रुपये | ती फॅशन, त्या - | ते लेगिंग्ज, ती - |
| तो कुडता, ते कुडते | ती साडी, त्या साड्या | ते घड्याळ, ती घड्याळे / घड्याळं |
| तो शर्ट, ते शर्ट / शर्ट्स | ती पँट, त्या पँटी / पँट्स | ते रेशीम |
| तो टी-शर्ट, ते टी-शर्ट / टी-शर्ट्स | ती सलवार, त्या सलवारी | ते नाणे, ती नाणी |
| तो ड्रेस, ते ड्रेस / ड्रेसेस | ती जीन्स, त्या - | ते चलन, ती चलने / ती चलनं |
| तो चुडीदार, ते - | ती ओढणी, त्या ओढण्या | |
| तो बूट, ते बूट / बूट्स | ती शाल, त्या शाली | |
| तो मोजा, ते मोजे | ती टोपी, त्या टोप्या | |
| तो स्वेटर, ते स्वेटर / स्वेटर्स | ती नोट, त्या नोटा | |
| तो हातमोजा, ते हातमोजे | ती सँडल, त्या सँडल / सँडल्स | |
| तो चष्मा, ते चष्मे / तो चश्मा, ते चश्मे | ती बॅग, त्या बॅगा / बॅग्स | |
| तो कापूस | ती भेट, त्या भेटी | |

शब्दसंपदा

### ३.३ नाम : दागदागिने

| | | |
|---|---|---|
| तो दागिना, ते दागिने | ती माळ, त्या माळा | ते कानातले / ते कानातलं, ती कानातली |
| तो हार, ते - | ती अंगठी, त्या अंगठ्या | ते कडे / ते कडं, ती कडी |
| तो मणी, ते - | ती बांगडी, त्या बांगड्या | ते गळ्यातले / ते गळ्यातलं, ती गळ्यातली |
| तो मोती, ते - | ती नथ, त्या नथी | ते पैंजण, ती पैंजणे |
| | ती टिकली, त्या टिकल्या | ते मंगळसूत्र, ती मंगळसूत्रे / ती मंगळसूत्रं |
| | ती कुडी, त्या कुड्या | ते जोडवे / ते जोडवं, ती जोडवी |
| | | ते कुडे / कुडं, ती कुडी |

### सामान्यरूपे - ईकारान्त नामे

**दृष्टिक्षेपातील ईकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.**

**क. ईकारान्त पुल्लिंगी नामे**

१.

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो कवी - ते कवी | त्या कवी-, त्या कवीं- |
| तो हत्ती - ते हत्ती | त्या हत्ती-, त्या हत्तीं- |



**वापर :** कवीमुळे...

**आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणतील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

**विद्यार्थी एक :** तुला याबद्दल काही माहीत आहे का?

**विद्यार्थी दोन :** कशाबद्दल? या कवीबद्दल?

**सगळे :** हो या कवीबद्दल.

**विद्यार्थी दोन :** नाही ना. काहीच माहीत नाहीये या कवीबद्दल.

(याचप्रमाणे : हत्ती... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

२.

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो शेजारी - ते शेजारी | त्या शेजाऱ्या-, त्या शेजाऱ्यां- |



**वापर : शेजाऱ्याकडे**

**क. ईकारान्त स्त्रीलिंगी नामे**

१.

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ती संस्कृती - त्या संस्कृती | त्या संस्कृती-, त्या संस्कृतीं- |



**वापर :** संस्कृतीबद्दल...

२. 

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ती बाहुली - त्या बाहुल्या | त्या बाहुली-, त्या बाहुल्यां- |
| ती चिमणी - त्या चिमण्या | त्या चिमणी-, त्या चिमण्यां- |
| ती बासरी - त्या बासऱ्या | |



**वापर :** बाहुलीमुळे...

(याचप्रमाणे : चिमणी, बाटली, किटली, चकली... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)









## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो सिनेमा, ते सिनेमे | ती चौपाटी, त्या चौपाट्या | ते जोडपे / ते जोडपं, ती जोडपी |
| तो परिसंवाद, ते - | ती काळजी, त्या काळज्या | ते मत, ती मते / ती मतं |
| तो विचार, ते - | ती यादी, त्या याद्या | ते नाटक, ती नाटके / ती नाटकं |
| तो पाठिंबा | ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या | ते प्रदर्शन, ती प्रदर्शने / ती प्रदर्शनं |
| तो विश्वास | ती बातमी, त्या बातम्या | ते वर्णन, ती वर्णने / ती वर्णनं |
| तो होकार, ते - | ती चुरस, त्या चुरशी | ते आयुष्य, ती आयुष्ये / ती आयुष्यं |
| तो नकार, ते - | ती गोष्ट, त्या गोष्टी | ते मासिक, ती मासिके / ती मासिकं |
| तो निर्णय, ते - | ती सदनिका, त्या - | ते पर्यावरण |
| तो विरोध, ते - | ती तरुणी, त्या - | ते साहित्य |
| तो पश्चात्ताप | ती संख्या, त्या - | ते नवल |
| तो जाब, ते - | ती संधी, त्या - | |
| तो तरुण, ते - | ती शरीरयष्टी, त्या - | |
| तो विद्वान, ते - | ती पाणीपुरी | |
| तो बुवा, ते - | ती समाजसेवा | |
| तो चेहरा, ते चेहरे | ती खात्री | |
| | ती तरुणाई | |
| | ती धमाल | |
| | त्या गप्पा | |

### विशेषणे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| चांगला | छोटा | मळका | शांत | लाडका | मजेदार | गोंडस |
| नवा | मोठा | नेटका | महागडा | ठेंगणा | हसरा | विचारी |
| हलकाफुलका | जुना | बुटका | कंटाळवाणा | निराळा | रडका | प्रेमळ |
| झकास / झक्कास | फिका | अढळ | परवडणारा | आवडता | चावट | स्वप्नाळू |
| बडबड्या | जाडा | संतापलेला | चिंतातुर | आनंदी | जाणकार | वेगळा |
| कठीण | मनोरंजक | योग्य | उत्साही | महत्त्वाचा | उदास | भोळा |
| बोचरा | दमदार | बिनधास्त | चिडका | थकलेला | | |
| अभ्यासू | चिंताक्रांत | मस्तीखोर | उत्तम | | | |

| क्रियापद | | प्रश्नशब्द | इतर शब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|---|
| पटवणे | पटणे | (करू) का | निवांत | अजिबात |
| शोधणे | लागणे | कसा आहेस (कसायस)... | | नक्की |
| वाजणे | जमणे | | | |
| जमवणे | होणे | | | |
| असणे | म्हणणे | | | |
| सोपवणे | लादणे | | | |
| इच्छिणे | दर्शवणे | | | |
| फिरवणे | फिरणे | | | |
| निवडणे | मिळणे | | | |

## आता मला हे येतं ...

**आवडीनिवडी सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विकारी / अविकारी विशेषण**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**क्रियापद + ला**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**वस्तूंचे / व्यक्तींचे वर्णन करणे, अभिप्राय देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कसंय...**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**आम्ही दोघे, आम्ही दोघी, आम्ही दोघं**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# नातेसंबंध

४









## चला, शिकू या...

- नातेसंबंध ओळखणे
- षष्ठी नाम आणि सर्वनामांची रूपे
- प्रश्नशब्द : कोणाचा
- षष्ठीचे प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी अव्यय 'च'
- 'रोजच्या रोज', 'आजच्या आज' असे वाक्प्रचार

## १ कुटुंब म्हणजे काय आणि कुटुंबात कोणाकोणाचा समावेश होतो? खालील चित्रे पाहू या आणि चित्रे आणि उतारे यांच्या जोड्या जुळवू या.

▶अ॰पु॰ १


१.


२.


३.

क. सकीना खान (२८) – आमच्या कुटुंबात आम्ही दोघं आणि आमची छोटुली - सना. ती नुकतीच तीन महिन्यांची झालीय. पुढच्या महिन्यापासून तिला पाळणाघरात ठेवावं लागेल. मला नोकरीवर रुजू व्हायचंय ना! तसंही आत्तासुद्धा आम्ही दोघं मिळूनच तिला सांभाळतो. रात्री तीन वाजेपर्यंत ती उठली तर मी तिला बघते, तीन वाजल्यानंतर साजिदची ड्युटी असते. तिचे डायपर बदलण्यापासून ते तिला बाटलीने दूध पाजण्यापर्यंत सर्व गोष्टी तोच माझ्याहून चांगल्या करतो. आम्हाला आणखी मुलं नकोत असं आम्ही ठरवलं आहे.

ख. पीटर डिसूझा (५५) – आमच्या पिढीतच कुटुंबाची व्याख्या बऱ्यापैकी बदलली. आमच्या कुटुंबात मी, माझी बायको आणि दोन मुली. माझे आई-वडील कधीच आमच्याजवळ राहिले नाहीत. जागा कुठे आहे या लहान घरात सर्वांना! नाताळला आणि इतर सणांना आम्ही त्यांना भेटायला गावी जातो. मुली परगावी असतात शिकायला. त्याही येतातच असं नाही. शाळा-कॉलेजना नेहमी सुट्ट्या असतात असे नाही आणि त्यांना गावी करमतही नाही. आताच्या युगात मित्रमंडळी म्हणजेच खरं कुटुंब. संकटात तेच धावून येतात!

ग. सरस्वतीबाई सखदेव (८१) – माझ्या मते कुटुंब म्हणजे आई - वडील, आजी-आजोबा आणि मुलं. असंच आहे माझं कुटुंब. कुटुंबात मुलंच महत्त्वाची असतात. आमची नातवंडंही आता मोठी झालीयेत. सर्वांशी सतत संपर्क असणं महत्त्वाचं. त्यांच्या आयुष्यात आम्हालाही एक स्थान आहे या विचारानेच बरं वाटतं. तसंच जवळचे आणि दूरचे नातेवाईक येतात भेटायला, माझे भाऊ - भावजया, बहिणी - मेव्हणे, दीर - नणंदा वगैरे. आम्हीही जातो सणासुदीला त्यांच्याकडे.

(एकत्र / विभक्त / दूरस्थ कुटुंब)

क. .................... ख. .................... ग. ....................

१. **तीन वयोगटांतील व्यक्तींनी त्यांची मते मांडली आहेत. तुम्ही कोणाशी सहमत आहात?**

........................................................................................................

२. **तुमचे कुटुंब कोणत्या प्रकारात मोडते?**

........................................................................................................

## २ मित्र कसे असावेत? काही मते पाहू या.

▶अ०पु० २-४







१. जयेश (१८) – जे आईवडिलांप्रमाणे पाठीशी उभे राहतात पण बदल्यात काहीच अपेक्षा करत नाहीत, ज्यांना बहीण-भावंडांप्रमाणे सर्व गुपिते सांगता येतात पण जे आपल्याशी कधीही स्पर्धा करत नाहीत, प्रत्येक संकटात जे धावून येतात तेच खरे मित्र.

२. सिमरन (१२) – जी मला गृहपाठात नेहमी मदत करते, मधल्या सुट्टीचा डबा मी जिच्याबरोबर खाते, जी नेहमी माझ्या बाजूने बोलते, तीच आहे माझी जिवाभावाची मैत्रीण.

३. इम्रान (२७) – मित्र नसते तर कंटाळा आल्यावर मी अगदी रात्रीसुद्धा कोणाला फोन केला असता? मी नाटक-सिनेमे कोणाबरोबर पाहिले असते, चर्चा कोणाबरोबर केली असती आणि वाद कोणाशी घातले असते? मला बरं नसताना माझ्याजवळ कोण येऊन बसलं असतं आणि ऑफिसातल्या आणि आमच्या कट्ट्यावरच्या सर्व बातम्या मला कोणी पुरवल्या असत्या? आता सर्वात महत्त्वाचं – मला जी मुलगी आवडते तिचं माझ्याविषयी चांगलं मत व्हावं म्हणून कोणी प्रयत्न केला असता? मित्रांनी आणि केवळ मित्रांनीच!

क. तुमच्या मते मित्र कुटुंबाची जागा घेऊ शकतात का? का?

..............................................................................................................

..............................................................................................................

ख. यापैकी कोणत्या प्रकारचे कुटुंब तुम्हाला आवडेल आणि का?







१. मुलांशिवाय कुटुंब
२. वृद्ध व्यक्तींशिवाय कुटुंब
३. मित्र म्हणजेच कुटुंब
४. विभक्त कुटुंब
५. एकत्र कुटुंब
६. दूरस्थ कुटुंब

## ३ 'ग्रॅनी-ग्रॅन्पा' नाही, 'आजी-आजोबा'

▶अ०पु० ५-६

आजी-आजोबांचे 'ग्रॅनी-ग्रॅन्पा' होण्याचा हा जमाना. दोन पिढ्यांमधील संवाद कमी होत चालला आहे, दुरावा वाढत चालला आहे. तरीही गेली पाच वर्षे 'विद्यानिकेतन' मध्ये 'आजी-आजोबा' संमेलन साजरे होत आहे. दरवर्षी एक नवीच कल्पना घेऊन मुले ज्येष्ठांना भेटतात, त्यांचे आशीर्वाद घेतात. गेल्या वर्षी मुलांनी या आजी-आजोबांना स्मार्टफोन वापरायला शिकवलं. विद्यानिकेतन शाळेने सुरू केलेल्या 'आचरणातून संस्कार' या प्रयोगाचे कौतुक होत आहे.



**तुम्ही तुमच्या आजी-आजोबांसाठी / आई-वडिलांसाठी काय करता?**

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

## ४ नातेसंबंध.

| जन्माने निर्माण होणारी नाती | | | |
|---|---|---|---|
| | खापरपणजोबा | खापरपणजी | |
| | पणजोबा | पणजी | |
| | आजोबा | आजी | |
| | वडील | आई | |
| भाऊ | आपण स्वतः | | बहीण |
| | मुलगा | मुलगी | |
| | नातू | नात | |
| | पणतू | पणती | |
| | खापरपणतू | खापरपणती | |



| मुलांच्या विवाहसंबंधाने होणारी नाती | |
|---|---|
| आपण स्वतः | |
| मुलाची बायको<br>सून | मुलीचा नवरा<br>जावई |
| सुनेचे / जावयाचे आई-वडील<br>विहीण-व्याही | |

## आई-वडील अशा दोन्ही बाजूंनी असणारी नाती

| | भावंडं | | त्यांची संतती |
|---|---|---|---|
| | भाऊ | मामा | मामेभाऊ<br>मामेबहीण |
| | वहिनी | मामी | |
| आई | | | |
| | बहीण | मावशी | मावसभाऊ<br>मावसबहीण |
| | मेहुणा | काका | |

| | भावंडं | | त्यांची संतती |
|---|---|---|---|
| | भाऊ | काका | चुलतभाऊ<br>चुलतबहीण |
| | वहिनी | काकी | |
| वडील | | | |
| | बहीण | आत्या | आतेभाऊ<br>आतेबहीण |
| | मेहुणा | काका | |

## विवाहसंबंधाने निर्माण होणारी नाती

| | | | त्यांची संतती |
|---|---|---|---|
| | मेहुणा | | भाचा<br>भाची |
| | बहीण | नणंद (वन्स) | |
| | आई | सासू | |
| पती | | | |
| | वडील | सासरे | |
| | भाऊ | दीर | पुतण्या<br>पुतणी |
| | वहिनी (भावजय) | | |

| | | | त्यांची संतती |
|---|---|---|---|
| | मेहुणा (साडू) | | भाचा<br>भाची |
| | बहीण | मेहुणी | |
| पत्नी | | | |
| | आई | सासू | |
| | वडील | सासरे | |
| | भाऊ | मेहुणा | भाचा<br>भाची |
| | वहिनी | | |

### कोण + षष्ठी विभक्ती
### Genitive / Possessive Case

| | ए॰व॰ | अ॰व॰ |
|---|---|---|
| पु॰ | कोणाचा | कोणाचे |
| स्त्री॰ | कोणाची | कोणाच्या |
| नपुं॰ | कोणाचे / चं | कोणाची |



## ५ कोण कोणाचा?

**खालील उदाहरणांप्रमाणे जोड्या लावू या.**

उदा॰ काकाची मुलगी : चुलतबहीण

▶अ॰पु॰ ७-९

| | |
|---|---|
| १. मामाचा मुलगा | क. मावसभाऊ |
| २. आत्याची मुलगी | ख. चुलतभाऊ |
| ३. काकाची मुलगी | ग. मामेबहीण |
| ४. मावशीचा मुलगा | घ. मामेभाऊ |
| ५. काकाचा मुलगा | च. आतेबहीण |
| ६. मामाची मुलगी | छ. चुलतबहीण |

टीप :
काका = चुलता
म्हणून काकाचा मुलगा = चुलतभाऊ,
तसेच
काकाची मुलगी = चुलतबहीण



## ६ लग्नानंतर काही नवीन नाती येतात.

▶अ॰पु॰ १०-१२

नवऱ्याची बहीण 'नणंद',
नवऱ्याचा भाऊ 'दीर',
बायकोचा भाऊ 'मेहुणा',
बायकोची बहीण 'मेहुणी'...
कशी आहेत ही नाती?



## ७ सासू – सारख्या सूचना. सून – सूचना नकोत

### सारख्या सूचना

दिवाळी आली म्हणून विचार केला लाडू करंज्या करीन चार. पण सासू कुठली ऐकायला, लागली सूचना द्यायला. आता म्हणते, गोड पदार्थ जमत नाहीत तुला. चिरोटे कसे खुसखुशीत हवेत. लाडू तुपाने तुकतुकीत दिसायला हवेत. आणि सारखं कसलं गं गोडधोड! जरा चमचमीत पदार्थ कर. चकल्या कुरकुरीत कर बरं! पोहे चांगले भाजून घे. चिवडा अगदी चुरचुरीत होऊ दे. अशा सारख्या सूचना देणारी ती सासू!



### सूचना नकोत

दिवाळी आली. वाटलं, चार पदार्थ खाईन छान. जरा तब्येत सुधारेल माझी. पण माझी सून इतकी लाखातली ना! कडकडीत चकल्या, चामट झालेला चिवडा असे चविष्ट पदार्थ करून हिनेच स्लिम ॲण्ड ट्रिम ठेवलंय मला. म्हणून सूचना देते मी. नाही तर मला तरी काय हौस आहे तोंड वाजवायची? पण हिचा आपला एकच धोशा! सूचना नकोत म्हणणारी ती सून!



८ **खालील चित्रे आणि वाक्ये पाहू या आणि बाणाने जोडू या.
तुम्हाला आणखी काही उदाहरणे सुचतायत का?**

| | | |
|---|---|---|
| १.  | त्या ठेच्याच्या मिरच्या आहेत.<br>जहाल तिखट असतील. | क.  |
| २.  | अंगठीचं सोनंच काय ते शिल्लक राहिलंय,<br>बाकी सगळं कर्ज फेडण्यासाठी विकलं. | ख.  |
| ३.  | १ ते ५ मिटींगची वेळ आहे.<br>कोणीही कामात व्यत्यय आणू नये. | ग.  |
| ४.  | देवाची फुलं आहेत ती, बाळा.<br>वास घेऊ नये त्यांचा. | घ.  |
| ५.  | निषेध! इथे मॉल होऊ देणार नाही. हे खेळाचं मैदान आहे. | च.  |
| ६.  | फेरीवाल्यांना हटवा!<br>पादचाऱ्यांच्या पुलावर यांनी का गर्दी केलीये? | छ.  |

## चिंटू



## ९ गाळलेल्या जागा भरू या.

(सकाळ, रोज, काल, पुढे, आज, रात्र, संध्याकाळ (२), दुपार, दर)

सकाळचा चहा घेतल्याशिवाय रवींद्ररावांचा दिवस सुरू होत नाही. ताबडतोब .................. वर्तमानपत्र लागते. .................. बातम्या वाचून मगच ते दैनंदिन कामांना सुरुवात करतात. .................. दिवशी काय करायचे हे सर्व ठाऊक असते. सकाळी रवींद्रराव कुठेच जात नाहीत. बायकोला घरच्या कामात मदत करतात. .................. जेवण करून एक छोटीशी वामकुक्षी घेतात. .................. सहा वाजले की बागेत फेरी मारायला जातात. घरी येऊन .................. सातच्या सह्याद्रीच्या बातम्या बघतात आणि लगेच जेवायला बसतात. .................. रवींद्रराव जास्त काही खात नाहीत. नंतर ते .................. डायरी लिहितात. "अहो, रोज काय तेच तेच लिहिता? तुमचा कालचा, आजचा आणि .................. दैनंदिन कार्यक्रम सारखाच आहे आणि असेल! गेली पाच वर्षं तेच करताय तुम्ही!" किचनमधून रवींद्ररावांच्या बायकोचा आवाज येतो.




## १० रिकाम्या जागा भरू या.

उदा॰ हल्ली तू (रात्र) रात्रीची खूप जागतेस का?

१. (महिना) .................. किराणा एकदम विकत घेतला तर स्वस्त पडतो.

२. तुमच्या गावात (आठवडा) .................. बाजार कधी भरतो?

३. माझं (नेहमी) .................. पेन मला सापडत नाहीये.

४. ही माझी (संध्याकाळ) .................. गाडी आहे.

५. हा तुझा (रोज) .................. रस्ता आहे का? कारण तू खूप सहजपणे गाडी चालवतेस.

६. (दुपार) .................. मी फारसं जेवत नाही.

७. धान्याचा (वर्ष) ..................साठा करून मग व्यापारी खोटी टंचाई निर्माण करतात.

### षष्ठी : सर्वनाम
### Genitive Forms : Pronouns

| | | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| मी | मी + कागद | माझा कागद | माझे कागद |
| आम्ही | आम्ही + अर्ज | आमचा अर्ज | आमचे अर्ज |
| आपण | आपण + वर्ग | आपला वर्ग | आपले वर्ग |
| तू | तू + हात | तुझा हात | तुझे हात |
| तुम्ही | तुम्ही + वेळ | तुमची वेळ | तुमच्या वेळा |
| आपण | आपण + गरज | आपली गरज | आपल्या गरजा |
| तो | तो + बाग | त्याची बाग | त्याच्या बागा |
| ती | ती + संध्याकाळ | तिची संध्याकाळ | तिच्या संध्याकाळी |
| ते | ते + घर | त्याचे घर | त्याची घरे |
| ते (अ॰व॰) | ते + पुस्तक | त्यांचे पुस्तक | त्यांची पुस्तके |
| त्या (अ॰व॰) | त्या + झाड | त्यांचे झाड | त्यांची झाडे |
| ती (अ॰व॰) | ती + काम | त्यांचे काम | त्यांची कामे |

**११ गाळलेल्या जागा भरू या.** ▶अ॰पु॰ १३-१५

उदा॰ (ते) त्यांची गोची झाली. ते चुकीच्या बसमध्ये चढले!



क. (मी) .................... गोंधळ .................... . .................... रस्ता चुकले!

ख. (ती) .................... गैरसमज .................... . .................... माझ्यावर चिडली!

ग. (ते) .................... घोटाळा .................... . .................... पुस्तक घरी विसरले!

घ. (आम्ही) .................... फजिती .................... . .................... चुकीच्या माणसाला रागावलो!

च. (तो) .................... पोपट .................... . .................... वेगळ्या इमारतीत शिरला!

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ ते (अ॰व॰)<br>त्यांचं ऐका तर तुम्ही! | त्यांचं ऐका तर तुम्ही! |
| ती | तिचं ऐका तर तुम्ही! |
| मी | माझं ऐका तर तुम्ही! |
| आम्ही | आमचं ऐका तर तुम्ही! |
| तो | त्याचं ऐका तर तुम्ही! |
| त्या | त्यांचं ऐका तर तुम्ही! |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ पिशवी<br>त्या मामाची पिशवी | त्या मामाची पिशवी |
| किल्ली | त्या मामाची किल्ली |
| चप्पल | त्या मामाची चप्पल |
| सदरा | त्या मामाचा सदरा |
| कागद | त्या मामाचा कागद |
| पत्र | त्या मामाचं पत्र |
| घर | त्या मामाचं घर |
| गाडी | त्या मामाची गाडी |

**षष्ठी**

**Genitive / Possessive Case**

| एकवचन | अनेकवचन | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| त्या मामाचा सदरा | त्या मामाचे सदरे | त्या मामांचा सदरा | त्या मामांचे सदरे |
| त्या मामीची पिशवी | त्या मामीच्या पिशव्या | त्या मामींची पिशवी | त्या मामींच्या पिशव्या |
| त्या बाळाचे खेळणे | त्या बाळाची खेळणी | त्या बाळांचे खेळणे | त्या बाळांची खेळणी |





| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ पिशवी<br>त्या मामीची पिशवी | त्या मामीची पिशवी |
| किल्ली | त्या मामीची किल्ली |
| चप्पल | त्या मामीची चप्पल |
| सदरा | त्या मामीचा सदरा |
| कागद | त्या मामीचा कागद |
| पत्र | त्या मामीचं पत्र |
| घर | त्या मामीचं घर |
| गाडी | त्या मामीची गाडी |

## षष्ठी - संबंधी सर्वनाम Genitive - Relative Pronouns



| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| जो | ज्याचा फोटो | जे | ज्यांचे फोटो |
| | ज्याची खुर्ची | | ज्यांच्या खुर्च्या |
| | ज्याचे घर | | ज्यांची घरे |
| जी | जिचा फोटो | ज्या | ज्यांचे फोटो |
| | जिची खुर्ची | | ज्यांच्या खुर्च्या |
| | जिचे घर | | ज्यांची घरे |
| जे | ज्याचा फोटो | जी | ज्यांचे फोटो |
| | ज्याची खुर्ची | | ज्यांच्या खुर्च्या |
| | ज्याचे घर | | ज्यांची घरे |



### षष्ठी - दर्शक सर्वनामांची Genitive - Demonstrative Pronouns

| एकवचन | | अनेकवचन | |
|---|---|---|---|
| हा | याचा फोटो | हे | यांचे फोटो |
| | याची टोपी | | यांच्या टोप्या |
| | याचे घर | | यांची घरे |
| हे | याचा फोटो | ही | यांचे फोटो |
| | याची टोपी | | यांच्या टोप्या |
| | याचे घर | | यांची घरे |
| ही | हिचा फोटो | या | यांचे फोटो |
| | हिची टोपी | | यांच्या टोप्या |
| | हिचे घर | | यांची घरे |

**टीप :** याचा = ह्याचा याची = ह्याची याचे = ह्याचे...



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ विमानतळ-प्राधिकरण (एअरपोर्ट अथॉरिटी) | |
| मला विमानतळ-प्राधिकरणाची परवानगी हवी आहे. | मला विमानतळ-प्राधिकरणाची परवानगी हवी आहे. |
| सरकार | मला सरकारची परवानगी हवी आहे. |
| हायकोर्ट | मला हायकोर्टाची परवानगी हवी आहे. |
| महाविद्यालय / कॉलेज | मला कॉलेजची परवानगी हवी आहे. |
| कार्यालय / ऑफिस | मला ऑफिसची परवानगी हवी आहे. |
| आयकरविभाग | मला आयकर विभागाची परवानगी हवी आहे. |
| महानगरपालिका | मला महानगरपालिकेची परवानगी हवी आहे. |







| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० परवानगी | |
| मला एअरपोर्ट अथॉरिटीची परवानगी हवीये. | मला एअरपोर्ट अथॉरिटीची परवानगी हवीये. |
| उत्तर | मला एअरपोर्ट अथॉरिटीचं उत्तर हवंय. |
| परवाना | मला एअरपोर्ट अथॉरिटीचा परवाना हवाय. |
| प्रतिक्रिया | मला एअरपोर्ट अथॉरिटीची प्रतिक्रिया हवीये. |
| अधिकारपत्र | मला एअरपोर्ट अथॉरिटीचं अधिकारपत्र हवंय. |
| संमती | मला एअरपोर्ट अथॉरिटीची संमती हवीये. |
| होकार | मला एअरपोर्ट अथॉरिटीचा होकार हवाय. |

**गंमत**

कुंदाच्या काकूंनी कुंदाच्या काकांच्या कचेरीचे कागद कात्रीने कराकरा कापून कचऱ्याच्या कुंडीत कोंबले.



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० चहा | |
| आता चहाची वेळ झालीये. | आता चहाची वेळ झालीये. |
| बस | आता बसची वेळ झालीये. |
| लेक्चर | आता लेक्चरची वेळ झालीये. |
| फ्लाईट | आता फ्लाईटची वेळ झालीये. |
| बैठक | आता बैठकीची वेळ झालीये. |
| वामकुक्षी | आता वामकुक्षीची वेळ झालीये. |





## १२ खालील उदाहरण वाचू या आणि रिकाम्या जागा भरू या.

▶अ॰पु॰ १६-१९

मचमच करणे, घोरणे, मोठ्याने बोलणे, भांडणे, भटकणे, झोपणे, खोटं बोलणे

उदा॰ आईशप्पथ, (तो) त्याच्या मचमच करण्याचा मला त्रास होतो.

क. आईशप्पथ, (रमा) .................... .................... मला त्रास होतो.

ख. (आम्ही) .................... .................... त्याला त्रास होतो.

ग. (आजी) .................... वेळीअवेळी .................... आईला खूप त्रास होतो.

घ. (नवरा) ........................................ बायकोला खूप त्रास होतो.

च. (तू) .................... उशिरापर्यंत .................... बाबांना खूप राग येतो.

छ. (मी) ........................................ मुलांना खूप त्रास होतो.

## १३ फरक ओळखू या.

▶अ॰पु॰ २०-२२

| वाक्ये | षष्ठीचा वापर | ठासून सांगण्यासाठी 'च'चा वापर |
|---|---|---|
| उदा॰ काही सेकंदांतच वेटर पाण्याचे पेले घेऊन आला. | पाण्याचे | सेकंदांतच |
| १) पोलिसांचं काम अवघडच आहे म्हणा! | | |
| २) त्याचं कशाकडेच लक्ष नव्हतं. काय चाललं होतं त्याच्या डोक्यात? | | |
| ३) पोळीचा शेवटचा तुकडा तोंडात कोंबतच मी उठलो. | | |
| ४) समोरच उभा असलेला माणूस साधारण बाबाच्या वयाचा. | | |
| ५) मी आमच्या गाडीच्या दिशेनेच नजर टाकली. | | |



## १४ ऐकू या.

**१. आता खालील प्रश्नांची उत्तरे निवडू या.**

| | |
|---|---|
| क. सूत्रधार आणि प्रिया यांच्यात काय नातं आहे? | १. प्रियकर – प्रेयसी<br>२. नट – नटी ३. नट – प्रेक्षक |
| ख. सूत्रधार म्हणजे... | १. नट<br>२. नाटकाचा निवेदक<br>३. दिग्दर्शक |
| ग. प्रेक्षक म्हणजे... | १. लेखक २. सूत्रधार<br>३. नाटक पाहणारे |
| घ. उताऱ्यातील 'माकडचेष्टा' या शब्दाचा योग्य अर्थ कोणता? | १. विनोदी हावभाव<br>२. सराव ३. मस्करी |
| च. प्रियेची कोणती सवय सूत्रधाराला आवडत नाही? | १. रंगमंदिरात उशिरा येण्याची<br>२. कावरंबावरं होण्याची<br>३. माकडचेष्टा करण्याची |
| छ. 'भाजी मार्केटमध्ये एक लहान मूल हरवते व .................... होऊन आपल्या आईला शोधण्याचा प्रयत्न करते.' रिकाम्या जागी योग्य विशेषण कोणते? | १. लहान<br>२. निरागस<br>३. कावरेबावरे |
| ज. तुमच्या आयुष्यात असे कोणी खास आहे का? | १. हो २. नाही<br>३. सांगता येत नाही<br>४. सांगायचे नाही |

**२. तुमच्या आयुष्यातील खास व्यक्तीने काय करावे आणि काय करू नये असे तुम्हाला वाटते? उदाहरणार्थ, रोज सकाळचा चहा करावा, उशीर झाल्यास फोन करावा, खाताना आवाज करू नये इ॰**

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

१५ उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या. ▶अ॰पु॰ २३




कांबळे कुटुंब एक मोठे दहा जणांचे एकत्रित कुटुंब आहे. आणि म्हणतात ना, 'व्यक्ती तितक्या प्रकृती'. घरातल्या प्रत्येकाचे एक वेगळेच व्यक्तिमत्त्व आहे, वेगळीच तऱ्हा आहे.

एखाद्या गोष्टीचा / ची / चे : छंद - नाद - वेड - आवड - सवय असणे

उदा॰ बाबा : वेगवेगळे पदार्थ बनवणे -

बाबांना वेगवेगळे पदार्थ बनवण्याचा छंद आहे.

१. आजोबा : रॉक आणि पॉप संगीत ऐकणे -

..........

२. आई आणि आजी : क्रिकेटचे सामने बघणे -

..........

३. काका : मॅरेथॉन स्पर्धांमध्ये भाग घेणे -

..........

४. काकू : आत्मचरित्रे वाचणे -

..........

५. आत्या : जगभर फिरणे -

..........

६. बच्चे कंपनी : शास्त्रीय संगीत -

क. रोहन : सतार वाजवणे -

..........

ख. मीरा : व्हायोलीन वाजवणे -

..........

ग. केतन : तबल्यावर साथ करणे -

..........

**१६** **खाली दिलेली क्रियापदे आणि नामे वाचू या आणि षष्ठी विभक्तीचा उपयोग करून मजेशीर जोड्या बनवू या. अजून इतर शब्दही वापरू या.**

| | |
|---|---|
| पाहणे, विकणे, फेकणे, विकत घेणे, बोलणे, खाणे, पिणे... | दुकान फोटो मेट्रो मालक खोली |
| | ऑफिस काम टेन्शन जोडपे |
| | गाडी सासू काच भाजी दरवाजा किलो |
| | पोस्ट नाणी आरसा सून पुस्तक |

उदा॰ खाण्याची गाडी...

.....................................................................

.....................................................................

.....................................................................

.....................................................................

**१७** **आत्ताच्या आत्ता**

**१. बाबा आणि त्याच्या मुलामधल्या संवादातील कोण कुठली वाक्ये बोलत आहे ते ओळखू या आणि हा संवाद योग्य त्या क्रमाने वहीत लिहून काढू या.**

| अनुक्रम | बाबा | समर्थ |
|---|---|---|
| उदा॰ <u>पूर्णच्या पूर्ण</u> गृहपाठ <u>आजच्या आज</u> का करायचा पण? रोज करतो ना थोडा थोडा. | | ✓ |
| १. (घरात येऊन) बाबा, आता <u>थोड्या वेळापूर्वीच</u> तर खाली गेलो होतो. आणि सकाळी थोडा अभ्यास केलाय ना मी! | | |
| २. (खाली खेळत असलेल्या आपल्या मुलाला) समर्थ, चल, वर ये आता! पुरे झाल्या उनाडक्या. <u>आत्ताच्या आत्ता</u> अभ्यासाला बस बघू! | | |
| ३. (खालूनच) काय रे बाबा, खेळू दे ना अजून थोडा वेळ! | | |
| ४. ते काही नाही. <u>केव्हाचा</u> गेलायस खाली खेळायला! चार तास होत आले आता. | | |
| ५. पण बाबा - | | |
| ६. असा थोडा अभ्यास करून काय होणारंय? उरलेला <u>सर्वच्या सर्व</u> आज पूर्ण कर. आज मलाही रजा आहे, तर तुझा सुट्टीतला गृहपाठ संपवू या. | | |
| ७. (मनात) जाऊ दे, <u>आत्ताच्या आत्ता</u> निमूट अभ्यासाला बसावं, हे बरं. नाही तर, <u>काहीच्या काही</u> बोलत बसेल हा बाबा! | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | पण नाही नि बीण नाही. तुला किती वेळा सांगितलंय, <u>तेव्हाच्या तेव्हा</u>, <u>वेळच्या वेळी</u> कामं पूर्ण करावीत. अरे, रोजच्या रोज लवकर ऊठ. <u>रोजच्या रोज</u> बदाम खा. वेळापत्रकानुसार रोजच्या रोज भरपूर अभ्यास कर. मग बघ, कसे <u>पैकीच्या पैकी</u> गुण मिळतात ते परीक्षेत! | | |
| ९ | अरे, तुझी सुट्टी संपायला आता दोनच दिवस राहिलेत. सुट्टीच्या पहिल्या दिवसापासून रोजच्या रोज थोडा अभ्यास केला असतास, तर <u>कधीच्या कधी</u> पूर्ण झाला असता! | | |

**२. वर अधोरेखित केलेले शब्द योग्य त्या अर्थाआधी लिहू या.**

| अधोरेखित शब्द | अर्थ | अधोरेखित शब्द | अर्थ |
|---|---|---|---|
| १. ................ | खूप वेळा आधी | ६. ................ | सगळा |
| २. ................ | आता लगेच, वेळ न दवडता | ७. ................ | आजच |
| ३. तेव्हाच्या तेव्हा | त्या त्या वेळी | ८. ................ | संपूर्ण |
| ४. ................ | रोज न चुकता, दररोज | ९. ................ | वेळेवर |
| ५. ................ | जेवढे गुण तेवढे सगळे | १०. ................ | काहीपण, वायफळ |

**१९ खालील उदाहरण वाचू या. चित्रांच्या आधारे वाक्ये बनवू या.** ▶अ॰पु॰ २४-२९

| | |
|---|---|
| १.  | लुकड्या ................ जाडा<br><br>उदा॰ केतन कसला दिसतो आता! लुकड्याचा चांगलाच जाडा झालाय. |
| २.  | बर्फा ................ पाणी |

| | |
|---|---|
| ३.  | पाण्या .................................... वाफ |
| ४.  | रंका .................................... राव |
| ५.  | बेडका .................................... राजकुमार |

१९. **खालील संवाद वाचू या आणि अधोरेखित रंगीत शब्दांचा अर्थ शोधून काढू या. तसेच संवाद बनवू या.**

**विशेषणाची पुनरावृत्ती होते.**

उदा॰ विशेषण - बारकुडी

आजोबा : सईबाई, नीट खात जा, व्यवस्थित पीत जा. बारकुडीची बारकुडी राहू नकोस.

सई : काय म्हणालात? बारकुडीची बारकुडी? म्हणजे?

आजोबा : म्हणजे वाघाचे पंजे. अगं, म्हणजे एकदा बारकुडी ती कायमची बारकुडी.

सई : मग नुसतं बारकुडी म्हणा ना!

आजोबा : नाही माझी सायुडी, बारकुडीची बारकुडी जास्त छान वाटते.

बारकुडीची बारकुडी = ..............................

१. विशेषण : मट्ठ

बाई: अभ्यास करा रे मुलांनो, टिंगलटवाळ्या कमी. नाही तर .............................. राहाल.

मुले: बाई, काय म्हणालात? ..............................? म्हणजे?

बाई: हो रे, .............................. म्हणजे मट्ठ.

संवाद

मुले: अच्छा, म्हणजे जसं कोणाला स्मार्टफोन वापरता येत नाही तसं ना?

२. विशेषण : रिकामं

रोहन : चला मित्रांनो, बाहेर जेवायला जाऊ या आज रात्री. कशी आहे कल्पना?

सनी : हो चालेल, पण त्या संजयला कळवू नका. त्याचं पाकीट रिकामंचं रिकामं असतं कायम.

रॉजर : .................... म्हणजे?

रोहन : .................... म्हणजे रिकामं, बिनपैशाचं.

रॉजर : अच्छा, कळलं मला. म्हणजे फुकटचं खाऊ नये म्हणून काय! हा: हा: हा:!

३. विशेषण : भरलेली

पांडू : केवढं गरम होतंय! अंगाची नुसती लाही लाही होतेय आणि त्यातून पाण्याचा तुटवडा.

माधवभाऊ : अरे पांडू, आपल्याला काय टेन्शन? घरामागची विहीर कायम ....................!

पांडू : काय सांगता माधवभाऊ, .................... म्हणजे?

माधवभाऊ : अरे पांडोबा, .................... म्हणजे भरलेली विहीर.

पांडू : समजले. कायम पाण्याने भरलेली, बरोबर.

### संभाषण साधू या

माझी जिवाभावाची / जिवलग मैत्रीण / घट्ट / घनिष्ठ मैत्री असणे
जिने मला पाठिंबा / आधार दिला
एकमेकांसाठी कधीही धावून जाणे
काकांचा रागीट चेहरा डोळ्यांसमोर आला की सगळे अवसानच गळून जाते

भावंडांशी भांडण होणे
मित्रांनी टिंगल करणे
आतल्या गाठीचं असणे
वाद घालणे



आईसारखी माया करणे
वडिलांसारखे पाठीशी उभे राहणे
आईला / वडिलांना वचन / आश्वासन देणे

२० खालील चित्र पाहू या आणि चित्रवर्णन करू या.



## २१ नातीगोती

**१. आपल्या कुटुंबाचा वंशवृक्ष (family tree) काढू या व कोणाचे आपल्याशी काय नाते आहे ते सांगू या.**

**२. कोणाची स्मरणशक्ती चांगली आहे? चला खेळ खेळू या.**

- चौदा पत्त्यांचे (वर्गातील संख्येनुसार) संच तयार करावेत.
- खाली दाखवल्याप्रमाणे प्रत्येक पत्त्याच्या एका बाजूवर नाते लिहावे व त्या पत्त्याची मागील बाजू कोरीच ठेवावी.
- दोन दोन विद्यार्थ्यांचे गट तयार करावेत. प्रत्येक जोडीला चौदा पत्ते द्यावेत.
- पत्त्यांची कोरी बाजू वर राहील अशा पद्धतीने ते समोर मांडावेत.
- मग खेळास सुरुवात करावी.
- एका विद्यार्थ्याने दोन पत्ते उलटावेत. जर नात्यांची जोडी जमली; उदा॰ 'आजी-आजोबा', 'सासू-सासरे', तर एक गुण त्याला मिळाला. जोडी न जमल्यास ते पत्ते होते त्या जागी तसेच ठेवावेत.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आजी | आजोबा | काका | काकू | सासू | सासरे | मामा |
| मामी | दीर | जाऊ | सून | मुलगा | मुलगी | जावई |

- ज्याची स्मरणशक्ती अधिक त्याला अधिक जोड्या जमवता येतील.

मुलगी-जावई, सासू-सासरा, आजी-आजोबा, मामा-मामी, काका-काकू, दीर-जाऊ, सून-मुलगा

**३. तुम्हाला आत्तापर्यंत मिळालेल्या भेटवस्तूंची एक यादी बनवा. किमान दहा भेटवस्तू लिहा.**

२२ ‘एका लग्नाची दुसरी गोष्ट’ या मालिकेचा एक भाग पाहू या आणि खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.

१. हे लोक घनाचे कोण? ओळखू या.

क.


ख.


ग.


घ.


च.


छ.


ज.


झ.


ट.


२. चूक की बरोबर ते लिहू या.

| | |
|---|---|
| उदा॰ घनाच्या घरी १५ जण राहतात. | बरोबर |
| क. घनाच्या काकीचं लग्नानंतरचं नाव विनिता असं आहे. | ................ |
| ख. लग्नानंतर नाव बदलायला राधाला आवडेल. | ................ |
| ग. घनाच्या आवडत्या काकाचं नाव दिगंबर आहे. | ................ |
| च. राधा जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून कमर्शिअल आर्ट्स शिकली आहे. | ................ |
| छ. राधाने सर्वांच्या पाया पडावं असा आजीचा मुळीच आग्रह नाही. | ................ |

**३. खालील नाती ओळखू या.**

क. घनाची काकी घनाच्या आईची कोण? जाऊ, की मेहुणी? ..................

ख. घनाची बहीण घनाच्या बायकोची कोण? नणंद, की भावजय? ..................

ग. घनाची बायको घनाच्या बाबांची कोण? सासू, की सून? ..................

घ. घनाचा मेहुणा म्हणजे त्याच्या बायकोचा भाऊ, की दीर? ..................

च. घनाची बायको घनाच्या बहिणीची कोण? विहीण, की वहिनी? ..................

छ. घनाची आई आणि त्याच्या बायकोची आई या एकमेकींच्या विहिणी, की वहिन्या? ..................

## शब्दसंपदा

### नाम : नातेसंबंध

| | | |
|---|---|---|
| तो परिवार, ते - | ती पिढी, त्या पिढ्या | ते कुटुंब, ती कुटुंबे / ती कुटुंबं |
| तो नातेवाईक, ते - | ती आजी, त्या आज्या | ते सासर, ती सासरे / ती सासरं |
| तो आजोबा, - | ती आई / त्या आई, त्या आया | ते माहेर, ती माहेरे / ती माहेरं |
| तो बाबा, - | ती मावशी, त्या मावश्या | ते लग्न, ती लग्ने / ती लग्नं |
| तो मामा, ते - | ती मामी, त्या माम्या | ते नाते / ते नातं, ती नाती |
| तो काका, ते - | ती काकू, त्या काकवा / त्या काकू / ती काकी, त्या काक्या | ते आईवडील |
| तो दीर, ते - | ती आत्या, त्या - | ते जोडपे / ते जोडपं, ती जोडपी |
| तो दादा, ते - | ती ताई, त्या ताया | ते लेकरू, ती लेकरे / ती लेकरं |
| तो भाऊ, ते - | ती बहीण, त्या बहिणी | ते बाळ, ती बाळे / ती बाळं |
| तो नवरा, ते नवरे | ती बायको, त्या बायका | ते मूल, ती मुले / ती मुलं |
| तो पती, ते - | ती सहचारिणी, त्या - | |
| तो मुलगा, ती मुलं / ते मुलगे | ती पत्नी, त्या- | |
| तो लेक, ते - | ती मैत्रीण, त्या मैत्रिणी | |
| तो सासरा / ते सासरे | ती मुलगी, त्या मुली | |
| तो साडू, ते - | ती लेक, त्या लेकी | |

शब्दसंपदा

| | | |
|---|---|---|
| तो मेहुणा, ते मेहुणे | ती सासू / त्या सासूबाई, त्या सासवा | |
| तो मित्र, ते - | ती सून, त्या सुना | |
| तो शेजारी, ते - | ती नात, त्या नाती | |
| | ती मेहुणी, त्या मेहुण्या | |
| | ती भावजय, त्या भावजयी | |
| | ती वहिनी, त्या वहिन्या | |
| | ती विहीण, त्या विहिणी | |
| | | |

**१. ऊकारान्त नामे**

**दृष्टिक्षेपातील ऊकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.**

**१. क. ऊकारान्त पुल्लिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो चेंडू – ते चेंडू | त्या चेंडू-, त्या चेंडूं- |
| तो चिक्कू – ते चिक्कू | त्या चिक्कू-, त्या चिक्कूं- |
| तो अश्रू – ते अश्रू | त्या अश्रू-, त्या अश्रूं- |



**वापर :** चेंडूमागे...

२.

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो विंचू – ते विंचू | त्या विंचवा-, त्या विंचवां- |
| तो भाऊ – ते भाऊ | त्या भावा-, त्या भावां- |



**वापर :** विंचवाकडे

**आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

विद्यार्थी एक : त्या विंचवाबद्दल तुम्हाला काय वाटतं?

सगळे : काय? विंचवाबद्दल?

विद्यार्थी एक : हो! विंचवाबद्दल.

सगळे : तो आम्हाला अजिबात नाही आवडत.

(याचप्रमाणे : लाडू, भाऊ... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

ख. ऊकारान्त नपुंसकलिंगी नामे

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ते लिंबू – ती लिंबे | त्या लिंबा-, त्या लिंबां- |
| ते कोकरू – ती कोकरे | त्या कोकरा-, त्या कोकारां- |
| ते वासरू – ती वासरे | त्या वासरा-, त्या वासरां- |



वापर : लिंबावर

ग. ऊकारान्त स्त्रीलिंगी नामे

१.

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती जादू – त्या जादू | त्या जादू-, त्या जादूं- |
| ती वाळू | त्या वाळू-, |



वापर : जादूसाठी

२.

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती सासू – त्या सासवा | त्या सासू-, त्या सासवां- |
| ती काकू – त्या काकू / काकवा | त्या काकू-, त्या काकूं- / काकवां- |



वापर : सासूमुळे

३.

| (नाम) (ए.व. - अ.व.) | (सा.रू.) (ए.व. - अ.व.) |
|---|---|
| ती जाऊ – त्या जावा | त्या जावे-, त्या जावां- |

वापर : जावेकडे

**आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

विद्यार्थी एक : लपूनछपून असं कोणाबद्दल बोलताय रे तुम्ही?

विद्यार्थी दोन : माझ्या काकूबद्दल.

सगळे : तुझ्या काकूबद्दल?

विद्यार्थी दोन : हो. माझ्या काकूबद्दल.

सगळे : मग लपूनछपून बोलायची काय गरज आहे? मोठ्याने बोला की.

(याचप्रमाणे- सासू, जाऊ, जादू, वाळू... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)






## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो दुरावा, ते दुरावे | ती उनाडकी, त्या उनाडक्या | ते नाते / ते नातं, ती नाती |
| तो घोटाळा, ते घोटाळे | ती फजिती, त्या फजित्या | ते पाळणाघर, ती पाळणाघरे / ती पाळणाघरं |
| तो गृहपाठ, ते – | ती पावती, त्या पावत्या | ते संकट, ती संकटे / ती संकटं |
| तो संस्कार, ते | ती टंचाई, त्या टंचाया | ते गुपित, ती गुपिते / ती गुपितं |
| तो प्रयोग, ते - | ती नजर, त्या नजरा | ते गाव, ती गावे / ती गावं |
| तो कार्यक्रम, ते - | ती मौज, त्या मौजा | ते स्थान, ती स्थाने / ती स्थानं |
| तो प्रयत्न, ते - | ती हौस, त्या हौसा | ते संमेलन, ती संमेलने / ती संमेलनं |
| तो गोंधळ, | ती वामकुक्षी | ते क्षेत्र, ती क्षेत्रे / ती क्षेत्रं |
| तो संवाद, ते - | ती कल्पना, त्या - | ते रंगमंदिर, ती रंगमंदिरे / ती रंगमंदिरं |
| तो विभाग, ते - | ती तऱ्हा, त्या - | ते आत्मचरित्र, ती आत्मचरित्रे / ती आत्मचरित्रं |
| तो वाद, ते - | ती माकडचेष्टा, त्या - | ते वचन, ती वचने / ती वचनं |
| तो नट, ते - | ती सूचना, त्या - | ते आश्वासन, ती आश्वासने / ती आश्वासनं |
| तो दिग्दर्शक, ते - | | |
| तो सूत्रधार, ते - | | |
| तो व्यत्यय, ते - | | |

## आता मला हे येतं ...

**कुटुंबातील वेगवेगळी नाती ओळखणे.**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**भेटवस्तू देणे / घेणे. कोणाला काय दिले?**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**षष्ठी नाम आणि सर्वनामांची रूपे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणाचा**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**षष्ठीचे प्रत्यय आणि शुद्ध शब्दयोगी अव्यय 'च'**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**'रोजच्या रोज', 'आजच्या आज' असे वाक्प्रचार**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# आनंदतरंग

५



## चला, शिकू या...

- सणांविषयी बोलणे
- आनंदाचे प्रसंग
- अभिनंदन करणे / शुभेच्छा देणे
- सर्वनामांची सामान्यरूपे + शब्दयोगी अव्यय
- तरी, आता तरी, निदान
- मराठी न्याहारी आणि जेवण याबद्दल
- एखादी मराठी पाककृती बनवणे, त्यावर लिहिणे आणि बोलणे

# ५ आनंदतरंग

## १ विविध सणांसाठी आणि आनंदाच्या प्रसंगांसाठी शुभेच्छा.




























































१. कोणत्या शुभेच्छा कुठल्या प्रसंगांसाठी? सांगू या.

| सण | विवाह | वाढदिवस | आनंदाचे इतर प्रसंग |
|---|---|---|---|
| उदा॰ ही दिवाळी तुम्हाला आनंदाची जावो. | | उदा॰ वाढदिवसाच्या अनेक शुभेच्छा. | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

२. खाली दिलेल्या सणांना आणि महत्त्वाच्या दिवसांना कोणत्या शुभेच्छा द्याल?

क. स्वातंत्र्यदिन ........................................

ख. ईद ........................................

ग. पंचाहत्तरावा वाढदिवस ........................................

घ. नृत्याच्या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक ........................................

च. दसरा ........................................

छ. प्रजासत्ताकदिन ........................................

ज. लग्नाचा वाढदिवस ........................................

झ. संस्थेचा वर्धापनदिन ........................................

ट. ख्रिसमस ........................................

▶अ॰पु॰ १

**३. सर्वनामांची योग्य रूपे व कंसातील योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरू या.**

(मनापासून, मनःपूर्वक, जोरदार, मनापासून, हार्दिक)

क. “दहावीच्या परीक्षेत ९०% गुण! (तू) ............ ............ अभिनंदन!”

ख. “आई, मला नोकरी मिळाली. आणि तो माझा मित्र आहे ना, समीर, त्यालापण मिळाली. माझ्याच ऑफिसात.”

“अरे वा! किती चांगली बातमी आहे. (तुम्ही दोघे) ............ ............ अभिनंदन.”

ग. “अठराव्या वाढदिवसाच्या ............ शुभेच्छा!”

घ. (ते) ............ ............ स्वागत झाले मुंबईत.

च. “आमच्या या छोट्याशा घरी (तुम्ही) ............ ............ स्वागत.”

**४. तुमच्या घरी कोणकोणते सण आणि उत्सव साजरे होतात? कुठल्या तरी एका सणाबद्दल माहिती सांगू या : तो सण आपण कसा साजरा करतो?**

▶अ॰पु॰ २-३

**२ आनंदाचे प्रसंग : चला, सर्वांना आनंदात सहभागी करून घेऊ या आणि इतरांच्या आनंदात आपणही सहभागी होऊ या.**

▶अ॰पु॰ ४-५

| आनंदाचा प्रसंग | आनंदाचा प्रसंग कळवणे | प्रतिक्रिया देणे |
|---|---|---|
| • परीक्षेतील यश<br>• नोकरीत बढती मिळणे<br>• नवीन घर घेणे<br>• बाळाचा जन्म<br>• लग्न ठरणे<br>• नवी गाडी घेणे<br>• एखादे रखडलेले काम होणे<br>• फ्लॅटचा ताबा मिळणे<br>• हव्या त्या ठिकाणी बदली होणे<br>• खडूस बॉसची बदली होणे<br>• बुडालेले पैसे परत मिळणे | मला कळवण्यास / कळवायला अतिशय आनंद होतोय / होत आहे.<br>एक चांगली बातमी सांगायचीये / सांगायची आहे.<br>तुम्हाला हे सांगताना मला खूप आनंद होतोय.<br>आज माझ्या आयुष्यातला फार महत्त्वाचा दिवस आहे.<br>एक छान बातमी सांगू का?<br>ऐक ना! एक मस्त बातमी आहे.<br>आज मी खूप खूश आहे.<br>बातमी ऐकल्यावर तुम्हालाही आनंद होईल.<br>एक आनंदाची बातमी आहे. | फारच छान बातमी आहे. हार्दिक अभिनंदन!<br>फक्त ‘चांगली’ काय! फारच उत्तम बातमी आहे.<br>तुझ्या डोक्याचा ताणच गेला आता. मनापासून अभिनंदन!<br>असंच यश तुला नेहमी मिळत राहो.<br>शाब्बास! मग आता पुढे काय?<br>अभिनंदन! आता काय, एकदम साहेबच झालास! गाडी, केबिन ... ऐटच आहे!<br>सुंदरच आहे घर. नव्या घरामध्ये तुमची भरभराट होवो.<br>अय्या! मस्त आहे गाडी. जरा आरामात प्रवास करता येईल ना आता! |

**प्रतिक्रिया देणे**

खूप छान! बरं वाटलं ऐकून.
खूपच कष्ट घेतलेस तू. तुझ्या कष्टांचं चीज झालं.
वा! वा! अभिनंदन! तुझ्या मेहनतीचं फळ मिळालं. खरंच तुझा अभिमान वाटतोय.
काय सांगतोस? खरंच? हा तर एक गोडच धक्का आहे. तुझ्या मागची कटकटच गेली.
फारच बरं झालं. अभिनंदन!

**प्रतिक्रिया देणे**

मनापासून अभिनंदन! ऐकून छान वाटलं. आता पेढे पाहिजेत.
अरे! खरंच महत्त्वाची बातमी आहे. बरं झालं तुझी काळजी मिटली. आता पार्टी पाहिजे बरं का!
वा! वा! खास अभिनंदन! मग आता लाडू कधी?
हे यश तुझंच होतं. हुशार आहेसच तू. अशीच प्रगती कर.





**टीप :** लग्न ठरल्यास / केल्यास लाडू.
यश मिळाल्यास / मुलगा जन्माला आल्यास पेढे.
मुलगी जन्माला आल्यास बर्फी.



१. **उदाहरणाप्रमाणे आनंदाची बातमी देऊ या.**

उदा० नोकरीत बढती मिळणे / मला कळवण्यास अतिशय आनंद होत आहे की मला नोकरीत बढती मिळाली आहे.

क. नवीन घर घेणे
ख. लग्न ठरणे
ग. परीक्षेतील यश
घ. नवी गाडी घेणे
च. फ्लॅटचा ताबा मिळणे







२. **वरील तक्त्यातील प्रसंग निवडून उदाहरणाप्रमाणे त्याला योग्य अशी प्रतिक्रिया त्याच्यासमोर लिहू या आणि संवादरूपाने सांगू या.**

उदा० • एक छान बातमी सांगू का? माझे बुडालेले पैसे मला परत मिळाले.
• खूप छान! तुझ्या डोक्याचा ताण गेला.

३ **एक लग्नाची आमंत्रणपत्रिका पाहू या.**


॥ श्री ॥

कळविण्यास आनंद होत आहे की,
आम्ही विवाहबद्ध होण्याचे ठरविले असून
हा विवाह सोहळा बुधवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०१२ रोजी
'ज्ञान प्रबोधिनी पद्धती'ने संपन्न होणार आहे.
तरी या मंगलकार्यास व भोजन समारंभास आपण सर्वांनी
जरूर उपस्थित राहावे.

आपली उपस्थिती हीच आमच्यासाठी आनंदाची गोष्ट असल्याने,
अहेर अथवा पुष्पगुच्छ आणू नयेत, ही विनंती.

आपले स्नेहांकित,

**प्रणव** आणि **रमा**

प्रियांका प्रकाश सखदेव
प्रभव प्रकाश सखदेव

मोनिका व अजेय हर्डीकर
पद्मा यशवंत हर्डीकर
रंजना मुकुंद धारवाडकर

स्थळ : श्री गणेश सभागृह, ऑफ कर्वे रोड, दीक्षित पेट्रोल पंपाजवळ, पुणे – ४११००४
मंगलाष्टकांची वेळ : स. ११.४५ वा. । भोजन समारंभ : दु. १२ ते २

### वेगवेगळ्या समारंभाच्या आमंत्रणपत्रिकेत येणारी महत्त्वाची वाक्ये

| सुरुवात | स्थळ / दिनांक / वेळ | आमंत्रण | शेवट |
|---|---|---|---|
| कळवण्यास आनंद होत आहे की | दिनांक... रोजी | आपली उपस्थिती मोलाची आहे. | कृपया अहेर / पुष्पगुच्छ आणू नयेत. |
| आमच्या येथे शुभकार्य आयोजले आहे. | ...वाजून ...मिनिटांनी या मुहूर्तावर | तुम्ही या समारंभास अगत्याने यावे. | तुमची उपस्थिती हाच आमच्यासाठी अहेर! |
| या मंगल प्रसंगी स्वागत समारंभ आयोजण्यात आला आहे. | या स्थळी | सहभागी व्हावे | आमच्या काकाच्या लग्नाला यायचं हं! |
| गणेश चतुर्थीचं औचित्य साधून हा समारंभ आयोजण्यात आला आहे. | | आपले आशीर्वाद / शुभेच्छा मोलाच्या आहेत. | |
| | | आमच्या विनंतीस मान देऊन यावे. | |

### सर्वनाम - षष्ठी - सामान्यरूप
### Pronoun - Genitive case - Oblique Forms

| | | | |
|---|---|---|---|
| मी + कागद | माझा कागद | माझ्या (कागद + वर) | माझ्या कागदावर |
| आम्ही + अर्ज | आमचा अर्ज | आमच्या (अर्ज + मुळे) | आमच्या अर्जामुळे |
| आपण + वर्ग | आपला वर्ग | आपल्या (वर्ग + कडे) | आपल्या वर्गाकडे |
| तू + हात | तुझा हात | तुझ्या (हात + वर) | तुझ्या हातावर |
| तुम्ही + वेळ | तुमची वेळ | तुमच्या (वेळ + वर) | तुमच्या वेळेवर |
| आपण + ओढ | आपली ओढ | आपल्या (ओढ + ने) | आपल्या ओढीने |
| तो + बाग | त्याची बाग | त्याच्या (बाग + चा) | त्याच्या बागेचा |
| ती + संध्याकाळ | तिची संध्याकाळ | तिच्या (संध्याकाळ + ई) | तिच्या संध्याकाळी |
| ते + घर | त्याचे घर | त्याच्या (घर + ला) | त्याच्या घराला |
| ते + पुस्तक | त्यांचे पुस्तक | त्यांच्या (पुस्तक + सोबत) | त्यांच्या पुस्तकासोबत |
| त्या + झाड | त्यांचे झाड | त्यांच्या (झाड + खाली) | त्यांच्या झाडाखाली |
| ती + काम | त्यांचे काम | त्यांच्या (काम + चे) | त्यांच्या कामाचे |

### ४ कोष्टक पूर्ण करू या.

▶अ॰पु॰ ६-७

### सर्वनामाचे सामान्यरूप + शब्दयोगी अव्यय
### Oblique Forms of Pronouns + Post position

| सर्वनाम | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी | सामान्यरूप + शब्दयोगी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | माझ्याशिवाय | | | माझ्यासोबत | | | |
| आम्ही | | आमच्यासारखा | | आमच्यासोबत | आमच्याबद्दल | | |
| आपण | | | आपल्याबरोबर | | | | |
| तू | | तुझ्यासारखा | | | | तुझ्यामुळे | |
| तुम्ही | तुमच्याशिवाय | | | | | तुमच्यामुळे | |
| आपण | | आपल्यासारखा | | | | | |
| तो | | | | | त्याच्याबद्दल | | |
| ती | तिच्याशिवाय | | तिच्याबरोबर | | | | |
| ते | | | त्याच्याबरोबर | | | | त्याच्याजवळ |
| ते, त्या, ती | | त्यांच्यासारखा | | | | | त्यांच्याजवळ |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी | |
| माझ्याबद्दल | माझ्याबद्दल |
| तू | तुझ्याबद्दल |
| आम्ही | आमच्याबद्दल |
| तुम्ही | तुमच्याबद्दल |
| तो | त्याच्याबद्दल |
| ती | तिच्याबद्दल |
| आपण | आपल्याबद्दल |
| ते (अ॰व॰) | त्यांच्याबद्दल |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ जवळ | |
| आपल्याजवळ कोण आहे? | आपल्याजवळ कोण आहे? |
| शिवाय | आपल्याशिवाय कोण आहे? |
| सारखा | आपल्यासारखा कोण आहे? |
| बरोबर | आपल्याबरोबर कोण आहे? |
| सोबत | आपल्यासोबत कोण आहे? |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ तू माझ्यासोबत येतेयस का? | |
| हो, तुझ्याशिवाय कशी जाईन? | हो, तुझ्याशिवाय कशी जाईन? |
| तू अमृतासोबत येतोयस का? | हो, तिच्याशिवाय कसा जाईन? |
| तू प्राजक्तासोबत येतेयस का? | हो, तिच्याशिवाय कशी जाईन? |
| तू देवेंद्र आणि पार्थसोबत जातेयस का? | हो, त्यांच्याशिवाय कशी जाईन? |
| तू आमच्यासोबत येतोयस का? | हो, तुमच्याशिवाय कसं जाईन? |

## ५ चला चित्रवर्णन करू या.

अ॰पु॰ ८

| | |
|---|---|
|  | १) अभिषेक - उदा॰ बॉल अभिषेकच्या पुढे आहे. बॉल त्याच्यापुढे आहे. |
|  | २) नमित - ........................................ |
|  | ३) प्रसाद - ........................................ |
|  | ४) अमृता - ........................................ |
|  | ५) कैलाश, स्मिता - ........................................ |
|  | ६) आजोबा - ........................................ |
|  | ७) आजोबा - ........................................ |

## ६ तरी, आता तरी, निदान...



सहा महिने, एक वर्ष म्हणता म्हणता दोन वर्षं झाली.
मनासारखी मुलगी ............ बघण्यात नाही आली.
आईचा धोशा सतत चालू, उलटून गेली तिशी,
............ मुलगी पसंत कर, पांढरी झाली तुझी मिशी.
बाहत्तर मुली बघितल्या, ............ नापसंती कायम.
एकदा सांगून तरी टाक तुझ्या अटी आणि तुझे नियम.



गोरीपान नसली ............ सडपातळ मात्र पाहिजे.
जेवण नको साग्रसंगीत ............
वरणभात तरी जमला पाहिजे.
माझ्यासोबत पबमध्ये तिनं आलं पाहिजे.
नाचता नाही आलं ............, मिरवणं तिला जमलं पाहिजे.
मुलगी नकटी असली, सावळी असली तरी मला चालेल.
काळजी नको करूस आई, अशी मुलगी मला नक्कीच सापडेल.

**१. वरील कवितेप्रमाणे मुलीच्या दृष्टिकोनातून नवीन कविता लिहू या.**

## ७ चला, जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| १. आठवड्यातून दोन दिवस पाणीकपात होते आहे. | क. आता तरी पर्यावरणाची काळजी घ्या. |
| २. जंगले उजाड झाल्याने पाऊस पडत नाही. | ख. आता तरी तो कचरा कचराकुंडीत टाका. |
| ३. कचरा इतस्ततः फेकल्यामुळे रोगराई पसरत आहे. | ग. आता तरी पाणी जपून वापरा. |
| ४. वायुप्रदूषण, जलप्रदूषण दिवसेंदिवस वाढतच आहे. | घ. आता तरी झाडे लावा. |





## ८ आनंदाच्या प्रसंगी थालीपीठ

▶अ०पु० १०-११





आज मी खूप खूप आनंदात आहे.
मी अख्खे थालीपीठ खाणार.



आज मी खूप आनंदात आहे.
मी अर्धे / निम्मे थालीपीठ खाणार.



आज मी खूप आनंदात आहे.
मी एक चतकोर थालीपीठ खाणार.

१. चित्र आणि खाद्यपदार्थांच्या जोड्या लावू या!

| चित्र | उत्तर | खाद्यपदार्थांची नावे |
|---|---|---|
| क.  | उदा० क - ३ | १. भजी |
| ख.  | | २. वडा पाव |
| ग.  | | ३. सोलकढी |
| घ.  | | ४. शिरा |
| च.  | | ५. पोहे |
| छ.  | | ६. आमटी |
| ज.  | | ७. भाकरी |
| झ.  | | ८. बटाट्याची भाजी |
| ट.  | | ९. तळलेला मासा |
| ठ.  | | १०. पाव भाजी |

# ५ आनंदतरंग

## १ मराठी माणूस आहे खवय्या!











पोहे खाऊ, थालीपीठ खाऊ, खाऊ शिरा आणि खिचडी
पेज, पानगी किंवा कधी कधी तिखटगोड धिरडी.
मराठी माणसाची आहे ही सकाळची न्याहारी,
राहशील इथे तर ठेव हेच खायची तयारी!

वरणभात, त्यावर तूप, वरती लिंबू पिळू,
लोणचं, चटणी डावीकडे, खाली कोशिंबीर वाढू.
पोळी/भाकरी वाढू मध्ये; भाजी-आमटी उजवीकडे.
चविष्ट मराठी जेवणाची लज्जत घे आमच्याकडे!

संध्याकाळी खाऊ बटाटावडा किंवा साबुदाणा वडा,
पाव-भाजी, पाव-मिसळ किंवा पावामध्ये वडा.
रोज करू छान-छान, चविष्ट कांदा-बटाटा भजी,
न्याहारी रोज नवलाईची आणि ताजी ताजी.

कोंबडी-वडा, मटणाचा रस्सा - पांढरा किंवा लाल
कोल्हापूरला जाल तर नक्कीच खाल.
पापलेट, सुरमई, बोंबील - तळून हवे की रस्सा?
सोबत सोलकढीचा खास कोंकणी ठसका!

सांग आता खरं खरं, नको विचार करू फार,
आवडला ना तुला हा मराठी पाहुणचार?

१. मराठी माणूस कुठल्या वेळी काय खातो?



सकाळची न्याहारी

क. फोडणीचे पोहे (कांदे / बटाटे घालून)



दुपारचे जेवण

ख. वरणभात (लिंबू, तूप घालून)



मधल्या वेळेचा फराळ

ग. बटाटावडा, साबुदाणा वडा, भजी



रात्रीचे जेवण

घ. दुपारच्या जेवणाप्रमाणेच

काही खास मराठी पदार्थ

उकडीचे मोदक, ...

पांढरा रस्सा, ...

सोलकढी, ...







२. मराठी माणूस कधी काय खातो? चुकीचा शब्द खोडू या!

क. सकाळची न्याहारी -

| | | | |
|---|---|---|---|
| १. पुरणपोळी | २. साबुदाणा खिचडी | ३. थालीपीठ | ४. शिरा |

ख. दुपारचे जेवण -

| | | | |
|---|---|---|---|
| १. पोळी | २. बटाट्याची भाजी | ३. उपमा | ४. आमटी |

ग. मधल्या वेळेचा फराळ -

| | | | |
|---|---|---|---|
| १. बटाटावडा | २. भजी | ३. तळलेला मासा | ४. पाव-भाजी |

घ. रात्रीचे जेवण -

| | | | |
|---|---|---|---|
| १. भात | २. कोशिंबीर | ३. फोडणीचे पोहे | ४. कोंबडी-वडा |

३. आतापर्यंत आपण खूप मराठी खाद्यपदार्थांची नावे शिकलो. पुढील पदार्थांपैकी कोणते गोड आहेत आणि कोणते तिखट? खालील नावे वाचून याद्या बनवू या!

(श्रीखंड, पुरणपोळी, बटाटावडा, आमटी, शिरा, पाव-भाजी, जिलबी, खिचडी, वडा-पाव, लाडू)

| गोड पदार्थ | तिखट पदार्थ |
|---|---|
| क. | १. |
| ख. | २. |
| ग. | ३. |
| घ. | ४. |
| च. | ५. |

४. तुम्ही दिवसभरात काय काय खाता? त्यातील गोड पदार्थ कोणते आणि तिखट पदार्थ कोणते?

..................................................

..................................................

## १० आई, आज डब्यात काय दिलंयस?

एक संभाषण ऐकू या. पुढील शब्द कोणत्या मराठी पदार्थांसाठी वापरले आहेत?

| | |
|---|---|
| १. पिझ्झा | |
| २. स्पायसी राइसफ्लेक्स | |

## ११ तुम्हाला जगातील निरनिराळ्या देशांतील खाद्यपदार्थ माहीत असतीलच. त्यातील आपल्या आवडत्या खाद्यपदार्थांची नावे लिहू या.

..................................................

..................................................

..................................................



## १२ चला, डबापार्टी करू या!

**शिक्षक आणि विद्यार्थी एकत्रितपणे डबापार्टीसाठी एक दिवस ठरवतील आणि विद्यार्थी खालील कामे करून आणतील :**

- आपला आवडता खाद्यपदार्थ बनवून आणणे
- त्या खाद्यपदार्थाची पाककृती लिहून आणणे
- बनवलेला खाद्यपदार्थ वर्गात एका बुफेमध्ये मांडणे आणि त्याची पाककृती वर्गासमोर मांडणे.

## १३ काही गाणी ऐकू या. आणि ती कोणत्या प्रसंगांसाठी लागू होतात हे ओळखू या. मग त्या गाण्यांच्या चित्रफिती पाहून उत्तरे बरोबर आहेत का हे पडताळून पाहू या.

क. बाळाचा जन्म आणि अंगाई ..............................

ख. सुट्टी लागणे ..............................

ग. शाळा सुटणे ..............................

घ. प्रेमात पडणे ..............................

च. लग्न होणे ..............................

### पुणेरी पाट्या

**एका खोपटवजा उपाहारगृहावरील पाटी**

हॉटेल ओबेराय
(आमची कोठेही शाखा नाही)

तीनदा दार वाजवूनही उघडले नाही,
तर समजावे की
मालकांना आपणास भेटावयाचे नाही.

**रद्दीच्या दुकानावरील पाटी**

चित्रपटाच्या खेळाला जायचे आहे?
आई-बाबा पैसे देत नाहीत?
मग वह्या-पुस्तके आम्हाला द्या की!

### म्हणी आणि वाक्प्रचार

पाहुणे येती घरा, तोचि दिवाळी दसरा
दसरा सण मोठा, नाही आनंदाला तोटा
तुझं माझं जमेना, तुझ्या वाचून करमेना
असेल तेव्हा दिवाळी, नसेल तेव्हा शिमगा

### शब्दसंपदा

#### ५.१ नाम : सण

| | | |
|---|---|---|
| तो सण, ते - | ती दिवाळी | ते निमंत्रण, ती निमंत्रणे / ती निमंत्रणं |
| तो उत्सव, ते - | ती होळी | ते सुख, ती सुखे / ती सुखं |
| तो सोहळा, ते सोहळे | ती संक्रांत | ते यश |
| तो नाताळ, ते - | ती ईद | ते नववर्ष, ती नववर्षे / ती नववर्षं |
| तो दसरा | ती शुभेच्छा | |
| तो गणपती, ते - | ती भेटवस्तू | |
| तो गुढीपाडवा | ती समृद्धी | |
| तो प्रसंग, ते - | ती भरभराट | |
| तो वाढदिवस, ते - | | |
| तो पतंग, ते - | | |

#### ५.२ नाम : खाद्यपदार्थ

| | | |
|---|---|---|
| तो खाऊ, ते - | ती चपाती, त्या चपात्या | ते दही |
| तो नाश्ता, ते - | ती भाकर, त्या भाकरी | ते लोणी |
| तो पोहा, ते पोहे | ती भाकरी, त्या भाकऱ्या | ते तूप |
| तो उपमा | ती पुरी, त्या पुऱ्या | ते तेल |
| तो डोसा, ते डोसे | ती पोळी, त्या पोळ्या | ते मीठ |
| तो शिरा, ते शिरे | ती पुरणपोळी, त्या पुरणपोळ्या | ते आले / आलं |
| तो सामोसा, ते सामोसे | ती खिचडी | ते बेसन |
| तो पाव, ते - | ती पावभाजी, त्या पावभाज्या | ते भजे / भजं, ती भजी |
| तो वडा, ते वडे | ती पाणीपुरी | ते कणीस, ती कणसे / ती कणसं |
| तो बटाटा, ते बटाटे | ती चिंच, त्या चिंचा | ते उप्पीट |

| | | |
|---|---|---|
| तो बटाटावडा, ते बटाटेवडे | ती हळद, त्या हळदी | ते चॉकलेट, ती चॉकलेटे / ती चॉकलेटं |
| तो मसाला, ते मसाले | ती लसूण, त्या लसणी | ते श्रीखंड, ती श्रीखंडे / ती श्रीखंडं |
| तो हलवा, ते हलवे | ती काजूकतली, त्या काजूकतल्या | ते अंडे / अंडं, ती अंडी |
| तो रसगुल्ला, ते रसगुल्ले | ती मिठाई, त्या मिठाया | ते लोणचे / ते लोणचं, ती लोणची |
| तो मेवा | ती जिलबी, त्या जिलब्या | |
| तो लाडू, ते - | ती फोड, त्या फोडी | |
| तो मोदक, ते - | | |
| तो पेढा, ते पेढे | | |
| तो गुलाबजाम, ते - | | |
| तो केक, ते - | | |
| तो बर्फ | | |

### ५.३ नाम : पेये

| | | |
|---|---|---|
| तो ज्यूस, ते - | ती लस्सी | ते पाणी |
| तो मिल्कशेक, ते - | ती बासुंदी | ते सरबत, ती सरबते / ती सरबतं |
| तो कोकाकोला | ती थंडाई | ते लिंबूसरबत, ती लिंबूसरबते / ती लिंबूसरबतं |
| | ती आमटी, त्या आमट्या | ते दूध |
| | | ते ताक |
| | | ते पऱ्हे / पऱ्हं |







### १. सामान्यरूपे - एकारान्त नामे

**दृष्टिक्षेपातील एकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.**

**एकारान्त नपुंसकलिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ते नाणे – ती नाणी | त्या नाण्या-, त्या नाण्यां |
| ते गाणे – ती गाणी | त्या गाण्या-, त्या गाण्यां- |
| ते डोके – ती डोकी | त्या डोक्या-, त्या डोक्यां- |



**वापर :** नाण्यामुळे...

**आता सरावासाठी पुढीलप्रमाणे वर्गात संभाषण करू या.**

**संभाषणातील सहभागी :** १) विद्यार्थी एक २) विद्यार्थी दोन ३) सगळे एकत्र

विद्यार्थी एक : तू असं का केलंस?

विद्यार्थी दोन : अरे गाण्यापुढे माझं काही चालत नाही.

सगळे : गाण्यापुढे?

विद्यार्थी दोन : हो की... गाण्यापुढे.

सगळे : कमाल आहे बुवा.

(याचप्रमाणे : नाणे, डोके ... वापरून वरीलप्रमाणे संभाषण करू या.)

### २. ओकारान्त

**दृष्टिक्षेपातील ओकारान्त नामे लिंगानुसार शोधून पुढीलप्रमाणे सामान्यरूपे लिहू या.**

**क. ओकारान्त पुंल्लिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| तो खोखो | त्या खोखो- |



**वापर :** खोखोमध्ये...

**ख. ओकारान्त स्त्रीलिंगी नामे**

| (नाम) (ए॰व॰ - अ॰व॰) | (सा॰रू॰) (ए॰व॰ - अ॰व॰) |
|---|---|
| ती बायको – त्या बायका | त्या बायको-, त्या बायकां- |



**वापर :** बायकोमुळे...

**संभाषण करू या :**

फारच छान बातमी
बरं / छान वाटलं ऐकून
खूप छान
फारच बरं झालं
उत्तम

हार्दिक / मनापासून अभिनंदन
शाब्बास
शुभाशीर्वाद
प्रगतीची शिखरे गाठ
खूप मोठा हो

डोक्याचा ताण जाणे
(तुझी / माझी / ...) काळजी मिटली
तुझ्यामागची कटकटच गेली
कष्टांचं चीज झालं
मेहनतीचं फळ मिळालं

तुझा अभिमान वाटतोय
हा एक गोड धक्काच आहे
आता पेढे पाहिजेत
अशीच प्रगती कर

भरभराट होणे
या शुभ दिवशी सर्वांना सुख-शांती लाभो
नवे वर्ष भरभराटीचे जावो
होळीचा / दिवाळीचा / ... सण आनंदाचा जावो
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

रखडलेले काम होणे
बढती मिळणे
लग्न ठरणे

तुला चांगले आयुरारोग्य लाभो
जीवन सुखाचे जावो
एक आनंदाची / मस्त / महत्त्वाची बातमी आहे
मला खूप / अतिशय आनंद होतोय






### दृष्टिक्षेप
#### नाम

| | | |
|---|---|---|
| तो अभिमान, ते - | ती वाटचाल, त्या वाटचाली | ते शिखर, ती शिखरे |
| तो आशीर्वाद, ते - | ती मेहनत, त्या मेहनती | ते अभिनंदन |
| तो धोशा, ते धोशे | ती काळजी | ते कौतुक, ती कौतुके / ती कौतुकं |
| | ती बातमी, त्या बातम्या | ते यश |
| | ती पाणीकपात | ते स्थळ, ती स्थळे / ती स्थळं |
| | ती लज्ज़त | ते औचित्य, ती औचित्ये / ती औचित्यं |
| | ती नवलाई | |

| क्रियापद | विशेषण | इतर शब्द |
|---|---|---|
| वाजवणे | गोरीपान | इतस्तत: |
| करमणे | सडपातळ | |
| उलटणे | साग्रसंगीत | |
| मिरवणे | नकटी | |
| सापडणे | सावळी | |
| वापरणे | अख्खे | |
| मांडणे | अर्धे / निम्मे | |
| | एक चतुर्थांश | |
| | उजाड | |
| | चविष्ट | |



## आता मला हे येतं ...

**सणांविषयी बोलणे / आनंदाचे प्रसंग**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**अभिनंदन करणे / शुभेच्छा देणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सर्वनामांची सामान्यरूपे + शब्दयोगी अव्यय**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**तरी, आता तरी, निदान**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मराठी न्याहारी आणि जेवण यांबद्दल बोलणे / मराठी पाककृती लिहिणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# भाषा

## ६












## चला, शिकू या...

- भाषेबद्दल बोलणे
- इच्छा व्यक्त करणे
- कारण आणि परिणाम सांगणे
- प्रश्नशब्द : का?
- संयुक्त वाक्ये : कारण, त्यामुळे, म्हणून
- सामान्य नामांची सामान्यरूपे
- ‘च’चा वापर

## १ भाषा

▶अ॰पु॰ १

१. खालील चित्र पाहू या आणि त्या भाषावृक्षामध्ये माहीत असलेल्या परकीय भाषा लिहू या. भाषेतला एक शब्द जरी माहीत असेल, तरी त्या भाषेचे नाव लिहू या.




२. एक चित्रफीत पाहू या आणि त्यावर चर्चा करू या.

## ६ भाषा

२ खालील आकृती पाहू या आणि परकीय भाषा शिकण्याची काय काय कारणे असू शकतात त्यावर बोलू या.

▶अ॰पु॰ २




नवीन भाषा शिकणे म्हणजे नवीन व्यक्ती बनणे.
- हारूकी मुराकामी
जपानी लेखक

परकीय भाषा का शिकावी?

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा॰ नव्या संस्कृतीची ओळख होणे<br>कारण त्यामुळे नव्या संस्कृतीची ओळख होते. | कारण त्यामुळे नव्या संस्कृतीची ओळख होते. |
| करियरविषयक संधी उपलब्ध होणे | कारण त्यामुळे करियरविषयक संधी उपलब्ध होतात. |
| कुतूहल वाढणे | कारण त्यामुळे कुतूहल वाढते. |
| त्या भाषेतील साहित्य वाचता येणे | कारण त्यामुळे त्या भाषेतील साहित्य वाचता येते. |
| जगाशी संवाद साधता येणे | कारण त्यामुळे जगाशी संवाद साधता येतो. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा॰ कारण मला सतत पुण्याला जावं लागतं.<br>मला सतत पुण्याला जावं लागतं, म्हणून मला मराठी शिकायचंय. | मला सतत पुण्याला जावं लागतं, म्हणून मला मराठी शिकायचंय. |
| कारण मला मराठी भाषेतील साहित्य वाचायचंय. | मला मराठी भाषेतील साहित्य वाचायचंय, म्हणून मला मराठी शिकायचंय. |
| कारण माझी बदली झालीये अहमदनगरला. | माझी बदली झालीये अहमदनगरला, म्हणून मला मराठी शिकायचंय. |
| कारण मराठी महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. | मराठी महाराष्ट्राची राज्यभाषा आहे, म्हणून मला मराठी शिकायचंय. |
| कारण माझी मैत्रीण मराठी आहे. | माझी मैत्रीण मराठी आहे, म्हणून मला मराठी शिकायचंय. |

## ३ आजची ताजी बातमी

▶अ॰पु॰ ३

मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागात आज एकच खळबळ उडाली. कारण होते त्यांच्या आजच सुरू झालेल्या "अन्यभाषकांसाठी संवादात्मक मराठी" या वर्गाचे. विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश करताच मोठ्ठा धक्का बसला, आणि ते घाबरून ओरडतच बाहेर पडले. आत पाच - सहा परग्रहवासी आधीच बसले होते. थोड्या वेळातच त्यांना कळले की हे परग्रहवासी निरुपद्रवी आहेत आणि मैत्रीच्या नात्याने इथे आले आहेत. मराठीच्या शिक्षिकेचा हात हातात घेताच केवळ ५ मिनिटांत त्यांनी मराठी भाषा आत्मसात केली आणि मराठी गाणं म्हणत आणि सर्वांना शुभेच्छा देत ते अदृश्य झाले.

नंतर दुपारी अचानक जुहू चौपाटीवर हे सहा परग्रहवासी अवतरले आणि लगेचच बातमीदारांनी त्यांना गराडा घातला आणि त्यांची मुलाखत घेतली :



बातमीदार - पृथ्वीवर तुम्हा सर्वांचं स्वागत. कुठून आलात तुम्ही?

परग्रहवासी- आम्ही साहुरी नावाच्या ग्रहावरून आलोय. पृथ्वी या अतिशय सुंदर ग्रहाची आणि येथील लोकांची ओळख करून घेण्याची आमची इच्छा आहे.

बातमीदार - तुम्ही इथे मुंबईतच का आलात?

परग्रहवासी - आम्ही सर्व देशांना भेट देणार आहोत, पण आज इथे मराठीचा वर्ग सुरू झाल्याचे कळले, म्हणून आधी इथे आलो.

बातमीदार - मराठी भाषेविषयी तुम्ही काय सांगाल?

परग्रहवासी - फारच छान भाषा आहे. हिचे आमच्या साहुरीना भाषेशी खूप साम्य आहे, म्हणून ही भाषा शिकताना फारच मजा आली. आम्हीपण आईच्या भावाला मामा म्हणतो. म्हणूनच 'झुकु झुकु झुकु झुकु आगीनगाडी, धुरांच्या रेघा हवेत काढी, पळती झाडे पाहू या, मामाच्या गावाला जाऊ या' हे गाणं आम्हाला फार आवडलं आणि आम्ही ते पाठही केलं. आता निघालो आम्ही अमेरिकेला.

बातमीदार - इतक्या लवकर इथून जाण्याचे कारण?

परग्रहवासी - आम्हाला अजून बरेच देश पाहायचे आहेत, कारण संपूर्ण पृथ्वीची माहिती मिळवणे हेच आमचे काम आहे. वेळ कमी आहे, त्यामुळे आता निघायला हवं. अच्छा!!

इतके बोलून सर्व साहुरीवासी एकदम दिसेनासे झाले. ते गात असलेल्या मराठी गाण्याचा आवाज मात्र उपस्थितांना बराच वेळ ऐकू येत होता.

१. वरील परिच्छेदातील निळ्या रंगातील शब्दांचे मूळ रूप लिहू या.

| रंगीत शब्द | मूळ रूप |
|---|---|
| उदा. विद्यापीठाच्या | विद्यापीठ |
| क. | |
| ख. | |
| ग. | |
| घ. | |
| च. | |
| छ. | |
| ज. | |
| झ. | |
| ट. | |
| ठ. | |
| ड. | |
| ढ. | |
| त. | |
| थ. | |







२. 'कारण' किंवा 'त्यामुळे' हे शब्द वापरून वाक्ये तयार करू या.

उदा. साहुरीवासी आधी मुंबईला का आले? त्यांना मुंबईत मराठीचा वर्ग सुरू झाल्याचे कळले.

साहुरीवासी आधी मुंबईला आले, कारण त्यांना मुंबईत मराठीचा वर्ग सुरू झाल्याचे कळले.

साहुरीवासीयांना मुंबईत मराठी भाषेचा वर्ग सुरू झाल्याचे कळले त्यामुळे ते आधी मुंबईला आले.

क. साहुरीवासीयांना घाई का आहे? त्यांना खूप देश बघायचे आहेत.

ख. साहुरीवासीयांना खूप देश का बघायचे आहेत? त्यांना संपूर्ण पृथ्वीची माहिती मिळवायची आहे.

ग. साहुरीवासीयांना लगेच का निघायला हवे? त्यांच्याकडे वेळ कमी आहे.

**४ कारण आणि परिणाम सांगणारी काही वाक्ये पुढे दिलेली आहेत. या वाक्यांच्या योग्य जोड्या लावू या आणि उदाहरणाप्रमाणे शक्य तितक्या प्रकारच्या वाक्यरचना करू या.** ▶अ॰पु॰ ४

कारण, त्यामुळे, म्हणून...

| | |
|---|---|
| १. सीमाला हवाईसुंदरी व्हायचे आहे. | क. फोन बंद पडला होता. |
| २. रोज व्यायाम केला पाहिजे. | ख. आरोग्य हीच खरी संपत्ती. |
| ३. कल्याणी खूप घाबरली होती. | ग. परीक्षा जवळ आली आहे. |
| ४. रोहन आजारी पडला. | घ. त्याला खूप भूक लागली होती. |
| ५. आईशी संपर्क होत नव्हता. | च. तिने बागेत एक मोठा साप बघितला होता. |
| ६. बाळ सारखे रडत होते. | छ. त्याचे बरेच मित्र महाराष्ट्रीय आहेत. |
| ७. सायली रोज मन लावून अभ्यास करते. | ज. तिला फिरायला आवडते. |
| ८. जॉन मराठी शिकत आहे. | झ. तो पावसात भिजला. |

उदा॰ : सीमाला हवाईसुंदरी व्हायचे आहे, कारण तिला भटकायला आवडते.
सीमाला भटकायला आवडते, त्यामुळे तिला हवाईसुंदरी व्हायचे आहे.
सीमाला भटकायला आवडते, म्हणून तिला हवाईसुंदरी व्हायचे आहे.

१. ..............................

२. ..............................

३. ..............................

४. ..............................

५. ..............................

६. ..............................

७. ..............................





## ५ खालील उतारा वाचू या.

जर्मनी, फ्रान्स, दक्षिण अमेरिकी देश व जपान असे देश भारताकडे 'उद्योग-व्यापाराच्या संधींचा प्रदेश' म्हणून पाहत आहेत. त्यामुळे या देशांतल्या मोठमोठ्या कंपन्यांनी भारतात आपला व्यवसाय उभारला आहे आणि भविष्यातही उभारणार आहेत. त्यामुळे दोन कंपन्यांमधला व्यावसायिक संवाद उत्तम प्रकारे घडावा, यासाठी कंपन्यांना हवे असतात परकीय भाषातज्ज्ञ - जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी आदी भाषांवर प्रभुत्व असलेले व्यावसायिक भाषातज्ज्ञ. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये परकीय भाषा अर्थात 'फॉरेन लँग्वेज' या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भाषांतरकार, दुभाष्या म्हणून करिअर संधी उपलब्ध झाल्या आहेत.

परकीय भाषा शिकण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे भाषांबद्दल आवड हवी. नवीन भाषा शिकणं ही तशी कठीण गोष्ट असल्याने तुमच्यात जिद्द आणि चिकाटी हवी, शिवाय मेहनत घ्यायची तयारी हवी. मुळात तुमची मातृभाषा आणि इंग्रजी अशा दोन भाषा पक्क्या असायला हव्यात.







कोणत्याही भाषेशी त्या त्या प्रदेशातल्या लोकांची संस्कृती, सामाजिक व्यवहार आदी गोष्टी निगडित असतात. त्यामुळे परकीय भाषा शिकत असताना त्या भाषेतील साहित्य वाचणं, तसंच उच्चार नीट कळावेत, कानावर पडावेत यासाठी ती भाषा 'ऐकणं' आवश्यक असतं. त्यासाठी वेगवेगळ्या कठीण पातळीनुसार ट्युटोरिअल्स इंटरनेटवर उपलब्ध असतात, तसंच त्याबाबतची पुस्तकं, सीडीही उपलब्ध आहेत. याशिवाय सराव आणि कोणताही शब्द अडला की तो शब्दकोशात शोधणं, नवीन शब्द टिपून ठेवणं अशा सवयी लावून घेणं महत्त्वाचं असतं. कष्टाचं फळ नेहमी गोडच असतं. त्यासाठी त्या भाषेतील भरपूर वाचनाखेरीज निजभाषकांशी वेगवेगळ्या प्रकारे सतत संवाद साधणं उपयोगी ठरतं. जसं वेगवेगळ्या सोप्या विषयांवर बोलणं, त्यांच्या प्रतिक्रिया नीट ऐकणं आणि सुरुवातीला एस.एम.एस. अथवा व्हॉट्सॲपवर छोटी छोटी वाक्य लिहिणं हेही उत्तम मार्ग ठरू शकतात. याखेरीज दूरचित्रवाणी व सिनेमासारखी दृक्‌श्राव्य माध्यमं खूपच उपयोगी आहेत.

**१. जोड्या जुळवू या.**

| | |
|---|---|
| क. जर्मनी, फ्रान्स, दक्षिण अमेरिका यांच्यासाठी भारत हा देश | १. नवीन संस्कृती, साहित्य, सामाजिक व्यवहार |
| ख. परकीय भाषांमधील करिअर संधी | २. जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, जपानी इत्यादी भाषांवर प्रभुत्व असलेले व्यावसायिक भाषातज्ज्ञ. |
| ग. परकीय भाषातज्ज्ञ | ३. परकीय भाषेत ऐकणे, सिनेमा पाहणे, पुस्तक, सीडी आणि डिक्शनरी यांचा वापर, व्याकरण |
| घ. परकीय भाषा शिकणे | ४. उद्योग-व्यापाराच्या संधींचा प्रदेश |
| च. परकीय भाषा म्हणजे | ५. भाषांतरकार, दुभाष्या |

**२. परिच्छेदातील अधोरेखित शब्दांचे मूळ रूप लिहू या.**

तो

| अधोरेखित शब्द | मूळ रूप |
|---|---|
| उदा॰ भारताकडे | भारत |
| उदा॰ व्यापाराच्या | व्यापार |
| क. | |
| ख. | |
| ग. | |
| घ. | |
| च. | |

ती

| | |
|---|---|
| छ. | |
| ज. | |
| झ. | |







**ते**

| | |
|---|---|
| ट. | |
| ठ. | |
| ड. | |
| ढ. | |
| त. | |
| थ. | |

**ते (अ.व.)**

| | |
|---|---|
| द. | लोक |

"ज्यांना परकीय भाषांबद्दल काहीच माहीत नसते, ते स्वभाषेबद्दलही अज्ञानी असतात."
- योहान वोल्फगांग फॉन ग्योथं (जर्मन साहित्यिक)

## ६ ईशा पंडित हिची एक मुलाखत ऐकू या.

**१. योग्य पर्याय निवडू या.**

क. ईशा कोणती भाषा शिकत आहे?
   १. जर्मन
   २. फ्रेंच
   ३. संस्कृत

ख. परदेशी भाषा शिकणे फार .................... आहे असे मुलाखतकाराला वाटते.
   १. कठीण
   २. किचकट
   ३. अवघड



ग. ईशाने जर्मन भाषा शिकायला कधी सुरुवात केली?
   १. १०वीमध्ये
   २. १०वी आधी
   ३. १०वीच्या सुट्टीमध्ये

घ. ईशाला जर्मन भाषा या क्षेत्राची माहिती कशी मिळाली?
   १. तिच्या जवळ राहणारी ताई जर्मन शिकत होती, तिच्याकडून.
   २. तिच्या आईने तिला ही माहिती दिली.
   ३. तिने स्वतः ही माहिती शोधून काढली.

च. ईशाने जर्मन भाषाच शिकायला घेतली, कारण
 १. इतर भाषांच्या तुलनेत तिला ही भाषा सोपी वाटली.
 २. तिची ताई ही भाषा शिकत असल्याने तिलाही तीच भाषा शिकायची इच्छा झाली.
 ३. तिच्या ताईने तिला स्पॅनिश किंवा जपानी भाषा न शिकण्याचा सल्ला दिला.

छ. ईशाचा जर्मनचा पहिला क्लास अविस्मरणीय होता, कारण
 १. तिच्या शिक्षिकेने त्यांना प्रत्येक शब्द इंग्रजीत अनुवाद करून शिकवला.
 २. आपल्या शाळेत जशी भाषा शिकवली जाते, तशीच तिच्या क्लासमध्येही ती शिकवली गेली.
 ३. तिच्या शिक्षिकेने सुरुवातीपासूनच जर्मन भाषेत शिकवायला सुरुवात केली.

ज. ईशाच्या वर्गात जर्मन शिकलेले
 १. बरेच लोक होते.
 २. कुणीच नव्हते.
 ३. दोन मुली होत्या.



झ. ईशाचा जर्मन भाषेचा प्रवास
 १. चालूच राहावा असे तिला वाटते.
 २. लवकर संपावा असे तिला वाटते.
 ३. यापैकी काहीच नाही.

**२. आपणही आपल्या मराठी शिकण्याच्या अनुभवाविषयी एकमेकांची मुलाखत घेऊ या आणि एकमेकांचे अनुभव जाणून घेऊ या.**



## ७ थोड्या गप्पा मारू या.

▶ अ॰पु॰ ५-६

शिक्षक - माझी मातृभाषा मराठी आहे. ती मला उत्तम येते असे मी समजतो. याखेरीज मला हिंदी आणि इंग्लिश खूप चांगल्या आणि गुजराती बरी येते असे मला वाटते. मी एक परकीय भाषापण शिकलोय, ती म्हणजे इटालियन. तीही मला बरी येते. यापुढे तमिळ शिकण्याची मला इच्छा आहे.

**आता आपण सांगू या, आपल्याला येणाऱ्या भाषांचे 'बरी', 'चांगली', 'खूप चांगली' आणि 'उत्तम' असे वर्गीकरण आपण करू शकतो का?**

| | |
|---|---|
| बरी | |
| चांगली | |
| खूप चांगली | |
| उत्तम | |

## ८ कधी कधी...

कधी कधी काय होतं, आपल्या नेहमीच्या पाहण्यातला माणूस असून त्याचं नावही आपल्याला माहीत नसतं. म्हणजे बघा ना, पहिल्यांदा आपण त्याला रस्त्यात बघतो, रोज बघतो, मग ओळखीचं हसू लागतो, मग कधी तरी पावसापाण्याच्या गप्पांना रंग चढतो. नंतर संध्याकाळी भेटल्यावर आपण मिळूनच बागेला चकरा मारतो. घरात शिरताना परत पाच मिनिटं गप्पा होतात. असेच दिवस जातात, पण आपण नाव काही विचारत नाही. आणि मग एके दिवशी अचानक कळतं की, हा तर आपल्या गावातल्या शाळेत होता, आपला जुना वर्गमित्र! ओळख पटते, मजा वाटते.

उन्मेष आणि मी, आमचं असंच झालं होतं. आता या माझ्या नव्यानं सापडलेल्या मित्राबरोबर रस्त्यावर फिरताना, बागेबाहेर भेळ खाताना, झाडाखाली उभे राहून तासन् तास गप्पा मारताना हा योगायोग आठवतो आणि गंमत वाटत राहते.

**१. वरील उताऱ्यात काही शब्द रंगीत केले आहेत. काय सांगाल त्यांच्याबद्दल? प्रथम लाल आणि निळ्या रंगाबद्दल बोलू या. यातील काही शब्द खालील तक्त्यात भरले आहेत ते नीट पाहू या.**

▶अ॰पु॰ ७

| | शब्द | मूळरूप | प्रत्यय | नाम / सर्वनाम |
|---|---|---|---|---|
| क | उदा॰ त्याचं | तो | चं | सर्वनाम |
| ख | आपल्याला | | | |
| ग | त्याला | | | |
| घ | रस्त्यात | | | |
| च | पावसापाण्याच्या | | | |
| छ | गप्पांना | | | |
| ज | बागेला | | | |
| झ | घरात | | | |
| ट | शाळेत | | | |



**२. हे प्रत्यय ओळखीचे आहेत ना? काय उपयोग आहे त्यांचा? आपल्याला नियम सांगता येतो का, बघू या.**

(प्रत्यय , सर्वनामे, क्रियापदाशी, रूप, नामे )

(क) .................... व (ख) .................... यांचा वाक्यातील (ग) .................... किंवा इतर शब्दांशी संबंध असतो. हा संबंध विभक्तीने दाखवला जातो. या विभक्तीचे (घ) .................... तयार करण्यासाठी जी अक्षरे जोडली जातात त्यांना (च) .................... म्हणतात.

आता लक्षात येतेय का? विभक्तिप्रत्यय तर आपल्याला आधीच माहीत आहेत. ते आपण वापरतही आहोत. 'प्रत्यय' हा शब्द येथे कळला, इतकेच.

**३. आता हिरवे शब्द बघू या. हेही आपल्या ओळखीचे आहेत, पण हे विभक्तिप्रत्यय नाहीत. हेही नामांना जोडून येतात. ही आहेत शब्दयोगी अव्यये - हीपण आपल्या ओळखीची आहेत. त्यांचे नाव आजच कळले!**

▶अ०पु० ८-९

| | शब्द | मूळरूप | शब्दयोगी अव्यय | नाम / सर्वनाम |
|---|---|---|---|---|
| क | नावही | नाव | ही | नाम |
| ख | मित्राबरोबर | | | |
| ग | बागेबाहेर | | | |
| घ | झाडाखाली | | | |

**नियम : शब्दयोगी अव्यये ही शब्दांचा त्याच वाक्यातील दुसऱ्या एखाद्या शब्दाशी संबंध जोडण्याचे काम करतात. ही आधीच्या शब्दाला जोडून येतात, म्हणून त्यांना 'शब्दयोगी' असे म्हणतात.**



९ **खेळू या.**

**खोखो**

- विभक्तिप्रत्यय, नामे व सर्वनामे आणि शब्दयोगी अव्यये यांच्या चिठ्ठ्या कराव्यात.
- त्या चिठ्ठ्या एका विद्यार्थ्याच्या पाठीला एक याप्रमाणे चिकटवाव्यात आणि प्रत्येकाने आपल्या पाठीवरील शब्द लक्षात ठेवावा.
- खोखोचा खेळ खेळावा. त्यामध्ये ज्याच्यावर राज्य असेल त्याने आपल्या शब्दासाठी योग्य जोडीदार शब्द शोधावा व त्याला खो द्यावा.
- ज्याला खो मिळाला त्याने जोडलेल्या शब्दांचे वाक्य तयार करून सांगावे आणि पुन्हा आपल्या शब्दासाठी योग्य जोडीदार शब्द शोधावा व त्याला खो द्यावा.

### सामान्यरूपे - नाम - पुल्लिंगी
### Oblique Forms - Nouns - Masculine

| | नाम<br>ए.व. - अ.व. | सामान्यरूप<br>ए.व. - अ.व. | सामान्यरूप + विभक्ती / शब्दयोगी<br>ए.व. - अ.व. |
|---|---|---|---|
| अ - आ / आं | कान - कान | काना-, कानां- | कानाला - कानांना |
| आ - आ | काका - काका | काका-, काकां- | काकाला - काकांना |
| आ - या | दिवा - दिवे | दिव्या-, दिव्यां- | दिव्याला - दिव्यांना |
| ई - ई | कवी - कवी | कवी-, कवीं- | कवीला - कवींना |
| ई - या | शेजारी - शेजारी | शेजाऱ्या-, शेजाऱ्यां- | शेजाऱ्याला - शेजाऱ्यांना |
| ऊ - ऊ | चेंडू - चेंडू | चेंडू-, चेंडूं- | चेंडूला - चेंडूंना |
| ऊ - वा | भाऊ - भाऊ | भावा-, भावां- | भावाला - भावांना |
| ओ - ओ | खोखो | खोखो- | खोखोला |
| **शिवाय...** | | | |
| सा - शा | मासा - मासे | माशा-, माशां- | माशाला - माशांना |

**टीप :** एकारान्त पुल्लिंगी नामेच नसल्यामुळे त्यांची सामान्यरूपेही नाहीत.

**अ - आ** **कान - कान कानाला - कानांना**

याचप्रमाणे : तास, खेळ, देव, विभाग, हात, वग, दिवस, स्वर्ग, दात, पाय, नारळ, शिक्षक, माणूस **पण :** तो माणूस, ती माणसे = माणसाला - माणसांना
(तो पाऊस = पावसाला, तो कापूस = कापसाला, तो शेंबूड = शेंबडाला)

**आ - आ** **काका - काका काकाला - काकांना**

याचप्रमाणे : मामा **पण :** तो राजा, ते राजे = राजाला - राजांना

**आ - शा** **मासा - मासे माशाला - माशांना**

याचप्रमाणे : ससा, मासा, पैसा, घसा

**आ - या** **दिवा - दिवे दिव्याला - दिव्यांना**

याचप्रमाणे : डोळा, गळा, वारा, आंबा, रस्ता, कावळा, बघ्या
**पण :** तो मुलगा, ते मुलगे = मुलाला - मुलांना; तो पोरगा, ते पोरगे = पोराला - पोरांना

| | | |
|---|---|---|
| तो पोर | ती पोर | ते पोर |
| ती पोरे / पोरं | त्या पोरी | ती पोरे / पोरं |
| पोराला – पोरांना | पोरीला – पोरींना | पोराला – पोरांना |

नामातील शेवटचे अक्षर कायम दीर्घ स्वरात असते.
नामाच्या अखारीस येणारे 'ई' / 'ऊ' हे स्वर नित्य दीर्घ असतात.
अन्य स्वरांना हा नियम लागत नाही. उदा॰ सिंह

**ई - ई** **कवी - कवी कवीला - कवींना**

याचप्रमाणे : दूरध्वनी, भटजी, गणपती, हत्ती, भाई

**ई - या** **शेजारी - शेजारी शेजाऱ्याला - शेजाऱ्यांना**

याचप्रमाणे : सहकारी, विद्यार्थी, कोळी, शिपाई, प्राणी, पक्षी, मणी

**ऊ - ऊ** **चेंडू - चेंडू चेंडूला - चेंडूंना**

याचप्रमाणे : तराजू, चिकू, झाडू, गुरू, पेरू, पेळू, वळू, बिंदू, गडू, खडू, खाऊ (ए॰व॰), भिडू, अश्रू, काऊ पण - लाडू - लाडू / लाडवाला - लाडवांना

**ऊ - वा** **नातू - नातू नातवाला - नातवांना**

याचप्रमाणे : विंचू, आसू, साडू
**पण :** ते लाडू = लाडूला - लाडूंना, लाडवाला - लाडवांना; तो भाऊ, ते भाऊ = भावाला भावांना; तो पू = पुवाला; तो गू = गुवाला

## ओ - ओ

टाहो - टाहो टाहोला - टाहोंना

याचप्रमाणे : ऋणको, धनको, खोखो, टाहो

### अ → आ

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० तास | |
| आजच्या तासाला नक्की ये. | आजच्या तासाला नक्की ये. |
| खेळ | आजच्या खेळाला नक्की ये. |
| वर्ग | आजच्या वर्गाला नक्की ये. |

### आकारान्त पु० (आ → आ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० काका | |
| आता काकाची गोष्ट सांग. | आता काकाची गोष्ट सांग. |
| मामा | आता मामाची गोष्ट सांग. |
| राजा | आता राजाची गोष्ट सांग. |

### आकारान्त पु० (आ → या)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा० कावळा | |
| आता कावळ्याची गोष्ट सांग. | आता कावळ्याची गोष्ट सांग. |
| कट्टा | आता कट्ट्याची गोष्ट सांग. |
| म्हातारा | आता म्हाताऱ्याची गोष्ट सांग. |
| घोडा | आता घोड्याची गोष्ट सांग. |
| रस्ता | आता रस्त्याची गोष्ट सांग. |

### ईकारान्त पु० (ई → ई)

| शिक्षक / शिक्षिका | शिक्षक / शिक्षिका |
|---|---|
| उदा० कवी | |
| अचानक कवीला खूप भूक लागली. | अचानक कवीला खूप भूक लागली. |
| भटजी | अचानक भटजीला खूप भूक लागली. |
| गणपती | अचानक गणपतीला खूप भूक लागली. |
| हत्ती | अचानक हत्तीला खूप भूक लागली. |

सराव

### ईकारान्त पु॰ (ई → या)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ शेजारी | |
| अचानक शेजाऱ्याला खूप भूक लागली. | अचानक शेजाऱ्याला खूप भूक लागली. |
| सहकारी | अचानक सहकाऱ्याला खूप भूक लागली. |
| विद्यार्थी | अचानक विद्यार्थ्याला खूप भूक लागली. |
| कोळी | अचानक कोळ्याला खूप भूक लागली. |
| शिपाई | अचानक शिपायाला खूप भूक लागली. |
| पक्षी | अचानक पक्ष्याला खूप भूक लागली. |

### ऊकारान्त पु॰ (ऊ → ऊ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ झाडू | |
| या झाडूला पाय लावू नकोस! | या झाडूला पाय लावू नकोस! |
| पेरू | या पेरूला पाय लावू नकोस! |
| खडू | या खडूला पाय लावू नकोस! |
| चिकू | या चिकूला पाय लावू नकोस! |

### ऊकारान्त पु॰ (ऊ → ऊ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ भाऊ – बहीण | |
| भावाऐवजी बहीण चालेल का? | भावाऐवजी बहीण चालेल का? |
| नातू – नात | नातवाऐवजी नात चालेल का? |
| विंचू – खेकडा | विंचवाऐवजी खेकडा चालेल का? |
| आसू – हसू | आसवाऐवजी हसू चालेल का? |
| लाडू – चकली | लाडवाऐवजी चकली चालेल का? |

### ओकारान्त पु॰ (ओ → ओ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ ऋणको | |
| ऋणकोचा आवाज वाढला. | ऋणकोचा आवाज वाढला. |
| धनको | धनकोचा आवाज वाढला. |
| टाहो | टाहोचा आवाज वाढला. |
| खोखो | खोखोचा आवाज वाढला. |

साकारान्त पु॰ (सा → शा)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा॰ ससा | |
| आता सशाची गोष्ट सांग. | आता सशाची गोष्ट सांग. |
| मासा | आता माशाची गोष्ट सांग. |
| पैसा | आता पैशाची गोष्ट सांग. |
| खिसा | आता खिशाची गोष्ट सांग. |

| | नाम | सामान्यरूप | सामान्यरूप + विभक्ती |
| --- | --- | --- | --- |
| अ - आ / आं | नाव - नावे | नावा-, नावां- | नावाला - नावांना |
| ई – या | पाणी | पाण्या- | पाण्याला |
| ऊ – आ | लिंबू - लिंबे | लिंबा-, लिंबां- | लिंबाला - लिंबांना |
| ऊ – वा | कुंकू | कुंकवा-, कुंकवांना- | कुंकवाला - कुंकवांना |
| ए – या | नाणे / नाणं - नाणी | नाण्या-, नाण्यां- | नाण्याला - नाण्यांना |

**टीप :** ओकारान्त नपुंसकलिंगी नामेच नसल्यामुळे त्यांची सामान्यरूपेही नाहीत.

**अ - आ** **नाव - नाव नावाला - नावांना**

याचप्रमाणे : पुस्तक, घड्याळ, पेन, मूल, फळ, विद्यापीठ, उत्तर, उदाहरण, घर, पान, मन, झाड, वेड, गीत,

**पण :** ते पाऊल, ती पावले = पावलाला - पावलांना; ते देऊळ, ती देवळे = देवळाला - देवळांना ते मूल, ती मुलं = मुलाला - मुलांना

**ई - या** **पाणी पाण्याला**

याचप्रमाणे : दही, लोणी

**ऊ - आ** **लिंब - लिंबे लिंबाला - लिंबांना**

याचप्रमाणे : कोकरू, वासरू, पाखरू, लेकरू, शिंगरू, पिलू / पिल्लू

**ऊ - आ** **कुंकू कुंकवाला**

याचप्रमाणे : अळू

**पण :** ते जू, ती जुवं = जुवाला, जुवांना

**ऊ - आ** **नाणे / नाणं - नाणी नाण्याला - नाण्यांना**

याचप्रमाणे : गाणे, तळे, केळे, कडे, जोडपे, भांडे, टाळे, डोके, फडके

### अकारान्त नपुं. (अ → आ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. पुस्तक | |
| हे बघ ना, पुस्तकाला पुस्तक कसं चिकटलं आहे. | हे बघ ना, पुस्तकाला पुस्तक कसं चिकटलं आहे. |
| घड्याळ | हे बघ ना, घड्याळाला घड्याळ कसं चिकटलं आहे. |
| पान | हे बघ ना, पानाला पान कसं चिकटलं आहे. |
| झाड | हे बघ ना, झाडाला झाड कसं चिकटलं आहे. |

### ईकारान्त नपुं. (ई → या)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. पाणी | |
| खबरदार, पाण्याला हात लावशील तर! | खबरदार, पाण्याला हात लावशील तर! |
| दही | खबरदार, दह्याला हात लावशील तर! |
| लोणी | खबरदार, लोण्याला हात लावशील तर! |

### ऊकारान्त नपुं. (ऊ → आ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. लिंबू | |
| या लिंबाचं काय करायचं? | या लिंबाचं काय करायचं? |
| कोकरू | या कोकराचं काय करायचं? |
| वासरू | या वासराचं काय करायचं? |
| पाखरू | या पाखराचं काय करायचं? |
| लेकरू | या लेकराचं काय करायचं? |

### ऊकारान्त नपुं. (ऊ → वा)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. कुंकू | |
| कुंकवावर पाणी पडलं. | कुंकवावर पाणी पडलं. |
| अळू | अळवावर पाणी पडलं. |
| गळू | गळवावर पाणी पडलं. |

### एकारान्त नपुं. (ए → ई)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. केळं | |
| हे बघ ना, केळ्याला केळं कसं चिकटलं आहे. | हे बघ ना, केळ्याला केळं कसं चिकटलं आहे. |
| नाणं | हे बघ ना, नाण्याला नाणं कसं चिकटलं आहे. |
| कडं | हे बघ ना, कड्याला कडं कसं चिकटलं आहे. |
| टाळं | हे बघ ना, टाळ्याला टाळं कसं चिकटलं आहे. |
| भांडं | हे बघ ना, भांड्याला भांडं कसं चिकटलं आहे. |

## सामान्यरूपे - नाम – स्त्रीलिंगी

## Oblique Forms – Nouns – Feminine

▶ अ॰पु॰ २४-२७

| | नाम | सामान्यरूप | सामान्यरूप + विभक्ती |
|---|---|---|---|
| अ – ई | भिंत – भिंती | भिंती-, भिंतीं- | भिंतीला – भिंतींना |
| अ – ए | बाग – बागा | बागे-, बागां- | बागेला – बागांना |
| आ – ए | भाषा – भाषा | भाषे-, भाषां- | भाषेला – भाषांना |
| ई – ई | संस्कृती – संस्कृती | संस्कृती-, संस्कृतीं- | संस्कृतीला – संस्कृतींना |
| ई – या | नदी – नद्या | नदी-, नद्या- | नदीला – नद्यांना |
| ऊ – ऊ | सासू – सासवा | सासू-, सासवा- | सासूला – सासवांना |
| ऊ – वे | जाऊ – जावा | जावे-, जावां- | जावेला – जावांना |
| ओ – ओ | बायको – बायका | बायको-, बायकां- | बायकोला – बायकांना |

**टीप :** एकारान्त स्त्रीलिंगी नामेच नसल्यामुळे त्यांची सामान्यरूपेही नाहीत.

### अ - ए
**बाग - बागा बागेला - बागांना**

याचप्रमाणे : घार, मगर, खार, गरज, रेघ, रांग, वाट, वेळ, नोट, झोप, मौज

**पण :** ती भीक, त्या भिकेला, भिकांना;

ती चूक, त्या चुका = चुकीला, चुकांना;

ती अक्कल, त्या अकला = अकलेला, अकलांना; याचप्रमाणे : चप्पल

### अ - ई
**भिंत - भिंती भिंतीला - भिंतींना**

याचप्रमाणे : ओळ, सतार, धूळ, इमारत, नात, भेट, चैन, दौड

**पण :** ती म्हैस, त्या म्हशी = म्हशीला, म्हशींना; याचप्रमाणे : हौस

### आ - ए
**भाषा - भाषा भाषेला - भाषांना**

याचप्रमाणे : दिशा, शाळा, शिक्षिका, जागा, परीक्षा, कथा, घंटा

### ई - या
**नदी - नद्या नदीला - नद्यांना**

याचप्रमाणे : बाहुली, टाचणी, सोसायटी, चिमणी, बासरी, मुंगी, राजधानी, ताई, साडी, गाडी, पेटी आजी, कैरी, माडी, खिडकी, बाटली, जिलबी

**पण :** ती बाई - त्या बाईला, त्या बाया / बायका - त्या बायांना / बायकांना

ती स्त्री, त्या स्त्रिया = स्त्रीला, स्त्रियांना

| ई - ई | संस्कृती - संस्कृती | संस्कृतीला - संस्कृतींना |
|---|---|---|

याचप्रमाणे : प्रवृत्ती, आवृत्ती, मूर्ती

| ऊ - ऊ | काकू - काकू | काकूला - काकूंना |
|---|---|---|

याचप्रमाणे : वाळू

| ऊ - वे | जाऊ - जावा | जावेला - जावांना |
|---|---|---|

**पण :** ती सासू, त्या सासवा = सासूला / सासवेला, सासवांना

| ओ - ओ | बायको - बायका | बायकोला - बायकांना |
|---|---|---|

याचप्रमाणे : मेट्रो

## पुणेरी पाट्या







### अकारान्त स्त्री॰ (अ → ई)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ घार | |
| घारीची पिल्ले तिची वाट पाहत होती. | घारीची पिल्ले तिची वाट पाहत होती. |
| मगर | मगरीची पिल्ले तिची वाट पाहत होती. |
| खार | खारीची पिल्ले तिची वाट पाहत होती. |

### अकारान्त स्त्री॰ (अ → ए)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ झोप | |
| झोपेवर बंधन असू नये. | झोपेवर बंधन असू नये. |
| वेळ | वेळेवर बंधन असू नये. |
| मौज | मौजेवर बंधन असू नये. |

सराव

### आकारान्त स्त्री॰ (आ → ए)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ शाळा | |
| शाळेचं नाव काढलं की मला भीतीच वाटते. | शाळेचं नाव काढलं की मला भीतीच वाटते. |
| भाषा | भाषेचं नाव काढलं की मला भीतीच वाटते. |
| घंटा | घंटेचं नाव काढलं की मला भीतीच वाटते. |
| परीक्षा | परीक्षेचं नाव काढलं की मला भीतीच वाटते. |

### ईकारान्त स्त्री॰ (ई → ई)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ संस्कृती | |
| संस्कृती जपली पाहिजें. | संस्कृती जपली पाहिजें. |
| मूर्ती | मूर्तीला जपले पाहिजे. |
| प्रकृती | प्रकृतीला जपले पाहिजे. |
| आवृत्ती | आवृत्तीला जपले पाहिजे. |

सराव

▶अ॰पु॰ २८-३७

### ईकारान्त स्त्री॰ (ई → या)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ चिमणी | |
| त्या चिमणीचा रंग छान आहे. | त्या चिमणीचा रंग छान आहे. |
| साडी | त्या साडीचा रंग छान आहे. |
| मुंगी | त्या मुंगीचा रंग छान आहे. |
| बाटली | त्या बाटलीचा रंग छान आहे. |

### ऊकारान्त स्त्री॰ (ऊ → ऊ)

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ काकू | |
| आता काय काकूला दोरीने बांधून ठेवू का? | आता काय काकूला दोरीने बांधून ठेवू का? |
| सासू | आता काय सासूला दोरीने बांधून ठेवू का? |
| वधू | आता काय वधूला दोरीने बांधून ठेवू का? |

## सामान्यरूपे पुल्लिंग

▶अ॰पु॰ ३८-३९

| | नाम | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| पु॰ (अ – आ) | कागद | कागदाला | कागदांना |
| पु॰ (आ – आ) | काका | काकाला | काकांना |
| पु॰ (आ – या) | फळा | फळ्याला | फळ्यांना |
| पु॰ (ई – ई) | कवी | कवीला | कवींना |
| पु॰ (ई – या) | माळी | माळ्याला | माळ्यांना |
| पु॰ (ऊ – ऊ) | चेंडू | चेंडूला | चेंडूंना |
| पु॰ (ऊ – वा) | भाऊ | भावाला | भावांना |
| पु॰ (ओ – ओ) | फोटो | फोटोला | फोटोंना |
| पु॰ (सा – शा) | ससा | सशाला | सशांना |
| **नपुंसकलिंग** | **नाम** | **एकवचन** | **अनेकवचन** |
| नपुं॰ (अ – आ) | नाव | नावाला | नावांना |
| नपुं॰ (ई – या) | मोती | मोत्याला | मोत्यांना |
| नपुं॰ (ऊ – आ) | लिंबू | लिंबाला | लिंबांना |
| नपुं॰ (ऊ – वा) | कुंकू | कुंकवाला | कुंकवांना |
| नपुं॰ (ए – या) | नाणे / नाणं | नाण्याला | नाण्यांना |
| **स्त्रीलिंग** | **नाम** | **एकवचन** | **अनेकवचन** |
| स्त्री॰ (अ – ई) | रात्र | रात्रीला | रात्रींना |
| स्त्री॰ (अ – ए) | बाग | बागेला | बागांना |
| स्त्री॰ (आ – ए) | भाषा | भाषेला | भाषांना |
| स्त्री॰ (ई – ई) | संस्कृती | संस्कृतीला | संस्कृतींना |
| स्त्री॰ (ई – या) | नदी | नदीला | नद्यांना |
| स्त्री॰ (ऊ – ऊ) | काकू | काकूला | काकूंना / काकवांना |
| स्त्री॰ (ऊ – वे) | जाऊ | जावेला | जावांना |
| स्त्री॰ (ओ – ओ) | बायको | बायकोला | बायकांना |
| ‘य’ या अक्षराने शेवट | गाय | गाईला / गायीला | गाईंना / गायींना |
| ‘स’ या अक्षराने शेवट | घूस | घुशीला | घुशींना |

**म्हणी आणि वाक्प्रचार**

शहाण्याला शब्दांचा मार
जिभेवर साखर पेरणे
जीभ चुरुचुरु चालणे
जिभेला हाड नसणे
जीभ टाळ्याला चिकटणे

**संभाषण करू या.**

तोडकेमोडके मराठी / जर्मन / इंग्रजी ... बोलणे
अस्खलित मराठी / जर्मन / इंग्रजी ... बोलणे
भाषेवर प्रभुत्व असणे
अनेक भाषा आत्मसात करणे
भाषेसोबतच संस्कृती जाणून घेणे
एखाद्या भाषेतील साहित्य वाचणे
नवीन भाषेसोबतच नवीन दृष्टिकोन निर्माण होणे
मैलामैलावर बदलत जाणारी भाषा

**च ची गंमत...**

**“ती सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडून विकत घेत आहे, या वाक्याच्या प्रत्येक शब्दाला ‘च’ जोडून वाक्याचा अर्थ कसा बदलतो ते पहा.**

बहीण – तीच सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडून विकत घेत आहे.
भाऊ – ती सोन्याचीच अंगठी मी त्या सोनाराकडून विकत घेत आहे.
आई – ती सोन्याची अंगठीच मी त्या सोनाराकडून विकत घेत आहे.
बाबा – ती सोन्याची अंगठी मीच त्या सोनाराकडून विकत घेत आहे.
आजी – ती सोन्याची अंगठी मी त्याच सोनाराकडून विकत घेत आहे.
आजोबा – ती सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडूनच विकत घेत आहे.
पणजी – ती सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडून विकतच घेत आहे.
पणजोबा – ती सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडून विकत घेतच आहे.
खापरपणजोबा – ती सोन्याची अंगठी मी त्या सोनाराकडून विकत घेत आहेच.

## १० साखळी खेळ खेळू या.

**१. एका विद्यार्थ्याने 'कारण' हा शब्द वापरून एक वाक्य सांगायचं, दुसऱ्या विद्यार्थ्याने उदाहरणात दाखवल्याप्रमाणे अजून एक कारण वाढवून सांगायचं, अशा तऱ्हेनं शब्दांची साखळी बनवायची व खेळ पुढे चालू ठेवायचा. खालील उदाहरणे पाहू या.**

उदा॰ परकीय भाषा शिकावी, कारण नवीन संस्कृतीची ओळख होते.

परकीय भाषा शिकावी, कारण नवीन संस्कृतीची आणि साहित्याची ओळख होते.

**२. एका विद्यार्थ्याने एक वाक्य सांगायचं, दुसऱ्या विद्यार्थ्याने त्या वाक्यामध्ये उदाहरणात दाखवल्याप्रमाणे अजून एका नवीन शब्दाची भर घालून तेच वाक्य पुन्हा सांगायचं, अशा तऱ्हेनं शब्दांची साखळी बनवायची व खेळ पुढे चालू ठेवायचा. खालील उदाहरणे पाहू या.**

उदा॰ मी मराठी शिकतो / ते आहे, मला एका पुस्तकाची गरज आहे.

मी मराठी शिकतो / ते आहे, मला एका पुस्तकाची आणि वहीची गरज आहे.

मी मराठी शिकतो / ते आहे, मला एका पुस्तकाची, वहीची आणि एका पेनाची गरज आहे.

**३. खालील मजकूर वाचू या आणि चित्रांचे वर्णन करू या.**

"आजी, आज आमच्या शाळेत ना गंमत झाली. एक कुणी तरी सर आले होते. त्यांनी आमचा वेगळाच गेम घेतला."

मल्हार आजीला गंमत सांगत असतानाच त्याच्या वर्गातली, शेजारीच राहणारी चार्वीही आली. दोघांनी एकदमच बोलायला सुरुवात केल्यावर आजी म्हणाली, "एकेकाने सांगा की!"

"मी आधी," मल्हार.

"आजी, त्या सरांनी वर्गामध्ये प्रत्येकाला जवळ बोलावून एकेक चित्र दाखवलं आणि त्याविषयी पटापट जास्तीत जास्त वाक्यं बोलायला सांगितली."

"मला ना स्टेशनचं चित्र दाखवलं," मल्हारचं वाक्य तोडून चार्वी मध्येच म्हणाली.

"आधी मी," मल्हारनं तिला अडवलं, "आजी, मला ना, चौपाटीवरच्या सनसेटचं मस्त पिक्चर दाखवलं. पण या गेमची एक अट होती. संपूर्ण चित्राबद्दल जे काही बोलायचंय ते फक्त आपल्या मातृभाषेतूनच म्हणजे आपल्या मराठीतूनच बोलायचं. हिंदी किंवा इंग्लिश शब्द वापरला तर आऊट."

"अरे वा! म्हणजे खूपच वेगळा गेम घेतला सरांनी," आजी म्हणाली.

चला तर, आता आपणही प्रयत्न करू या.

क. 

ख. 

च. 

घ. 

ग. 

**४. साखळी खेळ.**

शेकोटीचे गाणे म्हणू या. शेकोटीला कोणीही आणि काहीही येऊ शकते, जसे : दादा, मामी, कुत्रा, झाड. प्रत्येक विद्यार्थ्याने एक नवीन नाम घेऊन साखळी वाढवत न्यायची. जो चुकेल तो खेळातून बाहेर पडेल. बघू कोणाची स्मरणशक्ती किती चांगली आहे.

मालाडचा म्हातारा शेकोटीला आला, मालाडचा म्हातारा, म्हाताऱ्याची बायको शेकोटीला आले, मालाडचा म्हातारा, म्हाताऱ्याची बायको, बायकोचा भाऊ शेकोटीला आले, ...



**११ चला, मीनाच्या कोणत्या गोष्टी कुठे आहेत ते शोधू या.**



### शब्दसंपदा

### ६.१ नाम : वर्गात

| | | |
|---|---|---|
| तो विचार, ते - | ती भाषा, त्या - | ते वृत्तपत्र, ती वृत्तपत्रे / ती वृत्तपत्रं |
| तो शब्दकोश, ते - | ती परीक्षा, त्या - | ते पत्र, ती पत्रे / ती पत्रं |
| तो लेख, ते - | ती उजळणी, त्या उजळण्या | ते वाचन |
| तो पाठ, ते - | ती मेहनत, त्या मेहनती | ते कोडे / ते कोडं, ती कोडी |
| तो धडा, ते धडे | ती वही, त्या वह्या | ते पान, ती पाने / ती पानं |
| तो संवाद, ते - | ती ओळ, त्या ओळी | ते वाक्य, ती वाक्ये / वाक्यं |
| तो पेपर, ते - | ती रेघ, त्या रेघा | ते अक्षर, ती अक्षरे / ती अक्षरं |
| तो प्रश्न, ते - | ती चूक, त्या चुका | ते उत्तर, ती उत्तरे / ती उत्तरं |
| तो शब्द, ते - | ती पेन्सिल, त्या पेन्सिली | ते पेन, ती पेने / ती पेनं |
| तो अभ्यास | ती पट्टी, त्या पट्ट्या | ते गणित, ती गणिते / ती गणितं |
| तो कागद, ते - | ती फी, त्या फिया | ते दप्तर, ती दप्तरे/ ती दप्तरं |
| तो सराव, ते - | ती झोळी, त्या झोळ्या | ते कव्हर, ती कव्हरे / ती कव्हरं |
| तो उच्चार, ते - | ती खुर्ची, त्या खुर्च्या | ते खोडरबर |
| तो अंक, ते - | | ते टोकयंत्र, ती टोकयंत्रे / ती टोकयंत्रं |
| तो आकडा, ते आकडे | | ते कपाट, ती कपाटे / ती कपाटं |
| तो उतारा, ते उतारे | | ते टेबल, ती टेबले / ती टेबलं |
| तो क्रमांक, ते - | | ते काम, ती कामे / ती कामं |
| तो फळा, ते फळे | | ते नाव, ती नावे / ती नावं |
| तो वर्ग, ते - | | |
| तो खेळ, ते - | | |
| तो पत्ता, ते पत्ते | | |
| तो निरोप, ते - | | |
| तो ई-मेल, ते - | | |
| तो अर्ज, ते - | | |
| तो निकाल, ते - | | |
| तो गोंगाट | | |

६.२ नाम : व्याकरण

| | | |
|---|---|---|
| तो वाक्प्रचार, ते - | ती म्हण, त्या म्हणी | ते क्रियापद, ती क्रियापदे / ती क्रियापदं |
| तो काळ, ते - | | ते विशेषण, ती विशेषणे / ती विशेषणं |
| तो धातू, ते - | | ते सर्वनाम, ती सर्वनामे / ती सर्वनामं |
| | | ते सामान्यनाम, ती सामान्यनामे / ती सामान्यनामं |
| | | ते लिंग, ती लिंगे / ती लिंगं |
| | | ते वचन, ती वचने / ती वचनं |

## चिंटू







चिंटू, तू ना स्मार्ट आहेस. छान विनोद सांगतोस.
सगळ्यांना मदतही करतोस.
तू माझा उत्तम मित्र आहेस. खरं तर सगळ्यांचाच !
फक्त तू मिनीशी भांडणं सोड.
या शेवटच्या वाक्यासाठी आधीची किती वाक्य खर्ची घातलीस !
© चारुहास पंडित


चिंटू, माझा चष्मा दे रे आतनं आणून.
आणि येताना लावू नकोस.
का ?
कळलं !
© चारुहास पंडित


मला जाम टेन्शन आलंय.
परीक्षेच्या अभ्यासाचं ना ?
नाही. आपल्या क्रिकेट टीमच्या पाकिस्तान दौऱ्याचं !
© चारुहास पंडित

## दृष्टिक्षेप

**नाम**

| | | |
|---|---|---|
| तो शब्दकोश, ते - | ती बहुभाषिकता | ते साहित्य |
| तो संग्रह, ते - | ती कंपनी, त्या कंपन्या | ते विद्यापीठ, ती विद्यापीठे / विद्यापीठं |
| तो भाषातज्ज्ञ, ते - | ती परिस्थिती, त्या - | ते भविष्य, ती भविष्ये / भविष्यं |
| तो भाषांतरकार, ते - | ती संधी, त्या - | ते प्रभुत्व |
| तो दुभाष्या, ते दुभाषी | ती मेहनत, त्या मेहनती | ते मरण, ती मरणे / मरणं |
| तो प्रदेश, ते - | ती जिद्द, त्या जिद्दी | ते वर्णन, ती वर्णने / वर्णनं |
| तो गट, ते - | ती चिकाटी | ते रूप, ती रूपे / रूपं |
| तो परग्रहवासी, ते - | ती जागरूकता | |
| तो विभाग, ते - | ती कल्पकता | |
| तो योगायोग, ते - | ती शाबासकी, त्या शाबासक्या | |
| तो परिणाम, ते - | ती हवाईसुंदरी, त्या हवाईसुंदऱ्या | |
| तो जीव, ते - | | |

| क्रियापद | विशेषणे | इतर शब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| भटकणे | परकीय | आत्मसात | सतत |
| पकडणे | नवीन | अळीमिळी | अचानक |
| बोलावणे | पारंगत | | केवळ |
| विचारणे | संवादात्मक | | मुसुमुसु |
| साधणे | मृत | | |
| वाढवणे | नष्ट | | |
| भरवणे | वेडेपिसे | | |

## आता मला हे येतं ...

**भाषेबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**इच्छा व्यक्त करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कारण आणि परिणाम सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : का**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**संयुक्त वाक्ये : कारण, त्यामुळे, म्हणून**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सामान्य नामांची सामान्यरूपे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**‘च’ चा वापर**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# दैनंदिन व्यवहार

७




## चला, शिकू या...

◎ रोजच्या घडामोडींवर संभाषण करणे

◎ व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे यांबद्दल बोलणे

◎ द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती

◎ प्रश्नशब्द : कोणाला

◎ विशेषनामांची सामान्यरूपे

◎ विकारी विशेषणांची सामान्यरूपे

◎ विध्यर्थ - असणे आणि नसणे

# ७ दैनंदिन व्यवहार

## १ नव्याची नवलाई

▶अ॰पु॰ १

**१. नवी शाळा**

वडील : नवी शाळा कशी वाटते?
मधू : कधी कधी चांगली वाटते.
वडील : कधी चांगली वाटते?
मधू : शाळेला सुट्टी असल्यावर.



**२. नवी नोकरी**

वडील : नवी नोकरी कशी वाटते?
मधू : कधी कधी चांगली वाटते.
वडील : कधी चांगली वाटते?
मधू : ऑफिसला सुट्टी असल्यावर.




**वरीलप्रमाणे संवाद लिहू या.**

१. नवं काम
२. नवा व्यवसाय
३. नवं कार्यालय / ऑफिस

सराव

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ नवं काम कसं वाटतं? | |
| सुट्टी असल्यावर चांगलं वाटतं. | सुट्टी असल्यावर चांगलं वाटतं. |
| बॉस नसल्यावर | बॉस नसल्यावर चांगलं वाटतं. |
| काम संपल्यावर | काम संपल्यावर चांगलं वाटतं. |
| खूप प्रगती झाल्यावर | खूप प्रगती झाल्यावर चांगलं वाटतं. |
| खूप पगार मिळाल्यावर | खूप पगार मिळाल्यावर चांगलं वाटतं. |
| खूप पैसा मिळाल्यावर | खूप पैसा मिळाल्यावर चांगलं वाटतं. |
| सुट्टी असल्यावर | सुट्टी असल्यावर चांगलं वाटतं. |
| बॉस नसल्यावर | बॉस नसल्यावर चांगलं वाटतं. |




२ **कोणाला काय आवडेल आणि कोण काय करेल हे कोण सांगणार?**
**आपापल्या कामाच्या जागी किंवा मोकळ्या वेळात घरी कोण काय करतंय ते बघू या आणि खालील तक्ता वाचून योग्य तो शब्द भरू या!**

▶ अ.पु. २

**• बुद्धिबळ • मालिका • दूध • अक्षर • कपडे • मोजा • घड्याळ • मेणबत्ती • खिळा • चित्र • चित्रपट • भाजी • झाकण • वर्तमानपत्र**

| | | |
|---|---|---|
| शीला मालिका पाहते. | आशुतोष .................... खेळतो. | चारू .................... लावते. |
| अनिकेत .................... आणतो. | मानसी .................... लिहिते. | तो मोजा काढतो. |
| कृत्तिका .................... घालते. | मुली .................... काढतात. | प्रांजली .................... ठेवते. |
| सुतार .................... ठोकतो. | शिंपी .................... शिवतो. | राज्वी .................... बघते. |
| गिरिशा .................... चिरते. | | श्रुती .................... वाचते. |




कर्ता ↓ तू — कर्म ↓ फोटो काढतोस.

कर्ता ↓ मी — कर्म ↓ तो पाहते.

**४** **तक्ता पूर्ण करू या.**

| | | कर्ता | कर्म |
|---|---|---|---|
| १. | तू कविता लिहितोस. मी ती वाचते. | | |
| २. | तू पत्र पाठवतोस. मी ते जपून ठेवते. | | |
| ३. | तू चॉकलेटे पाठवतोस. मी ती आवडीने खाते. | | |

| कर्म (नाम) | कर्म (सर्वनाम) |
|---|---|
| फोटो | तो |
| कविता | ती |
| फूल | ते |
| चॉकलेटे | ती |





**५** **तुम्ही कोणता खेळ खेळता? खेळायला जाताना तुम्ही काय काय सोबत नेता / नेत नाही?**

अ.पु. ३-४

मी पोहते. मी एक टोपी आणि माझा पोशाख नेते.

मी सायकल चालवतो. मी टोपी नेतो पण पोशाख नेत नाही.



मी क्रिकेट खेळतो. मीपण टोपी आणि माझा पोशाख नेतो. मी बॅट आणि बॉल नेतो.

मी ...





**सुबोध :** अरे अनिकेत, तू आशुतोषला ओळखतोस का? मी त्याला ओळखत नाही. फेसबुकवर आहे का तो?

**अनिकेत :** आशुतोष नं? हो, मी ओळखतो त्याला. तो हुशार आहे. तो बुद्धिबळ खेळतो. आपण त्याला फेसबुकवर शोधू या.

| एकवचन |
|---|
| शब्दाचे सामान्यरूप + ला |

## ६ समजतंय का? चला तर, बघू या!

▶अ.पु. ५


रोहन मित्राला बोलावतो.



रोहन मैत्रिणीला बोलावतो.



रोहन मुलाला बोलावतो.



रोहन मित्रांना बोलावतो.


रोहन मैत्रिणींना बोलावतो.


रोहन मुलांना बोलावतो.

थोडक्यात

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| सामान्यरूप + ला | सामान्यरूप + ं + ना |

टीप :

काही वेळा '-ला' हा विभक्तिप्रत्यय न लावतासुद्धा वाक्यरचना करता येते.

| उदा. | पण, |
|---|---|
| मी मांजर रानात सोडले. | मी नोकरी सोडली. – बरोबर |
| मी मांजराला रानात सोडले. | मी नोकरीला सोडले. – चूक. |

**सामान्यरूपे - विशेषनामे**

**Oblique Forms - Proper Nouns**

| | | | |
|---|---|---|---|
| **विशेषनामे** | | | |
| अकारान्त पु॰ | संजय | संजयला | - |
| आकारान्त पु॰ | ब्रह्मा | ब्रह्म्याला | - |
| ईकारान्त पु॰ | रवी | रवीला | - |
| ऊकारान्त पु॰ | गुरू | गुरूला | - |
| एकारान्त पु॰ | पेले | पेलेला | - |
| ओकारान्त पु॰ | खजुराहो | खजुराहोला | - |
| अकारान्त नपुं॰ | महाराष्ट्र | महाराष्ट्राला | - |
| ऊकारान्त नपुं॰ | पेरू | पेरूला | - |
| एकारान्त नपुं॰ | काळे | काळ्याला | काळ्यांना |
| | आपटे | आपट्याला | आपट्यांना |
| अकारान्त स्त्री॰ | मेहेर | मेहेरला | - |
| आकारान्त स्त्री॰ | सीमा | सीमाला | - |
| ईकारान्त स्त्री॰ | मराठी | मराठीला | |
| **पौराणिक नामे** | | | |
| अकारान्त पु॰ | शंकर | शंकराला | - |
| ईकारान्त पु॰ | शनी | शनीला | - |
| ऊकारान्त पु॰ | पांडू | पांडूला | - |
| आकारान्त स्त्री॰ | सीता | सीतेला | |
| इकारान्त स्त्री॰ | द्रौपदी | द्रौपदीला | - |

### सामान्यरूपे - विशेषनामे

| | पुल्लिंगी नाम - सामान्यरूप | स्त्रीलिंगी नाम - सामान्यरूप |
|---|---|---|
| काहीही बदल नाही. ☒ | संजय - संजयला | मेहेर - मेहेरला |
| | शंकर - शंकरला | - |
| | चीन - चीनला | - |
| | हिंदुस्थान - हिंदुस्थानला / हिंदुस्थानाला | सीमा - सीमाला |
| | पाकिस्तान - पाकिस्तानला / पाकिस्तानाला | राधा - राधाला |
| | कोरिया - कोरियाला | भारती - भारतीला |
| | शिवबा - शिवबाला | इंदू - इंदूला |
| | मोती - मोतीला | |
| | गुरू - गुरूला | |

| | | अनौपचारिक | औपचारिक |
|---|---|---|---|
| बदल होतो | कलमकर | कलमकरला | कलमकरांना |
| आडनावे | परांजपे | परांजप्याला | परांजप्यांना |
| | पै | पैला | पैंना |
| पण अ – आ | भारत - भारताला | | |
| | हिमालय - हिमालयाला | | |
| | अमेरिका - अमेरिकेला | | |
| पौराणिक / ऐतिहासिक | शंकर - शंकराला | | |
| | राधा - राधेला | | |
| | सीता - सीतेला | | |

### सामान्यरूपे - विशेषनामे - नपुंसकलिंगी **Oblique Forms - Proper Nouns - Neuter**

| | नाम - सामान्यरूप | सप्तमी |
|---|---|---|
| काहीही बदल नाही. ☒ | श्रीनगर - श्रीनगरला | श्रीनगरात |
| | नागपूर - नागपूरला | नागपुरात |
| | उटी - उटीला | उटीत |
| | खजुराहो - खजुराहोला | खजुराहोत |

**टीप :** अहमदाबाद - अहमदाबादेला
सुरत - सुरतेला, चेन्नई - चेन्नईला, मुंबई - मुंबईला, दिल्ली - दिल्लीला
**पण** महाराष्ट्र - महाराष्ट्राला

## मराठीत आलेले इंग्रजी शब्द

**टीप :** काही इंग्रजी शब्दांची सामान्यरूपे होतात तर काहींची होत नाहीत. खूप रुळलेल्या इंग्रजी शब्दांची मराठी नामांच्या नियमाप्रमाणेच सामान्यरूपे केली जातात. पण त्याला काहीही ठोस नियम नाही.

उदा.

तो फोन - फोनला - फोनना (याचप्रमाणे : तो मोबाईल, तो बसस्टॉप, तो टायर, ती ट्रेन, ती बस, ती लाईट, ते नेलपेंट)

तो पेपर - पेपराला - पेपरांना (याचप्रमाणे : ते पोस्ट, ते पेन)

तो डॉक्टर - डॉक्टरला - डॉक्टरांना (याचप्रमाणे : तो बिल्डर)

ती बॅग - बॅगेला - बॅगांना (याचप्रमाणे : ती बँक, ती पिन)

ती पेन्सिल - पेन्सिलीला - पेन्सिलींना (याचप्रमाणे : रीफिल, वायर)

### ७ खालील शब्द 'ला' आणि 'ना' हे प्रत्यय जोडून लिहू या.

मांजर बाळ चोर आजी बाबा माकड साप
कुत्रा आई बुद्धिबळ पुस्तक शब्द पाटी
वाघ मित्र मामा आजोबा मालिका अनुज आशुतोष

| | ला | ना |
|---|---|---|
| उदा. मांजर | मांजराला | मांजरांना |
| .................................... | .................................... | .................................... |
| .................................... | .................................... | .................................... |
| .................................... | .................................... | .................................... |
| .................................... | .................................... | .................................... |
| .................................... | .................................... | .................................... |

## ८ आपण यांना शिकवता का?

(मामा)

(माकड)
हो, मी
माकडाला शिकवते.

(बाबा)

(ससा)

(मांजर)

(कुत्रा)

(साप)

(आजोबा)

(आजी)

(वाघ)

(बाळ)

(मित्र)

# ७ दैनंदिन व्यवहार

## चतुर्थी विभक्ती
## Dative case

**माझा आवडता सण दिवाळी**

- “ए, तुझा आवडता सण कुठला?”

◊ “माझा आवडता सण दिवाळी. मज्जा येते. आई फराळ करते. फराळ म्हणजे करंज्या, चकल्या, लाडू, शंकरपाळे, अनारसे आणि बरंच काही.”

- “मस्त. आणि काय काय करता?”

◊ “आई मला नवीन कपडे घेते. बाबा मला फटाके आणतात. मी दादाला भेटवस्तू देतो. मी आई आणि बाबांसाठी एक शुभेच्छापत्र बनवतो.”

- “अरे वा!”

**आई मला नवीन कपडे घेते.**

| कर्ता-कारक | संप्रदान-कारक | कर्म-कारक |
|---|---|---|
| (प्रथमा) | (चतुर्थी) | (द्वितीया) |
| Nominative | Dative | Accusative |





### ९ तक्ता पूर्ण करू या.

| | | कर्ता-कारक | कर्म-कारक | संप्रदान-कारक |
|---|---|---|---|---|
| १ | बाबा मला फटाके आणतात. | .................... | .................... | .................... |
| २ | मी दादाला भेटवस्तू देतो. | .................... | .................... | .................... |
| ३ | मी आईला आणि बाबांना एक शुभेच्छापत्र करून देतो. | .................... | .................... | .................... |

१. उदाहरणांप्रमाणे पुढील तक्ते पूर्ण करू या.

अ॰पु॰ ५-६

| | |
|---|---|
| वही | उदा॰ मेघना वही शोधते. |
| कागद | |
| फणी | |
| पुस्तक | |
| फोन | |
| वर्ग | |

| | |
|---|---|
| अनुज | उदा॰ मिहीर अनुजला पकडतो. |
| महेश | |
| आदित्य | |
| अजित | |
| सोनल | |
| मेघा | |

| | |
|---|---|
| मामा | उदा॰ राजू मामाला बोलावतो. |
| दादा | |
| काका | |
| आई | |
| मामी | |
| आजी | |

| | |
|---|---|
| मित्र (अ॰व॰) | उदा॰ आम्ही मित्रांना विचारतो. |
| मुले | |
| भावंडे | |
| मैत्रिणी | |
| बहिणी | |
| शिक्षक (अ॰व॰) | |

| | |
|---|---|
| विद्यार्थी (अ॰व॰) | उदा॰ दिव्या विद्यार्थ्यांना शिकवते. |
| भाऊ | |
| सहकारी (अ॰व॰) | |
| आजी | |
| जाऊ | |
| कुत्रे | |

| | |
|---|---|
| भिंत | उदा॰ भिंतीला रंग दिला आहे. |
| वर्ग | |
| घर | |
| मूर्ती | |
| भांडे | |
| रस्ता | |

## १० वाक्ये बनवू या.

उदा॰ पोलीस . चोर . पकडणे - पोलीस चोराला पकडतात. पोलीस चोरांना पकडतात.

१. शिक्षक . विद्यार्थी . शिकवणे ..................

२. पालक . मुले . वाढवणे ..................

३. आई . बाळ . भरवणे ..................

४. आम्ही . ते . ओळखणे ..................

५. ती . बहीण . गोष्ट  सांगणे ..................

## ११ द्वितीया व चतुर्थीतील शब्द अधोरेखित करू या.

आम्ही सर्व जण घरी मराठी मालिका बघतो. 'उंच माझा झोका' ही मालिका आईला खूप आवडते. त्यात माधव रमेस सांगतो, "रमा, 'अ' हे अक्षर लिही." मग रमा पाटी आणते. ती 'अ' लिहिते. माधव रमेस शाबासकी देतो.




कमी वापर

| एकवचन |
|---|
| सामान्यरूप + स |

## १२ कोण - कुठे - काय काम करतो?

**१. जोड्या लावू या.**

| | | कोण | कुठे | काय |
|---|---|---|---|---|
| क. |  | खलाशी | पोलिस ठाणे | प्रवाशांची ने-आण करणे |
| ख. |  | हवालदार | नाटक कंपनी | चोरांना पकडणे |
| ग. |  | डिस्क जॉकी | रेल्वे स्थानक | आवडीची गाणी ऐकवणे |
| घ. |  | आगगाडी चालक | जहाज | मनोरंजन करणे |
| च. |  | नट / नटी | नाईट क्लब | सागरी वाहतुकीशी संबधित कामे |

**२. ओळखून लिहू या.**

शेतकरी, डॉक्टर, तंत्रज्ञ, सुतार, कुंभार, शिक्षक / शिक्षिका, वैमानिक, गवंडी



..............................................



..............................................



..............................................



..............................................




..............................................



..............................................



..............................................



..............................................

**३. कोण होणार मी?**



**स्वीटी :** मला ना, मोठी झाले की आई व्हायचंय.



**चिराग :** मी बाबा मोठा झालो की पोलिस होणार.



**मिहीका :** मी होणार माझ्या वहिनीसारखी डॉक्टर.



तू रे मिहीर, तू का गप्प? तू काय होणार?

मी अमिताभ बच्चन होणारे!

१३ **लहानपणीची स्वप्ने मोठेपणी खरी होतातच असे नाही. कधीकधी तर ती बदलतातच. नवे व्यवसाय, नवी क्षितिजे खुणावू लागली की मुलांना विचार पडतो, आता काय निवडू? पाहू या, काही नवी कार्यक्षेत्रे. वाचू या आणि विचार करू या. नंतर खालील तक्ता भरू या.**

**१. परकीय भाषा आणि करिअर**

आजच्या 'ग्लोबलाइज्ड' जगात सगळेच देश एकमेकांच्या खूप जवळ आले आहेत. अनेक संस्थांच्या आणि कंपन्यांच्या शाखा जगभर आहेत. आणि म्हणूनच कमीत कमी एक परकीय भाषा तरी येत असणे आवश्यक झाले आहे. भारतामध्ये इंग्रजीसोबत जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इटालिअन तसेच चिनी, जपानी आणि कोरिअन या भाषांना महत्त्व प्राप्त झाले आहे. या भाषा शाळा, विद्यापीठे यांखेरीज त्या त्या देशांच्या ठरावीक संस्थांमध्येदेखील शिकता येतात. उदाहरणार्थ जर्मन भाषा ग्योथं इन्स्टिट्यूट तर फ्रेंच भाषा आलियाँस फ्राँसेज या संस्थेत शिकता येते. या भाषांमध्ये प्रमाणपत्र, पदविका, पदवी किंवा उच्च पातळ्यांचे प्रशिक्षण घेऊन करिअरच्या खूप नवीन संधी मिळतात. या भाषा शिकून आपण त्या शिकवू शकतो त्याचप्रमाणे भाषांतराच्या क्षेत्रात आपले करिअर करू शकतो. तसेच या देशांतील विविध कंपन्यांमध्ये किंवा त्या त्या देशांच्या दूतावासांत काम करू शकतो. याशिवाय व्हॉईस ओव्हर आणि प्रूफरीडींग यासारख्या वेगळ्या वाटा आपण निवडू शकतो.

**२. टीव्ही उद्योगात करिअर करायचंय?**

टीव्ही इंडस्ट्रीमध्ये वेगवेगळया करिअरच्या निवडीच्या संधी आहेत. उदा. संकलन, दिग्दर्शन, छायाचित्रण इत्यादी. या क्षेत्रांशी संबंधित प्रशिक्षण घेतलेल्या कोणालाही या क्षेत्रात प्रवेश मिळू शकतो. या इंडस्ट्रीत करिअर करायचं असेल तर फिल्म आणि टेलिव्हिजनमधले सर्टिफिकेट किंवा डिप्लोमा कोर्स तुम्ही करू शकता. त्याद्वारे या क्षेत्राचे तांत्रिक पैलू जाणून घ्या. हे क्षेत्र कितीही आकर्षक दिसत असलं, तरी त्यात प्रचंड प्रमाणात स्पर्धा आहे. तुमची कष्टाची तयारी असावीच लागते. तुमच्याकडे चांगली कल्पनाशक्ती असावी लागते आणि जरूर पडल्यास धोका पत्करण्याची तयारीही असावी लागते.

| कार्यक्षेत्र / व्यवसाय | आवश्यक प्रशिक्षण | नोकरीच्या संधी |
|---|---|---|
| | | |
| | | |



१४ **पाहिजे! पाहिजे!! पाहिजे!!!**

**खालील जाहिराती वाचू या आणि त्यापुढे दिलेल्या उमेदवारांपैकी कोणत्या कामासाठी कोण योग्य आहे हे सांगू या.**

**१. पाहिजे - मुंबईस्थित खाजगी कंपनीसाठी**

लघुलिपिक व सचिव (शक्यतो अविवाहित महिला)

अर्जदाराकडून अपेक्षा - उत्कृष्ट संवादकौशल्ये, स्वयंप्रेरित, हुशार, स्वतंत्रपणे काम करण्याची इच्छा. इतर कौशल्ये - हॉटेल आरक्षण, तिकीट व्यवहार इ. स्वतंत्रपणे सांभाळणे

शिक्षण - कोणतीही पदवी, लघुलेखनाचा डिप्लोमा

पगार - शैक्षणिक पात्रता आणि अनुभवावर अवलंबून

४/५ वर्षांचा अनुभव आवश्यक

फोटोसकट अर्ज पाठवावा

ई-पत्ता - abcde@--- पत्ता - अबकड, पहिली गल्ली, वांद्रे पूर्व, मुंबई

**२. आधुनिक फर्निचर कंपनी**

फर्निचर कंपनीत तातडीने नेमणे आहे

कुशल सुतार

अपेक्षा - सुतारकामातील सरकारी पदविका अथवा १० वर्षांचा सुतारकामाचा अनुभव. मशीनवर सुतारकाम करण्याचा अनुभवही अपेक्षित. कामाचे स्वरूप - हाताखालील १५ नवीन उमेदवारांकडून काम करून घेणे, स्वतः बरोबरीने काम करणे, ऑर्डर वेळेवर पूर्ण करून घेणे. गोदामातील लाकूड आणि इतर मालाची जरूरीप्रमाणे व्यवस्था बघणे.

पगार - कौशल्य आणि अनुभवावर अवलंबून.

मुलाखतीसाठी आजपासून कधीही १०.०० ते १७.०० या वेळात आपले दाखले आणि एक फोटो घेऊन यावे. पत्ता - आधुनिक फर्निचर, बहावा मार्ग, नवी पेठ, पुणे.

**३. पाहिजे - सोबती**

वृद्ध दांपत्याला पुरुष अथवा महिला सोबती पाहिजे.

अपेक्षा -

वय ४० च्या आसपास, सुदृढ प्रकृती, निदान १०वी पास. २४ तास राहण्याची तयारी

कामे - सकाळी आणि दुपारी चहा करून देणे, वर्तमानपत्र वाचून दाखवणे, फोन घेणे, फिरायला जाताना सोबत करणे, वेळोवेळी ठरल्याप्रमाणे औषधे देणे वगैरे.

गरजूंनी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान फोन करावा.

**४. सांगलीमधील प्रतिष्ठित माध्यमिक शाळेसाठी शिक्षक पाहिजेत.**
सर्व विषय, बी.ए., बी.एड. अथवा अधिक शैक्षणिक पात्रता.
किमान ४ वर्षांचा अनुभव. शाळेतील वसतिगृहात राहण्याची सोय होऊ शकते.
नवीन शैक्षणिक वर्षापासून कामाचा आरंभ. फोटोसहित अर्ज पाठवावा.
पगार - शैक्षणिक पात्रता आणि अनुभवावर अवलंबून.
मुखाध्यापक, परमविद्या मंदिर, सांगली ४.३

**उमेदवार :**

क. विमलताई बने, वय ३८, शिक्षण ६ वी नापास, विनापत्य विधवा, सुदृढ.

ख. पीटर मेन्डोन्का, वय ४२, अविवाहित, शिक्षण ११वी, कुस्तीवीर.

ग. महिपती जनार्दन, वय ३०, गेली १२ वर्षे होम डिझाइन कंपनीत बैठकीच्या खोलीपासून स्वयंपाक घरापर्यंत सर्व प्रकारचे फर्निचर बनवायचा अनुभव.

घ. अमित रांजणगावकर - वय ३१, शास्त्र आणि गणित विषय घेऊन बी.एस्सी., बी.एड. गेली ५ वर्षे मुंबईत खाजगी शिकवण्या घेण्याचा अनुभव.

च. ऋजुता दळवी, वय २९, कलाशाखेतली पदवी, लघुलेखनाचा डिप्लोमा, ५ वर्षांचा प्रवासी कंपनीत कामाचा अनुभव.

छ. गगनबिहारी यादव, वय ४५, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून पदविका, घरीच चित्रकलेचे वर्ग घेतात, अंतर्गत सजावटीची आवड.

| जाहिरात | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| उदा. जाहिरात १. | ऋजुता दळवी |
| | |
| | |
| | |

**१५ खालील चौकटीत चांगल्या मुलाखतीसाठी आवश्यक असण्याऱ्या काही गोष्टींची यादी आहे. यातील एक मुद्दा निवडून त्यावर आपली मते सांगू या.**

| | | |
|---|---|---|
| कपडे | अनुभव | आत्मविश्वास |
| मी या कंपनीसाठी काय करू शकतो याचा विचार | | प्रमाणपत्रे |
| कंपनीची माहिती | मुलाखत घेणाऱ्याचे पद आणि इतर माहिती | |
| कंपनीने मलाच का निवडावे याची कारणे | | देहबोली |
| इतर कौशल्ये | दाखले / बूट | आधीची नोकरी सोडण्याची कारणे |

उदा॰ मुलाखतीच्या वेळी चांगले / योग्य कपडे घालणे / महत्त्वाचे / जरुरीचे / आवश्यक आहे, कारण...

तुम्ही हे मुद्दे वापरू शकता -
प्रभाव पडणे, चांगले मत होणे, व्यवस्थित दिसणे, तणाव-रहित वाटणे, चिंता न वाटणे, हालचालीला मर्यादा न येणे, दडपण न येणे, सहजता असणे, आत्मविश्वास वाटणे, या नोकरीत खरोखरच रस आहे हे दाखविणे, हुशारी / चुणचुणीतपणा दिसून येणे, व्यक्तिमत्त्व बहुआयामी आहे हे कळून येणे.

**१६ मुलाखत**

**१. तुमच्या मते मुलाखतीच्या वेळी पुढीलपैकी कोणत्या गोष्टी व्हाव्यात, किंवा होऊ नयेत, किंवा झाल्या तर चालतील? विधानासमोरील मोकळ्या जागेत 'हो', 'नाही' किंवा 'चालेल' असे लिहू या.**

क. दाखले ठेवलेली बॅग हरवणे ..........

ख. मुलाखत घेणारा ओळखीचा निघणे ..........

ग. मैत्रिणीचा फोन येणे ..........

घ. मुलाखतीच्या जागी वेळेआधी पोचणे ..........

च. वाटेत चिखल उडून कपडे घाण होणे ..........

छ. आत्मविश्वासाने बोलणे ..........

ज. मुलाखतीला उशिरा पोचणे ..........

झ. सध्या काम करताय तिथला सहकारीसुद्धा मुलाखतीला आलेला असणे ..........

ट. सध्याचाच बॉस इथे मुलाखत घेत असणे ..........

**२. आता तुम्ही निवडलेल्या पर्यायांवर आपण चर्चा करू या.**

**३. नोकरीसाठी मुलाखत द्यायला जाता तेव्हा तुम्हाला मुलाखत घेणाऱ्याकडून कोणत्या प्रश्नांची अपेक्षा असते? चला, काही अपेक्षित प्रश्नांची यादी करू या.**

उदा॰ आपलं नाव?...

आता या प्रश्नांची संभाव्य उत्तरे आपल्याला देता येतात का ते पाहू.

**४. एक खरीखुरी मुलाखत वाचू या. पण झालंय काय, की त्यातील प्रश्न आणि उत्तरं उलटसुलट झाली आहेत. ही सर्व प्रश्नोत्तरं बरोबर क्रमात लावायची आहेत. तर चला, कामाला लागू या.**

**मुलाखतकार -**

क. तुमचा रेझ्युमे दाखवता का?

ख. मग त्यानंतर बी॰एड॰ कुठून केलंत?

ग. छान. तुम्हाला एकूण १५ वर्षांचा शिकवण्याचा अनुभव आहे. कुठे कुठे नोकरी केलीत तुम्ही?

घ. स्वतःविषयी थोडक्यात माहिती द्याल का?

च. तुमचं कॉलेज तर मुंबईचं दिसतंय!

छ. काय काय शिकवलंत?

ज. इतर कोणते विषय तुम्ही शिकवू शकाल?

झ. फारच छान. शिक्षक म्हणून तुमची स्वतःची बलस्थानं कोणती आहेत असं तुम्हाला वाटतं?

ट. आणि आपण कुठे कमी पडतो असं तुम्हाला वाटतं?

ठ. ठीक आहे. सरकारी नियमांप्रमाणेच आम्ही पगार आणि इतर सवलती देतो.

ड. तुम्हाला काही इतर प्रश्न विचारायचे आहेत का?

ढ. तुमच्याशी बोलून छान वाटलं. साधारण एका आठवडयात तुम्हाला आमचा निर्णय कळवूच.

त. नमस्कार.

थ. नमस्कार. बसा. आपलं नाव?

**अर्जदार -**

१. हो, मी मूळचा मालवणचा. माझं प्राथमिक शिक्षण तिथेच झालं.

२. हो, ही घ्या फाईल. यात माझा रेझ्युमे आणि इतर सर्व दाखले आणि प्रमाणपत्रं आहेत.

३. मुलं माझ्याशी फारच जवळिकीनं वागतात असं मला वाटतं. जरा कडक शिक्षक होणं मला जमावं असंही वाटतं.

४. मी चित्रकलेच्या परीक्षा दिल्या आहेत. खालच्या वर्गांना चित्रकला शिकवू शकतो मी. तसंच कबड्डीचा संघनायक होतो मी, शाळेत असताना.

५. मी एकूण तीन शाळांत नोकरी केली.

६. हो, माझ्या वडिलांची बदली मुंबईला झाली त्यामुळे आम्ही मुंबईत आलो. मी विरारच्या कॉलेजमधून बी॰एस्सी॰ केलं, रसायनशास्त्रात. दुसरा वर्ग मिळाला मला.

७. तेही विरार एज्युकेशनमधूनच केलं.

८. मी मुख्यतः रसायनशास्त्र शिकवलं. याखेरीज पाचवी आणि सहावीला गणित शिकवत असे.

९. मी मुलांत छान मिसळू शकतो आणि खेळीमेळीच्या वातावरणात माझा वर्ग चालतो.

१०. नाही.

११. नमस्कार

१२. नमस्कार. धन्यवाद. मी सतीश भोईर.

**५. आता हीच मुलाखत ऐकू या.**

**६. मुलाखत सादर करणे**

क्र. १४ मधील जाहिराती परत वाचू या. आता आपण वर्गातल्या विद्यार्थी / विद्यार्थिनींचे ४ गट करू या. प्रत्येक गट एक जाहिरात निवडेल आणि त्यावर एक मुलाखत तयार करेल आणि नंतर वर्गासमोर सादर करेल.



## १७ विकारी विशेषणांची सामान्यरूपे

**१. खालील उतारा काळजीपूर्वक वाचू या आणि अधोरेखित शब्दांकडे लक्ष देऊ या.**

मुंबईच्या रस्त्यांवर काळ्या-पिवळ्या टॅक्सीची वाहतूक आता कमी दिसते. आता वेगळ्या टॅक्सीचे दिवस आले आहेत. तिला 'कॅब' म्हणतात. पण ती चटकन ओळखू येत नाही. मी पहिल्या वेळी मुंबईत आले होते तेव्हा हात केला की पटकन टॅक्सी थांबत असे. काळ्या-पिवळ्या गणवेषातल्या त्या टॅक्स्या मला फार आवडायच्या. फोन करून टॅक्सी बोलावणंही वृद्ध माणसांसाठी कटकटच. आणि ॲपने टॅक्सी बोलावणं सोपं खरं, पण त्याचंही वृद्ध माणसांना दडपणच. कितीही चांगली असली तरी वेगळ्या पद्धतीशी जुळवून घेणं हे सुरुवातीला अवघडच जातं. तरुणांना जरी हे सोपं वाटलं तरी या सोप्या पद्धतीचा जुन्या पिढीला मात्र बाऊ वाटतो. मागच्या पिढीतल्या लोकांनी शहाण्या मुलासारखी एखाद्या तरुणाची मदत घ्यावी हेच बरं! एकेका काळाचा महिमा, दुसरं काय!






**विशेषणांच्या रूपात काय बदल झाला आहे?**

उदा. काळी-पिवळी : काळ्या - पिवळ्या टॅक्सीची वाहतूक

क) वेगळी : ..........

ख) पहिली : ..........

ग) वृद्ध : ..........

घ) मोठे : ..........

च) सोपी : ..........

छ) जुनी: ..........

ज) शहाणा : ..........

झ) एकेक : ..........

| | |
|---|---|
| एक - एका | पण, एक - एके दिवशी / वर्षी |

२. उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या.

| पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| मोठा<br>(दरवाजा, साफसफाई, जबाबदारी, अट, तपशील, कागदपत्र, फाईल, महत्त्व) | मोठी<br>(अभिनेत्री, आई, गाडी, वाहनचालक, बायको, आजी, खुशाली) | मोठे / मोठं<br>(घर, खोली, दार, रंग, किंमत)<br>उदा. मोठे घर<br>मोठ्या घराची खोली<br>मोठ्या घराच्या खोलीचे दार<br>मोठ्या घराच्या खोलीच्या दाराचा रंग<br>मोठ्या घराच्या खोलीच्या दाराच्या रंगाची किंमत |
| नवा | नवी | नवे / नवं |
| चांगला | चांगली | चांगले / चांगलं |




| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. काळा (कागद) (ए.व.) | |
| हा काळा कागद कोणाला हवा? | हा काळा कागद कोणाला हवा? |
| निळा (वही) (ए.व.) | ही निळी वही कोणाला हवी? |
| पिवळा (छत्री) (ए.व.) | ही पिवळी छत्री कोणाला हवी? |
| वेगळा (गोष्ट) (अ.व.) | या वेगळ्या गोष्टी कोणाला हव्यात? |
| सोपा (कोडे / कोडं) (ए.व.) | हे सोपे कोडे कोणाला हवे? / सोपं कोडं कोणाला हवं? |
| जुना (नाणे / नाणं) (अ.व.) | ही जुनी नाणी कोणाला हवीत? |
| मोठा (पुस्तक) (ए.व.) | हे मोठे / मोठं पुस्तक कोणाला हवे / हवं? |

सराव

**१८ वाक्ये बनवू या.**

उदा॰ माझ्या/ मुलाला / मोठा/ छान मार्क्स / मिळाले :

माझ्या मोठ्या मुलाला छान मार्क्स मिळाले.

१. माझ्या / उद्या / धाकटा / पाचवा वाढदिवस / मुलीचा / आहे

..........

२. वर्तमानपत्रासोबत / आजच्या / निळा / रंगाचे / आले / पत्रक / आहे

..........

३. करावी लागते / मुलीला / खूप मेहनत / भोळा

..........

४. मोठा / आहेत / सुंदर चित्रेच / पुस्तकात / फक्त

..........

५. छोटा / नयेत / मुलांनी / स्मार्ट फोन्स / वापरू

..........

**विध्यर्थी रूपे - क्रियापद - असणे, नसणे**

**Desiderative Forms - Verbs - असणे, नसणे**

| सर्वनाम | पुल्लिंग | स्त्रीलिंग | नपुंसकलिंग |
|---|---|---|---|
| मी | असावा | असावी | असावे / असावं |
| | नसावा | नसावी | नसावे / नसावं |
| आम्ही /आपण | असावे | असाव्या | असावे / असावं |
| | नसावे | नसाव्या | नसावे / नसावं |
| तू | असावास | असावीस | असावेस / असावंस |
| | नसावास | नसावीस | नसावे / नसावंस |
| तुम्ही / आपण | असावे | असाव्या | असावे(त) / असावं(त) |
| | नसावे | नसाव्या | नसावे(त) / नसावं(त) |
| ए॰व॰तृ॰पु॰ | (तो) | (ती) | (ते) |
| | असावा | असावी | असावं |
| अ॰व॰तृ॰पु॰ | नसावा | नसावी | नसावं |
| | (ते) | (त्या) | (ती) |
| | असावेत | असाव्या (त) | असावीत |
| | नसावेत | नसाव्या (त) | नसावीत |

## १९ कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच!

असावेत / नसावेत, असावी / नसावा, असावा / नसावा, असावी / नसावी, असावी / नसावे

१. प्रत्येकाजवळ मोबाईल (क) ........................, पण तो सतत हातात (ख) ........................!

२. चांगले चित्रपट बघण्याची आवड (ग) ........................, पण त्यामुळे अभ्यासाचा कंटाळा (घ) ........................!

३. व्हॉट्सॲपवरील संदेश (अ.व.) रंजक (च) ........................, पण ते मित्रांना दुखावणारे (छ) ........................!

४. शाळा-कॉलेजात वर्गात मोबाईलवर बंदी (ज) ........................, पण कॅन्टिन आणि आवारात ही बंदी (झ) ........................!

५. मोबाईलची आवड (ट) ........................, त्याचे व्यसन (ठ) ........................!

### संभाषण करू या.

रोजचा दिनक्रम ठरलेला असणे
शाळा / कॉलेज / ऑफिसला जाणे
अभ्यास करणे
सकाळी उशिरा उठणे
ऑफिसला जायला उशीर होणे
आईचा पारा चढणे
चिडचिड होणे
समाधान न मिळणे
स्वयंपाक करणे
घर / पसारा आवरणे
घर नीटनेटके ठेवणे

मागच्या / पुढच्या आठवड्यात / काही दिवसांपासून
बदल गरजेचा वाटणे
सगळ्यापासून लांब जावेसे वाटणे
प्रसन्न करणारा अनुभव येणे

**म्हणी आणि वाक्प्रचार**

| | |
|---|---|
| मी मी करणे | टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही |
| आयजीच्या जिवावर बायजी उदार | अडला हरी गाढवाचे पाय धरी |



## २० खेळू या.

▶अ.पु. १२-१३

शिक्षिका वर्गात असणाऱ्या वस्तूंची यादी वाचेल. समोर तीन खुर्च्या असतील. विद्यार्थ्यांच्या दोन रांगा खुर्च्यांपासून थोड्या लांब उभ्या असतील. त्या खुर्च्यांवर लिंगाप्रमाणे तो, ती, ते असे लिहिले असेल. यादीतला शब्द ऐकून बरोबर त्या गोष्टींचे लिंग ओळखून पटकन त्या खुर्चीत बसावे. जास्तीत जास्त शब्द ओळखणारा आणि कमीत कमी चुका करणारा गट जिंकेल.

## २१ एक चित्रफीत पाहू या.

**१. योग्य उत्तर निवडू या.**

**क. बायको नवऱ्याला किती वाजताचा गजर लावायला सांगते?**

१. ५

२. ७

३. ९

**ख. मानवला सोडल्यावर नवऱ्याने काय करणे अपेक्षित आहे?**

१. नऊच्या आत डबा भरून दारात ठेवणे

२. डबा भरून बॅगेत ठेवणे

३. नऊनंतर डबा भरून दारात ठेवणे

**ग. आणखी कोणतं काम बायकोला आठवत आहे?**

१. कपडे इस्त्रीला देणे

२. विजेचे बिल भरणे

३. कपडे धुवायला देणे

**घ. बायको दहा दिवस कुठे चालली आहे?**

१. इतरांची काळजी घ्यायला

२. फिरायला

३. नवीन नोकरी करायला

२. या चित्रफितीमध्ये काय वेगळेपण आहे हे तुमच्या लक्षात आले का? नवरा - बायकोच्या बदलत गेलेल्या जबाबदाऱ्यांविषयी वर्गात चर्चा करू या.

## शब्दसंपदा

### ७.१ नाम : व्यवसाय

| | |
|---|---|
| तो हवालदार, ते - | ती शिक्षिका, त्या - |
| तो शिक्षक, ते - | ती प्राध्यापिका, त्या - |
| तो प्राध्यापक, ते - | ती डॉक्टर, त्या - / डॉक्टरीण, त्या डॉक्टरणी |
| तो डॉक्टर, ते - | ती विद्यार्थिनी, त्या - |
| तो विद्यार्थी, ते - | ती इंजिनियर, त्या - |
| तो इंजिनियर, ते - | ती लेखिका, त्या - |
| तो लेखक, ते - | ती गृहिणी, त्या - |
| तो गृहस्थ, ते - | ती गायिका, त्या - |
| तो गायक, ते - | ती नर्तकी, त्या - |
| तो नर्तक, ते - | ती कवयित्री, त्या - |
| तो कवी, ते - | ती शेतकरीण, त्या शेतकरणी |
| तो शेतकरी, ते - | ती अभिनेत्री, त्या - |
| तो अभिनेता, ते अभिनेते | ती खेळाडू, त्या - |
| तो खेळाडू, ते - | ती शास्त्रज्ञ, त्या - |
| तो शास्त्रज्ञ, ते - | ती व्यापारी, त्या - |
| तो व्यापारी, ते - | ती कोळीण, त्या कोळणी |
| तो कोळी, ते - | ती सहकारी, त्या - |
| तो कर्मचारी, ते - | |
| तो विभागप्रमुख, ते - | |
| तो शिपाई, ते - | |
| तो भटजी, ते - | |
| तो सहकारी, ते - | |

### ७.२ प्रशासकीय / व्यवस्थापकीय शब्द

| | | |
|---|---|---|
| तो अर्ज, ते - | ती तक्रार, त्या तक्रारी | ते देयक, ती देयके / देयकं |
| तो पासपोर्ट, ते - | ती सुट्टी, त्या सुट्ट्या | ते बिल, ती बिले / बिलं |
| तो व्हिसा, ते - | ती जबाबदारी, त्या जबाबदाऱ्या | ते पासबुक, ती पासबुके / पासबुकं |
| तो काउंटर, ते - | ती विनंती, त्या विनंत्या | ते कागदपत्र, ती कागदपत्रे / कागदपत्रं |
| तो तपशील, ते - | ती परवानगी, त्या परवानग्या | ते कार्ड, ती कार्डे / कार्डं |
| तो सल्ला, ते सल्ले | ती सूचना, त्या सूचना | ते ओळखपत्र, ती ओळखपत्रे/ ओळखपत्रं |
| तो होकार, ते - | ती तक्रार, त्या तक्रारी | ते चेकबुक, ती चेकबुके / चेकबुकं |
| तो नकार, ते - | ती अट, त्या अटी | ते तिकीट, ती तिकिटे / तिकिटं |
| तो व्यापार, ते - | ती नोट, त्या नोटा | |
| तो व्यवसाय, ते - | ती गरज, त्या गरजा | |
| तो पगार, ते - | ती ओळख, त्या ओळखी | |
| तो परवाना, ते परवाने | ती गडबड, त्या गडबडी | |
| ते पारपत्र, ती पारपत्रे | | |
| तो धनादेश, ते - | | |
| तो चेक, ते - | | |
| तो पत्ता, ते पत्ते | | |
| तो दूरध्वनी-क्रमांक, ते - | | |
| तो पैसा, ते पैसे | | |
| तो उद्देश, ते - | | |
| तो तोडगा, ते तोडगे | | |
| तो घोळ, ते - | | |



### ७.३ नाम : घर आणि घरातल्या वस्तू

| | | |
|---|---|---|
| तो दरवाजा, ते दरवाजे | ती भिंत, त्या भिंती | ते घर, ती घरे / ती घरं |
| तो पंखा, ते पंखे | ती खोली, त्या खोल्या | ते छत, ती छते / ती छतं |
| तो एॅसीॅ, ते - | ती खिडकी, त्या खिडक्या | ते दार, ती दारे / ती दारं |
| तो दिवा, ते दिवे | ती ट्युबलाईट, त्या - | ते स्वयंपाकघर, ती स्वयंपाकघरे / ती स्वयंपाकघरं |
| तो पलंग, ते - | ती खुर्ची, त्या खुर्च्या | ते टेबल, तीटेबले / ती टेबलं |
| तो फ्रीज, ते - | ती काच, त्या काचा | ते कपाट, ती कपाटे / ती कपाटं |
| तो टीव्ही, ते - | ती किल्ली, त्या किल्ल्या | ते टाळे / ते टाळं, ती टाळी |
| तो रेडिओ, ते - | ती चावी, त्या चाव्या | ते फडके / ते फडकं, ती फडकी |
| तो चेंडू, ते - | ती इस्त्री, त्या इस्त्र्या | ते गेट, ती गेटे / गेटं |
| तो दूरध्वनी, ते - | ती चळत, त्या चळती | |
| तो जुडगा, ते जुडगे | ती साफसफाई, - | |
| तो आरसा, ते आरसे | ती बैठक, त्या बैठका | |
| तो साबण, ते - | | |
| तो झाडू, ते - | | |
| तो पसारा, ते पसारे | | |

### ७.४ नाम : भांडी

| | | |
|---|---|---|
| तो माठ, ते - | ती कढई, त्या कढया | ते भांडे, ती भांडी |
| तो तांब्या, ते तांबे | ती थाळी, त्या थाळ्या | |
| तो कप, ते - | ती प्लेट, त्या प्लेटी / प्लेट्स | |
| तो पेला, ते पेले | ती वाटी, त्या वाट्या | |
| तो ग्लास, ते - | ती सुरी, त्या सुऱ्या | |
| तो चमचा, ते चमचे | ती बाटली, त्या बाटल्या | |
| तो काटा, ते काटे | | |

**दृष्टिक्षेप**

**नाम**

| | | |
|---|---|---|
| तो आगगाडीचालक, ते - | ती पाटी, त्या पाट्या | ते शुभेच्छापत्र, ती शुभेच्छापत्रे / ती शुभेच्छापत्रं |
| तो खलाशी, ते - | ती भेटवस्तू, त्या - | ते प्रशिक्षण, ती प्रशिक्षणे / |
| | | ती प्रशिक्षणं |
| तो ज्योतिषी, ते - | ती करंजी, त्या करंज्या | ते क्षितिज, ती क्षितिजे, ती क्षितिजं |
| तो वैमानिक, ते - | ती चकली, त्या चकल्या | ते भौतिकशास्त्र |
| तो गवंडी, ते - | ती शंकरपाळी, त्या शंकरपाळ्या | ते रसायनशास्त्र |
| तो सुतार, ते - | ती पाणबुडी, त्या पाणबुड्या | ते जीवशास्त्र |
| तो कुंभार, ते - | ती कंपनी, त्या कंपन्या | ते उत्पादन, ती उत्पादने / ती उत्पादनं |
| तो उद्योग, ते - | ती प्रतिक्रिया, त्या प्रतिक्रिया | ते कौशल्य, ती कौशल्ये / ती कौशल्यं |
| तो लघुलिपिक, ते - | ती गल्ली, त्या गल्ल्या | ते आरक्षण, ती आरक्षणे, ती आरक्षणं |
| तो सचिव, ते - | ती मुलाखत, त्या मुलाखती | ते दांपत्य, ती दांपत्ये / ती दांपत्यं |
| तो फटाका, ते फटाके | ती हालचाल, त्या हालचाली | ते पद, ती पदे / ती पदं |
| तो लाडू, ते - | ती जाहिरात, त्या जाहिराती | ते मडकं, ती मडकी |
| तो फराळ, ते - | ती पद्धत, त्या पद्धती | ते अंतराळ |
| तो अनारसा, ते अनारसे | ती सहजता | |
| तो वर्ग, ते - | | |
| तो पेटारा, ते पेटारे | | |
| तो चौकोन, ते - | | |
| तो दाखला, ते दाखले | | |
| तो क्रम, ते - | | |
| तो बदल, ते - | | |
| तो मतभेद, ते - | | |
| तो चुणचुणीतपणा | | |

| क्रियापद | विशेषणे | प्रश्नशब्द | इतर शब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|---|
| पकडणे | आकर्षक | कोणालाही | जरी | आतापर्यंत |
| विचारणे | खाजगी | कितीही | पैकी | पटकन |
| भरवणे | उत्कृष्ट | | नंतर | |
| वाढवणे | स्वयंप्रेरित | | सर्वांकडे | |
| ओळखणे | स्वतंत्र | | | |
| निवडणे | आरामदायी | | | |
| वापरणे | बहुआयामी | | | |
| कापणे | भोळा | | | |
| शिवणे | उत्तीर्ण | | | |
| धुणे | | | | |
| बनवणे | | | | |

## आता मला हे येतं ...

**रोजच्या घडामोडींवर संभाषण करणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्यवसाय आणि कार्यक्षेत्रे यांबद्दल बोलणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**द्वितीया आणि चतुर्थी विभक्ती**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणाला**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विशेषनामांची सामान्यरूपे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विकारी विशेषणांची सामान्यरूपे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विध्यर्थ - असणे आणि नसणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# करावे तसे भरावे

८



## चला, शिकू या...

- विध्यर्थ, आज्ञार्थ : सकारात्मक / नकारात्मक
- सर्वनाम / नाम + तृतीया
- कधी तरी / काही तरी
- सूचना देणे / सल्ला देणे / नियम सांगणे
- हवंय / नकोय
- जिथे / तिथे, जिकडे / तिकडे, ज्याने / त्याने, ज्याच्याशी / त्याच्याशी, ज्याला / त्याला
- आधी / मग, पूर्वी / आत्ता, अगोदर / नंतर
- जोडक्रियाविशेषणे : इकडेतिकडे, रात्रीअपरात्री ...



**'त्या'ची कविता**

मी कुठे म्हणालो 'परी' मिळावी...
फक्त जरा 'बरी' मिळावी...
प्रयत्न मनापासून आहेत, मग...
किमान एक 'तरी' मिळावी...!
स्वप्नात तशा खूप भेटतात...
कधी तरी खरी मिळावी...
हवीहवीशी एक जखम...
एकदा तरी उरी मिळावी...!!
गालावर खळी नको तिच्या...
फक्त जरा हसरी मिळावी...!
चंद्राइतकी सुंदर नकोच...
फक्त जरा लाजरी मिळावी...!!
मी कुठे म्हणालो परी मिळावी...
फक्त जरा बरी मिळावी...!!

\- मंगेश पाडगावकर

## १ तो आणि ती

**१. पुढील काव्यांश वाचू या आणि 'ती'ची कविता पूर्ण करू या.**

**'ती'ची कविता**

मी कुठे म्हणाले 'देखणा' मिळावा...
एवढंच की जरा 'शहाणा' मिळावा...
नुसती छप्पन इंचांची छाती नको...
मनाचा 'सच्चा बाणा' असावा...!!

........................................................................

........................................................................

........................................................................



**२. वाचू या.**

कधी कधी मलाही वाटते, की आपण पहाटेच उठावे, छानसे उबदार कपडे चढवावेत, झकास शूज घालावेत आणि पहाटेच्या अंधुक प्रकाशात घराबाहेर पडावे. रस्त्यावरून रुबाबात झपाझप चालावे. फिरायला आलेल्या तरुण मुलामुलींना मागे टाकून पळत पळत टेकडी चढावी. आपला जोश आणि उत्साह पाहून त्यांनी चकित व्हावे. उगवता सूर्य प्रत्यक्ष पाहणे हा अनुभव मन प्रसन्न करणारा असतो असे मी वाचले आहे. टेकडीच्या माथ्यावरून तो अनुभव रोज घ्यावा. मग पुन्हा तेवढ्याच उत्साहाने पळत घरी परत यावे आणि आरशासमोर उभे राहून आपले सडपातळ शरीर आणि जवळपास खपाटीला गेलेले पोट कौतुकाने डोळे भरून न्याहाळावे.





**३. जोड्या लावू या.**

| | | |
|---|---|---|
| क. | टेकडी | १. न्याहाळावे |
| ख. | अनुभव | २. चढवावे |
| ग. | पोट | ३. चढावी |
| घ. | कपडे | ४. घ्यावा |



क. ..........

ख. ..........

ग. ..........

घ. ..........



२ हा उतारा वाचू या.

**'करावे मनाचे...'**

प्रत्येकानं आपलं आयुष्य कसं जगावं हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. 'माय लाईफ, माय चॉइस' हा दीपिका पदुकोणचा व्हिडीओही असंच काहीसं सांगतो. त्यामुळे त्यात नावीन्य काही नाही. स्त्रियांनी काय करावं, काय करू नये हे ठरवण्याचा हक्क सर्वस्वी त्यांनाच आहे. तसंच, लग्न करायचं की नाही, लग्नाआधी संबंध ठेवावेत की नाही, विवाहबाह्य संबंध ठेवावेत की नाही, हाही सर्वस्वी वैयक्तिक मुद्दा आहे. यावर एखाद्यानं बंधन घालावं असं अजिबातच काही नाही. मग तिनं मांडलेली मतं का स्वीकारली जाऊ शकत नाहीत? दीपिकानं असं काय नवीन मांडलंय जे याआधी जगात घडत नव्हतं? याआधीही या व्हिडीओमधल्या अनेक विषयांवर चर्चा झाली आहे. परंतु स्त्रीविषयक इतर अनेक प्रश्न आहेत जे या व्हिडीओमध्ये मांडले गेले नाही आहेत. त्यावरही बोलणं गरजेचं आहे. याची सुरुवात आपल्या घरातूनच व्हायला हवी. मुलींनी स्वयंपाक शिकला पाहिजे अशी अपेक्षा असेल, तर तो मुलांनीही शिकला पाहिजे. असंही म्हटलं जातं की, दीपिका पदुकोणनं 'माय लाइफ, माय चॉइस' या व्हिडीओच्या माध्यमातून महिला सबलीकरणाला प्रोत्साहन दिलं आहे. दीपिकानं पब्लिसिटी स्टंट म्हणून असं केलं असेल अशीही चर्चा झाली. गेल्या काही महिन्यांपूर्वी दीपिकानं असाच एक अनुभव घेतला. तिच्या एका फोटोविषयी एका वृत्तपत्रानं एक बातमी केली होती आणि तो चर्चेचा विषय बनला होता. तरीही तिनं स्वतःच्या आयुष्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. उलट, हा व्हिडीओ प्रदर्शित करून तिनं आपली याविषयीची मतं जगासमोर मांडली. म्हणूनच म्हटलं आहे, 'ऐकावे जनाचे, करावे मनाचे'.

**क्रियापद अकर्मक असल्यास त्याचे रूप कायम नपुंसकलिंगी, तृतीय पुरुषी आणि एकवचनी असते.**

सर्वनाम / नाम + तृतीया + अकर्मक क्रियापदाचे विध्यर्थी रूप

**Pronoun / Noun + Instrumental + Desiderative Form of Intransitive Verbs**

| सर्वनाम / नाम | येणे |
|---|---|
| मी | यावे/ यावं |
| आम्ही / आपण | यावे/ यावं |
| तू | यावेस / यावंस |
| तुम्ही / आपण | यावे(त) / यावं(त) |
| तो / ते / ती | यावे / यावं |
| शिक्षक / बाळ / शिक्षिका | |
| ते / ती / त्या | |

**टीप :** वाक्यात कर्म दिलेले नसेल तर क्रियापद नेहमी नपुंसकलिंगी एकवचनी राहते.
**पण :** तू – यावेस / यावंस

**याचप्रमाणे :** येणे, धावणे, थांबणे, असणे, झोपणे...

### सर्वनाम / नाम + तृतीया + सकर्मक क्रियापदाचे विध्यर्थी रूप (खाणे)

### Pronoun / Noun + Instrumental + Desiderative Form of Transitive Verbs

| सर्वनाम / नाम | + तृतीया | | (तो) आंबा | (ते) आंबे | (ती) कैरी | (त्या) कैऱ्या | (ते) फळ | (ती) फळे / फळं |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | मी | | खावा | खावे(त) | खावी | खाव्या(त) | खावे / खावं | खावी(त) |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण | | खावा | खावे(त) | खावी | खाव्या(त) | खावे / खावं | खावी(त) |
| तू | तू | | खावास | खावेस | खावीस | खाव्यास | खावेस / खावंस | खावीस |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण | | खावा | खावे(त) | खावी(त) | खाव्या(त) | खावे(त) / खावं(त) | खावी(त) |
| तो | + ने = त्याने | शिक्षकाने | | | | | | |
| शिक्षक | | | | | | | | |
| ती | + ने = तिने | शिक्षिकेने | | | | | | |
| शिक्षिका | | | | | | | | |
| ते | | बाळाने | खावा | खावे(त) | खावी | खाव्या(त) | खावे / खावं | खावी(त) |
| बाळ | + ने = त्याने | | | | | | | |
| ते | | शिक्षकांनी | | | | | | |
| त्या | + नी = त्यांनी | शिक्षिकांनी | | | | | | |
| ती | | बाळांनी | | | | | | |

**याचप्रमाणे :** पिणे, ऐकणे, वाचणे, लिहिणे, सांगणे, विचारणे, शिकणे, शिकवणे, फेकणे, पकडणे...





व्याकरण

पुणेरी चिमटा

स्थळ - अर्थात पुणेच!

रेखाला दाखवण्याचा कार्यक्रम (चहा - पोहे!) सुरू असतो.

रेखाचे आई-बाबा आणि पाहुणे यांच्यातील सुसंवाद -

"पोहे रेखानंच केलेत बरं का!..."

"हो का? छान!...

घर छान आहे तुमचं!"

"रेखानंच छान ठेवलंय!"

"बागही मस्तच!"

"रेखाच करते सगळं!"

"हे पेंटिंग बाकी खासच!"

"रेखानंच काढलंय..."

"हो का?... पण खाली सही मुळगांवकरांची दिसतेय...!"

"तीपण रेखानंच केलीय (!)"



विध्यर्थी वाक्यरचना

| कर्ता | विभक्ती | प्रत्यय |
|---|---|---|
| १) शिक्षक<br>२) लोक | तृतीया | ने (ए.व.)<br>नी (अ.व.)<br><br>उदा. १) शिक्षकाने शिकवावे / शिक्षकानं शिकवावं.<br>२) लोकांनी वाचावे / वाचावं. |
| कर्म<br><br>१) विद्यार्थी<br>२) प्राणी-पक्षी | द्वितीया | ला / स (ए.व.)<br>ना / स (अ.व.)<br>(क्रियापद : नपुं., तृ.पु. आणि ए.व.)<br><br>उदा. १) शिक्षकाने / शिक्षकानं विद्यार्थ्यांना शिकवावं.<br>२) लोकांनी प्राण्या-पक्ष्यांना वाचवावं. |

## ३ वाक्ये बनवू या.

| | | | |
|---|---|---|---|
| तिने | | पेरू | पोहोचणे |
| त्याने | ही | कादंबरी | बोलणे |
| तुम्ही | नेहमी | वेळेवर | वाचणे |
| तू | हा | खरे | करणे |
| त्यांनी | | पौष्टिक | खाणे |
| आपण | | अभ्यास | |

उदा॰ आपण ही कादंबरी वाचावी.

१. ..............................

२. ..............................

३. ..............................

४. ..............................

५. ..............................

६. ..............................

७. ..............................

८. ..............................

९. ..............................

१०. ..............................

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. मी - वाचणे | |
| मी वाचावे. | मी वाचावे. |
| आम्ही - बोलणे | आम्ही बोलावे. |
| तू - खेळणे | तू खेळावेस. |
| तुम्ही - करणे | तुम्ही करावे. |
| तो - जाणे | त्याने जावे. |
| ती - जिंकणे | तिने जिंकावे. |
| ते (अ.व.) - लिहिणे | त्यांनी लिहावे. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. वर्तमानपत्र - वाचणे | |
| वर्तमानपत्र वाचावे. | वर्तमानपत्र वाचावे. |
| कविता - करणे | कविता करावी. |
| भाषा - शिकणे | भाषा शिकावी. |
| व्यायाम - करणे | व्यायाम करावा. |
| नृत्य - शिकणे | नृत्य शिकावे. |
| पैसे - कमवणे | पैसे कमवावेत. |
| शोध (अ.व.) - लावणे | शोध लावावेत. |

▶अ.पु. ६-८

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. वर्तमानपत्र - वाचणे | |
| अगं / अरे, कधी तरी वर्तमानपत्र वाचावे. | अगं / अरे, कधी तरी वर्तमानपत्र वाचावे. |
| कविता - करणे | अगं / अरे, कधी तरी कविता करावी. |
| भाषा - शिकणे | अगं / अरे, कधी तरी भाषा शिकावी. |
| व्यायाम - करणे | अगं / अरे, कधी तरी व्यायाम करावा. |
| नृत्य - शिकणे | अगं / अरे, कधी तरी नृत्य शिकावे. |
| घर - आवरणे | अगं / अरे, कधी तरी घर आवरावे. |
| अभ्यास - करणे | अगं / अरे, कधी तरी अभ्यास करावा. |

▶अ.पु. ३-५



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. मी - वाचणे | |
| मी काही तरी वाचावे. | मी काही तरी वाचावे. |
| आम्ही - बोलणे | आम्ही काही तरी बोलावे. |
| तू - खेळणे | तू काही तरी खेळावेस. |
| तुम्ही - करणे | तुम्ही काही तरी करावे. |
| आपण - बघणे | आपण काही तरी बघावे. |
| तो - खाणे | त्याने काही तरी खावे. |
| ती - सांगणे | तिने काही तरी सांगावे. |
| ते (अ.व.) - लिहिणे | त्यांनी काही तरी लिहावे. |
| त्या - वाचणे | त्यांनी काही तरी वाचावे. |
| ते (ए.व.) - पाहणे | त्याने काही तरी पाहावे. |
| ती (अ.व.) - छापणे | त्यांनी काही तरी छापावे. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. वाचणे | |
| वाचावे नेटके. | वाचावे नेटके. |
| बघणे | बघावे नेटके. |
| बोलणे | बोलावे नेटके. |
| खेळणे | खेळावे नेटके. |
| करणे | करावे नेटके. |
| लिहिणे | लिहावे नेटके. |

४ खालील चित्रावरून म्हण ओळखू या.

..........................................

तसे

..........................................!



| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. किती मोठ्यानं बोलतोस तू! | |
| हळू बोलावं, रे. | हळू बोलावं, रे. |
| किती उशिरा उठतोस तू! | लवकर उठावं, रे! |
| किती खोटं बोलतोस तू! | खरं बोलावं, रे! |
| किती भरभर जेवतोस तू! | सावकाश जेवावं, रे! |
| किती लवकर भडकतोस तू! | शांत राहावं, रे! |

**टीप :**

पुरुषाला उद्देशून : शांत राहावं .................!

स्त्रीला उद्देशून : शांत राहावं, गं!

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. आश्चर्याने | |
| आई-वडिलांनी माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. | आई-वडिलांनी माझ्याकडे आश्चर्याने पाहिले. |
| गर्वाने | आई-वडिलांनी माझ्याकडे गर्वाने पाहिले. |
| भावुक | आई-वडिलांनी माझ्याकडे भावुक होऊन पाहिले. |
| कौतुकाने | आई-वडिलांनी माझ्याकडे कौतुकाने पाहिले. |
| उत्साहाने | आई-वडिलांनी माझ्याकडे उत्साहाने पाहिले. |
| आनंदाने | आई-वडिलांनी माझ्याकडे आनंदाने पाहिले. |

## ५ आम्रयोग

**१. ऐकू या.**

**२. कंसातील क्रियापदांचे योग्य रूप रिकाम्या जागी भरू या.**

(जाणे, आंजारणे, घेणे, नेणे, बोलणे, घेणे, करावं, पुटपुटणे, खाणे, फिरवणे, घेणे, जाणे, खाणे, गोंजारणे, खाणे)

आंबा प्रथम हातांनी ................. . त्याला थोडं ................. . त्याच्या त्या नितळ सालीवरून हात ................. . डेखापासून चोचीपर्यंत एक हळुवार मींड ................. . त्याच्या नकट्या नाकाचं थोडं कौतुक ................. . मग तो धुतला नाही तरी चालेल. आंबा हा

स्वभावतःच स्वच्छ असतो, एखाद्या अजाण, निरागस पोरासारखा. मग त्याच्याशी थोडं बोबडं ................................ . एकदा तरी हवेत उडवून हलक्या हाताने झेलून ................................ . मग मनामध्ये मंत्र ................................, 'झेलला तरी चेंडू नव्हे, तोलला तरी माल नव्हे, सोलली तरी साल नव्हे, कच्चा म्हणून कैरी नव्हे आणि खाल्ला म्हणून वैरी नव्हे.' मग आंबा डोळ्यांनी ................................, डोळ्यांच्या जवळ ................................, डोळ्यांवरून फिरवून ................................ . त्याच्या रंगात रंगून ................................ . मग त्याला नाकानं ................................, त्याच्या वासात विरून ................................ .

## ६ बसस्टॉप

**१. दोघा-दोघांचे गट करून खालील उतारा वाचू या आणि एकमेकांच्या मदतीने कंसातील शब्दांची तृतीया विभक्तीतील रूपे रिकाम्या जागी लिहू या.**

माझी बस नेहमी एक किंवा दोन (मिनिट) (क) ........................... चुकते. आजही असंच झालं. पण त्यामुळेच मला तो दिसला. खूप (वर्ष) (ख) ........................... बघितल्यामुळे मी त्याला थोडा वेळ ओळखलंच नाही. काही (क्षण) (ग) ........................... माझ्या लक्षात आलं, की मी त्याला बऱ्याच (वर्ष) (घ) ........................... पाहते आहे. मधल्या (काळ) (च) ........................... तो खूप बदलला होता. पण तरीही मला त्याची ओळख पटली. थोड्या (वेळ) (छ) ........................... मला आमची शेवटची भेट आठवली. तेव्हाही आम्ही बसस्टॉपवरच भेटलो होतो. प्रथम आमच्या भेटी दर दोन (दिवस) (ज) ........................... होत. नंतर दोन (आठवडे) (झ) ........................... होऊ लागल्या आणि मग काही (महिने) (ट) ........................... . आणि आता तर आम्ही बऱ्याच(वर्ष) (ठ) ........................... भेटत होतो. मी त्याला ओळखलं, पण (तो) (ड) ........................... मला ओळखलं की नाही हे मला कळलं नाही.



२. आता हाच उतारा ऐकू या.

## ७ पाककृती शिकू या.

**चिंगीची आई बाहेर गेली आहे. चिंगीची मैत्रीण रिंकी चिंगीला खालील पाककृती शिकवते.**





**चिंगीनं केलं मस्त सँडविच**

रिंकी : ब्रेडच्या कापांना लोणी लाव. नंतर त्यावर चटणी लाव. त्यावर आधी कांद्याचे काप, त्यावर टोमॅटो आणि काकडीचे काप ठेव. वर मिरपूड आणि मीठ भुरभुरव. वर दुसरा ब्रेडचा काप ठेव. टोमॅटोसॉसबरोबर खायला दे.

चिंगीचं सँडविच खूपच छान झालं आहे. ती तिच्या शाळेच्या मासिकासाठी हीच पाककृती लिहिते.

साहित्य – ब्रेडचे २ तुकडे, लोणी, सँडविचची चटणी, कांद्याचे पातळ काप २-३, टोमॅटोचे पातळ काप २-३, काकडीचे पातळ काप २-३, मिरपूड, मीठ चवीला.

**कृती – ब्रेडच्या कापांना लोणी लावावे.**

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

**आता आपली पाळी. आपल्या आवडत्या पदार्थाची पाककृती लिहू या. पाककृती लिहू या आणि एक छानसे छायाचित्रही लावू या!**

पदार्थ- ..........................................

साहित्य- ..........................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

छायाचित्र

कृती –

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

........................................................................................................................

**८** रिकाम्या जागी योग्य ते सर्वनाम भरू या. ▶अ.पु. ११



उदा. त्याने व्यायाम करावा.

१. 


............ मेहनत करावी

२. 

............ भांडू नये

३ 


............ वेळेवर निघावे

## ९ वाक्ये बनवू या.

उदा. विद्यार्थी (अ.व.) - शिक्षक (अ.व.) - नम्रपणे - वागणे - विद्यार्थ्यांनी शिक्षकांशी नम्रपणे वागावे.

१. तो - ती - खोटे - न बोलणे - ..........

२. लहान मुले - मोठे - आदराने - वागणे - ..........

३. तो - ते (अ.व.) - लपंडाव - खेळणे - ..........

४. मीनल - दीपाली - संपर्क - साधणे - ..........

## १० चला, योगासने करू या.

क. ताठ उभे राहणे
ख. हात वर करणे
ग. कमरेत वाकणे
घ. डोके गुडघ्यात लावणे
च. हात दोन्ही बाजूला सरळ ताणणे
छ. पाय दुमडून बसणे
ज. मांडी घालून बसणे
झ. कपाळ जमिनीला टेकवणे
ट. पोटावर झोपून डोके वर उचलणे
ठ. पाठीवर झोपून पाय वर उचलणे
ड. पुढे वाकून हात जमिनीवर टेकणे





२. आंतरजालावर एखादी चित्रफीत पाहून सूर्यनमस्कार समजून घेऊ या.

## ११ वाचू या.

खोटे कधी बोलू नये
चोरी कधी करू नये
शिवी कोणा देऊ नये
कोणासंगे भांडू नये

गोड फार खाऊ नये
पाहिले ते मागू नये
चित्ती धरी जो हे बोल
त्याचे कल्याण होईल.






## १२ रिकाम्या चौकटींत योग्य ते क्रियापद लिहू या.

(ऐकावे, पाहावे, बोलावे)





वाईट (क) .................. नये!

वाईट (ख) .................. नये!

वाईट (ग) .................. नये!

## विध्यर्थ - नकारात्मक

**Desiderative - Negative**

▶अ॰पु॰ १२-१३

| सर्वनाम | + तृतीया | (तो) आंबा | (ते) आंबे | (ती) कैरी | (त्या) कैऱ्या | (ते) फळ | (ती) फळे / फळं |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | मी | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत |
| तू | तू | खाऊ नयेस | खाऊ नयेस | खाऊ नयेस | खाऊ नयेस | खाऊ नयेस | खाऊ नयेस |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत |
| तो | + ने = त्याने | | | | | | |
| ती | + ने = तिने | | | | | | |
| ते | + ने = त्याने | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत | खाऊ नये | खाऊ नयेत |
| ते | | | | | | | |
| त्या | + नी = त्यांनी | | | | | | |
| ती | | | | | | | |

व्याकरण

**टीप :**

असणे – असावे (होकारार्थी)

असू नये / न + असावे= नसावे (नकारार्थी)

सराव

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ प्रदूषण (न करणे) | |
| प्रदूषण करू नये. | प्रदूषण करू नये. |
| वाट (न सोडणे) | वाट सोडू नये. |
| नकाशा (न विसरणे) | नकाशा विसरू नये. |
| काळजी (न करणे) | काळजी करू नये. |
| साहित्य (न हरवणे) | साहित्य हरवू नये. |
| मद्यपान (न करणे) | मद्यपान करू नये. |
| कपडे (न मळवणे) | कपडे मळवू नयेत. |
| झाडे (न तोडणे) | झाडे तोडू नयेत. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा. मी - वाचणे | |
| मी वाचू नये. | मी वाचू नये. |
| आम्ही - बोलणे | आम्ही बोलू नये. |
| तू - खेळणे | तू खेळू नयेस. |
| तुम्ही - करणे | तुम्ही करू नये. |
| तो - जाणे | त्याने जाऊ नये. |
| तू - जाणे | तू जाऊ नयेस. |
| ते (अ.व.) - लिहिणे | त्यांनी लिहू नये. |

### १३ कसे जगावे, कसे वागावे?

सत्याने वागून नेहमी
जीवन आपुले जगावे...
चेहऱ्यावर स्मितहास्य
नेहमी बाळगून चालावे...
येणाऱ्या जाणाऱ्यांकडे
आनंदाने पाहावे...

जगात खूप भांडण तंटे
आपण शांत राहावे...
सतत तोंडात मध आणि
मस्तकी बर्फ धरावे...

### विध्यर्थ – नकारार्थी

| सर्वनाम | + तृतीया | | | |
|---|---|---|---|---|
| मी | मी | | नये | |
| तू | तू | | नयेस | |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण | | नये | |
| तो | + ने = त्याने | | नये | |
| ती | + ने = तिने | येऊ | नये | का? |
| ते | + ने = त्याने | | नये | |
| ते | | | नये | |
| त्या | + नी = त्यांनी | | नये | |
| ती | | | नये | |

व्याकरण

**१४ खालील उत्तरांना योग्य प्रश्न लिहू या.**

मी आत्ता त्यांना फोन करू नये का?

आपण सिनेमा बघू नये का?

मी हा कुडता विकत घेऊ नये का?

तिने फिरायला जाऊ नये का?

त्यांनी खरेदीला जाऊ नये का?

त्यांनी थंड खाऊ नये का?

१. ..............................................................................?

नाही रे, घड्याळात किती वाजलेत बघ. उशीर झालाय आता.

२. ..............................................................................?

मुळीच नाही. दोन दिवसांपूर्वीच तर मॉलला जाऊन आले ते.

३. ..............................................................................?

नाही. का बघायचा? झालाय की आपला एकदा बघून.

४. ..............................................................................?

नाही. खूप थंडी आहे ना! सर्दी होईल.

५. ..............................................................................?

नाही. ती एकटीच एवढ्या रात्री कशी जाईल बाहेर?

६. ..............................................................................?

नको घेऊस. हा रंग खूप भडक आहे.

## १५ सूचना, की सल्ला?

एका चिठ्ठीवर एखादी सूचना / एखादा सल्ला आज्ञार्थी रूपात लिहू या. तीच सूचना / तोच सल्ला विध्यर्थी रूपात चिठ्ठीच्या मागील बाजूस लिहू या. आता आपण चिठ्ठी घेऊन आपल्या सहकाऱ्याकडे जाऊ या. एकमेकांना आपापल्या चिठ्ठीची आज्ञार्थी बाजू दाखवून विध्यर्थी रूप विचारू या, आणि चिठ्ठ्यांची अदलाबदल करू या.

| | |
|---|---|
| काळजी घ्या | काळजी घ्यावी |
| सेवा करा | सेवा करावी |
| नियम पाळा | नियम पाळावेत |
| व्यायाम कर | व्यायाम करावास |
| ... | ... |



### पुणेरी पाटी



**१६** काही गोष्टी चारचौघांमध्ये करणे हे असभ्यपणाचे मानले जाते.
कोणत्या ते पाहू या आणि योग्य जोड्या जुळवू या.

(१. नाक शिंकरू नये २. घोरू नये ३. पादू नये ४. ढेकर देऊ नये ५. जांभया देऊ नये ६. भुरके मारत चहा पिऊ नये ७. खाजवू नये ८. खाताना तोंडाचा आवाज करू नये)

क.


ख.


घ.


ग.


च.


छ.


ज.


झ.


| सर्वनाम | + चतुर्थी | (तो) आंबा | (ते) आंबे | (ती) कैरी | (त्या) कैऱ्या | (ते) फळ | (ती) फळे / फळं |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | मला | खावासा वाटतो | खावेसे वाटतात | खावीशी वाटते | खाव्याशा वाटतात | खावेसे वाटते / खावंसं वाटतं | खावीशी वाटतात |
| आम्ही | आम्हाला | | | | | | |
| आपण | आपल्याला | | | | | | |
| तू | तुला | | | | | | |
| तुम्ही | तुम्हाला | | | | | | |
| आपण | आपल्याला | | | | | | |
| तो | त्याला | | | | | | |
| ती | तिला | | | | | | |
| ते | त्याला | | | | | | |
| ते | त्यांना | | | | | | |
| त्या | | | | | | | |
| ती | | | | | | | |

**टीप :**

जर कर्म नसेल तर क्रियापद नपुंसकलिंगी नामाप्रमाणे चालते.

उदा॰ मला बाहेर जावेसे वाटते / जावंसं वाटतं.

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ शिरा | |
| खावासा वाटतो | खावासा वाटतो |
| खीर | खावीशी वाटते |
| लोणचं | खावंसं वाटतं |
| पोहे | खावेसे वाटतात |
| पोळ्या | खाव्याशा वाटतात |
| बिस्किटं | खावीशी वाटतात |

१७ **उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवू या.**

पुस्तक वाचणे - उदा॰ मला कधी कधी पुस्तक वाचावंसं वाटतं.

१. कविता करणे - ..........

२. खोखो खेळणे - ..........

३. पुरणपोळी खाणे - ..........

४. चित्र काढणे - ..........

५. चित्रपट पाहणे (अ॰व॰) - ..........

**लिहिताना :**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी हवा आहे | आम्ही / आपण हवे आहोत |
| मी हवी आहे | आम्ही / आपण हव्या आहोत |
| तू हवा आहेस | तुम्ही / आपण हवे आहात |
| तू हवी आहेस | तुम्ही / आपण हव्या आहात |
| तो हवा आहे | ते हवे आहेत |
| ती हवी आहे | त्या हव्या आहेत |
| ते हवे / हवं आहे | ती हवी आहेत |

**बोलताना :**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी हवाय | आम्ही / आपण हवेहोत |
| मी हवीये | आम्ही / आपण हव्याहोत |
| तू हवायस | तुम्ही / आपण हवेहात |
| तू हवीयेस | तुम्ही / आपण हव्याहात |
| तो हवाय | ते हवेत |
| ती हवीय / हवीये | त्या हव्यात / हव्यायत / |
| ते हवंय | ती हवीत / हवीयत / हवीयेत |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा. त्यांना मुलगा हवा आहे. | |
| काय म्हणतेस! खरंच? त्यांना मुलगा हवाय? | काय म्हणतेस! खरंच? त्यांना मुलगा हवाय? |
| त्यांना नवीन टीव्ही हवा आहे. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना टीव्ही हवाय? |
| त्यांना नवीन मोबाईल हवा आहे. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना मोबाईल हवाय? |
| त्यांना मुलगी हवी आहे. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना मुलगी हवीये? |
| तिला सोन्याची अंगठी हवी आहे. | काय म्हणतेस! खरंच? तिला सोन्याची अंगठी हवीये? |
| त्यांना नवीन कपडे हवे आहेत. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना नवीन कपडे हवेत? |
| त्यांना थोडी मोकळीक हवी आहे. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना मोकळीक हवीये? |
| त्यांना नवीन घर हवं आहे. | काय म्हणतेस! खरंच? त्यांना नवीन घर हवंय? |

सराव

▶ अ.पु. १४-१६

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
| --- | --- |
| उदा. मला आंबा खावासा वाटतोय. | |
| मला आंबा हवाय. | मला आंबा हवाय. |
| मला कैरी खावीशी वाटतेय. | मला कैरी हवीय. |
| मला पुरी खावीशी वाटतेय. | मला पुरी हवीय. |
| मला शिरा खावासा वाटतोय. | मला शिरा हवाय. |
| मला पोहे खावेसे वाटतायत. | मला पोहे हवेत. |
| मला केळी खावीशी वाटतायत. | मला केळी हवीत. |
| मला लाल गोळ्या खाव्याशा वाटतायत. | मला लाल गोळ्या हव्यात. |

१८ ... का?

तुला लाल गोळ्या हव्यात का?

हो, मला लाल गोळ्या हव्यात. — नाही, मला लाल गोळ्या नकोत.

**लिहिताना :**

| एकवचन | अनेकवचन |
| --- | --- |
| मी नको आहे | आम्ही / आपण नको आहोत |
| तू नको आहेस | तुम्ही / आपण नको आहात |
| तो / ती/ते नको आहे | ते / त्या / ती नको आहेत |

व्याकरण

**बोलताना :**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| मी नकोय | आम्ही / आपण नकोत |
| तू नकोयस | तुम्ही / आपण नको आहात |
| तो / ती / ते नकोय | ते / त्या / ती नकोयत |

### १९ पुढील वाक्ये नकारार्थी लिहू या.

उदा॰ मला आंबा हवाय. मला आंबा नकोय.

१. मला कैरी हवीये. ..........

२. मला चिंच हवीये. ..........

३. मला चहा हवाय. ..........

४. मला पोहे हवेत. ..........

५. मला बोरे हवीत. ..........

६. मला लाल गोळ्या हव्यात. ..........

| आहे | नाही |
|---|---|
| हवा आहे / हवाय | नको आहे / नकोय |

### २० खेळू या.

**१. व्यवसाय ओळखू या.**

◊ एका विद्यार्थ्याने एक व्यवसाय मनात धरावा.

◊ इतर विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारावेत.

◊ ज्याने मनात व्यवसाय धरला असेल, त्याने फक्त हो किंवा नाही या स्वरूपात उत्तरे द्यावीत.

◊ इतर विद्यार्थी त्या व्यवसायाचे नाव ओळखेपर्यंत खेळ सुरू रहावा.

◊ पुढे दिल्याप्रमाणे प्रश्न विचारावेत.

| वेळ | जागा | पोषाख | स्वरूप | पगार / पैसे | संपर्क |
|---|---|---|---|---|---|
| तुम्ही ९ ते ५ काम करता का? | तुम्ही घरी राहून काम करता का? | तुम्हाला औपचारिक वेष घालावा लागतो का? | तुम्हाला खूप वाचावं लागतं का? | तुम्हाला एका वेळच्या कामाचे पैसे मिळतात का? | तुम्ही एकटे काम करता का? |
| तुम्हाला ठराविक वेळ काम करावं लागतं का? | तुम्हाला रोज घरातून बाहेर पडावं लागतं का? | तुम्हाला गणवेष घालावा लागतो का? | तुम्हाला खूप लिहावं लागतं का? | तुम्हाला ठराविक पगार मिळतो का? | तुम्हाला कोणी वरिष्ठ आहेत का? |
| तुमच्या कामाच्या वेळा बदलतात का? | तुम्ही ऑफिसमध्ये बसून काम करता का? | तुम्हाला वेगवेगळी वेषभूषा आणि रंगभूषा करावी लागते का? | तुम्हाला लोकांना खूप समजवावं लागतं का? | तुमचा रोज पैशांच्या व्यवहाराशी संबंध येतो का? | तुमच्या हाताखाली लोक काम करतात का? |
| तुम्हाला पाळ्यांमध्ये काम करावं लागतं का? | तुम्हाला खूप चालावं लागतं का? | | तुम्हाला दिवसभर संगणकासमोर बसावं लागतं का? | | तुम्ही खूप लोकांशी बोलता का? |
| तुम्हाला रात्रपाळी करावी लागते का? | | | तुम्ही संगीताचा उपयोग करता का? | | तुम्ही सतत फोनवर बोलता का? |
| | तुम्हाला परदेशी जावं लागतं का? | | तुमचा अन्नधान्याशी संबंध येतो का? | | |
| | | | तुमचा स्वतःचा व्यवसाय आहे का? | | |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ तुम्ही ९–५ काम करता का? | |
| हो, मी ९–५ काम करतो / करते. | हो, मी ९–५ काम करतो / करते. |
| तुम्ही ऑफिसमध्ये बसून काम करता का? | हो, मी ऑफिसमध्ये बसून काम करतो / करते. |
| तुम्ही खूप लोकांशी बोलता का? | हो, मी खूप लोकांशी बोलतो / बोलते. |
| तुम्ही संगीताचा उपयोग करता का? | हो, मी संगीताचा उपयोग करतो / करते. |
| तुम्ही सतत फोनवर बोलता का? | हो, मी सतत फोनवर बोलतो / बोलते. |

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ तुम्हाला औपचारिक वेष घालावा लागतो का? | |
| नाही, मला औपचारिक वेष घालावा लागत नाही. | नाही, मला औपचारिक वेष घालावा लागत नाही. |
| तुम्हाला खूप वाचावं लागतं का? | नाही, मला खूप वाचावं लागत नाही. |
| तुम्हाला ठराविक पगार मिळतो का? | नाही, मला ठरावीक पगार मिळत नाही. |
| तुम्हाला रात्रपाळी करावी लागते का? | नाही, मला रात्रपाळी करावी लागत नाही. |
| तुम्हाला परदेशी जावं लागतं का? | नाही, मला परदेशी जावं लागत नाही. |









## जो / तो (ज्याने / त्याने)

▶अ॰पु॰ १७

| सर्वनाम | | |
|---|---|---|
| तो | जो | तो |
| | ज्याने | त्याने |
| | ज्याच्याशी | त्याच्याशी |
| | ज्याला | त्याला |
| | | |
| ती | जी | ती |
| | जिने | तिने |
| | जिच्याशी | तिच्याशी |
| | जिला | तिला |
| | | |
| ते | जे | ते |
| | ज्याने | त्याने |
| | ज्याच्याशी | त्याच्याशी |
| | ज्याला | त्याला |
| | | |
| ते / त्या / ती | जे / ज्या / जी | ते / त्या / ती |
| | ज्यांनी | त्यांनी |
| | ज्यांच्याशी | त्यांच्याशी |
| | ज्यांना | त्यांना |

## २१ जान्हवी आणि तिचा जोडीदार

▶अ॰पु॰ १९-२०

**१. आता हा उतारा वाचू या.**

कालपासून जान्हवी अगदी गप्पगप्प आणि उदास आहे. एरवी एवढी दंगा करणारी, हसरी मुलगी! का आली ही वेळ तिच्यावर? तिने ज्याच्यावर मनापासून प्रेम केले, ज्याच्यासाठी आई-वडिलांचा राग ओढवून घेतला, ज्याच्यामुळे तिला नोकरीही सोडावी लागली, त्याच्यामुळेच ही वेळ आली तिच्यावर. तो गेला; मागे वळूनही न पाहता निघून गेला.

**२. खालील उताऱ्यातील मोकळ्या जागा भरू या.**
(ज्याला - ५, ज्याच्यात, ज्याच्याहून, ज्याच्याशी, ज्याने - २)

उदा॰ ज्याला पाहताच ती प्रथमदर्शनी प्रेमात पडली, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

क. मागचा-पुढचा विचार न करता ती .................... घरी घेऊन आली, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

ख. आपल्या घरच्या रीतिभाती तिने .................... मन लावून शिकवल्या, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

ग. .................... तिने आपले सर्वस्व मानले, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

घ. .................... तिने इतका जीव लावला, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

च. .................... जगात काहीच महत्त्वाचे आणि अमूल्य असे तिला वाटायचे नाही, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

छ. .................... गप्पा मारताना तिला जगाचे भानही नसायचे, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

ज. .................... काहीही केले तरी तिने नेहमी माफच केले, त्याने जाताना मागे वळूनही नाही पाहिले.

झ. .................... सांभाळताना तिला वेळोवेळी खोटेही बोलावे लागले, तिला सोडून तो मागे वळून न पाहता निघून गेला.

ट. .................... खाण्यापिण्याच्या वेळा सांभाळताना तिची ओढाताण झाली, तो मागे वळून न पाहता निघून गेला.

ठ. .................... तिला वेळी अवेळी फिरण्यासाठी घरातून बाहेर पडायला लावले, तो गेला, मागे वळूनही न पाहता निघून गेला.

जान्हवीला सोडून जाणारा हा आहे तरी कोण? याचे उत्तर हवे आहे ना तुम्हाला? चला तर मग, अभ्यासपुस्तकात याचे उत्तर शोधू या!

## २२ थोडी गंमत

▶ अ॰पु॰ १८

| | | |
|---|---|---|
| जिथे बाग, तिथे फुले | इकडे आड, तिकडे विहीर | पूर्वी मुलगी, आता बाई |
| जिथे शाळा, तिथे मुले | इकडे माडी, तिकडे गाडी | पूर्वी ताई, आता आई |
| इथे चित्र, तिथे मित्र | आधी प्रश्न, मग उत्तर | अगोदर गम्मत, नंतर जम्मत |
| इथे भेळ, तिथे खेळ | आधी दाम, मग काम | अगोदर स्वैपाक, नंतर पंगत |

२. आता तुम्ही – तुम्हाला सुचताहेत का काही मजेशीर जोड्या?

**तुमच्या मदतीसाठी हे काही शब्द –**

आजी - भाजी, खड्डा - गड्डा, पोळी - गोळी, पाणी - लोणी, भांडण - तंटण , किडा - विडा, मुद्दा – गुद्दा

जिथे ........................ ........................

........................ ........................

........................ ........................

........................ ........................

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ ढग - पाऊस | |
| जिकडे ढग, तिकडे पाऊस | जिकडे ढग, तिकडे पाऊस |
| पैसा - गर्दी | जिकडे पैसा, तिकडे गर्दी |
| गुलाब - काटे | जिकडे गुलाब, तिकडे काटे |
| आई - बाळ | जिकडे आई, तिकडे बाळ |
| झाड - सावली | जिकडे झाड, तिकडे सावली |
| पुस्तक - ज्ञान | जिकडे पुस्तक, तिकडे ज्ञान |
| चोर पळाला - पोलीस पळाले | जिकडे चोर पळाला, तिकडे पोलीस पळाले |



## २३ व्यावहारिक मराठी

**नियम**

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई
दिनांक: ९/६/२००६

मुंबई पोलिस कायदा, १९५१
क्रमांक : १२७६/कक्ष-१०, चित्रपटशाखा / ०६

सिनेमाव्यतिरिक्त अन्य मनोरंजनाच्या जागा आणि पूलखेळ, पार्लर्स, संगणकीय खेळ, सायबरकॅफे, इंटरनेट किंवा आंतरजाल कनेक्टिव्हिटीसह खेळ, बोलिंगॲली, पत्ते खेळण्याच्या खोल्या, सोशलक्लब, स्पोर्टस् क्लब, डिस्को, मेळे व तमाशा यांसह सार्वजनिक मनोरंजनाच्या प्रयोगांना परवानगी देणे व त्यांचे नियंत्रण करणे याबद्दल नियम १९६० या नियमावलीत दुरुस्ती करण्याच्या मसुद्याच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग चार-क मध्ये अधिसूचना दिनांक २४ ऑगस्ट २००६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

**सायबर कॅफे, संगणक किंवा वास्तवाभासी खेळांसाठी विशेष नियमावली :**

**२४६ : वैयक्तिक ओळख -**

(अ) सायबर कॅफेला भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने कोणतीही अधिप्रमाणित फोटो ओळख - पत्रिका, पारपत्र, महाविद्यालयाचे ओळखपत्र, पॅनकार्ड, वाहन चालक परवाना, कार्यालयीन ओळखपत्र वगैरे सादर करणे आवश्यक राहील.

(ब) परवानगी दिलेल्या प्रत्येक सायबर कॅफेने वापरण्याची प्रत्यक्ष रोजवही लिहून ठेवणे आवश्यक राहील व त्यातील मजकूर वापरणाऱ्याने स्वतः लिहिला पाहिजे.

**२४७ : प्रत्यक्ष मांडणी -**

(अ) सायबर कॅफेमध्ये संगणक वापरणाऱ्या एका व्यक्तीला संगणक वापरणाऱ्या इतर व्यक्तींपासून वेगळे करील असे पूर्णपणे बंदिस्त विभाजन सायबर कॅफेमध्ये असता कामा नये.

(ब) सायबर कॅफेच्या आत कोणतेही विभाग (विभाजन) बसवण्यात किंवा बांधण्यात आले असल्यास त्याची उंची जमिनीच्या पातळीपासून साडेचार फुटांपेक्षा जास्त असता कामा नये.

| शब्द | अर्थ | उदाहरण |
|---|---|---|
| **व्यतिरिक्त** | एखादी व्यक्ती किंवा वस्तू सोडून | त्याव्यतिरिक्त तो दुसरा कोणताही विचार करत नाही. |
| **संगणक** | कॉम्प्युटर | संगणकावर जगभराची माहिती मिळते |
| **तमाशा** | महाराष्ट्रातील एक लोककला | तमाशा बघायला लोकांना मज्जा वाटते. |
| **नियंत्रण** | एखाद्या गोष्टीवर ताबा असणे | गाडी चालवताना गाडीवर नियंत्रण ठेवावं लागतं. |
| **दुरुस्ती** | बिघडलेली वस्तू चांगली करणे | मी पंखा दुरुस्त करतोय. |
| **मसुदा** | कच्चा लिहिलेला लेख | मसुद्यात काही सुधारणा असतील तर सांगा. |
| **राजपत्र** | सरकारी नवे नियम आणि प्रमुख सूचना प्रकाशित करणारी सरकारी पत्रिका | राजपत्रात एखाद्या राज्य किंवा विभाग इत्यादींशी संबंधित गोष्टी प्रकाशित होतात. |
| **अधिसूचना** | सरकारी सूचना | परीक्षेबद्दल अचानक अधिसूचना आली आणि सगळ्या शाळांमध्ये गडबड उडाली. |
| **प्रसिद्ध** | विख्यात, प्रख्यात | लता मंगेशकर या एक प्रसिद्ध गायिका आहेत. |
| **वैयक्तिक** | फक्त व्यक्तीशी / स्वतःशी संबंधित | दुसऱ्याच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावू नये. |
| **सादर करणे** | प्रस्तुत करणे / मांडणे / दाखवणे | वार्षिक सर्वसाधारण सभेत सचिवांनी वार्षिक अहवाल सदर केला. |
| **मजकूर** | लिहून काढलेला विचार | तू पत्रातला मजकूर वाचलास का? |

**१.१. चूक की बरोबर ते लिहू या.**

| | चूक | बरोबर |
|---|---|---|
| क) वरील अधिसूचना वीजवापराबद्दल आहे. | | |
| ख) सायबर कॅफेला भेट देणाऱ्या व्यक्तीने ओळखपत्रिका न दिल्यास त्याला प्रवेश मिळणार नाही. | | |
| ग) परवानगी दिलेल्या प्रत्येक सायबर कॅफेने डायरी लिहून ठेवावी. | | |
| घ) सायबर कॅफेच्या आत विभाग केल्यास बक्षीस मिळेल. | | |

**२. योग्य पर्याय निवडू या.**

क) सिनेमाव्यतिरिक्त म्हणजे

१) सिनेमाशिवाय  २) फक्त सिनेमा  ३) सिनेमामध्ये

ख) संगणकीय खेळांसाठी कशाची आवश्यकता आहे?

१) कॉम्प्युटर / संगणक  २) वही  ३) फळा

ग) घराची मांडणी करणे म्हणजे

१) घराची भिंत रंगवणे  २) घराचे विभाजन करणे  ३) घराची रचना करणे

घ) वरील परिच्छेदात 'प्रयोग' हा शब्द कशासाठी वापरला गेला आहे?

१) वैज्ञानिक प्रयोगासाठी  २) कार्यक्रमासाठी  ३) वाक्यरचनेचा प्रकार म्हणून

च) परवाना देणे म्हणजे

१) पैसे देणे  २) मान देणे  ३) परवानगी देणे

छ) गाडी चालवताना आपला गाडीवर ताबा असणे म्हणजे

१) नियंत्रण असणे  २) संयम बाळगणे  ३) सत्ता असणे

ज) अधिसूचना कशाबद्दल आहे?

१) सायबर कॅफेबद्दल  २) वैयक्तिक माहितीबद्दल  ३) सुट्टीबद्दल

झ) वैयक्तिक ओळख म्हणजे

१) स्वतःबद्दलची माहिती सांगणे  २) इतरांबद्दलची माहिती सांगणे

३) एखाद्या जागेबद्दलची माहिती

ट) हजर करणे म्हणजे
१) पैसे देणे २) देणे / प्रस्तुत करणे ३) हजर असणे

ठ) दुरुस्ती करणे म्हणजे
१) बिघडणे २) सुधारणे ३) बिघडवणे

ड) 'राहुल उद्यापासून इथे असता कामा नये' म्हणजे
१) काम नसणे २) काम असणे ३) असू नये

**३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहू या.**

क) नियम १९६० कशासाठी आहे?

........................................

........................................

ख) सायबर कॅफेतील विभाजन कसे व कुठपर्यंत असावे?

........................................

........................................

ग) सायबर कॅफेत प्रवेशासाठी कोणकोणत्या गोष्टी लागतात?

........................................

........................................

घ) वरील परिच्छेदातील कोणत्याही तीन खेळांची नावे लिहू या.

........................................

........................................



**४. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरू या.**

(ठेवावी, असावे, करावी, नसावी)

क) सायबर कॅफेत प्रवेश करणाऱ्याने ओळखपत्रिका हजर ............................................ .

ख) सायबर कॅफेच्या मालकाने रोजवही लिहून ............................................ .

ग) सायबर कॅफेमध्ये बंदिस्त कक्षिका ............................................ .

घ) सायबर कॅफेच्या आतले कोणतेही विभाजन जास्तीत जास्त साडेचार फुटांपर्यंत ............................................ .

**५. कंसात दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप लिहू या.**

उदा॰ आम्हा सर्वांना पूल (खेळणे) खेळायला आवडतं.

क) रूपाला पार्लरला (जाणे) .................................... वेळ लागेल.

ख) मला इंटरनेट सर्फ (करणे) .................................... शिकवशील का?

ग) तुला (नाचणे) .................................... काय झालंय?

घ) तमाशा (बघणे) .................................... त्याला आवडतं.

च) मेळ्यात पाकिट (मारणे) .................................... आलेल्या चोराला पोलिसांनी पकडलं.

## २४ खालील वाक्ये वाचू या.

१. माझं पेन, फाईल, लॅपटॉप आणि कागदपत्रे नेहमी हरवतात.
२. माझी फाईल, पेन, कागदपत्रे, आणि लॅपटॉप नेहमी हरवतो.
३. माझा लॅपटॉप, फाईल, कागदपत्रे, आणि पेन नेहमी हरवते.
४. माझी कागदपत्रे, पेन, लॅपटॉप आणि फाईल नेहमी हरवते.

**टीप :**

एखाद्या वाक्यात एकापेक्षा अधिक नामे येताना त्यांतील पहिल्या नामाचे लिंग व वचन सुरुवातीच्या नाम / सर्वनाम / विशेषण याला लागू होते, तर, शेवटच्या नामाचे लिंग व वचन क्रियापदाला लागू होते.

**वरीलप्रमाणे वाक्ये तयार करू या.**

१. मुलांनी पहिलं अक्षर, शब्द, ओळी आणि वाक्ये पाठ करावीत.

२. मी चांगली कविता, नाटक, लेख आणि कादंबऱ्या वाचल्या आहेत.

३. दिवसभर सारखा चहा, कॉफी, सरबते आणि ताक पोटात गेले.

४. परवडणारी टेबले, खुर्ची, कपाट आणि पंखे कुठे मिळतात?

५. बाबाने केलेले वडे, आमटी, भात आणि कोशिंबीर फस्त झाली.

## २५ एक चित्रफीत पाहू या.

**१. काकडी आणि बीटाची कोशिंबीर बनवण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या गोष्टी लागतात?**

| साहित्य | हो | नाही |
|---|---|---|
| क. काकडी | | |
| ख. बीट | | |
| ग. दूध | | |

| | | |
|---|---|---|
| घ. हिरवी मिरची | | |
| च. दही | | |
| छ. मीठ | | |
| ज. कोथिंबीर | | |
| झ. साखर | | |
| ट. आमचूर | | |
| ठ. कढीपत्ता | | |
| ड. लोणी | | |

**२. आता गाळलेल्या जागी योग्य अर्थाच्या क्रियापदाचं योग्य रूप लिहू या.**

क. प्रथम एका बाऊलमध्ये काकडीचा कीस आणि दुसऱ्या बाऊलमध्ये बीटाचा रस ................................ .

ख. दोन्ही बाऊलमध्ये दही ................................ . दोन्ही बाऊलमध्ये थोडी थोडी कोथिंबीर, साखर, मीठ, आमचूर आणि हिरवी मिरची घालून दोन्ही कोशिंबिरी एकजीव करून ................................ .

**३. आता ही चित्रफीत पुन्हा पाहू या. या चित्रफितीमध्ये पुढील तिन्ही वाक्यांत एक शब्द चुकीचा दिला आहे. तो ओळखून योग्य पद्धतीने लिहू या.**

क. बीटाचा ................................

ख. काकडीचा ................................

ग. प्रथम एका बाऊलमध्ये काकडीचा किस आणि दुसऱ्या बाऊलमध्ये बीटाचा ................................ घ्यावा.

**म्हणी आणि वाक्प्रचार**

ऐकावे जनाचे करावे मनाचे

ज्याचं करावं बरं, तो म्हणतो माझंच खरं

एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारू नये

अंथरूण पाहून पाय पसरावेत

पेरावे तसे उगवते

स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे

### संभाषण करू या.

स्वतःच काही ना काही गोंधळ घालणे
गडबड करणे
काम व्यवस्थित पार पाडणे
कामात व्यत्यय येणे
कामात दखल देणे
कामातला उत्साह संपणे
कामाचे निरीक्षण करणे
कामाचे परीक्षण करणे
अवघड काम पत्करणे

### शब्दसंपदा

### नाम : जोडशब्द

| |
|---|
| ती लपाछपी |
| ती लपवाछपवी |
| ती टोलवाटोलवी |
| ती ओढाताण |
| ती दमछाक |
| ती धावपळ |
| ती धावाधाव |
| ती पडापड |
| ती घडामोड |
| ती अळमटळम |
| ती थरथर |
| ती मळमळ |
| ती देवाणघेवाण |









## चिंटू


चिंटू, ऊठ.
थोड्या वेळानं.
अंघोळीला जा.
थोड्या वेळानं.
दप्तर भरलं का ?
थोड्या वेळानं.
आई गं, भूक. मला एक...
थोड्या वेळानं.
©चारुहास पंडित


सकाळी उठून आई-वडिलांना नमस्कार करावा. सगळं आवरून अभ्यास करावा.
शाब्बास !
असं केल्यानं काय होतं ?
असं लिहील्यानं निबंधात चांगले मार्क मिळतात !
©चारुहास पंडित


छे ! फारच दमले मी !
का ?
चिंटूला त्याचं कपाट आवरायला लावलं.
मग आवरलं ना त्यानंच ?
हो. त्यामुळे नंतर मला त्याच्याहून जास्त आवरा-आवरी करायला लागली !
©चारुहास पंडित

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो नकाशा, ते नकाशे | ती जखम, त्या जखमा | ते स्वप्न, ती स्वप्ने / ती स्वप्नं |
| तो अनुभव, ते - | ती परी, त्या पऱ्या | ते प्रोत्साहन, ती प्रोत्साहने / ती प्रोत्साहनं |
| तो तंटा, ते तंटे | ती टेकडी, त्या टेकड्या | ते प्रदूषण, ती प्रदूषणे / ती प्रदूषणं |
| | ती कादंबरी, त्या कादंबऱ्या | |
| | ती कविता, त्या - | |
| | ती रचना, त्या - | |
| | ती चिठ्ठी, त्या चिठ्ठ्या | |
| | ती वाट, त्या वाटा | |
| | ती सावली, त्या सावल्या | |
| | ती धुंदी, - | |

| क्रियापद | विशेषणे | इतर शब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| न्याहाळणे | खरी | नावीन्य | सतत |
| जिंकणे | हसरी | | अचानक |
| कमवणे | लाजरी | | केवळ |
| आवरणे | देखणा | | |
| गोंजारणे | शहाणा | | |
| उडवणे | सडपातळ | | |
| विसरणे | नम्र | | |
| हरवणे | वैयक्तिक | | |
| मळवणे | निर्जीव | | |
| | ठराविक | | |





## आता मला हे येतं...

**विध्यर्थ, आज्ञार्थ : सकारात्मक / नकारात्मक**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सर्वनाम + तृतीया + क्रियापदाचे विध्यर्थ रूप**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**कधीतरी / काहीतरी**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सूचना देणे / सल्ला देणे / नियम सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**हवंय / नकोय**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जिथे / तिथे, पूर्वी / आत्ता, आधी / मग, अगोदर / नंतर**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**जोड क्रियाविशेषणे : इकडेतिकडे, रात्रीअपरात्री ...**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# भ्रमंती

## ९



## चला, शिकू या...

- प्रवास, सुट्टी, सहल यांबद्दल सांगणे
- मुख्य शहरांची व पर्यटनस्थळांची माहिती सांगणे
- सामान्य भूतकाळ (सकर्मक)
- विशेषनाम, सामान्यनाम, सर्वनाम, क्रियापद + शब्दयोगी अव्यय
- -ऊन, -हून, -पासून, -पर्यंत, -कडून
- प्रश्नशब्द : कोणी, कोणाशी, कुठे
- प्रश्नशब्द + शब्दयोगी अव्यय (कुठे + पर्यंत = कुठपर्यंत)

## १ चला, जग फिरू या.

१. ही ठिकाणे कुठे आहेत?

क.



ख.



ग.



घ.



च.



| | | |
|---|---|---|
| १. | युरोप | |
| २. | ऑस्ट्रेलिया | |
| ३. | अमेरिका | |
| ४. | आशिया | |
| ५. | आफ्रिका | |

२. तुम्ही कोण-कोणते देश पाहिले आहेत?

.............................................................................................................

३. तुम्हाला कोणते देश पाहण्याची इच्छा आहे?

.............................................................................................................

## २ भटकंती

▶अ.पु. १-२

**१. वाचू या.**



- वर्षाऋतू जेवढा लोभस, भटकण्यासाठी ओढून नेणारा, तेवढाच असुरक्षित... कुठल्याही ट्रेक-सहलीला जाण्यापूर्वी त्या जागेची आणि ट्रेकची पूर्ण माहिती घ्यावी. अज्ञात ठिकाणी जाताना अनुभवी मार्गदर्शक आणि माहिती-पुस्तक घेऊनच बाहेर पडावे.
- पाऊस, ढग, वारा यांमध्ये रस्ता चुकण्याचा, चिखलात पाय घसरून अपघात होण्याचा धोका असतो. अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.
- प्रवास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने होणार असेल तर वेळापत्रक लक्षात ठेवावे आणि स्वतंत्र वाहन असेल तर आवश्यक दुरुस्ती-साहित्य बरोबर बाळगावे.
- निवासी ट्रेक असल्यास अगदीच निर्जन स्थळी मुक्काम करण्याऐवजी सुरक्षित जागी उघड्यावर, जवळच्या गावातील एखाद्या घरी किंवा मंदिरात मुक्काम करावा.
- ट्रेक करताना पायात योग्य बूट घालावेत. चप्पल, सँडलवर ट्रेक करू नये.
- ओल लागू नये म्हणून सॅकमधील सर्व सामान एखाद्या मोठ्या बॅगमध्ये घ्यावे. कॅमेरा, लेन्स, मोबाईल, चार्जर यांची विशेष काळजी घ्यावी.
- अवघड ट्रेक करताना आपल्याबरोबर दोरी, टॉर्च, काडेपेटी, मेणबत्ती, पॅक्ड फूड, आवश्यक औषधे आणि ओळखपत्र घेण्यास विसरू नये. या ओळखपत्रात नाव-पत्ता-संपर्क-क्रमांक ही माहिती असावी.
- मद्यपान, कर्कश गाणी, धिंगाणा टाळावा. स्थानिक नागरिकांशी नम्रपणे वागावे. त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. जमल्यास त्यांच्यासाठी आणि तिथल्या निसर्ग-पर्यावरणासाठी काही मदत करावी.
- शेवटी सर्वात महत्त्वाचे : कुठल्याही स्थळी गेलात तरी तिथल्या निसर्गसौंदर्याचा आनंद जरूर घ्यावा; पण त्यात हस्तक्षेप आणि प्रदूषण करणे टाळावे! निसर्गात आपल्या पाऊलखुणांशिवाय मागे काही ठेवू नये आणि गोड आठवणींशिवाय तिथून काही घेऊन जाऊ नये.

२. जोड्या लावू या.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | आनंद | १. | घालावेत |
| ख. | माहिती | २. | बाळगावे |
| ग. | बूट | ३. | करावी |
| घ. | मदत | ४. | घ्यावा |
| च. | साहित्य | ५. | घ्यावी |
| छ. | लक्षात | ६. | करावा |
| ज. | मुक्काम | ७. | ठेवावे |

क. .................... ख. ....................

ग. .................... घ. ....................

च. .................... छ. ....................

ज. ....................

## ३ विनोद

**जोश्यांच्या दुकानाला लागली आग!**

जोश्यांच्या दुकानाला दुपारी आग लागली. आतून धूर येऊ लागला. कोणी तरी फोन केला आणि आगीचा बंब येऊन पोचला. दुकान बंद होते म्हणून जोश्यांना फोन लावला.

जोशी म्हणाले, "आत्ता दुकान बंद आहे. ४ वाजता या. आधी यायचा प्रयत्न करू नका."




## ४ कुठपासून कुठपर्यंत? आधी जोड्या लावू या, मग वाक्ये बनवू या.

उदा॰ डोक्यापासून पायापर्यंत अंग स्वच्छ धू!

| | |
|---|---|
| १. डोक्यापासून पायापर्यंत | क. प्रेमाने वागणे |
| २. 'अथ'पासून 'इति'पर्यंत | ख. अंग धुणे |
| ३. पायापासून कळसापर्यंत | ग. पुस्तक वाचणे |
| ४. जन्मापासून मरणापर्यंत | घ. मंदिर बांधणे |
| ५. लहानांपासून थोरांपर्यंत | च. मुळाक्षरे शिकणे |
| ६. अ पासून ज्ञ पर्यंत | छ. श्वासोच्छ्वास करणे |



## ५ सांगता येईल?

**आंतरराष्ट्रीय वाररेषा ओलांडताना, एखाद्या व्यक्तीला कुठून कुठे जाताना एक दिवस अधिक धरावा लागेल?**

१) पूर्वेकडून पश्चिमेकडे २) पश्चिमेकडून पूर्वेकडे ३) दक्षिणेकडून उत्तरेकडे
४) उत्तरेकडून दक्षिणेकडे






## ६ मीच स्वतःला दिलेली एक भेट. पाहू या कशी आहे ती?

मी माझ्या पहिल्या पगारातून <u>**स्वत:कडूनच**</u> स्वत:ला भेट म्हणून मनाली ट्रेक करायचं ठरवलं. त्याची माहिती करून घेण्यासाठी मी खूप भटकंती करणाऱ्या माझ्या एका <u>**काकाकडून**</u> एक माहितीपुस्तक घेतलं. आमच्या जवळच्या <u>**दुकानदाराकडून**</u> मनालीचा एक नकाशाही घेतला. माझी एक मैत्रीण नेहमीच ट्रेक करते म्हणून मी तिच्याकडून एक तंबू घेतला. <u>**दादाकडून**</u> वाढदिवसाची भेट म्हणून एक मोठी सॅक घेतली आणि <u>**ताईकडून**</u> ट्रेकिंगचे खास बूट घेतले. <u>**बाबांकडून**</u> गरम कपडे घेतले आणि शेवटी याव्यतिरिक्त सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे <u>**आईकडून**</u> चार सल्लेही घेतले. अशी होती ही <u>**माझ्याकडूनच**</u> मलाच मिळालेली छोटीशी भेट.

| कोणाकडून? | काय? |
|---|---|
| उदा॰ स्वतःकडून | मनाली ट्रेक |
| | |
| | |
| | |
| | |

## ७ कुठून कुठे?



**१. महाराष्ट्रातील काही मुख्य नद्या - कुठून, कशा, कुठे वाहतात?**

इंद्रायणी नदी लोणावळ्याजवळ उगम पावते आणि तुळापूर गावाजवळ भीमा नदीला मिळते. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरमधून वाहणारी चंद्रभागा नदी म्हणजेच भीमा नदी. भीमा महाराष्ट्रात भीमाशंकरजवळ उगम पावते आणि कर्नाटक व तेलंगणातून वाहत रायचूरजवळ कृष्णेला मिळते. गोदावरीचा उगम नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर या ठिकाणी होतो. गोदावरी नदी आंध्रप्रदेशात काकीनाडाजवळ बंगालच्या उपसागराला मिळते. कृष्णा ही नदी महाबळेश्वरजवळ उगम पावून आंध्रप्रदेशातील राजमहेंद्रीजवळ बंगालच्या उपसागराला मिळते. वाटेमध्ये ती कऱ्हाड, औदुंबर, सांगली, नरसोबाच्या वाडीवरून कर्नाटकात प्रवेश करते. प्रवरा ही नदी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात रतनगड इथे उगम पावते. हिला मुळा, आढळा, म्हाळुंगी या उपनद्या आहेत. ही नदी पुढे गोदावरीला जाऊन मिळते.

**२. या नद्या कुठे उगम पावतात ? प्रश्न आणि उत्तरांची वाक्ये लिहू या.**

उदा॰ इंद्रायणी (लोणावळा) - प्रश्न - इंद्रायणी नदी कुठे उगम पावते?
उत्तर - इंद्रायणी नदी लोणावळ्याजवळ उगम पावते.

क. भीमा (भीमाशंकर) -

........................................

ख. गोदावरी (त्र्यंबकेश्वर) -

........................................

ग. कृष्णा (महाबळेश्वर) -

........................................

घ. प्रवरा (रतनगड) -

........................................

**३. या नद्या कुठून कुठे वाहतात आणि कुठे जाऊन मिळतात?**

उदा॰ इंद्रायणी (लोणावळा / तुळापूर / भीमा)

इंद्रायणी नदी लोणावळ्यापासून तुळापूर गावापर्यंत वाहते आणि तिथे भीमा नदीला मिळते.

क. भीमा (भीमाशंकर / रायचूर / कृष्णा)

........................................................................................................

ख. गोदावरी (त्र्यंबकेश्वर / काकिनाडा / बंगालचा उपसागर)

........................................................................................................

ग. कृष्णा (महाबळेश्वर / राजमहेंद्री / बंगालचा उपसागर)

........................................................................................................

घ. प्रवरा (रतनगड / गोदावरी)

........................................................................................................

## व्याकरण '-ऊन', '-हून'

| एकवचन | अनेकवचन | |
|---|---|---|
| मी | आम्ही | आपण |
| माझ्याहून | आमच्याहून | आपल्याहून |
| तू | तुम्ही | आपण |
| तुझ्याहून | तुमच्याहून | आपल्याहून |
| तो | ते | |
| त्याच्याहून | त्यांच्याहून | |
| ती | त्या | |
| तिच्याहून | त्यांच्याहून | |
| ते | ती | |
| त्याच्याहून | त्यांच्याहून | |

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| जो | जे |
| ज्याच्याहून | ज्यांच्याहून |
| जी | ज्या |
| जिच्याहून | ज्यांच्याहून |
| जे | जी |
| ज्याच्याहून | ज्यांच्याहून |

## ८ सर्वनामांचे 'ऊन', 'हून' वापरून योग्य रूप लिहू या.

उदा॰ ऋतुजाहून राहुल जग जास्त फिरला आहे.
तिच्याहून राहुल जग जास्त फिरला आहे.

१. नर्मदेहून गंगा नदी मोठी आहे.
.................................... (ती) (ए॰व॰) गंगा नदी मोठी आहे.

२. बाबाहून त्याची मुलं जास्त उंच झाली आहेत.
(तो) .................................... त्याची मुलं उंच झाली आहेत.

३. विमानाच्या प्रवासाहून मला रेल्वेचा प्रवास आवडतो.
(तो) .................................... मला रेल्वेचा प्रवास आवडतो.

४. आई आणि बाबाहून मी कमी ट्रेक केले आहेत.
(ते) (अ॰व॰) .................................... मी कमी ट्रेक केले आहेत.

५. तुझ्याहून अश्विनीला ट्रेकविषयी जास्त कळतं.
(मी) .................................... अश्विनीला ट्रेकविषयी जास्त कळतं.

## ९ खालील वाक्ये उदाहरणाप्रमाणे पूर्ण करू या.

▶अ॰पु॰ ३

उदा॰ ही गाडी सुरतेहून मुंबईला जाते.

१. हे विमान (दिल्ली) (क) .................................... (मुंबई) (ख) .................................... जाते.

२. ही बस (वान्द्रा) (ग) .................................... (डोंबिवली) (घ) .................................... जाते.

३. ही टॅक्सी (अंधेरी) (च) .................................... (मालाड) (छ) .................................... जाते.

४. हे जहाज (चेन्नई) (ज) .................................... (सिंगापूर) (झ) .................................... जाते.

५. हा रस्ता (नाशिक) (ट) .................................... (औरंगाबाद) (ठ) .................................... जातो.

## १० क्रियापदाला '-ऊन' हा प्रत्यय जोडून खालील परिच्छेद पूर्ण करू या.

आज मंगेश सकाळी लवकर (उठणे) उठून अभ्यासाला बसणार होता. पण थंड वातावरणामुळे त्याला परत झोप लागली. (१) (झोपणे) .................... उठल्यावर त्याने घड्याळ बघितले तेव्हा तो (२) (दचकणे) .................... जागा झाला. आता नाश्ताच (३) (करणे) ....................आपण अभ्यास करावा, असा त्याने विचार केला. मग त्याने ठरवले की नाश्ता करता करता आपण टीव्हीवर एखादा कार्यक्रम बघावा आणि कार्यक्रम (४) (बघणे) .................... झाल्यावर अभ्यास करावा. कार्यक्रम संपेपर्यंत परत दुपारच्या जेवणाची वेळ झाली. मग त्याने ठरवले की आपण आता (५) (जेवणे) .................... झाल्यावरच अभ्यास करू या. जेवताना गोड पदार्थ जास्त खाल्ल्यामुळे त्याला परत झोप येऊ लागली. झोप झाल्यावर आपण ताजेतवाने होऊ या विचाराने तो परत झोपी गेला. (६) (झोपणे) .................... उठल्यावर त्याला मित्रांनी खेळायला बोलावले म्हणून तो खेळायला गेला. आईने विचारल्यावर त्याने आईला वचन दिले की (७) (खेळणे) .................... झाल्यावर मी नक्की माझा अभ्यास पूर्ण करेन. अशा विविध गोष्टी करण्यातच त्याचा सबंध दिवस वाया गेला आणि शेवटी अभ्यास तसाच राहिला.

## ११ 'कोणी', 'कोणाशी', 'कुठे' या प्रश्नांची उत्तरे चौकटीत भरू या.

उदा. सिडने नेपाळला जाऊन तिथल्या काही लोकांशी खूप छान मैत्री केली.

१. आग्र्याला असताना तनयाने तिच्या भावाशी भांडण केले.
२. दाल लेकचे सौंदर्य पाहण्यात कबीर मग्न झाला होता. तिथे असेपर्यंत कुणाशी काहीच बोलला नाही.
३. निशाने परदेशी जाण्यापूर्वीच घरबसल्याच तेथील काही स्थानिक लोकांशी संपर्क साधला.
४. मायराने ऋषीशी बोलून ऑफिसमध्येच एका पिकनिकचा बेत आखला.
५. एव्हरेस्ट सर केलेल्या एका २१ वर्षांच्या मुलीशी पत्रकारांनी तिच्या घरी जाऊन संवाद साधला.

| कोणी? | कोणाशी? / काय? | कुठे? |
|---|---|---|
| सिडने | लोकांशी / मैत्री | नेपाळमध्ये |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

## १२ सिडची गोष्ट : रस्त्यावर क्रिकेट?

**१. प्रथम खालील सर्व चित्रे योग्य त्या क्रमाने लावू या.**

क



ख



ग



घ



च



छ




द्रविड कुटुंबीय आले आहेत गोव्याला सुट्टी घालवायला. आई, बाबा, सिड आणि केया. समुद्रकिनाऱ्याजवळील शांत रस्त्याने चौघे मजेत सायकल चालवत असताना हे काय झाले?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उदा॰ १ - क | २. | ३. | ४. | ५. | ६. |

**२. आता सर्व घटना क्रमवार सांगू या.**

**३. झालेली घटना सिड आपला मित्र अभि याला १० – १२ वाक्यांत ई-मेलने कळवतो. चला, सिडसाठी आपणच हा ई-मेल लिहू या. (साधा / पूर्ण भूतकाळ)**

प्रिय अभि,

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

**४. यापुढे या गोष्टीत काय झाले असेल? कल्पना करू या आणि आणखी काही ओळी लिहू या.**

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## १३ ऊन (तून) / हून

**मोकळ्या जागा भरू या.**

उदा॰ नेहाहून तिचं बाळ हुशार आहे.

१. तोतापुरी (आंबा) ........................ हापूस आंबा वेगळा असतो.

२. माझ्या (हात) ........................ भांडे पडले यावर माझा विश्वासच बसत नाही.

३. (घर) ........................ बाहेर पडताच रणरणते ऊन अंगावर आले.

४. पुण्याच्या (थंडी) ........................ दिल्लीची थंडी हाडे गोठवणारी असते.

५. मुंबईच्या (ऊन) ........................ नागपुरात जास्त कडक ऊन पडते.

६. (दिल्ली) ........................ आग्र्याला जायला ३ तास तरी लागतील.

७. (आई) ........................ मुले जास्त उंच झाली आहेत.

८. (रिक्शा) ........................ हिंडायला फारच मजा येते.

९. मी आता (सातारा) ........................ चार दिवसांनी घरी परत आलो आहे.

१०. (ग्रंथालय) ........................ एका वेळी एकच पुस्तक नेण्यास परवानगी आहे.

११. चैतालीने विचारले, बाबा (मुंबई) ........................ माझ्यासाठी काय आणशील?

१२. मंगेश (शाळा) ........................ परस्पर गाण्याच्या शिकवणीला जातो.

**टीप :**

‘हून’ = स्थलवाचक / तुलनात्मक

## १४ प्रवासाची पुढील साधने ओळखू या.

**१. चित्र आणि प्रवासाची साधने / प्रवासाचे प्रकार यांच्या जोड्या लावू या आणि मग लिहू या.**

(बस, गरम हवेचा फुगा, फेरीबोट, घोडा, घोडागाडी, रिक्षा, मेट्रो, हाउसबोट, स्लेज, सायकलरिक्षा, गोंडोला, ट्राम, पायी)



........................................



........................................



........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................



..........................................

**२. तुम्ही कोणत्या गावात कोणते प्रवासाचे साधन वापरले?**

| | | |
|---|---|---|
| क. मुंबई | ख. कोलकाता | ग. दिल्ली |
| घ. श्रीनगर | च. पहेलगाम | छ. महाबळेश्वर |
| ज. माथेरान | झ. लखनौ | ट. गोवा |
| ठ. बंगळुरू | ड. व्हेनिस | ढ. पुणे. |

उदा॰ ड. व्हेनिस - गोंडोला : मी व्हेनिसमध्ये गोंडोलाने प्रवास केला.

**सकर्मक क्रियापदांचा भूतकाळ**

| सर्वनाम | + तृतीया | (तो) ग्रंथ | (ते) ग्रंथ | (ती) कादंबरी | (त्या) कादंबऱ्या | (ते) पुस्तक | (ती) पुस्तके |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | मी | वाचला | वाचला | वाचली | वाचल्या | वाचले / वाचलं | वाचली |
| आम्ही / आपण | आम्ही / आपण | | | | | | |
| तू | तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | त्याने | | | | | | |
| ती | तिने | | | | | | |
| ते | त्याने | | | | | | |
| ते | त्यांनी | | | | | | |
| त्या | | | | | | | |
| ती | | | | | | | |

**टीप :**

वरीलप्रमाणेच : (ह - हिला) पाह - पाहिला,
राह - राहिला, लिह - लिहिला, वाह - वाहिला
**अपवाद :** पोह - पोहला





| सकर्मक क्रियापद (अनियमित) | भूतकाळ - (तृ॰ ए॰ व॰ पु॰) |
|---|---|
| सांगणे, मागणे, बघणे, घालणे | सांगितले / सांगितलं, मागितले / मागितलं, बघितले / बघितलं, घातले / घातलं |
| करणे | केले / केलं |
| पिणे, भिणे | प्याला / प्यायला, भ्याला / भ्यायला |
| देणे | दिला |
| म्हणणे | म्हणाला (कर्तरी प्रयोग) |
| घेणे | घेतला |
| खाणे | खाल्ले |

**टीप :**

पिणे : तो पाणी प्याला / प्यायला. (कर्तरी प्रयोग)

त्याने पाणी प्याले / प्यायले / प्यालं / प्यायलं. (कर्मणी प्रयोग)

भिणे : तो भ्याला / भ्यायला. (कर्तरी प्रयोग)

म्हणाला: तो म्हणाला. (कर्तरी प्रयोग)

त्याने गाणं म्हटलं. (कर्मणी प्रयोग)

| **शिक्षक / शिक्षिका** | **विद्यार्थी / विद्यार्थिनी** |
|---|---|
| उदा॰ मी – पाणी (पिणे) | |
| मी पाणी प्यालो / प्यायलो. | मी पाणी प्यालो / प्यायलो. |
| मी – सरबत | मी सरबत प्यालो / प्यायलो. |
| आम्ही – चहा | आम्ही चहा प्यालो / प्यायलो. |
| आपण – कॉफी | आपण कॉफी प्यालात / प्यायलात. |
| तू – दूध | तू दूध प्यालास / प्यायलास. |
| तुम्ही – नारळपाणी | तुम्ही नारळपाणी प्यालात / प्यायलात. |

सराव

### १५ पुढील वाक्ये पूर्ण करू या.

उदा. सुनीता विशाखाशी लंगडी (खेळणे) खेळली.

१. विनयने अरविंदकडे चेंडू (टाकणे) ............................................ .

२. नितीन विवेकशी दुसऱ्या दिवशीच्या कामाविषयी (बोलणे) ............................................ .

३. शोभाने तलावातून चेंडू (काढणे) ............................................ .

४. अक्षयचा चेंडू तन्मयने (हरवणे) ............................................ .

५. शोभाने अक्षयला चेंडू परत (देणे) ............................................ .

### १६ खालील तीन वाक्ये वाचू या आणि काय लक्षात येते ते सांगू या.

| | | |
|---|---|---|
| त्याने फोन विकला. | त्याने खुर्ची विकली. | त्याने घर विकले. |

काय लक्षात आले? सामान्य भूतकाळात ............................................ प्रमाणे क्रियापद बदलते.

### १७ चार मित्रांच्या सहली

**नीलेश, आश्विन, ऋजुता आणि हेमांगी अगदी जवळचे मित्र. दिवाळीच्या सुट्टीत चारही जणांनी चार वेगवेगळ्या सहली केल्या आणि एकमेकांना पुढील ई-मेल पाठवले.**

**१. खालील ई-मेल वाचून क्रियापदे अधोरेखित करू या.**

क. प्रिय मित्रांनो,



मी कालच एका खूप छान सहलीवरून परत आलो. आम्ही सर्व काल सकाळी सिंहगडावर गेलो आणि संध्याकाळी परतलो. पुण्याहून गाडीने सिंहगडाच्या पायथ्याशी जायलाच २ तास लागले. आम्ही पायीच वर चढलो, खूप दमलो पण खूप खूप मजा आली. महेश घसरून पडला; नशिबाने काही जास्त लागले नाही. वाटेत झुणका-भाकर खाल्ली आणि थंडगार ताजे ताक



प्यायलो. तलावातील गोड पाण्याची चव घेतली. गडावर टिळकांचं घर पाहिलं, तानाजी मालुसरे यांची समाधी पाहिली. पुण्यात याल तेव्हा तुम्हीही नक्की सिंहगडाला भेट द्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती करून घ्या.

भेटूच.

नीलेश

ख. मित्रांनो,

तुम्ही कधी हॉट एअर बलूनमधून प्रवास केलाय का? नाही ना? अरे, मी कालच हा अनुभव घेतला, गोव्यामध्ये. काय, जळलात ना? जेव्हा माझ्या मावसभावानं मला विचारलं की तुला माझ्याबरोबर यायचंय का, तेव्हा माझ्यासाठी ही खूपच मोठी संधी चालून आली. मी तर उडालोच – आधी आनंदाने आणि मग फुग्यातून! वरून गोव्याचं काय छान दृश्य दिसलं म्हणून सांगू! मी खूप फोटो काढले. दाखवीनच!

भेटू लवकरच.

अश्विन







ग. हाय,

कसे आहात मित्रांनो? तुम्हा दोघांची मेल पाहिली. मी आणि ऋजुता इथे केरळात ऋजुताच्या मावशीकडे मज्जा करतोय. एक रात्र तर हाउसबोटीवर घालवली. कसली धम्माल आली! बोट पाण्यावर झुलत होती आणि कोणी तरी आमचा पाळणा हलवतंय असं वाटत होतं. आणि इथला निसर्ग तर किती सुंदर आहे! उगीच नाही केरळला "गॉडस् ओन लँड" म्हणत!

सुट्टी लवकरच संपेल.

मग भेटू.

हेमांगी आणि ऋजुता

२. वरील ई-मेल्समध्ये काही क्रियापदे निळ्या रंगात आहेत. खालील तक्त्यात त्या क्रियापदांचे मूळ रूप लिहू या.

| क्रियापदाचे वाक्यातील रूप | क्रियापदाचे मूळ रूप |
|---|---|
| उदा० खाल्ली | खाणे |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

## १८ संवाद पूर्ण करू या.

▶अ०पु० ४-९

उदा० अभिजित : दमलो बुवा!
गौरी : काय झालं?

(सकाळी मोटरमननी अचानक पगारवाढ मागणे आणि आंदोलन पुकारणे, मोटरमनने गाडी पुढे नेण्यास नकार देणे, सगळे मोटरमन ट्रॅकवर बसणे, त्यांनी उठण्यास नकार देणे, प्रवाशांनी मोटरमनशी भांडणे, काहींनी मारामारी करणे आणि गाडीची तोडफोड करणे, काही अधिकाऱ्यांनी मोटरमनना समजावणे, पण मोटरमननी न ऐकणे.)








**१९ आईच्या सूचना. खालील संभाषण ऐकू या आणि मन्याचे संवाद पूर्ण करू या.**


खोली स्वच्छ करणे


भाज्या आणणे


वाचणे


साफसफाई करणे


मोतीला फिरायला नेणे


स्वयंपाक करणे


झाडांना पाणी घालणे

मन्या : हॅलो, आई, परत फोन केलास? अगं, दहा मिनिटांअगोदर केला होतास नं तू फोन? आता काय झालं?

आई : हॅलो, मन्या, हो रे! घरी पोहोचलास का हे विचारायचं होतं. मित्राच्या घरी गेला होतास ना?

मन्या : हो, आलोय मी घरी. तू तिथे सुट्टीवर जाऊनही तुझा अर्धा जीव घरात अडकला आहे.

आई : चूप रे! किती बोलशील तुझ्या आईला ! मग, काय केलंस दुपारभर?

मन्या : ............... आणि तेवढ्यात तुझे शंभर फोन येऊन गेले.

आई : काय रे मन्या तूपण! बरं, फ्रीजमधल्या भाज्या संपल्या असतील. ............... का?

मन्या : आणल्या, गं!

आई : छान केलंस. आणि हो, ............................... ना? तुझी ............................... होती तुला.

मन्या : माहितेय मला. मी घराची...

आई : आणि हो, विसरण्याच्या आत सांगते. ............................... का? कोमेजतील रे नाहीतर ह्या उकाड्यात.

मन्या : आई SSS, माहीत आहे मला. मी झाडांना...

आई : आणि तुझ्या जेवणाचं काय? ............................... का रात्रीचा?

मन्या : अगं आई, मी रात्री...

आई : आणि आपल्या मोतीला विसरू नकोस. ............................... का?

मन्या : अगं, माझे आई, तेच करतोय मी. तू फोन ठेवशील तर ना. चल, मोती, आपण फिरायला जाऊ.

**म्हणी आणि वाक्प्रचार**

अति तिथे माती

ऋण काढून सण साजरा करणे

**पुणेरी चिमटा**

पुणेकर - (पाहुण्यांना) अजून बिस्किटे घ्या ना!

पाहुणे - नको हो, आधीच मी पाच खाल्ली आहेत!...

पुणेकर - तशी तुम्ही सहा खाल्ली आहेत... पण घ्या की अजून !...

इथे कोण मोजत बसलंय!

**पुणेरी पाटी**

आम्ही कधी अभ्यास केला नाही
कारण अभ्यास फक्त दोनच गोष्टींमुळे शक्य होतो.
१. आवडीने २. भीतीने
फालतू आवडी आम्ही ठेवल्या नाहीत,
भीत तर आम्ही कोणाच्या बापालाही नाही.

## संभाषण करू या.

जसा देश, तसा वेष

देशोदेशी फिरायची इच्छा असणे

सहलीची तयारी करणे

खूप खूप मजा येणे

... म्हणजे वेगळीच धमाल

उत्साह वाटणे

ताजेतवाने होणे

आम्ही काल भरभर चालणे

वेळेवर घरी पोहोचणे

चालून चालून / फिरून फिरून / खरेदी करून / ... थकून जाणे

गाडी उशिरा येणे

गाडी / बस / ... ट्रॅफिकमध्ये अडकणे

पावसामुळे वाहतूक ठप्प होणे

## २० करा आणि शिका.

▶अ.पु. १०-१९

**एका मिनिटात तुमच्या आवडत्या ठिकाणाबद्दल सांगा. ते ठिकाण तुम्हाला का आवडते? तुम्हाला कोणत्या वाहनाने प्रवास करायला आवडतो आणि का?**

## २१ चित्रफिती पाहू या.

**१. पहिल्या चित्रफितीत पुढीलपैकी कोणत्या गोष्टींचा उल्लेख केला आहे?**

या काकूंना काश्मीरला जायचं आहे, कारण :

क. खूप गरम होतंय.
ख. त्यांना खूप कंटाळा आला आहे.
ग. त्यांना त्यांच्या काश्मिरी मैत्रिणीला भेटायचं आहे.
घ. अंगाची लाही लाही होतेय.
च. अंग घामाने थबथबलंय.
छ. त्यांना काश्मिरी खाणं खायचं आहे, खाद्यपदार्थ खायचे आहेत.





**२. आता दुसरी चित्रफीत पाहू या.**

काकूंना परदेशी जायला का भीती वाटतेय ते लिहू या.

**३. तुम्ही कधी परदेशी गेलाय का? तुमच्या पहिल्या परदेशगमनाचा अनुभव कसा होता? या काकूंना पडलेत तेच प्रश्न तुम्हालाही पडले होते का? परदेशी जाताना येणाऱ्या अडचणींविषयी वर्गात चर्चा करू या.**



## शब्दसंपदा

### ८.१ नाम : ठिकाणे

| | | |
|---|---|---|
| तो देश, ते - | ती जमीन, त्या जमिनी | ते राष्ट्र, ती राष्ट्रे / राष्ट्रं |
| तो प्रदेश, ते - | ती गल्ली, त्या गल्ल्या | ते राज्य, ती राज्ये / राज्यं |
| तो रस्ता, ते रस्ते | ती वाट, त्या वाटा | ते शहर, ती शहरे / शहरं |
| तो बाजार, ते - | ती पाऊलवाट, त्या पाऊलवाटा | ते गाव, ती गावे / गावं |
| तो मॉल, ते - | ती बाग, त्या बागा | ते ठिकाण, ती ठिकाणे / ठिकाणं |
| तो गाभारा, ते गाभारे | ती इमारत, त्या इमारती | ते उद्यान, ती उद्याने / उद्यानं |
| तो कट्टा, ते कट्टे | ती कार्यशाळा, त्या - | ते पार्क, ती पार्क्स |
| तो उंबरा, ते उंबरे | ती मशीद, त्या मशिदी | ते मैदान, ती मैदाने / मैदानं |
| | | ते दुकान, ती दुकाने / दुकानं |
| | | ते हॉटेल, ती हॉटेल्स / हॉटेले |
| | | ते देऊळ, ती देवळे / देवळं |
| | | ते मंदिर, ती मंदिरे / ती मंदिरं |
| | | ते चर्च, ती चर्चेस |
| | | ते अंतर, ती अंतरे / अंतरं |







### ८.२ नाम: वाहतूक

| | | |
|---|---|---|
| तो ट्रक, ते - | ती रहदारी, - | ते बसस्थानक, ती बसस्थानके / बसस्थानकं |
| तो विमानतळ, ते - | ती कोंडी, - | ते रेल्वेस्थानक, ती रेल्वेस्थानके / रेल्वेस्थानकं |
| | ती वाहतूक, त्या वाहतुकी | ते वाहन, ती वाहने / वाहनं |
| | ती रेल्वे, त्या - | ते जहाज, ती जहाजे / जहाजं |
| | ती बस, त्या - | ते विमान, ती विमाने / विमानं |
| | ती ट्रेन, त्या - | |
| | ती गाडी, त्या गाड्या | |
| | ती मोटारसायकल, त्या मोटारसायकली | |
| | ती स्कूटर, त्या स्कूटरी | |
| | ती सायकल, त्या सायकली | |
| | ती रिक्शा, त्या - | |
| | ती टॅक्सी, त्या टॅक्स्या | |

### चिंटू




पप्पा, आपण नाताळच्या सुट्टीत ट्रिपला जाऊ या ?
हो ऽऽ जाऊ या की !
ते ट्रिपला जायला कधीही नाही म्हणत नाहीत.
पण तरीही आम्ही गेल्या दोन वर्षात ट्रिपला गेलो नाही !
© चारुहास पंडित


किती छान आहे इथे ! इथल्या लोकांची तर रोजच ट्रिप असणार !
पपा, इथले लोक ट्रिपला कुठे जातात ?
ते ना...
आपल्या शहरात येतात !
© चारुहास पंडित


आई,नूडल्स कर ना.
वेफर्स आहेत घरात?
चॉकलेट,च्युईंगम आहे का गं काही?
चिंटू,खातोयस का टीव्ही बघतोयस?
या कार्यक्रमात फारच खाण्याच्या जाहिराती दाखवतात बुवा.
© चारुहास पंडित

## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो ऋतू,ते - | ती सहल, त्या सहली | ते स्वप्न, ती स्वप्ने / ती स्वप्नं |
| तो ट्रेक, ते - | ती दुर्घटना, त्या - | ते प्रोत्साहन, ती प्रोत्साहने / ती प्रोत्साहनं |
| तो अपघात, ते - | ती समस्या, त्या - | ते प्रदूषण, ती प्रदूषणे / ती प्रदूषणं |
| तो बंब, ते - | ती खूण, त्या खुणा | |
| तो सल्ला, ते सल्ले | ती आठवण, त्या आठवणी | |
| तो उगम, ते - | ती खोली, त्या खोल्या | |
| तो मुक्काम, ते - | | |

| क्रियापद | विशेषणे | इतर शब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| खेचणे | लोभस | वाया | विविध |
| घसरणे | स्वतंत्र | माफ | क्षणभर |
| जाणणे | निर्जन | | नक्की |
| टाळणे | हताश | | |
| बाळगणे | विस्कळीत | | |
| उडणे | सडपातळ | | |
| बुडणे | | | |
| दमणे | | | |
| थकणे | | | |
| कंटाळणे | | | |
| हरवणे | | | |
| घालवणे | | | |
| हलवणे | | | |
| शिरणे | | | |
| सुटणे | | | |
| फुलणे | | | |
| दचकणे | | | |
| न्याहाळणे | | | |
| पाठवणे | | | |
| भटकणे | | | |
| साठवणे | | | |
| कळवणे | | | |







## आता मला हे येतं ...

**प्रवास, सुट्टी, सहल यांबद्दल सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**मुख्य शहरांची व पर्यटन स्थळांची माहिती सांगणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सामान्य भूतकाळ (सकर्मक)**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**विशेषनाम, सामान्यनाम, सर्वनाम, क्रियापद + शब्दयोगी अव्यय**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**-ऊन, -हून, -पासून, -पर्यंत, -कडून**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द : कोणी, कोणाशी, कुठे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**प्रश्नशब्द + शब्दयोगी अव्यय (कुठे + पर्यंत = कुठपर्यंत)**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

# नवी-जुनी पिढी

१०



## चला, शिकू या...

- ◎ नव्या-जुन्या पिढीची मते मांडणे
- ◎ सप्तमी (कोणावर, कोणात, कुठे)
- ◎ व्यक्ती आणि कामे
- ◎ व्यक्तिमत्त्व, प्रवृत्ती, राहणीमान
- ◎ नेट-नाद
- ◎ द्विकर्मक भूतकाळ

# नवी – जुनी पिढी

## १ ई-साहित्य कट्टा

‘आमच्या वेळी दिवसाला एक पुस्तक वाचून संपायचं. पुस्तकं विकत घेणं परवडायचंही नाही, म्हणून मिळेल तिथून, मिळेल ते पुस्तक घेऊन वाचायचो. त्यावर मित्रांशी चर्चा करायचो. पण इथे, वाचनाचीच बोंब! चर्चा कसल्या चालतायेत! मोबाइलमधून यांना सवड मिळेल तर ना!..’ हे असं अनेक वेळा नव्या पिढीला ऐकावं लागतंच. मुलं मोबाइलवर एवढा वेळ नेमकं काय करतात असा प्रश्न पालकांना पडणार नाही का? ‘जी साहित्यिक चर्चा आधीच्या पिढीतील मंडळी भेटून करायची, ती आम्ही इथे करतो. मोबाईलवर. आमचे साहित्यकट्टे इथे भरतात’, असे वाचनाची आवड असलेले अनेक विद्यार्थी आवर्जून नमूद करतात. असाच एक पुण्यातील व्हॉट्सॲप ग्रुप! इंजिनिअरिंग कॉलेजचे विद्यार्थी... साहित्याची आवड आणि जाण असलेली मंडळी इथे कमी असल्याने नियमित साहित्य वाचनास उत्सुक असलेल्यांचा एक ग्रुप तयार करावा असं एम॰आय॰टी॰ मध्ये शिकणाऱ्या दिशाला वाटलं. ओळखीच्या चार लोकांना सोबत घेऊन तिने हा ग्रुप तयार केला. हळूहळू त्याचा पसारा वाढला, व्याप्ती वाढली, मैत्री वाढली, ओळख झाली. आज ग्रुपमधील सदस्यांकडून नियमितपणे पुस्तकांची देवाणघेवाण चालू असते. सर्वांनाच एका वेळी प्रत्यक्ष भेटणं शक्य नसल्यामुळे वाचलेल्या पुस्तकांविषयी व्हॉट्सॲपवर तासन् तास चर्चा चालते.

## २ चर्चा करू या.

▶अ॰पु॰ १-२

**पुढची पिढी**

पुढची पिढी ही कशी अगोदरच्या पिढीपेक्षा जास्त तल्लख आहे या विषयावर बऱ्याच पालकांचं एकमत दिसतं. आपल्या मुलाचं याबाबत कौतुक करणं हा अशा प्रत्येक पालकाचा एक आवडीचा छंदच असतो. आपण जर बारकाईने निरीक्षण केलं तर ते काही अगदीच खोटं बोलताहेत असं नाही. येणारी प्रत्येक नवीन पिढी सभोवतालच्या गोष्टी इतक्या झपाट्याने शिकते, की आपल्याला त्याचं नवल वाटतं. तांत्रिक उपकरणांचा वापर करणं नवीन पिढीला अजिबात अवघड वाटत नाही याचं आश्चर्य वाटतं. मोबाईल फोन, ट्विटर, फेसबुक, ब्लू टूथ वगैरे गोष्टी त्यांच्या खेळण्यातल्या झाल्या आहेत. महत्त्वाचा प्रश्न हा उभा राहतो, की मग ही पिढी अगोदरच्या पिढीपेक्षा जास्त समजूतदार आहे का?





## ३ ‘घरभर प्रकाश’ ही कथा वाचू या.

▶अ॰पु॰ ३-४

भरतपूर नावाचे गाव होते. त्या गावात केशवराव नावाचे एक शेतकरी होते. ते शेतात सतत राबत असत. त्यांना दोन मुले होती.

एके दिवशी केशवरावांनी आपल्या मुलांना प्रत्येकी दोन रुपये दिले. मुलांना आनंद झाला. केशवराव म्हणाले, “मुलांनो, या पैशांतून तुम्ही घर भरून जाईल अशी एक वस्तू आणू शकाल का?”

“घर भरून जाईल एवढी वस्तू कशी आणायची, तीही एवढ्याशा पैशांत?” मुलांना प्रश्न पडला. त्यांना काही सुचेना. ती एका दुकानात गेली. तेथे त्यांना अनेक वस्तू दिसल्या. दोघांनी मिळून खूपखूप विचार केला. त्यांना एक कल्पना सुचली.



दोघांनी मिळून एक पणती विकत घेतली. मुले घरी आली. संध्याकाळ झाली. त्यांनी पणतीत तेल घातले. कापसाची वात लावली. पणती लावून ठेवली.

तेवढ्यात केशवराव आले. त्यांनी पाहिले, साऱ्या घरात प्रकाश भरला होता. “अरे वा! कमालच केलीत तुम्ही!” केशवराव म्हणाले.

### १. जोड्या लावू या.

| | |
|---|---|
| क. भरतपूर गावातील शेतकरी | १. पणती |
| ख. मुलांनी विकत आणलेली वस्तू | २. प्रकाश |
| ग. घरभर पसरलेला | ३. केशवराव |

### २. रिकाम्या जागा भरू या.

▶अ॰पु॰ ६-९

(आणणे, होणे, देणे, शोधणे, बोलावणे, म्हणणे, असणे, करणे)

मुले (क) ………………, “बघा बाबा, आम्ही घर भरून जाणारी वस्तू (ख)………………..”

खरेच घरभर प्रकाश पसरला (ग)………………. दोन्ही मुलांनी एकत्रित विचार

(घ) ………………, विचारलेल्या प्रश्नाचे त्यांनी उत्तर (च)………………, याचा

केशवरावांना खूप आनंद (छ)………………. त्यांनी दोन्ही मुलांना जवळ

(ज)……………… व शाबासकी (झ) ………………..

## ४ संस्कृती जपणारी नवी पिढी



नुकताच सर्वत्र गणेशोत्सव साजरा झाला. यावेळी मिरवणुकांमध्ये ढोलताशा पथकांनी लाखो भक्तांना ठेका धरायला लावला. हे ढोलताशा वाजवणारे हात तरुण-तरुणींचे होते. या हातांमध्ये तरुणाईची ऊर्जा सळसळत होती. तरुण पिढी भारतीय संस्कृतीकडे दुर्लक्ष करते असं म्हणणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या मुलांना पाहावं असं चित्र होतं.



ढोल-ताशा संस्कृती हे आपल्या कलासंस्कृतीचंच एक प्रतीक आहे. ढोल-ताशाचं लोण हळूहळू सर्व महाराष्ट्रात पसरू लागलंय. विशेष म्हणजे युवकांबरोबर युवतीही यात सहभागी होत आहेत. ढोल आणि ताशा वाजवणं या एके काळच्या फक्त पुरुषांच्या मक्तेदारीला युवती आणि स्त्रियांनी आपल्या शिस्तबद्ध व कलात्मक ढोलवादनाने आव्हान दिलं आहे.

आपली वादनकला सादर करण्याच्या निमित्ताने तरुणांमधील कलेला यावेळी वाव मिळतो, व्यासपीठ मिळतं. शिवाय त्यांच्यातली एकता आणि संघटनक्षमताही यावेळी दिसून येते. वादन पथकांमध्ये शिस्तबद्धताही असते. तरुणांना शिस्त नाही म्हणून नेहमी ओरड असते, पण तसं चित्र या ढोलताशा वादनाच्या वेळी अजिबात दिसत नाही.



आपल्या भारतीय संस्कृतीचं हे देखणं रूप आवडल्याने, संस्कृतीवर प्रेम असल्यानेच तरुण-तरुणी मोठ्या उत्साहाने यात दरवर्षी सामील होतात. पथकातील वादकांची संख्या दरवर्षी वाढते आहे. पारंपरिक पेहराव करायला देखील ही तरुण मंडळी तेव्हा विसरत नाहीत. इतर वेळी पाश्चिमात्य वेषभूषेत असणारे कित्येक जण सणावारी हमखास पारंपरिक वेषात दिसतात.



**टीप:**

सप्तमी = त / ई / आ

स्थलवाचक

उदा॰ घर = घरात / घरी / घरा

कालवाचक

उदा॰ सकाळ = सकाळी

आठवडा = आठवड्यात

पहाट = पहाटे

| पाऊस<br>भूगोलाचे शिक्षक : सांगा पाहू, महाराष्ट्रात सर्वात जास्त पाऊस कुठे पडतो?<br>बंड्या: जमिनीवर. | १. भूगोलाचे शिक्षक : सांगा पाहू, (भारत) ........................ सर्वात जास्त पाऊस कुठे पडतो?<br>२. भूगोलाचे शिक्षक : सांगा पाहू, (हिमालय) ................ सर्वात जास्त पाऊस कुठे पडतो? |
|---|---|

## ५ रिकाम्या जागा भरू या.

(गावोगावी, पानोपानी, गल्लोगल्ली, घरोघरी)

उदा॰ गावोगावी शाळा व्हाव्यात यासाठी अनेक लोक प्रयत्न करीत आहेत.

१. या पुस्तकात ........................ निसर्गवर्णने आली आहेत.

२. दिवाळीत ........................ फराळाचा वास दरवळत असतो.

३. सुट्ट्यांमध्ये ........................ क्रिकेटचे सामने रंगतात.

## ६ आजी काय काय करते? वाक्ये लिहू या.

▶अ॰पु॰ ९-१०

उदा॰ पहाट - उठणे आणि पूजा करणे : आजी पहाटे उठते आणि पूजा करते.

१. सकाळ - चहा पिणे आणि वर्तमानपत्र वाचणे

........................................................................

२. दुपार - रेडिओ ऐकणे आणि जेवणे

........................................................................

३. संध्याकाळ - बाजारात फेरी मारणे आणि भाजी आणणे

........................................................................

४. रात्र - आमच्याशी गप्पा मारणे

........................................................................

५. दर वर्ष - गावी जाणे

........................................................................

## ७ नोव्हेंबर महिन्यातील धावपळ ऐकू या आणि रिकाम्या जागी योग्य शब्द लिहू या.

नोव्हेंबर (महिना) (१) ........................आमची सगळ्यांचीच धावपळ चाललेली असते. (घर) (२) ........................ आई आणि आजीला दिवाळीचे वेध लागलेले असतात आणि (दिवाळी) (३)........................ लागणाऱ्या सामानाच्या याद्या बाबांच्या (हात) (४)........................ येऊन पडतात. (स्वयंपाकघर) (५) ........................फराळ तयार होत असतानाच आजोबांच्या (खोली) (६) ........................ मात्र एकदम शांतता असते, कारण आता आजोबा कंदील बनवण्यात अगदी मग्न झालेले असतात. माझ्या (महाविद्यालय) (७) ........................वार्षिक दिनाची तयारी चालू असली तरी माझं लक्ष मात्र (दिवाळी) (८) ........................ नवीन काय घ्यायचं यावरच असतं. आणि या (दिवस) (९) ........................ (अमेरिका) (१०) ........................ राहणाऱ्या दादाला मात्र सुट्टीचे वेध लागलेले असतात.





## ८ खालील वाक्ये वाचून कंसातील नामाचे सप्तमी रूप लिहू

▶अ॰पु॰ ११-१२

उदा॰ मी उन्हाळ्याच्या सुट्टीत नेहमी माझ्या गावी (गाव) जातो.

१. खरेच, फळांची झाडे लावायला हवीत. मी जेव्हा जेव्हा (जंगल) ........................ फिरायला जाते तेव्हा आंबा, चिकू, सीताफळ इत्यादी फळांची झाडे का नाही आढळत, हा प्रश्न कायम पडतो.
२. आपण सगळे आरंभ-शूर असतो. बिया लावू, मात्र त्या रोपांची निगा राखणे आपल्याला जमत नाही. पण निवृत्त झालेल्या लोकांनी आमच्या (कॉलनी) ........................ रोपांची काळजी घ्यायला सुरुवात केली.
३. “भाज्यांची लागवड मी सोसायटीच्या (आवार)........................च करावी असं लिहिलं आहे का कुठे?”
४. आमच्या सोसायटीतले नारळ आम्ही सोसायटीतल्या सदस्यांना विकतो आणि ते पैसे रीतसर सोसायटीच्या (खाते) ........................ जमा करतो.

## ९ ऐकू या आणि ओळखू या.

कोण आहे मी? माझे काम काय? मी कुठे सापडेन?
(डॉक्टर, नेता, परीट (धोबी), अभिनेता, कवयित्री)

| | व्यवसाय | कामाची जागा | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

## १० आय॰टी॰त नोकरी करणारा जिप्सी.

▶अ॰पु॰ १३

**रिकाम्या जागी क्रियापदाचे योग्य ते रूप लिहू या.**

ही गोष्ट अमेरिकेतल्या संदीपची. भारतातून तो तिथं (१) गे .........., तीन वर्षं मरमरून काम केलं. दोन वर्षांपूर्वी त्यानं कामाची वेळ संपतासंपता कंपनीच्या मालकाला ई-मेल (२) पाठ .........., "हा माझा राजीनामा."

मालकाचं उत्तर (३) आ.........., "का? तू आमचा चांगला कर्मचारी आहेस. तुझी कंपनीला गरज आहे. वेडेपणा करू नकोस."

संदीपनं तातडीनं रिप्लाय (४) दि .........., "मला खूप फिरायचंय. जग बघायचंय. माणसांना भेटायचंय. नोकरीत राहून ते शक्य नाही. आय॰टी॰ कंपन्यांतली माणसं लवकर म्हातारी होतात! माझंही तसंच होईल. मग दुनिया कधी बघणार?"

मालकानं सिरिअसली विचार (५) के .........., "नोकरीत राहूनदेखील तुला ते सगळं करता येऊ शकेल!" "ते कसं काय, बुवा?" संदीप.

पगार तीस टक्क्यांनी कमी आणि ऑफिसात न येता संदीपनं इंटरनेटवरूनच ऑफिसचं काम करायचं, असा प्रस्ताव मालकानं (६) मांड .......... . संदीपनं तो त्वरित मान्य (७) के .........

काही महिने तो ब्राझीलमध्ये (८) रा ......... तिथली भाषा (९) शि .......... ग्रीसमधल्या मुक्कामात तिथल्या लोकजीवनाशी एकरूप होऊन (१०) गे .......... सध्या जपानमध्ये आहे. दोन वर्षांत खूप माणसांना (११) भे ......... आणि जणू त्यांच्या कुटुंबातलाच एक (१२) झा ..........! दिवसभर फिरायचं अन् रात्री जागून ऑफिसचं काम इंटरनेटवर करायचं, असा त्याचा दिनक्रम. उत्तमोत्तम खाद्यपदार्थ त्यानं (१३) चाख .......... विविध जीवनशैली आपुलकीनं आत्मसात (१४) के .......... संदीप खऱ्या अर्थानं 'ग्लोबल' नागरिक झाला.

११ **झुम्बा. अधोरेखित केलेल्या इंग्रजी शब्दांचे अर्थ मराठीत समजावून सांगू या.**

आकाशवाणी; मुंबई केंद्राची ही आहे एफ.एम. गोल्ड वाहिनी. मी आहे अंबरी. सध्या जगभरात अनेक तरुण-तरुणींच्या ‘ट्-डू’ लिस्टमध्ये आपल्याला एक गोष्ट दिसतेय, कॉमन अशी, ती म्हणजे झुम्बा नृत्य. म्हणजे जर तुम्ही वाढत्या वजनाने स्ट्रेसमध्ये असाल किंवा जर अती स्ट्रेसमुळे तुम्हाला बोअर होत असेल, तर यासाठी झुम्बा हा नृत्यप्रकार एक उत्तम उपाय आहे. म्हणूनच या तरुण-तरुणींच्या ‘टू-डू’ लिस्टमध्ये सध्या आपल्याला झुम्बा नृत्य बघायला मिळतंय. एका आकडेवारीनुसार असं दिसून आलंय, की जगभरात आठवड्याचा एक तास साधारण एक कोटी पन्नास लाख तरुण मुलं-मुली झुम्बा हा नृत्यप्रकार करतात. असं म्हटलं जातं, की जर तुम्ही एक तास हा एक्झरसाईज केलात किंवा हा नृत्यप्रकार केलात तर वेट लॉससाठी मदत होते. मला वाटतं, म्हणूनच सध्या तरुण-तरुणींमध्ये हा नृत्यप्रकार आवडीचा झालेला आहे, त्यामुळे सध्या आपल्याला बऱ्याचदा ऐकायला येतं की, ‘या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मी झुम्बा शिकणार आहे,’ किंवा, ‘मी झुम्बाचे क्लासेस लावले आहेत,’ किंवा, ‘इथे आमच्या घराजवळच झुम्बाचे क्लासेस आहेत.’ तेव्हा तुम्हीसुद्धा विचार करत असाल तर नक्की या. कुठलाही नृत्यप्रकार करण्यात आनंदच असतो. तेव्हा, आनंदही साजरा करा आणि त्याचबरोबर जर तुम्हाला बारीक व्हायलाही मदत होत असेल तर नक्कीच हा नृत्यप्रकार करून बघायला हरकत नाही.

१२ **वाचू या.** ▶अ.पु. १४

आईची मम्मी झाली
चवीची यम्मी झाली
बदलाचं फॅड झालं
वडिलांचं डॅड झालं
पतंगाचं काइट झालं
विमानाचं फ्लाईट झालं
कावळ्याचं क्रो झालं
भुवईचं ब्रो झालं
पोळीचं फ्रँकी झालं
रुमालाचं हँकी झालं
भाताचं राईस झालं
छानचं नाईस झालं
श्शी चं शिट झालं
सामानाचं किट झालं
स्थानकाचं स्टेशन झालं
नात्याचं रिलेशन झालं
तिथेच मोठा गोंधळ झाला
विनाकारण घोळ झाला
शांतीचं पीस झालं
नि बहिणीचं सिस झालं
प्रत्येक मोठं छोटं झालं
नि खऱ्याचंही खोटं झालं
प्रत्येक क्षण झुरणं आलं
जगणंसुध्दा मरणं झालं
यावरती उपाय काही
नुसतं रडणं उपाय नाही
एक उपाय आहे त्यावर
पहिलं तुझं रडणं आवर
सदा सर्वदा प्रसन्न राहा
मग काय होईल पाहा
अरे तुझी भाषा बदलेल
मातृभाषेतच आशा जन्मेल...
**-डॉ. संजय उपाध्ये**

## १३ नवी स्वप्ने. वाचू या.

सोळावे किंवा सतरावे वर्ष म्हणजे आयुष्यातील एक महत्त्वाचे वळण. शाळा सोडून कॉलेजमध्ये जाण्याची वेळ. नवनवीन स्वप्ने पाहण्याचे दिवस. कोणती स्वप्ने पाहतात आजचे तरुण आणि तरुणी? आयुष्याकडून त्यांना काय हवे असते?

उदा० अनघाला हवाईसुंदरी व्हायचं आहे.

१. सिमरन (विमानचालक) :

२. अपेक्षा (सॉफ्टवेअर इंजिनीअर) :

३. आदिल (समाजसेवक) :

४. सुमित (राजकारणी) :







## १४ खालील पाटीतील चुका शोधू या.



# १० नवी - जुनी पिढी

**१५ गेल्या आठवड्यात विनयने नागपुरात काय काय केले ते सामान्य भूतकाळात लिहू या.**

उदा॰ सोम. - १०.०० - डॉक्टर - अपॉइंटमेंट - असणे.
सोमवारी १० वाजता माझी डॉक्टरकडे अपॉइंटमेंट होती.

१. मंगळ. - ५.३० - क्रिकेटचा सराव करणे

.......................................................................

२. बुध. - सरिताबरोबर - जेवणे

.......................................................................

३. गुरु. - १.४५ - चर्चासत्र - भाग घेणे

.......................................................................

४. शुक्र. - ३.३० - चित्रपट बघणे

.......................................................................

५.शनि. - दि. १५ - गाण्याचा क्लास - जाणे

.......................................................................

६. रवि. - दि. १६ - सुट्टी असणे

.......................................................................







**१६ शब्दसाखळी : 'तू आज काय काय केलेस?' उत्तरांची साखळी बनव.** ▶अ॰पु॰ १५

विद्यार्थी १

मी आज
सकाळी नऊ
वाजता उठलो.

विद्यार्थी २

मी आज सकाळी
नऊ वाजता उठलो.
मग कॉफी प्यायलो.

विद्यार्थी ३

मी आज सकाळी नऊ
वाजता उठलो. मग कॉफी
प्यायलो. नंतर अंघोळ केली.

## १७ करा आणि शिका

**१. पत्ते तयार करू या. कमीतकमी १२ जोड्या बनवू या आणि एक पत्ता कोरा ठेवू या. खालील उदाहरणे पाहू या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मी पळत आहे. | मी पळाले | तो चित्र रंगवत आहे. | तो चित्र रंगवतो. |

**२. तीन जणांचा गट करून खेळू या.**

उजवीकडच्या खेळाडूचे एक पान ओढू या. जसजशा जोड्या बनत जातील तसतशा त्या खाली टेबलावर टाकू या आणि मोठ्याने वाचू या. खेळाच्या शेवटी ज्याच्याकडे कोरे पान राहील तो गाढव!

| म्हणी / वाक्प्रचार | |
|---|---|
| जुनं ते सोनं | उडाला तर कावळा, बुडाला तर बेडूक |

### भूतकाळ : द्विकर्मक क्रियापदे

### Past Tense: Verbs with Two Objects

| द्विकर्मक क्रियापदे (कर्ता आणि कर्म दोन्हींना प्रत्यय लागतो, क्रियापद नेहमी तृतीय पुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी असते.) | | |
|---|---|---|
| कर्ता + प्रत्यय | कर्म + प्रत्यय | क्रियापद (तृ॰ पु॰ नपुं॰ ए॰ व॰) |
| शेतकऱ्याने | बैलाला | बांधले / बांधलं |
| गुरवाने | गाईला | |
| आजोबांनी | कुत्र्याला | |
| रमाने | बकरीला | |
| आईने | शेळीला | |

| द्विकर्मक | | | |
|---|---|---|---|
| | | | क्रियापद (मुख्य कर्माप्रमाणे) |
| रंगाऱ्याने | खुर्चीला | रंग | दिला |
| गिरिजाने | झाडाला | पाणी | दिले / दिलं |
| भावाने | घड्याळाला | चावी | दिली |

व्याकरण

| सर्वनाम | कर्म | क्रियापद (कर्माप्रमाणे) |
|---|---|---|
| मला | विषय | समजला |
| आम्हाला | | |
| तुला | | |
| त्यांना | बातमी | समजली |
| त्याला | | |
| तिला | | |
| त्याला | गणित | समजले / समजलं |
| त्यांना | | |





१८ खालील कोष्टके पूर्ण करू या.

**निघणे - निघाला**

| सर्वनामे | क्रियापद | | | |
|---|---|---|---|---|
| | निघणे- निघाला | बुडणे- बुडाला | उडणे- उडाला | पळणे- पळाला |
| मी (पु॰) | | | | |
| मी (स्त्री॰) | | | | |
| आम्ही / आपण | | | | |
| तू (पु॰) | | | | |
| तू (स्त्री॰) | | | | |
| तुम्ही / आपण | | | | |
| तो | | | | |
| ती | | | | |
| ते | | | | |
| ते | | | | |
| त्या | | | | |
| ती | | | | |

फिरणे - फिरला

| सर्वनामे | क्रियापद | | | |
|---|---|---|---|---|
| | फिरणे - फिरला | शिरणे - शिरला | विझणे - विझला | शिकणे - शिकला |
| मी (पु॰) | | | | |
| मी (स्त्री॰) | | | | |
| आम्ही / आपण | | | | |
| तू (पु॰) | | | | |
| तू (स्त्री॰) | | | | |
| तुम्ही / आपण | | | | |
| तो | | | | |
| ती | | | | |
| ते | | | | |
| ते | | | | |
| त्या | | | | |
| ती | | | | |

भिणे - भ्याला

| सर्वनामे | क्रियापद |
|---|---|
| | भिणे - भ्याला |
| मी (पु॰) | |
| मी (स्त्री॰) | |
| आम्ही / आपण | |
| तू (पु॰) | |
| तू (स्त्री॰) | |
| तुम्ही / आपण | |
| तो | |
| ती | |
| ते | |
| ते | |
| त्या | |
| ती | |

उठणे - उठला

| सर्वनामे | क्रियापद | | |
|---|---|---|---|
| | उठणे - उठला | फुलणे - फुलला | सुटणे - सुटला |
| मी (पु०) | | | |
| मी (स्त्री०) | | | |
| आम्ही / आपण | | | |
| तू (पु०) | | | |
| तू (स्त्री०) | | | |
| तुम्ही / आपण | | | |
| तो | | | |
| ती | | | |
| ते | | | |
| ते | | | |
| त्या | | | |
| ती | | | |

क्रियापद 'म्हणणे' :

टीप :

'म्हणणे' या क्रियापदाची भूतकाळात दोन रूपे आहेत.

- एक कर्त्याप्रमाणे वागणारे - मी म्हणालो, ती म्हणाली, तुम्ही म्हणालात...
- दुसरे कर्माप्रमाणे वागणारे - मी कविता म्हटली, त्याने गाणे म्हटले, आपण श्लोक म्हटला...




### १९ खालील उतारा वाचून क्रियापदाचे योग्य रूप लिहू या.

इतक्या लहान मुलांना सांभाळण्याची ती माझी पहिलीच वेळ होती. थोडा वेळ बरा गेला; पण नंतर त्या भावंडांचे काय करावे ते मला कळेना. मग मी सहजच (म्हणणे)

(क) ......................................., "गाणं म्हणून दाखव ना!"

हा प्रस्ताव मुलाला फारच पसंत पडला. त्याने (गाणे) (ख)....................................... (म्हणणे)

(ग) .......................................

"मला कवितादेखील येते," तो (म्हणणे) (घ)....................................... . मग त्याने कविता (म्हणणे)

(च) ....................................... . आता त्याला चेवच चढला होता; पण त्याच्या बहिणीने त्याला थांबवले.

"आता तू!" ती मला (म्हणणे) (छ) ....................................... .

"मी? मला नाही येत काही."

"खोटं! 'मी तुमच्यापेक्षा हुशार आहे,' असं तूच मघाशी (म्हणणे) (ज)....................................... . आम्ही कशी पटापट गाणी(म्हणणे) (झ) ......................................., कविता (म्हणणे) (ट) ......................................., पाढे (म्हणणे) (ठ) ....................................... . आता तू काही (म्हणणे) (ड) ....................................... नाहीस तर..."

"कट्टी!" करंगळी पुढे करून दोघेही एका सुरात (म्हणणे) (ढ)....................................... .

**पुणेरी चिमटा**

**घर आवरताना सासूला सुनेचा बायोडाटा सापडला.**
**लग्न जुळवणाऱ्या मध्यस्थाला देण्यासाठी तो कधीकाळी तयार केला होता. 'आवड' या सदरात सुनेने लिहिले होते, 'स्वयंपाक करण्याची भयंकर आवड'...**
**पक्क्या पुणेरी सासूबाईंनी त्यात दुरुस्ती केली, 'भयंकर स्वयंपाक करण्याची आवड (!)'**

| शिक्षक / शिक्षिका | विद्यार्थी / विद्यार्थिनी |
|---|---|
| उदा॰ मी - चेंडू (देणे) | |
| मी चेंडू परत दिला. | मी चेंडू परत दिला. |
| मी - पैसे | मी काल संतोषला पैसे परत दिले. |
| आम्ही - वही | आम्ही वह्या शिक्षकांना तपासायला दिल्या. |
| आपण - फाईल | आपण फाईल परत दिलीत. |
| तू - डबा | तू महेशला डबा परत दिलास. |
| तुम्ही - घड्याळ | तुम्ही अभिजितला घडयाळ दिलेत. |

## २० करा आणि शिका.

**उजळणी - थोडी गंमत**

हा खेळ गटात खेळायचा आहे. तीन-चार जणांचा एक गट बनवू या. सर्वांनी मिळून एक छोटासा प्रसंग किंवा एक लहानशी गोष्ट तयार करायची आहे. खाली काही शब्द दिले आहेत. घडून गेलेल्या घटना सांगताना काळाचा विचार करू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकदा | इतका | तेव्हा | केवढा | मग |
| त्यानंतर | कारण | अगदी | जितका - तितका | शेवटी |

आता गटातील एकाने पहिला शब्द वापरून एक वाक्य लिहायचं आणि त्याच्या सहकाऱ्याकडे द्यायचं.

मग त्याने दुसरा शब्द वापरून गोष्ट पुढे न्यायची.

इतर सहकारी काय लिहीत आहेत याचा विचार करायचा नाही. तुम्हाला जे सुचेल ते लिहायचं. फक्त वर दिलेले शब्दच वापरावेत असं नाही. विशेषणे/ क्रियाविशेषणे / तुम्हाला माहीत असलेले शब्द वापरा.

## २१ नवीन पिढी बिघडलेली आहे - मत व्यक्त करू या.

▶अ॰पु॰ १६-३३

**पुणेरी चिमटा**

आम्ही पुणेकर काय असेल ते स्पष्टपणे आणि बाणेदारपणे सांगतो. आता हेच पाहा ना...
मुंबईकर सासूने नव्या सुनेला विचारले-
'तुला 'किचन'मध्ये काय येते?'
पुणेरी सून शांतपणे उत्तरली- 'कंटाळा!'

## २२ चित्रफीत पाहू या.

**१. पहिला भाग (०.४६) पाहू या आणि खालील प्रश्नांची उत्तरे देऊ या.**

क. “आज्ञी, तू बोल, आपण कोर्ट मॅरेज करू”, हे बोलणे कोणाच्या लग्नाविषयी चालले आहे?

ख. मुलाचा व्यवसाय काय आहे?

ग. सावित्रीने एम.बी.बी.एस. ला प्रवेश का घेतला नाही?

**२. दुसरा भाग पाहू या आणि हे कोण बोलत आहे हे सांगू या.**

| वाक्य | सावित्री | सत्यप्रकाश | आजी | आई |
|---|---|---|---|---|
| क. होकार देण्यापूर्वी मला मुलासोबत राहून बघायचं आहे. | | | | |
| ख. सत्यप्रकाश आणि सावित्रीचं जुळणं किंवा न जुळणं यापेक्षा हा प्रयोग (एक्सपेरिमेंट) होणं जास्त गरजेचं आहे. | | | | |
| ग. बायको किंवा सून म्हणून जुळवून घेण्यापूर्वी समजून घेण्याची एक तरी संधी मिळायला हवी. | | | | |
| घ. होऊन होऊन काय होणार आहे? मुलगा नाही तर मुलगी! | | | | |
| च. हा प्रयोग झाला तर मी पंख्याला टांगून जीव देईन. | | | | |
| छ. तुला अशी चित्रं काढावीशी वाटतायत कारण तुझ्यात हार्मोन्स निर्माण होतायत. | | | | |

**३. हा या चित्रपटाचा केवळ ट्रेलर होता. पूर्ण चित्रपट पाहायला तुम्हाला आवडेल का? आणि का?**

**४. ‘लग्न करायचं की नाही हे ठरवण्यासाठी आधी एकत्र राहून बघणे’ या कल्पनेविषयी तुमची काय मतं आहेत? याविषयी आपल्या वर्गमित्राशी चर्चा करू या व एकमेकांची मतं वर्गासमोर मांडू या.**

**म्हणी आणि वाक्प्रचार**

साठी बुद्धी नाठी

सोळावं वरीस धोक्याचं

माकडाच्या हाती कोलीत

# १० नवी - जुनी पिढी

**संभाषण साधू या.**

एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न करणे
एकमेकांशी संवाद साधण्याची तयारी दाखवणे

नव्या - जुन्या पिढीत मतभेद होणे

अनुभवाचे बोल बोलणे
आपलेच भलेबुरे दाखवणारा आरसा
भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे.

नवी पिढी बिघडली
हे जरा अतीच आहे
नाही तर उगीच / उगाच माझ्यावर चिडेल
मोबाइलमधून यांना सवड मिळेल तर ना...

व्यक्तिगत प्रगती होणे
व्यक्तिगत वाढ / व्यक्तिमत्त्व विकास करता येणे
अस्वस्थ होऊन येरझाऱ्या मारणे

याचं मला आश्चर्य / नवल वाटतं
याचं मला कौतुक वाटतं

**शब्दसंपदा**

**नामे : भाववाचक आणि इतर नामे**

| | | |
|---|---|---|
| तो अभिनय, - | ती सवड, त्या सवडी | ते अभिवादन, ती अभिवादने / अभिवादनं |
| तो स्वभाव, ते - | ती मदत, - | ते राष्ट्रीयत्व, ती राष्ट्रीयत्वे / राष्ट्रीयत्वं |
| तो आदर, - | ती उत्सुकता, - | ते बळ, - |
| तो पाठिंबा, - | ती खुशाली, - | ते धैर्य, - |
| तो आराम, - | ती मजा, - | ते वेड, ती वेडे / वेडं |
| तो विश्वास, - | ती मौज, त्या मौजा | ते आश्चर्य, ती आश्चर्ये / ती आश्चर्यं |
| तो ताण, ते - | ती अवस्था, त्या - | ते स्वप्न, ती स्वप्ने / ती स्वप्नं |
| तो आवाज, ते - | ती झोप, त्या झोपा | ते उद्दिष्ट, ती उद्दिष्टे |
| तो विनोद, ते - | ती भेट, त्या भेटी | |
| तो त्रास, ते - | ती प्रार्थना, त्या - | |
| तो उद्देश, ते - | ती तयारी, त्या तयाऱ्या | |
| | ती दौड, त्या दौडी | |
| | ती शिवी, त्या शिव्या | |

शब्दसंपदा

## चिंटू


ही नवीन पिढी फार स्मार्ट आहे !
हो ना ! त्यांच्या पुढे आपण बावळटच वाटतो.
ते बहुतेक माझ्याबद्दलच बोलत असावेत.
© चारुहास पंडित


आज शाळेत जाऊ नको?
का ? परवा तर म्हणला होतास एकही दांडी मारणार नाही.
त्या आधी म्हणाला होतास रोज सकाळीच अभ्यास करेन. दप्तर आवरून ठेवेन.
रोज व्यायाम करेन, लवकर उठेन, अंघोळ करूनच शाळेत जाईन.
जातो शाळेत.
माझ्या विरूध्दचे खूप मुद्दे त्यांच्याकडे आहेत !
© चारुहास पंडित


सतीशदादाला बोलवूया खेळायला ?
डिव्हीडी प्लेअरचा आवाज मोठा येतोय. म्हणजे नक्कीच तो घरी अभ्यास करत असेल !
बघ, काय म्हणालो होतो !
z z z
© चारुहास पंडित


दूध प्यायलंय...अंघोळ केलीय...गृहपाठ झालाय... डबा-वॉटरबॅग घेतलीय...
...अभ्यासाची सगळी पुस्तकं घेतलीयत... शाळेतून थेट घरीच येईन.
अय्या, रोज एवढं सगळं विचारते मी त्याला ?
© चारुहास पंडित

# नवी – जुनी पिढी



## दृष्टिक्षेप

### नाम

| | | |
|---|---|---|
| तो फराळ, ते - | ती प्रवृत्ती, त्या- | ते राहणीमान,ती राहणीमाने / राहणीमानं - |
| तो मालक, ते - | ती पणती, त्या पणत्या | ते व्यक्तिमत्त्व, ती व्यक्तिमत्त्वे / ती व्यक्तिमत्त्वं |
| तो पगार, ते - | ती मिरवणूक, त्या मिरवणुका | ते उपकरण, ती उपकरणे / ती उपकरणं |
| तो प्रस्ताव, ते - | ती मक्तेदारी, त्या मक्तेदाऱ्या | ते पथक, ती पथके / ती पथकं |
| तो दिनक्रम, ते - | ती गरज, त्या गरजा | ते रूप, ती रूपे / ती रूपं |
| तो खाद्यपदार्थ, ते - | ती नोकरी, त्या नोकऱ्या | ते चर्चासत्र, ती चर्चासत्रे / ती चर्चासत्रं |
| तो राजीनामा, ते राजीनामे | ती शुद्धी | ते वळण, ती वळणे / ती वळणं |
| तो नागरिक, ते - | ती बुद्धी- | ते माध्यम, ती माध्यमे / ती माध्यमं |
| तो नृत्यप्रकार, ते - | ती तालीम, त्या तालमी | |
| तो उपाय, ते - | ती पद्धत, त्या पद्धती | |
| तो नाद, ते - | ती सोबत, त्या सोबती | |
| तो धोका, ते धोके | ती देवाणघेवाण, त्या देवाणघेवाणी | |
| तो तरुण, ते - | ती क्षमता, त्या - | |
| तो निकाल, ते - | | |
| तो परीट, ते - | | |
| तो हक्क, ते - | | |
| तो रंगारी, ते - | | |
| तो सुरुंग, ते - | | |
| तो आवाका | | |
| तो तांत्रिक, ते - | | |
| तो वेध, ते - | | |

| क्रियापद | विशेषणे | प्रश्नशब्द | क्रियाविशेषण |
|---|---|---|---|
| परवडणे | समजूतदार | कशाची | झपाट्याने |
| राबणे | महत्त्वाचा | | कल्पकतेने |
| दरवळणे | शिस्तबद्ध | | मरमरून |
| पोहोचणे | कलात्मक | | मरमर |
| मिसळणे | स्वच्छ | | अगोदर |
| मांडणे | बदनाम | | तातडीने |
| चाखणे | एकत्रित | | नुकताच |
| रंगवणे | एकरूप | | दरवर्षी |
| विसावणे | उत्तमोत्तम | | हमखास |
| | सारे | | कायम |
| | | | कुठे तरी |

## आता मला हे येतं ...

**नव्या-जुन्या पिढीची मते मांडणे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**सप्तमी (कोणावर, कोणात, कुठे)**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्यक्ती आणि कामे**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**व्यक्तिमत्व, प्रवृत्ती, राहणीमान**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**नेट-नाद**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

**द्विकर्मक भूतकाळ**

☐ उत्तम ☐ चांगलं ☐ जेमतेम ☐ फारच कमी

## पाठ्यपुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित संवाद, उतारे इ.
## Transcripts of Audios in the Textbook

**पाठ : मागील भागात**

**१८.१ काय चाललंय?**

आई : ए मन्या, आज तुम्ही कोणता चित्रपट बघायला जाताय रे सगळेजण?

मन्या : आज आम्ही सगळेजण 'सैराट' बघायचा विचार करतोय.

बाबा : अरे, विचार करतोय असं का म्हणतोयस तू?

मन्या : म्हणजे बाबा, आमचं अजून नक्की काही ठरत नाहीये ना!

आई : चित्रपट बघायला जाणार म्हणजे सबंध दिवस वाया जाणार. मग अभ्यासाचं काय तुझ्या?

मन्या : काय गं आई! हे काय, मी आत्ता अभ्यास करतोय ना पूर्ण माझा!

बाबा : झालं तर मग. अभ्यास पूर्ण करतोयस ना? मग ठीक आहे.

आई : अहो, ठीक आहे काय! अजून ४ दिवसांनी परीक्षा आहे.

मन्या : आई, मी आत्ता परीक्षेचा अभ्यासच करतोय, अगं! बाबा, तुम्ही बघताय काय नुसते असे!

बाबा : म्हणजे? आता काय झालं?

मन्या : अहो, काय झालं म्हणून काय विचारताय तुम्ही? आता मी चित्रपट बघायला जाणार म्हणजे मला पैसे नकोत का द्यायला?

बाबा : अरे हो! माझ्या हे लक्षातच नाही आलं. जरा थांब हं, मी देतोय तुला पैसे.

मन्या : थँक्यू, बाबा! आई, मी येतो गं!

**पाठ १ : प्रसारमाध्यमे**

**१५. मोलकरीण**

मोलकरीण गेली गावाला, नको-नको म्हणताना
याद तिची येते खूप, सर्व कामे करताना

दूध उतू जाताना, ओटा पुसून घेताना
घराला झाडू मारताना, धुणे वाळत घालताना

टॉमीला फिरायला नेताना, झाडांना पाणी देताना
फिश टँक धुताना, रात्री दाराला दुधाची पिशवी लावताना

जेव्हा पाहिली एके दिवशी,मोलकरीण घरी येताना
डोळ्यांमध्ये भरले पाणी, तिला दार उघडताना

| पाठ २ : आरोग्य |
|---|
| **४.१ रविवारची दुपार**<br>नवरा : चार वाजलेत. चहा करू का?<br>बायको : नको! तू फार गोड करतोस चहा.<br>नवरा : दुपारची भांडीही तशीच पडली आहेत. आपण घासू या का?<br>बायको : मी नाही घासणार भांडी. माझी पाठ दुखतेय.<br>नवरा : कपड्यांना इस्त्रीपण केलेली नाही.<br>बायको : मी नाही करणार, माझं डोकं दुखतंय.<br>नवरा : मी करू का इस्त्री?<br>बायको : नाही, नको! तुला नाही जमणार!<br>नवरा : आणि घर कधी आवरणार तू? की मी आवरू?<br>बायको : मी काहीही आवरणार नाही. माझी तब्येत बरी नाही.<br>नवरा : मग मी काय करू?<br>बायको : माझं डोकं चेपणार का? नको. त्यापेक्षा मला एक कप चहा करून दे. |
| **९.१ डॉक्टर आणि पेशंट यांच्यातील संवाद**<br>डॉक्टर : बोला, काय झालंय? काय होतंय?<br>पेशंट : डॉक्टर, मला ताप आला आहे.<br>डॉक्टर : किती आहे?<br>पेशंट : दीड / दोन.<br>डॉक्टर : कधीपासून?<br>पेशंट : कालपासून आहे.<br>डॉक्टर : पावसात भिजलात का?<br>पेशंट : नाही.<br>डॉक्टर : आता मी तुम्हाला या गोळ्या देतो, त्या दोन दिवस घ्या. याने ताप गेला नाही, तर आपल्याला रक्ताची तपासणी करावी लागेल.<br>पेशंट : डॉक्टर, काही गंभीर नाही ना?<br>डॉक्टर : नाही; पण तुम्ही आराम करा. बाहेर जाऊ नका. आणि दोन दिवसांनी मला सांगा.<br>पेशंट : धन्यवाद, डॉक्टर. |

| पाठ ३ : आवडनिवड |
|---|
| **१०.१. क. असा हवा जोडीदार!**<br>रिया : आता कॉलेज संपलं. आपण रोज भेटणार नाही, नाही का! प्रत्येक जण वेगळ्या दिशेला जाईल. आज अनघा तर किती गंभीर झालीये!<br>अनघा : अगं, आईनं एकदम माझ्या लग्नाचाच विषय काढला आज. मी तर त्याचा काहीच विचार केलेला नाही.<br>रिया : पण मग कर ना विचार! कसा हवा तुला जोडीदार?<br>रचना : खरंच! हा विचार करायला हवा. मला तर मस्त जॉन अब्राहमसारखा जोडीदार हवा. जबरदस्त!<br>रिया : मला तर चांगला रग्गड पैसेवाला हवा. मी काही नोकरीबिकरी करणार नाही हं! माझं हिंडणं-फिरणं, छंद आणि समाजसेवा यात काही आडकाठी आली नाही म्हणजे झालं.<br>निकिता : मी परवाच आईला सांगितलं, तू माझ्यासाठी मुलगा बघू नकोस. माझ्या विचारांशी मिळताजुळता मला भेटेल, तेव्हाच मी लग्नाचा विचार करेन.<br>अनघा : हे एवढं सगळं ठरलंय तुमचं? मला जोडीदार कसा हवा सांगू? एकदम कूल. बिनधास्त! त्याच्याबरोबर असताना माझाही आत्मविश्वास वाढला पाहिजे.<br>रोहित : जोडीदाराच्या गप्पा चालल्यात? व्वा! आपल्याला तर खूप छान ॲक्टिव्ह मुलगी हवी. कुठेही जायला तयार आणि एकदम बिनधास्त हवी. माझ्याबरोबर सगळीकडे तिने यायला पाहिजे. माझ्या कामात तिलाही रस हवा.<br>मोहित : आणि मग स्वयंपाक कोण करेल?<br>रोहित : दोघं मिळून करू. त्याचं काही एवढं नाही. मला सहचरी हवी आहे, नुसतीच नावाला बायको नको.<br>निकिता : अरे व्वा! असा विचार सगळ्यांनीच केला तर काही प्रश्नच उरणार नाही. रोहित, तुझं अभिनंदन! |
| **१६.१ ऐकू या.**<br>सरिता : मीनाकाकू!<br>मीनाकाकू : अगं सरिता, तू! इकडं कुठं?<br>सरिता : घड्याळ दुरुस्तीला टाकलंय ते घ्यायला आलेय. काय गं, सौरभला स्कॉलरशिप मिळाल्याचं कळवलं नाहीस! कुठं चाललाय, आणि कधी? मला भेटायचंय त्याला. न भेटता गेला तर कट्टी करीन हं! |

| पाठ ३ : आवडनिवड | |
|---|---|
| मीनाकाकू : | अगं, अजून पत्र आलं नाहीये हातात म्हणून कळवण्याची घाई केली नाही. आणि तसा अवकाश आहे अजून. पुढच्या महिन्यात निघेल तो. |
| सरिता : | फ्रान्सला नं? मस्त! त्याला फ्रेंचपण येते? |
| मीनाकाकू : | म्हणून तर मिळालीये स्कॉलरशिप. त्याचं सगळं नक्की झालं की मीच त्याला घेऊन येईन तुझ्याकडे, चालेल? |
| सरिता : | चालेल. काही मदत लागली तर सांग. |
| मीनाकाकू : | नक्की! |

**पाठ ४ : नातेसंबंध**

**१४.१ रिकाम्या रंगमंचावर एक तरुण अस्वस्थ होऊन येरझाऱ्या घालतोय. हा आधुनिक पोशाखातला सूत्रधार आपल्या प्रियेची, म्हणजे नटीची वाट पाहतोय.**

पहिली घंटा द्यायची वेळ झाली आणि हिचा अजून पत्ता नाही. 'ही' म्हणजे माझी अनेक शतकांपासूनची सखी, प्रिया. आताच्या काळात नाटकाचा प्रयोग वेळेवर सुरू करणं किती महत्त्वाचं असतं! पण माझ्या या प्रियेला अजूनही त्याचा पत्ताच नाहीये. घरातून वेळेवर निघावं, रंगमंदिरात वेळेवर पोहोचावं, झटपट रंग लावून तयार व्हावं आणि प्रसन्न चेहऱ्यानं प्रेक्षकांचं स्वागत करावं ही सूत्रधाराची - म्हणजे माझी - पद्धत. प्रिया वेळेवर न आल्यामुळं काही तरी माकडचेष्टा करून मी रसिक प्रेक्षकांचं मन रमवावं, आणि हिनं मात्र उशीर करून माझा अंत पाहावा! इतकी शतकं झाली तरी हे असंच चालू आहे. बरं, उशीर तरी कशामुळं व्हावा? आरशामुळं! हिला वेषभूषा करायला किती वेळ लागावा, त्याला काही सुमारच नाही! माणसानं किती बेजबाबदार असावं आणि किती बेशिस्त वागावं! इतका राग येतो म्हणून सांगू! वाटतं, सरळ निघून जावं. इथून नाहीसंच व्हावं. चांगली अद्दल घडवावी. छे:! नाही जमत. तिचा निरागस चेहरा डोळ्यांसमोर आला की सगळं अवसान गळून पडतं. किती झालं तरी प्रिया आहे ती माझी! एखादं भयंकर संकट तर तिच्यावर कोसळलं नसेल? छे:! फोनमध्येही बॅलन्स नाही! ही एकविसाव्या शतकातील संकटं! काय बरं करावं?... हां, थोडा वेळ त्या विंगेत लपून बसावं. ती येईल तेव्हा इथं मी नाही, हे पाहून ती कशी कावरीबावरी आणि कासावीस होईल ते पाहावं. मस्त मजा येईल...

**पाठ ५ : आनंदतरंग**

**१०. आई, आज डब्यात काय दिलंयस?**

आई : चिनू, चल लवकर, खाऊन घे, बसची वेळ झाली.
चिनू : आई, आज काय केलंयस खायला?
आई : केलेत पोहे. चल बरं आता लवकर!
चिनू : मला नको जा पोहे! मला पिझ्झा हवाय.
आई : चिनू, जास्त हट्ट करू नकोस हं! डब्यात दिलाय पिझ्झा.
चिनू : खरा खरा पिझ्झा का मराठी पिझ्झा? मागे नाही का, तू मला थालीपीठ दिलंस डब्यात आणि म्हणालीस, मराठी पिझ्झा आहे!
आई : हो गं, मराठी पिझ्झाच दिलाय. तोच जास्त पौष्टिक असतो!
चिनू : काय गं! सगळ्या हसतात मला. पण आई, पोह्यांना काय म्हणू गं मी इंग्रजीत?
आई : सांग, म्हणावं, स्पाईसी राईसफ्लेक्स खाल्ले मी ब्रेकफास्टला!

**पाठ ६ : भाषा**

**६. ईशा पंडितची मुलाखत**

मुलाखतकार : 'युवातरंग'मध्ये आपण जर्मन भाषेच्या क्षेत्रात काही तरी करू पाहणारी आणि यश मिळवणारी ईशा पंडित हिच्याशी गप्पा करणार आहोत. हॅलो, ईशा!
ईशा : हॅलो!
मुलाखतकार : तुझं 'युवातरंग'मध्ये खूप खूप स्वागत आहे.
ईशा : धन्यवाद!
मुलाखतकार : मी आताच सांगितलं सगळ्या श्रोत्यांना, की तू जर्मन भाषा शिकते आहेस.
ईशा : हो.
मुलाखतकार : आजकाल खरं म्हणजे सगळ्यांची आवड खूप वेगवेगळी असते, आणि काही लोक एखादी भाषा खूप लवकर अवगत करू शकतात.
ईशा : बरोबर.
मुलाखतकार : पण एखादी परदेशी भाषा शिकणंही खूप अवघड गोष्ट आहे, असं मला वाटतं. तर, तू जर्मन भाषा शिकायला कधी सुरुवात केलीस?
ईशा : मी दहावीच्या सुट्टीमध्ये सुरुवात केली. म्हणजे दहावीची सुट्टी झाली, आणि सलग चार महिन्यांची सुट्टी; तर तेव्हा मला वाटलं, की अरे, आता आपण काय करायचं या सुट्टीत? तर तेव्हा मी सुरू केलं जर्मन शिकायला. ॲक्च्युली आमच्याजवळ एक ताई आहे, ती तेव्हा जर्मन शिकायची.

मुलाखतकार : बरं!

ईशा : म्हणजे तिने रुपारेल कॉलेजमध्ये अकरावी-बारावीमध्ये जर्मन घेतलं होतं, मराठी किंवा हिंदीच्या ऐवजी.

मुलाखतकार : बरं!

ईशा : तर त्याच्यामुळे आम्हाला कळलं, की अरे, हेपण एक क्षेत्र आहे. इकडे आपण काहीतरी करू शकतो. तर म्हणून मी सुरुवातीला मजा म्हणूनच जर्मन शिकायला सुरुवात केली. आणि तेव्हापासून ते आतापर्यंतही मला असंच वाटतंय, की हा प्रवास माझा, जर्मन लँग्वेजमधला, कधीही संपू नये.

मुलाखतकार : अरे वा! परदेशी भाषासुद्धा वेगवेगळ्या असतात. त्यातलीच फक्त जर्मन तू त्या ताईमुळे शिकायला लागलीस, की तू इतर भाषांविषयीही जाणून घेतलं होतंस? 'ही भाषापण आहे, ती भाषापण आहे, पण मला जर्मन बरी वाटते.' कारण प्रत्येकाच्या व्याकरणापासून सुरुवात करावी लागते, कुठलीही भाषा शिकण्यासाठी. तर त्यातल्या त्यात तुला जर्मन भाषा सोपी वाटली का, व्याकरणाच्या अँगलने?

ईशा : मला असं वाटतं, हा खूप मोठा योगायोग आहे माझ्या आयुष्यातला, की मी जर्मन शिकायला सुरुवात केली.

मुलाखतकार : बरं!

ईशा : तर मला असं वाटतं, आपल्या ओळखीच्या सर्कलमध्ये लोक जे काही करतात ना, तेच आपल्याला करावंसं वाटतं कधी कधी. आता नेमकं तिने जर्मनच घेतल्यामुळे मला वाटलं की चला, ही करतेय तर आपणही करू या.

मुलाखतकार : हं हं!

ईशा : म्हणजे जर ती जापनीज शिकली असती, किंवा दुसऱ्या कोणीही, माझ्या ओळखीच्या सर्कलमध्ये, जापनीज, स्पॅनिश शिकलं असतं, तर कदाचित मी तेही केलं असतं.

मुलाखतकार : बरं, बरं!

ईशा: कारण तेव्हा मला काही एक्सपोजर असं नव्हतं, की आता हे जर्मनपण आहे, आपण स्पॅनिशपण शिकू शकतो, किंवा जापनीज, आणि मला हेही माहिती नव्हतं, की जर्मन शिकल्यावर आपण काय काय करू शकतो?

मुलाखतकार : हं हं!

ईशा: पण मी एक एक्सपेरिमेंट करायचा विचार केला, की शाळेमध्येही मला मार्क चांगले होते भाषांमध्ये वगैरे. तर चला; हिंदी, मराठी, संस्कृत केलं, आता जर्मनपण शिकून बघू या.

मुलाखतकार : बरं! पण, असं कधी वाटलं नाही, जर्मन शिकत असताना, की अरे बाप रे, हे फारच अवघड आहे! म्हणजे मी जो विचार केला होता, त्याच्यापेक्षा हे खूप अवघड आहे, तर मग नको शिकायला, असं कधी वाटलं होतं?

ईशा : हो, म्हणजे पहिलाच माझा क्लास होता ना जर्मनचा, तो अविस्मरणीय होता.

मुलाखतकार : बरं!
ईशा : म्हणजे मी क्लासमध्ये शिरल्यानंतर त्या टीचरने एकदम लगेच जर्मनमध्येच बोलायला सुरुवात केली.
मुलाखतकार : हं हं!
ईशा : म्हणजे मला वाटलं, अरे बाप रे! हे काय होतंय? कारण हे विश्व एकदम वेगळं होतं.
मुलाखतकार : हो, हो.
ईशा : आणि इकडे जशी भाषा शिकवली जाते, तशी आपल्या शाळेमध्ये नाही शिकवली जात. कारण मला आठवतंय, मराठीचा तास होता आमच्या शाळेत. त्या बाईंनी सांगितलं, टेक्स्टबुक उघडा, कविता आहे पहिली, तुम्ही वाचायला सुरुवात करा, मी अर्थ सांगते तुम्हाला. तर तसं इकडे नाही झालं.
मुलाखतकार : बरोबर, बरोबर.
ईशा : म्हणजे ती जर्मनमध्येच शिकवायची, आणि आम्ही इंग्लिशमध्ये किंवा कुठल्याही आमच्या मातृभाषेत विचारलं, तर ती अजिबात उत्तर नाही द्यायची.
मुलाखतकार : हंऽऽ!
ईशा : म्हणजे ती आम्हाला भाग पाडायची जर्मनमध्येच उत्तर द्यायला.
मुलाखतकार : बरोबर.
ईशा : तर, हा प्रवास खूपच वेगळा असल्यामुळे आधी वाटलं अवघड, कारण एकदम नवीन भाषा आहे आणि लगेच कळत नाही. पण त्या टीचरने ते खूप सोपं करून आम्हाला दिलं. आम्हाला काही शब्द कळायचे नाहीत, तर ती बोर्डावर त्याची चित्रं काढायची.
मुलाखतकार : हं!
ईशा : पण कधीही तिने ट्रान्सलेट नाही केलं इंग्लिश किंवा मराठीमध्ये.
मुलाखतकार : बरोबर, बरोबर. कदाचित काही विद्यार्थ्यांना शाळांमध्येसुद्धा या भाषा शिकवल्या जातात.
ईशा : हो, हो.
मुलाखतकार : तर, त्यामुळे ते थोडेसे तयारी करून आलेले असतात.
ईशा : नक्कीच.
मुलाखतकार : आणि तो विचार बहुतेक शिक्षकांचा असावा जर्मन शिकवणाऱ्या, की त्यांना थोडं माहिती आहे, तर तुम्ही त्यांच्या लेव्हलपर्यंत पोचावंत आणि त्याच्यासाठी कष्ट हे करावेच लागणारेत.
ईशा : हो, पण माझ्या वर्गात असं कोणी नव्हतं, ज्यांनी आधी जर्मन केलेलं.
मुलाखतकार : बरं!
ईशा : कारण जर्मन ही भाषा फार कमी शाळांमध्ये शिकवली जाते बेसिकली आणि तीही फक्त काही कॉलेजेसमध्ये. फक्त २-३ कॉलेजेस आहेत मुंबईत,तिथे अकरावी-बारावीमध्ये जर्मन भाषा शिकवली जाते.

**पाठ ७ : दैनंदिन व्यवहार**

**१६.५ एक मुलाखत**

अर्जदार : नमस्कार.

मुलाखत घेणारे अधिकारी : नमस्कार, बसा.

अर्जदार : धन्यवाद.

मुलाखत घेणारे अधिकारी : आपलं नाव?

अर्जदार : मी सतीश भोईर.

मुलाखत घेणारे अधिकारी : तुमचा रेझ्युमे दाखवता का?

अर्जदार : हो, ही घ्या फाईल. यात माझा रेझ्युमे आणि इतर सर्व दाखले आणि प्रमाणपत्रं आहेत.

मुलाखत घेणारे अधिकारी : स्वतःविषयी थोडक्यात माहिती देऊ शकाल?

अर्जदार : हो, मी मूळचा मालवणचा. माझं प्राथमिक शिक्षण तिथेच झालं.

मुलाखत घेणारे अधिकारी : तुमचं कॉलेज तर मुंबईचं दिसतंय!

अर्जदार : हो, माझ्या वडिलांची बदली मुंबईला झाली, त्यामुळे आम्ही मुंबईत आलो. मग विरारच्या कॉलेजमधून बी॰एस॰सी॰ केलं, रसायनशास्त्रात. दुसरा वर्ग मिळाला मला.

मुलाखत घेणारे अधिकारी : आणि मग त्यानंतर बी॰एड॰ कुठून केलंत?

अर्जदार : तेही 'विरार एज्युकेशन'मधूनच केलं.

मुलाखत घेणारे अधिकारी : तुम्हाला एकूण १५ वर्षांचा शिकवण्याचा अनुभव आहे. कुठे कुठे नोकरी केलीत तुम्ही?

अर्जदार : मी एकूण ३ शाळांमध्ये नोकरी केली आहे.

मुलाखत घेणारे अधिकारी : काय काय शिकवलंत?

अर्जदार : मी मुख्यतः रसायनशास्त्र शिकवलं. याखेरीज ५वी आणि ६वीला गणितही शिकवत होतो.

मुलाखत घेणारे अधिकारी : इतर कोणते विषय तुम्ही शिकवू शकाल?

अर्जदार : चित्रकलेच्या परीक्षा दिल्या आहेत मी. खालच्या वर्गांना चित्रकला शिकवू शकतो मी. तसंच कबड्डीचा संघनायक होतो, शाळेत असताना.

मुलाखत घेणारे अधिकारी : छान. शिक्षक म्हणून तुमची स्वतःची बलस्थानं कोणती आहेत असं तुम्हाला वाटतं?

अर्जदार : मी मुलांमध्ये छान मिसळू शकतो असं मला वाटतंआणि खेळीमेळीच्या वातावरणात वर्ग चालतो माझा.

मुलाखत घेणारे अधिकारी : आणि आपण कुठे कमी पडतो असं तुम्हाला वाटतं?

अर्जदार : मुलं माझ्याशी फारच जवळीक करतात असं मला वाटतं. जरा कडक शिक्षक होणं जमायला हवं मला.
मुलाखत घेणारे अधिकारी : ठीक आहे. सरकारी नियमांप्रमाणेच आम्ही पगार आणि इतर सवलती वगैरे देतो.
तुम्हाला काही इतर प्रश्न विचारायचेत?
अर्जदार : नाही.
मुलाखत घेणारे अधिकारी : ठीक आहे. साधारण एका आठवड्यात आम्ही तुम्हाला आमचा निर्णय कळवूच. नमस्कार.
अर्जदार : नमस्कार.

**पाठ ८ : करावे तसे भरावे**

**५.१ आम्रयोग**

आंबा प्रथम हातांनी खावा. त्याला थोडं आंजारावं, गोंजारावं. त्याच्या त्या नितळ सालीवरून हात फिरवावा. डेखापासून चोचीपर्यंत एक हळुवार मींड घ्यावी. त्याच्या नकट्या नाकाचं थोडं कौतुक करावं. मग तो धुतला नाही तरी चालेल. आंबा हा स्वभावतःच स्वच्छ असतो, एखाद्या अजाण, निरागस पोरासारखा. मग त्याच्याशी थोडं बोबडं बोलावं. एकदा तरी हवेत उडवून हलक्या हाताने झेलून घ्यावं. मग मनामध्ये मंत्र पुटपुटावा, 'झेलला तरी चेंडू नव्हे, तोलला तरी माल नव्हे, सोलली तरी साल नव्हे, कच्चा म्हणून कैरी नव्हे आणि खाल्ला म्हणून वैरी नव्हे.' मग आंबा डोळ्यांनी खावा, डोळ्यांच्या जवळ न्यावा, डोळ्यांवरून फिरवून घ्यावा. त्याच्या रंगात रंगून जावं. मग त्याला नाकानं खावं, त्याच्या वासात विरून जावं. - **गो॰ वि॰ करंदीकर**

**६.२ बसस्टॉप**

माझी बस नेहमी एक किंवा दोन मिनिटांनी चुकते. आजही असंच झालं. पण त्यामुळेच मला तो दिसला. खूप वर्षांनी बघितल्यामुळे मी त्याला थोडा वेळ ओळखलंच नाही. काही क्षणांनी माझ्या लक्षात आलं, की मी त्याला बऱ्याच वर्षांनी पाहते आहे. मधल्या काळात तो खूप बदलला होता. पण तरीही मला त्याची ओळख पटली. थोड्या वेळाने मला आमची शेवटची भेट आठवली. तेव्हाही आम्ही बसस्टॉपवरच भेटलो होतो. प्रथम आमच्या भेटी दर दोन दिवसांनी होत. नंतर दोन आठवड्यांनी होऊ लागल्या आणि मग काही महिन्यांनी. आणि आता तर आम्ही बऱ्याच वर्षांनी भेटत होतो. मी त्याला ओळखलं, पण त्याने मला ओळखलं की नाही हे मला कळलं नाही.

| पाठ ९ : भ्रमंती |
| --- |

**१९. आईच्या सूचना**

मन्या : हॅलो, आई, परत फोन केलास! अगं, दहा मिनिटांअगोदर केला होतास नं तू फोन? आता काय झालं?

आई : हॅलो, मन्या, हो रे! घरी पोहोचलास का हे विचारायचं होतं. मित्राच्या घरी गेला होतास ना?

मन्या : हो, आलोय मी घरी. तू तिथे सुट्टीवर जाऊनही तुझा अर्धा जीव घरात अडकला आहे.

आई : चूप रे! किती बोलशील तुझ्या आईला! मग, काय केलंस दुपारभर?

मन्या : वाचत होतो. आणि तेवढ्यात तुझे शंभर फोन येऊन गेले.

आई : काय रे मन्या, तूपण! बरं, फ्रीजमधल्या भाज्या संपल्या असतील. मार्केटमधून भाज्या विकत आणल्यास का?

मन्या : आणल्या, गं!

आई : छान केलंस. आणि हो, घराची साफसफाई केलीस ना? तुझी खोलीही स्वच्छ करायची होती तुला.

मन्या : माहितेय मला. मी घराची...

आई : आणि हो, विसरण्याच्या आत सांगते; झाडांना पाणी घातलंस का? कोमेजतील रे नाहीतर या उकाड्यात.

मन्या : आईऽऽऽ, माहीत आहे मला. मी झाडांना...

आई : आणि तुझ्या जेवणाचं काय? स्वयंपाक केलास का रात्रीचा?

मन्या : अगं आई, मी रात्री...

आई : आणि आपल्या मोतीला विसरू नकोस! त्याला फिरवायला नेलंस का?

मन्या : अगं, माझे आई, तेच करतोय मी. तू फोन ठेवशील तर ना! चल, मोती, आपण फिरायला जाऊ.

| पाठ १० : नवी जुनी पिढी |
| --- |

**९. ऐकू या आणि ओळखू या.**

कोण आहे मी? माझे काम काय? मी कुठे सापडेन?

(डॉक्टर, नेता, परीट / धोबी, अभिनेता, कवयित्री)

१. माझे काम पाणी आणि साबण यांशिवाय होतच नाही. सर्वांनाच माझी गरज पडते. सर्वांना स्वच्छ कपडे मिळावेत असा माझा प्रयत्न असतो.

२. मला बरेच लोक देवाच्या जागीच मानतात. मी दिवसरात्र सेवा करतो. या जागी पोहोचण्यासाठी मला खूप अभ्यास करावा लागला आहे.

३. मी स्वप्नात रंगते. शब्द माझे सोबती आहेत. माझं काम करताना मला कशाचीही शुद्ध नसते.
४. माझं काम लोकांना आवडलं तर ते माझे चाहते बनतात. नाव, पैसा, प्रसिद्धी यांचा वर्षाव होतो. काही लोक तर माझी देवळंही बांधतात.
५. मी लोकांसाठी काम करतो. मी कधी खूप लोकप्रिय तर कधी खूप बदनाम होतो. मला खूप बोलावं लागतं आणि लोकांमध्ये मिसळावं लागतं.

# Photo Credits

## Cover Page

Sammati Balgi

Arya Kasture

Jiyoung Woo

Juilee Vaidya

Shrinidhi Kini

## Others

Ankita Deshpande

Mandar Deshpande

Trupti Choudhary

Sonalee Hardikar

Parineeta Dandekar

Manjiri Joshi

Chittaranjan Bhat

Anand Jadhav

Sayali Palande Datar

Dr. Mandar Dharmadhikari

Anjali Chipalkatty

Mitali Khargonkar

Kaustubh

Reshma Barve

Bhalchandra

Marathi Textbook for beginners Level 2:

- Creative exercises, tests, glossary & answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the Language
- For young & adult learners
- For classroom study as well as self learners
- Language skills, understanding, speaking, reading, writing Marathi

The Set Contains:

1. A Textbook
2. A Workbook
3. Marathi glossary
4. DVD (with audio & audio-visual content)

   Online access link: https://mu.ac.in/mymarathi2

मुंबई विद्यापीठ

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

ISBN 978-93-5291-443-2

INR1250 | $25 | €20
(For the complete set of Textbook, Workbook, Glossary and 1 Free DVD)

https://www.learn-marathi.com rmvs.maharashtra.gov.in